म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
स. नं. [illegible]

मराठी

# शिवराज-भूषण

तिवारी

REFBK-0004490
REFBK-0004490



महाकवि भूषण

Art Press Lucknow.

॥ ॐ नमश्चंडिकायै ॥

काव्यकिरणमाला—किरण १० वा.

1035
स-काव्य
0-632

मराठी

# शिवराज भूषण.

भूषण कविकृत हिंदी अलंकारिक
ग्रंथाचें रूपांतर

लेखक
दु० आ० तिवारी, जळगांव.

संग्रहालय ठाणे
1120

संपादक व प्रकाशक
मि० का० भोरटके, जळगांव.

REFBK-0004490

मुद्रक
नामदेव माधव नेमाडे.
श्रीकृष्ण प्रिं. प्रेस,—जळगांव.

एप्रिल १९३१

किंमत २ रुपये.

ग्रंथ कर्त्यानें सर्व हक्क आपल्या
स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रकाशकाचें निवेदन.

श्रीयुत तिवारी कविकृत 'मराठी शिवराजभूषण' हा ग्रंथ काव्यकिरणमालेचा दहावा किरण ह्मणून प्रसिद्ध होत आहे. छत्रपतींच्या दरबारीं असलेले हिंदी कविराज भूषण ह्यांनीं 'शिवाबावनी' ह्मणून जें वीररसाचें उत्कृष्ट काव्य लिहिलें त्याचेंही तिवारीकविकृत मराठी रूपांतर याच मालेंतून 'शिवप्रताप' या नांवानें यापूर्वीं प्रकाशित झालें. (किरण ६ वा) आणि आतां त्याच हिंदी वाग्भूषणाच्या काव्यकीर्तीचा केवळ मेरुमणि असा 'शिवराज भूषण' ग्रंथ मराठी काव्य स्वरूपांत आम्ही आमच्या वाचकांच्या हातीं देत आहों.

हा अलंकारिक ग्रंथ असून अलंकारांच्या लक्षणांपुढें जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं शिवचरित्रांतील महत्वाचे प्रसंग शोधून त्यांच्या वर्णनाचीं दिलीं आहेत. हीं उदाहरणें ह्मणजे भूषणासारख्या सत्यवाक् कवीनें प्रत्यक्ष पाहून लिहिलेला इतिहास होय. हिंदुपदपातशाई स्थापन करणाऱ्या ज्या महाभागाच्या नामोच्चाराबरोबर अखिल महाराष्ट्र पुलकित होऊन उठतो त्याचें शौर्य, धैर्य, धाडस, साहस स्वधर्माभिमान स्वदेशभक्ति, दातृत्व, औदार्य इत्यादि गुणांचीं मूर्तिमंत चित्रें शिवराजभूषणांत पहावयास मिळतील. महाराष्ट्रीय जनतेस शिवछत्रपतींच्या यशोमंदिरांतील हें एक नवेंच दालन तिवारी कवींनीं उघडून दिलें असें आह्मी समजतों.

आनंद व आश्चर्य वाटावयास लावणारी गोष्ट अशी कीं, भूषण कवि कान्यकुब्ज ब्राह्मण, तिवारीही कान्यकुब्ज ब्राह्मण. ते कश्यपगोत्री तिवारी, हेही कश्यप गोत्री तिवारी. ते उत्तर प्रांतांचे रहिवाशी, हेही तिकडचेच. दोघांची मातृभाषा हिंदी व दोघेही वीररसाचे कवि तेव्हां भूषणांच्या तेजस्वी कवितांचें मराठी रूपांतर तज्जातीय व तद्गोत्रीय

अशा तिवारींनींच महाराष्ट्रास अर्पण करावें हा योग मोठा अपूर्व आहे. भूषण व तिवारी या दोघां कवींचें हें साम्य लक्षांत घेऊन महाराष्ट्राचे सहसंपादक श्री. माडखोलकर हे तिवारी-कृत मराठ्यांचीं संग्रामगीतें या पुस्तकावरील परीक्षणांत ह्मणतातः– “ मराठ्यांच्या इतिहासांतील उदात्त किंवा अद्भुत प्रसंगांवर इतकीं कवनें महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याही कवीनें लिहिलेलीं नाहींत. त्या दृष्टीनें तिवारी यांनीं हीं वीर-रसपूर्ण संग्रामगीतें लिहून केवळ मराठी वाङ्मयाचीच नव्हे तर मातृ-भूमीचीही स्पृहणीय सेवा केली आहे. यांत शंका नाहीं. **सतराव्या शतकांत उदयोन्मुख स्वराज्यसंस्थापकांच्या विमल यशाचे पोवाडे उत्तर हिंदुस्थानांतून आलेल्या भूषण कवीनें गायिले. आज विसाव्या शतकांत अस्तंगत झालेल्या मराठशाहीच्या पुण्यप्रतापी स्मृति जागृत ठेवावयालाही त्याच भूषण कवीचा एक देशबंधू पुढें यावा, हा योगायोग किती सूचक आहे ?...** ......मुसलमानी सत्तेच्या सर्वंकष लाटेला जर यशस्वी प्रतिरोध कोणी केला असेल तर तो फक्त महाराष्ट्रानें ! अशा राष्ट्राच्या अतुल कर्तृ-त्वाचे पोवाडे गाण्याची स्फूर्ति कोणास होणार नाहीं ? **परंतु त्या सत-राव्या शतकांत काय किंवा या विसाव्याही शतकांत काय, महाराष्ट्राच्या पुण्यप्रतापाचे पोवाडे गावयाला कवि काव्य-कुञ्जांतून यावा लागला !** ”

तिवारी कवींनीं ‘ मराठ्यांचीं संग्रामगीतें ’ लिहून महाराष्ट्राच्या शौर्यवीर्याचें स्वतः काव्य-गान केलेंच परंतु आपला देशबंधु व जातिबंधु यानेंही केलेलें महाराष्ट्र–भूपालाचें यशोवर्णन मराठी रसिकांपुढें ‘ शिव-प्रताप ’ व ‘ शिवराजभूषण ’ या पुस्तकांच्या रूपानें ठेविलें. या योगें ते भूषणभूत झाले आहेत असें कोण ह्मणणार नाहीं ?

आमच्या मालेला असा हा अप्रतिम ग्रंथ लाभल्यानें आह्मास अत्यंत आनंद झाला आहे. या पुस्तकाची छपाई वाचकांच्या सोई

करितांच मूळासह करावी लागली. सौंदर्याकरितां यांत चित्रेंही घातलीं. अशा या पुस्तकाची १॥ रु. किंमत अधिक आहे असें वाटणार नाहीं. आमच्या वाचकांचें समाधान हेंच आमचें समाधान आहे आणि मालेचें कतृत्व पाहून महाराष्ट्रानें तिजविषयीं काढलेले प्रशंसनीय उद्गार यांत आमचें श्रम—साफल्य आहे.

मालेच्या ग्राहकांच्या हातीं हें पुस्तक दिलें ह्मणजे एकूण सुमारें ६ रु. किं. चीं पुस्तकें होतील. ग्राहकांस मालेचीं सर्व पुस्तकें पाऊण-पट किंमतीस द्यावयाचीं या नियमानें ४॥ रु. किंमतीचीं पुस्तकें त्यांच्या हातीं दिलीं. मालेची वर्गणी ५॥ रु. तींतून ।॥- पोस्ट खर्च वजा जातां ४॥।- रु.चीं पुस्तकें ग्राहकांस द्यावयाची पैकीं ४॥ रु. चीं दिलीं गेलीं. आतां ग्राहकांचे फक्त ८४ आमच्याकडे राहिले. काव्यकिरणमाला उत्कृष्ट काव्य-प्रकाशनाचें आपलें कार्य चालूच ठेवणार आहे. तेव्हां ग्राहकांस आमचा जो प्रामाणिक अनुभव आला असेल तो लक्षांत घेऊन त्यांनीं आपला आश्रय नव्या वर्गणीच्या रूपानें कायम ठेवावा. इतर रसिकांना आह्मी विनंती करितों कीं त्यांनीं मालेचे ग्राहक होऊन साह्य करावें.

जळगांव.<br>वर्ष प्रतिपदा.<br>शके १८५१

पि. का. भोरटके.

# कविराज भूषण.

हिंदी साहित्यांत भूषणाचें नांव ठाऊक नाहीं अशी व्यक्ति क्वचितच आढळेल. हिंदी भाषा ही वीर, रौद्र व भयानक या रसांना अनुकूल भाषा आहे. तिच्या साहित्याच्या इतिहासास जेथून आरंभ होतो त्या कालचा पहिला काव्य ग्रंथ 'पृथ्वीराज रासो' हा वीररस प्रधानच आहे. भाषेच्या या वीररसानुकूल अशा स्वाभाविक गुणानें तिच्यांत वीररसाची विपुल कविता निर्माण होणें साहजिक आहे. हें जरी खरें तरी वीररसाची उत्कृष्ट कविता लिहून ज्यांनीं हिंदी सारस्वतांत आदराचें स्थान मिळविलें आहे असे सत्कवि 'भूषण' हेच होत. भूषणापूर्वी होऊन गेलेल्या व त्यानंतरही झालेल्या कोणाही कवीची कविता भूषणाच्या कवितेची बरोबरी करूं शकत नाहीं. आम्हा महाराष्ट्रीयांस विशेष आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट ही कीं, जी ही भूषण-कविता हिंदी वाङ्मयांत आज २५० वर्षे झालीं चमकून राहिली आहे ती सर्व हिंद-स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांवरची आहे. भूषण हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदरीं राजकवि म्हणून होते. त्यांनीं छत्रपतींवर 'शिवराज-भूषण' व 'शिवाबावनी' हे दोन उत्कृष्ट ग्रंथ लिहून ठेविले आहेत. त्यांपैकीं शिवाबावनी याचें भाषांतर प्रस्तुत लेखकानें 'शिवप्रताप' या नांवानें दोन वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलें आणि आज शिवराज भूषणाचें भाषांतर प्रसिद्ध होत आहे.

सत्कवि भूषण यांचा पूर्व वृत्तांत, त्यांचें शिवरायाकडे आगमन वगैरे विवेचन जरी आम्ही शिवप्रतापांत केलें असलें तरी या ग्रंथाच्या वाचकांकरितां त्याचें उद्घाटन करणें अवश्य आहे. भूषण कवीच्या चरित्रांतील कांहीं गोष्टींसंबंधीं निरनिराळ्या लेखकांचीं निरनिराळीं मतें आहेत. तीं सर्व विचारांत घेऊन आमचीं निश्चित मतें आम्ही साधार देत आहोंत.

# कवीचा जीवनवृत्तांत.

कानपूर जिल्ह्यांत यमुना नदीच्या कांठीं त्रिविक्रमपूर म्हणून जें गांव आहे तें भूषण कवीचें जन्मस्थान होय. याचा परगणा व डाकखाना घाटमपूर आहे. बीरबलासारख्या अकबराच्या महामंत्र्याचा जेथें जन्म झाला तो ' अकबरपूर बिरबल ' नांवाचा कसबा त्रिविक्रमपुराजवळच आहे. त्रिविक्रमपुरांत रत्नाकर त्रिपाठी ( तिवारी[1] ) नांवाचे कश्यप गोत्री कान्यकुब्ज ब्राह्मण रहात असत. त्यांना चार पुत्र झाले. चिंतामणि, भूषण, मतिराम आणि नीलकंठ ( उपनाम–जटाशंकर ) हे चौघेही बंधु नामांकित कवि ह्मणून प्रसिद्धीस आले. या चौघांनीं आपल्या कवित्व गुणानें राजाश्रय मिळविला. एकाच पित्याच्या चौघा पुत्रांनीं ' सत्कवि ' ह्मणून लौकिक मिळविल्याचें असें उदाहरण इतरत्र क्वचितच सांपडेल.

या चौघांबंधूंत भूषण हे विशाल प्रतिभेचे कवि ह्मणून गाजले. भूषण कवींनीं स्वतःविषयींची माहिती याच पुस्तकांत पुढीलप्रमाणें दिली आहे.

दुज कनौज कुल कस्यपी, रतनाकर सुत धीर ।
बसत त्रिविक्रमपुर सदा तरनि-तनूजा-तीर ॥ १ ॥
बीर बीरबरसे जहां उपजे कवि अरु भूप ।
देव विहारीश्वर जहां विश्वेश्वर तद्रूप ॥ २ ॥

भूषण कवींनी रचिलेल्या ग्रंथापैकीं शिवराजविषयक दोन ग्रंथांचा निर्देश वर केलाच आहे. त्याखेरीज छत्रसालदशक व कांहीं स्फुट कविता एवढाच चतुर्विध भाग त्यांच्या उपलब्ध कवितांत संकलित आहे. ह्यांशिवाय भूषणहजारा, भूषणउल्लास, दूषणउल्लास हेही ग्रंथ त्यांनीं लिहिले होते परंतु आज ते उपलब्ध नाहींत, ही खेदाची गोष्ट आहे. ते जर उपलब्ध झाले तर पुष्कळ अज्ञात गोष्टींवर प्रकाश पडणार आहे.

1 कान्यकुब्ज ब्राह्मणांतील त्रिपाठी कुलशब्दाचा ' तिवारी ' अपभ्रंश आहे. त्याचप्रमाणें द्विवेदी याचें दुबे, मिश्र याचें मिसर वगैरे रूपें झालीं आहेत.

भूषण कवींचा जन्म इ. स. १६१५ च्या सुमारास झाला आणि इ. स. १७१५ पावेतों ते हयात होते असें ह्मणण्यास आधार आहेत. यावरून शतोत्तर आयुष्याचें भाग्य या कवीश्वरास लाभलें होतें हें स्पष्ट आहे. भूषणजी प्रथम अगदीं अनभ्यासी होते ही गोष्ट लोकविश्रुत आहे. त्यांचे वडील बंधु चिंतामणी हे औरंगजेबाच्या दरबारीं सत्कवि ह्मणून गाजत असतां भूषणजी घरीं बसून भावाच्या कमाईवर पोट भरून मौज करीत होते. एकेदिवशीं जेवतांना त्यांनीं आपल्या भावजाई जवळ मीठ मागितलें तेव्हां तिनें क्रोधानें उत्तर दिलें कीं, "हो तुह्मी बरेंचसें मीठ कमाऊन ठेविलें आहे ना, कीं, मी तें उचलून आणूं!" भावजाईच्या मुखांतील ही वक्रोक्ती ऐकून भुषणजीस अत्यंत विषाद उत्पन्न झाला. त्यांनीं त्याचक्षणीं तोंडांतील घास उगळून टाकिला आणि तिला ह्मटलें "ठीक! आतां मीठ कमाऊन आणूं तेव्हांच येथें जेवावयास येऊं." इतकें बोलून घराबाहेर पडलेल्या या हिंद शारदा भक्तानें सरस्वतीची खडतर उपासना करून आठ दहा वर्षांत 'विद्वान' ही पदवी प्राप्त करून घेतली व ते चांगल्या प्रकारची कविता करूं लागले. भूषणजीस कवितादेवी प्रसन्न झाल्यावर ते कमाऊनच्या राजाकडे गेले व त्यांस त्यांनीं आपल्या रसवंतीनें संतोषित केलें. कमाऊनच्या राजानें त्यांस एक लक्ष रुपये देणगी देतांना अहंकारानें ह्मटलें कीं, "असा दाता तुह्मास भूतलावर आढळणार नाहीं." भूषणजी अत्यंत मानधन होते. राजाच्या या गर्वोक्तीनें त्यांचा बाणेदार स्वभाव उसळून बाहेर आला व त्यांनीं कुमाऊं--नरेशास तात्काल उत्तर दिलें कीं,— "असे दाते तर भूमंडलावर पुष्कळच आहेत. परंतु तुह्मी असा याचक पाहिला नसेल कीं जो अहंकारानें दिलेल्या लक्ष रुपयांनाहीं तृणासारखें समजून त्यांना स्पर्श करण्यांत दुर्गंधी मानितो.

'भूषण ग्रंथावलीचे' कर्ते महाशय मिश्रबंधु यांच्या मतें कुमाऊंनरेशाची व भूषणजींची ही भेट छत्रपतींच्या भेटीनंतर झाली. ६।७

वर्षें त्यांच्या आश्रयास राहून भूषणजींनीं शिवराज भूषण हा ग्रंथ समाप्त करून जेव्हां ते कांहीं दिवसापुरतें स्वदेशीं आले, तेव्हां ते कमाऊं नरेशाकडे गेले. तेथें त्यांना राजाकडून एक लक्ष रुपयांची देणगी मिळाली तेव्हां त्यांनीं तिचा स्वीकार केला नाहीं. मग कमाऊं दरबारापर्यंत येण्याचें कारण काय तर भूषणजी ह्मणतात. "हम तो केवल यह देखने आए थे कि महाराज शिवराजका यश यहाँतक पहुँचा है या नहीं!"

भूषणकवींच्या तोंडी मिश्रमहाशयांनीं घातलेलें हें कारण असमर्थनीय आहे. कारण—बल्क बुखारा काश्मीर व रूमशाम पर्यंत ज्या छत्रपतींच्या धाकानें खळबळ उडून गेल्याचें भूषण कवि वर्णन करितात[१] त्या शिवरायांचें यश कुमाऊं पर्यंत गेलें आहे कीं नाहीं हें पाहण्यास जाण्याचें त्यास कारण काय!

शिवराजभूषण ग्रंथ पूर्ण केल्यानंतर भूषण कवि स्वदेशीं गेले ही गोष्ट सिद्ध आहे. हा ग्रंथ सन १६७३ त पूर्ण केल्याचें कवीनें ग्रंथाचे शेवटीं लिहिलें आहे. ह्याच्या आधीं इ. १६६६ त छत्रपति व औरंगजेब यांच्या भेटीचा महाप्रसंग घडला व तेथून महाराज धाडसानें व साहसानें सुटून आले! हा विषय ह्मणजे सर्व उत्तर भारताला विस्मित करणारा होता. बादशहानें तर चोहींकडे सांडणीस्वार व दूत पाठवून जाहीर केलें होतें कीं, जो कोणी शिवाजीस पकडून देईल त्यास अमुक इनाम मिळेल तर छत्रपतींच्या या धैर्य साहसादि गुणांची वार्ता कुमाऊं नृपतीस कळली नसेल असें ह्मणवत नाहीं मग ती केवळ समक्ष जाऊन विचारण्याचा भूषणजींचा उद्देश काय?

पुन्हां एक गोष्ट अशी कीं भूषणजींनीं शिवाबावनींत एके ठिकाणीं

॥ मौरंग कुमाऊं औ पलाऊ बांधे एक पल—

---

१ बलक बुखारे कासमीर लौं परी पुकार धामधाम धूमधाम रूमसाम परी है॥
शि. बा.

'मौरंग कमाऊन आणि पलाऊ येथील संस्थानिकांना तर शिवाजीनें क्षणांत जिंकून कैद केलें' असें वर्णन केलें आहे तेव्हां ज्या कमाऊन नरेशाला शिवछत्रपतींनीं जिंकून कैद केलें त्याजकडे मिश्रमहाशयांनीं दर्शविलेल्या कारणानें भूषणजींचें जाणें शक्य नाहीं. अर्थात् ही कवित्वशक्ति संपादित केल्यावर आपले वडील बंधु चिंतामणी यांच्याहून स्वतंत्रपणें काव्यकीर्ति संपादन करण्याकरितांच आरंभीं ते कमाऊ नरेशाकडे गेले असावें हें सयुक्तिक दिसतें.

भूषण कवींच्या वरील निस्पृहपणामुळें त्याचें नांव सर्वतोमुखीं झालें. नंतर भूषणजी चित्रकूटाधिपती हृदयरामाचे पुत्र रुद्रराम सोलंकी या हिंदू राजाच्याच आश्रयाला राहिले. तेथें त्यांच्या काव्यगुणास अनुरूप अशी 'कवि भूषण' ही पदवी त्यांना मिळाली. आणि तेव्हांपासून ते भूषण या नांवानेंच प्रसिद्धीस आले. त्यांचें मूळचें नांव कांहीं निराळेंच असावें. ही 'कवि भूषण' पदवी मिळाल्याचा उल्लेख याच शिवराज-भूषण ग्रंथांत कवीनें पुढीलप्रमाणें केला आहे.

कुल सुलंक चितकूटपति साहस सील समुद्र
'कवि भूषन' पदवी दई हृदयराम सुत रुद्र

(क. नं. २८)

भूषण कवींच्या वीर्यशाली कवितेचा प्रभाव इतका गाजला आणि त्यांच्या बाणेदार स्वभावाची इतकी लोकचर्चा झाली कीं, भूषणजींचे ज्येष्ठ बंधु चिंतामणि– जे औरंगजेबाच्या दरबारीं होते– त्यांच्यामार्फत त्यांचा औरंगजेबाच्या दरबारीं प्रवेश झाला. औरंगजेब हा इस्लाम धर्माचा कट्टा अभिमानी खरा, परंतु पूर्वपरंपरेस धरून अकबरापासून मोंगल दरबारीं हिंदी कवि असण्याचा परिपाठ[१]

---

१ कवि गंग हा अकबराच्या दरबारीं होता. त्याचप्रमाणें प्रसिद्ध गंगालहरीचा कर्ता जगन्नाथराय हा संस्कृत कविही शहाजहानच्या दरबारीं होता.

त्याच्या कारकीर्दीतही सुटलेला नव्हता. याला इतरही आधार आहेत. त्यांपैकीं चिंतामणि कवि शहाजहानच्या वेळेपासून त्याच्या दरबारीं होते हा एक आधार आहे.

एके दिवशीं औरंगजेबानें दरबारी कवींस प्रश्न केला कीं, तुह्मी जेव्हां तेव्हां प्रशंसा करितां परंतु माझ्या ठिकाणीं कांहीं दोष नाहींत काय ? माझ्या सत्य दोषांचें निवेदन करणारा तुमच्यांत कोणी नाहीं काय ? त्याच्या प्रश्नानें दरबारी कवि चपापून गेले. कारण छद्मी औरंगजेबाच्या मनांत असें विचारण्यांत काय कपट असेल नकळे, ह्मणून ते साशंक होणें साहजिक होतें. स्तब्धतेचा एक क्षण ओसरतांच एक तरुण कवि उठून उभा राहिला आणि तो म्हणाला—" शहंशाह ! स्तुति ही ईश्वरलाही प्रिय आहे, मग ती मनुष्याला प्रिय असावी यांत नवल काय ? तथापि दैवाच्या चमत्कारिक गोष्टी देवही ललाटांत झांकून ठेवितो ! म्हणून आह्मी कवि देखील मोठ्यांचा मोठेपणा जगापुढें मांडित असतो आणि त्यांच्या व्यंगाविषयीं मौन धारण करितों. पण ज्या अर्थी आपला हुकूम झाला त्याअर्थी मला उठावें लागलें. मालिक, दोष सांगणारे तर पुष्कळच सांपडतील पण ते ऐकून घेणाराच मर्द सांपडत नाहीं. आपण आपले दोष ऐकावयास तयार असाल तर ते मी सांगायला तयार आहें.

औरंगजेबासारख्या बादशहासमोर त्याचे दोष सांगावयास उद्यत झालेला हा निस्पृह कवि म्हणजे भूषणच होत. बादशहानें त्यास दोष-निदर्शनाची अनुज्ञा दिली; तथापि भूषणजीनें शहाचें अभयपत्र मागितलें व त्याजवर दरबारांतील राव, ठाकूर वगैरे रजपुतांच्या ग्वाही घालून देण्यास सांगितलें. उत्सुकतेच्या भरांत शहानें तेथल्या तेथें तसें अभयपत्र दिल्यावर कविराज भूषण शहाच्या दोष निवेदनास सज्ज झाले आणि सर्व दरबार त्यांजकडे उन्मुख होऊन पाहूं लागला. त्यांनीं पहिली कविता म्हटली ती अशी:--

किबले की ठौर बाप बादशहा शहाजहान, ताको कैद कियो मानो मक्के आग लाई है ।
बडो भाई दारा वाको पकरि कै कैद कियो मेहरहू नाहिं माँको जायो सगो भाई है ॥
बंधु तो मुरादबक्श बात चूक करिबेको, बीचले कुरान खुदाकी कसम खाई है ।
भूषन सुकवि कहै सुनो नवरंगजेब एते काम कीन्हे तेऊ पातसाही पाई है ॥ १ ॥

**अर्थः—**

तुझा पिता जो शहाजहान बादशहा त्याला त्वां कैद केलेंस जणों मक्केला आग लावण्यासारखें हें तुझें कृत्य ! वडील भाऊ दारा, त्याला त्वां धरून कैद केलें परंतु तुझ्या हृदयांत एवढीही दया उपजली नाहीं कीं हा माझा सख्खा भाऊ आहे. तुझा धाकटा भाऊ मुराद त्याला फसविण्याकरितां तूं त्याच्यांत आणि आपल्यांत कुराण ग्रंथ ठेऊन ईश्वराची शपथ[1] वाहिली. भूषण कवि म्हणतात. औरंगजेबा ! ऐक इतकीं पापें केलीं तेव्हां तुला ही बादशाही मिळाली आहे.

या कवितेचा एकेक शद्ब शहास कट्यारी सारखा लागत गेला, हें काय सांगावयास पाहिजे ? त्याचें विकृतानन आणि भ्रूभ्रमण यांनीं व्यक्त होणाऱ्या त्याच्या प्रज्वलित क्रोधाची पर्वा न करितां त्या कवीश्वरानें धडाडीनें दुसरी कविता म्हटली:—

हाथ तसबीह लिये प्रात उठै बंदगीको, आपही कपट रूप कपट सुजपके ।

---

१ औरंगजेबानें मुरादाजवळ वाहिलेली ही शपथ अशी कीं, " तुला गादीवर बसावयाचें व मला मात्र फकीर होऊन मक्केस जावयाचें ! "

आगरेमें जाय दारा चौक में चुन्हाय लीन्हो, छत्र हू छिनायो
मानो बूढे मरे बापके ॥
कीन्हो है सगोत घात सो तो मैं नाहिं कहों पील पै तुराये चार
चुगलके गपके ।
भूषन भनत शठछंदी मतिमंद महा, सौ सौ चुहे खायके बिलारी
बैठी तपके ॥

**अर्थः—**

भूषण कवि म्हणतात, औरंगजेबा ! तूं रोज सकाळीं उठून हातांत स्मरणी घेऊन ईश्वर प्रार्थना करितोस परंतु हें केवळ ढोंग आहे. कारण तूं स्वतःच कपटाचें केवळ रूप आहेस. कारण आग्र्यास जाऊन दाराला भर चौकांत त्वां चिणून टाकिलें. तसेंच चहाडखोर लोकांच्या सांगण्यावरून किती गोत्रजांना तूं हत्तीच्या पायीं दिलें त्या सर्वांचीं नांवें मी सांगू शकत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे तूं शठछंदी व धूर्त आहेस. शेकडो उंदीर खाऊन पुन्हां टपून तपश्चर्या करणाऱ्या मांजरी सारखा तूं बसला आहेस ! ”

कटु शब्दांची कट्यार आणि ज्वलत्वक्रोक्तीचे विषधर बाण यांनीं औरंगजेबाच्या शरिराचा पहिल्याच कवितेनें दाह झाला होता. त्यांत दुसऱ्या कवितेच्या शेवटीं कवीनें शहास उद्देशून जी अंतिम रचना केली कीः—

“ सौ सौ चूहे खाय के बिलारी बैठी तप के ”

ती बादशहास सर्वतोपरी असह्य झाली. तो आपल्या वचनास विसरून क्रोधानें बेमान झाला. आणि त्या सत्यवचनी कविश्वराचा शिरच्छेद करावयास तरवार उपसून सिंहासनावरून उठला ! हा प्रकार पाहतांच ग्वाहीदार अमीर उमरावांनीं आणि वचनप्रिय रजपूतांनीं मध्यस्थी-करून शहास शांत केलें व तो प्रसंग टाळला. यापुढें दिल्लींत किंवा

दिल्लीच्या भोंवतालच्या प्रदेशांत राहणें इष्ट नव्हे असें जाणून भूषण कवींनीं औरंगजेबाचे कट्टे शत्रू व हिंदुपदपादशाहीचे संस्थापक श्री छत्रपति शिवाजी महाराज यांजकडे जाण्याचा संकल्प केला व त्याप्रमाणें ते आपल्या केसर घोडीवर बसून रायगडाच्या पायथ्याशीं येऊन पोंचले.

वर जें भूषणकवि आणि औरंगजेब यांच्यामधील प्रसंगाचें वर्णन केलें तो प्रसंग घडलाच नाहीं असें ' भूषण ग्रथावली ' चे कर्ते महाशय मिश्रबंधु यांस वाटतें. भूषणकवि व औरंगजेब ही भेटच त्यांस अग्राह्य वाटते. ते म्हणतात " भूषणकवि चित्रकूटाधिपति रुद्ररामाकडून निघाले [ इ. स. १६६६ ] ते छत्रपति शिवाजी महाराजाकडेच आले. ( इ. स. १६६७ ) त औरंगजेबाकडे गेले नाहींत. पंडित महाशयांनीं आपल्या विधानाला कांहीं आधार दिला नाहीं. भूषण कवींनीं शहाच्या दोषनिदर्शनात्मक म्हटलेल्या ज्या दोन कविता वर दिल्या आहेत त्या मिश्र महाशयांनीं स्वसंपादित प्रतींत संकलित केल्या आहेत. या दोन्ही कवितांचें स्वरूप पाहतां त्या कवीनें शहाच्या समक्ष म्हटलेल्या दिसतात. विशेषतः " भूषण कवि सांगतात, औरंगजेबा ! ऐक " हे पहिल्या कवितेंतील उद्गार तर त्या दोघाची समक्ष स्थितीच व्यक्त करितात. त्याचप्रमाणें शेंकडों उंदीर खाऊन तूं तप करणाऱ्या मांजरी सारखा ( टपून ) बसला आहेस ! " हेही उद्गार त्यांची उपस्थितीच दर्शवितात.

वरील दोन्ही कवितांची रचना देखील अशी आहे कीं, त्यांत तात्कालिक म्हणावयाच्याच कवितेचें सामान्य स्वरूप उमटलें आहे. भूषण कवींच्या इतर कवितेंत प्रासानुप्रासांच्या लाटा प्रायः जशा उसळतात तशा येथें उसळत नाहींत. अलंकारांची मांडणी, अर्थाचा गौरव यांनीं नटलेल्या याच कवीश्वराच्या इतर कवितांशीं वरील दोन कविता तोलतां येत नाहींत.

भूषण कवीस चित्रकूटाधिपतीकडून 'कवि भूषण' ही पदवी इ. सन १६६६ च्या सुमारास मिळाली आणि इ. स १६६७ च्या शेवटीं शेवटीं ते छत्रपतींच्या दरबारीं दाखल झाले, असें मिश्रपंडितांनीं अनेक आधारांनीं सिद्ध केलें आहे. आह्मासही त्यांची ही सिद्धता सत्य वाटते. भूषणजी दक्षिणेंत येण्याच्या कांहीं महिने आधीं श्रीछत्रपति दिल्लीहून सुटून दक्षिणेंत आले होते. त्यावेळीं त्यांच्या आगमनाप्रीत्यर्थ मोठा दानोत्सव करण्यांत आला होता. असें चिटणीस विरचित शिवचरित्रांत पृ. २४२ वर या दानधर्माचें व उत्सवाचें वर्णन आलें आहे. या उत्सवांत देणग्या मिळविण्याकरितां देशोदेशींचे गुणीजन येणें साहजिक होते. भूषणजींनीं शिवरायाकडे येण्याचें जें कारण या शिवराज भूषण ग्रंथांत दिलें आहे. तें असें आहे–

"देसन देसन ते गुणी आवत जाचन ताहि ।
तिनमें आयो एक कवि भूषण कहियतु जाहि ॥"

देशोदेशींहून शिवरायाकडे गुणीजन याचनेकरितां येऊं लागले त्यांतच आपण आलों असें त्यांनीं लिहून ठेविलें आहे. अर्थात् हा भूषण कवींचा आगमनकाल मिश्रपंडितांनीं जो ठरविला (इ.स. १६६७) तो खरा आहे.

आम्हांस तर बहुतांशी असें वाटतें कीं चित्रकूट नरेशाकडून इ. स. १६६६ त पदवी मिळाल्यानंतर ते एकदम दाक्षिणेंत न येतां बंधूच्या (चिंतामणीच्या) आग्रहावरून त्यांचा औरंगजेबाच्या दरबारीं प्रवेश झाला असावा आणि तेथें शिवछत्रपती व औरंगजेब यांची जी भेट झाली, त्या भेटींत अपमानानें महाराजांचा जो क्रोध समुद्र उचंबळला व त्यामुळें सर्व दरबार जो भयग्रस्त झाला तो वीरप्रसंग या वीर रसप्रिय कवीनें पाहिला असावा आणि नंतरच शहाचा व कवीचा बिघाड घडून हा हिंदी कवि दक्षिणेंत आला असावा. नाहींतर बुंदेल-

खंडचे राजे, हाडाकोटाचे राजे, रेवाचे राजे, जयपूर जोधपूर येथील राजे असे कितीतरी हिंदी कवितेचे रसिक उत्तर भारतांत विद्यमान असतां व त्यांपैकीं कांहींच्या दरबारीं भूषणजींचे इतर बंधु राजाश्रित असतां त्यांनीं आपल्या जन्मभूमीचा अखिल उत्तरप्रांत सोडून हिंदीशीं अपरिचित अशा दक्षिण प्रांतीं इतक्या लांब कां येरें यावें ?

शहाच्या व छत्रपतींच्या भेटीचें वर्णन भूषण कवींनीं फार बारकाईनें केलें आहे. दरबारांत महाराज कशा आविर्भावानें शिरले, दरबारी लोकांची कशी त्रेधा उडाली; शहाची व महाराजांची दृष्टिभेट होतांच काय प्रकार झाला, हा दख्खनचा सिंह संतापानें कसा भडकला; त्याची उग्रमुद्रा पाहतांच औरंगजेबाची मनःस्थिति कोणत्या प्रकारची झाली वगैरे इतक्या बारीकसारीक गोष्टींचें वर्णन भूषण कवींनीं केलें आहे कीं तें जर कल्पनिक असतें तर -

' को कविराज भुवालन भावत भौंसिला के मन मैं बिनु भाये ? '
( १५३ क. नं. )

[ भोसल्याच्या मनाला आवडल्यावांचून कोण कवि सभाजित होईल ? ] अशी ज्या शिवरायांची सत्कवि--परीक्षा भूषणजींनीं निवेदिली आहे त्या शिवरायांना तें वर्णन पटलें नसतें. यावरून या भेटीच्या प्रसंगीं भूषण कवी दिल्लीच्या दरबारीं असावे व त्यांनीं तो अद्भुत प्रसंग पाहिलेला असावा. मिश्रपंडित ह्मणतातः— " भूषण कवि एखादी अद्भुत गोष्ट जरी असली तरी ती एक वेळां सांगून सोडून देतात. तिचें वारंवार कथन करीत नाहींत. परंतु या गुसलखान्याचें [ शहा-शिवाजी यांच्या भेटीचें स्थान, स्नानगृह ] वर्णन त्यांनीं जेथें तेथें केलें आहे. "

ही आश्चर्याची गोष्ट तर खरीच परंतु या आश्चर्याचें कारण वर सांगितलेलें प्रत्यक्षावलोकनच होय. या प्रसंगानें कवीचें शौर्यप्रिय हृदय छत्रपतीकडे आकर्षिलें गेलें असावें.

कविताकौमुदीचे कर्ते श्री. रामनरेश त्रिपाठी यांचेंही मत आमच्याच सारखें आहे. ते ह्मणतातः–

" सं. १७२३ में ( इ. स. १६६६ ) शिवाजी दिल्ली गये उस समय भूषण दिलीही मे थे......शिवाजीके दिल्लीसे चले जानेपर एकदिन औरंगजेबनें कवियोंसे कहा तुमलोग मेरी बढाई किया करते हो, सची बात कहो। अन्य कवि तो चूप रहे, परंतु भूषण से चूप न 'रहा'' गया। इन्होंने दो कबित्तोमें उसकी खासी निंदा की। उससे औरंगजेब बहुत बिगडा। और वो भूषनको मारने उठा। परंतु दरबारियोंके समझाने से रुक गया। भूषण उसी समय दिल्ली छोडकर शिवाजीके दरबामें चले गये।"

(कविता कौमुदी पा. २७८)

भूषणकवि रायगडास पोंचल्यावर विश्रांतीकरितां पायथ्याशीं कांहीं वेळ थांबले. तेथें शिवछत्रपतींची व त्यांची अचानक भेट झाली. त्यांनीं भूषणजींच्या आगमनाचें कारण विचारून त्यांचें सर्व वृत्त ऐकिलें. व शिवदरबारांत प्रवेश होण्यापूर्वी आपणास शिवछत्रपतीवरील कांहीं कविता ऐकविण्याविषयीं सुचविलें. ही भेट रात्रींच्या वेळीं एका देवळांत झाली असें मिश्र पंडित लिहितात व तेथें शिवछत्रपती पूजेस आले होते असा ते खुलासा करितात. यावरून भूषणकवींनीं शिवरायास न ओळखणें शक्य आहे. कविराज भूषणांनीं या शिवराजभूषण ग्रंथांतील ५६ नं. ची कविता[१] अशा आविर्भावानें आणि खड्या सुरानें म्हटली कीं शिव-

---

**१ कवित्त–मनहरण.**

इंद्र जिमि जंभ पर वाडव सुअंभ पर रावन सदंभ पर रघुकुल राज है।
पौन वारिवाह पर संभु रतीनाह पर ज्यों सहसबाह पर राम द्विजराज है॥
दावा द्रुमदंड पर चीत मृगझुंड पर भूषन वितुंड पर जैसे मृगराज है।
तेज तम अंस पर कान्ह जिमि कंस पर त्यों मलिच्छ बंस पर शेर शिवराज है॥

रायांच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले ! छत्रपतींनीं भूषणजींची प्रशंसा करून तीच कविता पुन्हां ऐकण्याची इच्छा दर्शविली आणि भूषण-कवींनींही ती पूर्ण केली ! याप्रमाणें १८ वेळां ती कविता पुनः पुन्हां म्हटल्यावर भूषणकवींच्या कंठनलिका फुगून ते थकून गेले. यापुढें शिव-रायांनीं पुन्हां कविता ऐकण्याची इच्छा दर्शविली तरी ती कवीकडून पूर्ण करविली गेली नाहीं. तेव्हां छत्रपतींनीं आपली त्यास ओळख करून दिली[1] आणि म्हटलें– " कविराज ! आम्ही मनांत निश्चय केला होता कीं, आपण जितक्या वेळा ही कविता ऐकवाल तितक्या लक्ष मुद्रा, तितके हत्ती व तितके गांव आपणास इनाम द्यावे. आपला योग इत-काच होता. आपणास १८ लक्ष रुपये, १८ हत्ती, व १८ गांवें इनाम दिले[2] आहेत. आतां आपण कोणत्याही प्रकारची चिंता न करितां आमच्या दरबारचे राजकवि ह्मणून राहावें.

संतुष्ट झालेल्या त्या कवीश्वरानें उत्तर दिलें. महाराज आपला आश्रय मिळाला हा लाभ काय थोडा आहे ? मी आपलें शौर्य आणि आर्यधर्माभिमान यावर लुब्ध होऊन आपणाकडे आलों. आपणा-सारख्या शूर योध्याकडून यवनांचा निःपात आणि भारताचें स्वातंत्र्य पाहण्याची माझी प्रबल इच्छा आहे.

शिवछत्रपतींस त्यांच्या या वचनानें अधिकच आनंद होऊन त्यांनीं त्यांचा चांगलाच पुरस्कार केला. हा सुंदर राजकवि समागम

---

१ छत्रपतींची ही ओळख कवीला दुसऱ्या दिवशीं दरबारांत झाली असेंही कांहींचें ह्मणणें आहे. आमच्या शिवप्रताप पुस्तकांत हा प्रसंग वर्णिला आहे.

२ संवत १७६० ( सन १७०३ ) मधील लोकनाथ कवि भूषणजींना छत्रपतींकडून ५२ हत्ती मिळाल्याचा उल्लेख करितात. त्याचप्रमाणें संवत १७९१ ( सन १७३४ ) मध्यें होऊन गेलेल्या ' दास ' कवींनें लिहिलें आहे कीं, भूषण कवींनीं कवितेवर विपुल संपत्ती मिळविली.

इ० स० १६६७ पासून इ० स० १६७३ पावेतों अखंड चालू होता. आणि याच ६ वर्षांत भूषण कवींनीं हा ' शिवराज-भूषण ' अलंकारिक ग्रंथ तयार केला. शिवराज्याभिषेक झाल्यानंतर भूषणकवि शिवप्रभूंच्या अनुज्ञेनें स्वदेशीं गेले[१] स्वदेशीं जातांना मार्गात बुंदेलखंडचे राजे छत्रसालजी (शिवछत्रपतींचे मित्र) यांनीं भूषण कवींची कीर्ति ऐकून त्यांची भेट घेतली या प्रसंगाची अशी एक गोष्ट विद्वान लेखकांनींही लिहिली आहे कीं, छत्रसाल राजास वाटलें कमाऊन, दिल्ली, रायगड येथील भूपतींच्या दरबारांत मानसन्मान पावलेले श्रेष्ठकवि कुठें आणि मी कुठें ? म्यां भूषणजींचा कोणत्या प्रकारें सन्मान करावा ? असा विचार करून कवि ज्या पालखींतून जात होते. त्या पालखीच्या वाहकांत मिसळून त्यांनीं तो आंदोलिका-दंड आपल्या स्कंधावर ठेवून घेतला ! अहाहा ! भूषणांनीं तो रायाचा सत्कार पाहतांच 'हॉं हॉं ! महाराज' ह्मणून एकदम पालखीखालीं उडी घेतली ! आणि तात्काल त्यांच्या प्रशंसापर २।३ कविता ह्मटल्या. ' छत्रसाल दशक ' ह्मणून जो भूषणजींचा १० कवितांचा संग्रह आहे त्यांत या कविता समाविष्ट झाल्या आहेत. हें छत्रसाल दशक इतकें सुंदर आहे कीं, त्यांतील कविता उत्तम वर्गाखेरीज मध्यम वर्गांत येऊंच शकत नाहींत !

भूषणजी घरीं येऊन पोंचल्यावर मोठा आनंद मानिला गेला[१] त्या आगमनाची वार्ता दिल्ली दरबारापर्यंत जाऊन पोंचली. औरंग-जेबाच्या त्यावेळच्या दिल्ली दरबारांत भूषणकवींचे ज्येष्ठ बंधु चिंतामणी हे होतेच. आपला प्रतिपक्षी जो शिवाजी त्यांच्या दरबारांत वीर रसाची कविता करून अलौकिक सन्मान पावलेल्या कविराज भूषणांस औरंग जेबानें आपल्या चिंतामणी कवीकडून एकदां दरबारास येण्याविषयीं

---

१ घरीं जाण्यापूर्वी त्यांनीं कोंकणांतील एक लाख रुपयांचें मीठ विकत घेऊन तें आपल्या भावजाईकडे पाठवून दिलें होतें असें ह्मणतात !

कळवून बंधूकडून त्यांचें मन वळविलें. चिंतामणींनीं भूषणास बराच आग्रह केला. प्रथम त्यांनीं ती गोष्ट मान्य केली नाहीं. शेवटीं त्यांनीं सांगितलें कीं, ऐका, आम्ही बादशहाचे कट्टे वैरी, तसेंच शिवाजी महाराजांचे प्रशंसक आहोंत. जर आमच्याकडून शिवप्रभूंची स्तुति ऐकावयाची असेल तर आम्ही दरबारांत येऊं शकतों. चिंतामणींनीं बादशहास बंधूची अट कळविली. त्यानें ती मान्य केल्यावर भूषणजी फिरून दरबारांत गेले[1].

बादशहानें जेव्हां त्यांस म्हटलें कीं, तुमची शौर्यशालिनी कविता म्हणून दाखवा; तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं, 'आपण प्रथम आपले हात व कान धुवून टाका.' शहानें असें करण्याचें कारण विचारिलें तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, 'माझे सहोदर चिंतामणि हे आपणांस शृंगारिक कविता ऐकवितात व त्यामुळें आपले हात परवश होतात. परंतु माझी कविता ऐकून आपला हात मिशीवर जाईल.'

बादशहा म्हणाला, "ठीक, मी हात तर धुतों; पण जर माझा हात मिशीवर गेला नाहीं तर भ्रष्टप्रतिज्ञ कवीचें मी डोकें कापून घेईन!"

बादशहानें हात धुतले आणि कवीश्वर भूषणजींनीं वीररसांतील कवितामंत्र जागविण्यास प्रारंभ केला. त्यांतील शिवछत्रपतींचें यशोवर्णन त्यास असह्य झालें! तेव्हां त्यानें आज्ञा केली कीं, "मी सार्वभौम राजा आहे, सर्व राजे मला कर देतात; शिवाजी हा एक लहान मांडलिक राजा आहे; त्याचें यश मांडलिक भूपालांत वर्णन करा!"

भूषणकवींनीं आपल्या तिर्थक्विषसंसर्पि दृष्टीनें शहाकडे पाहून व किंचित मान हलवून लागलीच कवितेंत वर्णन केलें कीं– "सर्व राजे पुष्पवृक्ष आहेत व बादशहा मकरंद सेवन करणारे भ्रमर आहेत.

---

1 चिटणीस बखरींत औरंगजेब व भूषण कवि यांच्या या भेटीचा उल्लेख आहे.

परंतु शिवभूप त्या पुष्पवृक्षांतील चंपक आहेत. चंपकाजवळ भ्रमर जाऊं शकत नाहीं[1] !"

" अली नौरंगजेब, चंपा शिवराज है "

(शिवाबावनी क. नं. ३८।३९)

कवि तो कविच-- दुर्वर्तनी भूपती ' आपण लक्ष्मीपती आहोंत ' ह्मणून मानधनाचेही पति होऊं इच्छित असतील, परंतु खरे कवि त्यांची यथार्थ योग्यता जगाला दाखवायला थेडेच भिणार? औरंगजेबास त्या कवींद्राचें वर्णन-चातुर्य पाहून आपल्या उद्भ्रांत मनाचें संयमन करावें लागलें. शहा पुढें ह्मणाला ' बरें हें असो. पण ज्या करितां माझे हात धुवाविले ती आपली प्रतिज्ञा पूर्ण करा !

हें ऐकतांच भूषण कवीश्वराची वीररसाची रसवंती वाहूं लागली. सभेंत बसलेले रजपूत, राव, ठाकूर व अमीर-उमराव यांच्या नजरा फिरूं लागल्या, बाहू स्फुरण पावूं लागले ! त्या हिंदी साहित्य-कोविदाच्या प्रत्येक शद्बानें, प्रत्येक ओळीनें रसविज्ञांच्या व विक्रमी पुरुषांच्या भावना प्रदीप्त झाल्या ! सर्व दरबार विस्फारित नयनांनीं भूषणकवीकडे पहात होता: आणि रोमांचित होत होता. कवी तर

---

१ या अर्थाचें प्रसिद्ध संस्कृत सुभाषित खालील प्रमाणें आहे.

भ्रमन् वनान्ते नव मंजिरीषु ।
न षट्पदो गंधफलीमजिघ्रत् ॥
सा किं न रम्या सच किं न रंता ।
बलीयसी केवलमीश्वरेच्छा ॥

अर्थ:-- उपवनांत नवीन पुष्पमंजिरीवर गुंजारव करणारा भ्रमर चाफेकळीवर कांहीं बसत नाहीं. ती कळी रमणीय नाहीं काय ? किंवा हा भृंग रममाण होण्यास योग्य नाहीं काय ? तर तसें नव्हें. ही केवळ ईश्वरी इच्छा.

अंग–विक्षेपांत व भावनेंत बेभान झाला होता. पहिली कविता संपली दुसरीला आरंभ झाला. तीही संपून तिसरी, चौथी शेवटाला पोंचते तों त्या कवितांचा बादशहावर परिणाम झालेला दिसला त्याच्या भुवया वर चढल्या, मान फिरूं लागली. सातवी कविता पूर्ण होतांच बादशहाचा हात अवसानासरसा न कळत मिशीवर चढून गेला[१]! अहाहा! धन्य तो कवि! या कवितांपैकीं एखादी जरी उपलब्ध असती तरी ती आह्मी वाचकांकरितां अवश्य दिली असती. भूषणकवींचे बरेच काव्यग्रंथ अजून उपलब्ध व्हावयाचे आहेत. त्यांत जर या कविता मिळाल्या तर तो एक अमूल्य ठेवा सांपडल्या सारखें होईल.

त्या सत्यप्रतिज्ञ कवीवर बादशहा फार प्रसन्न झाला आणि त्यानें त्याचा बहुत सन्मान करून बहुमोल पारितोषिक दिलें. ही हकिकत दक्षिणेंत शिवाजी महाराजांस त्यांच्या आग्र्याच्या वाकिलाकडून कळ-तांच त्यांनीं त्यास राजपत्रिका पाठवून पुन्हां आपल्या दरबारीं बोलावून घेतलें. नंतर शिवाजी महाराजांच्या अंतकालापर्यंत ते त्यांच्या जवळ राहिले भूषणजींच्या भूषणहजारा, भूषणउल्हास वगैरे ज्या अनुपलब्ध ग्रंथांचीं नांवें ऐकिलीं जातात ते ग्रंथ त्यांनीं याच काळांत लिहिले असावे. भूषण हे नुसते कवि नसून महाकवि[२] होते. पदोपदीं वाचकांस चकित करून सोडणारी रचना, भाषेची शुद्धता, अर्थाचा गौरव, पदांचें लालित्य आणि प्रसाद गुणाचा उत्कर्ष इत्यादि महाकवींचे सर्व

---

१ भूषण ग्रंथावलीचे संग्राहक यांनीं पृ. १४ वर हा प्रसंग मान्य केला आहे.

२ " भूषण महाराजका काव्य वास्तव में हिंदी साहित्यका भूषण है. स्थिर लक्षणानुसार चाहे इनकी कविताको कोई महाकाव्य संस्कृतरीति ग्रंथोमे न कह सके परंतु तोभी **इन्हे हम बिना महाकवि कहे नही रह सकते.** " पं० श्यामबिहारी मिश्र एम्. ए.

उत्तम गुण त्यांच्या काव्यांत पहावयास सांपडतात. ते अलंकारशास्त्रज्ञ होते याला प्रमाण ह्मणजे त्यांचा हा ' शिवराज भूषण ' अलंकारिक ग्रंथच होय. संस्कृतकाव्यें, पुराणें यांचें अध्ययनही त्यांनीं फारच चांगल्या प्रकारें केलें होतें असें याच ग्रथांतील संस्कृत शद्व व पौराणिक कथांचे संदर्भ या वरून निःसंदेह ह्मणतां येतें. हिंदीभाषा, व्रजभाषा, आणि फारशी भाषा यांतील त्यांचें पटुत्वही याच ग्रंथानें सिद्ध होतें.

अशा या महाकवीच्या काव्यांत शिवकालीन अनेक प्रसिद्ध व्यक्तींचा समावेश होणें अत्यंत संभवनीय आहे. शिवप्रभूसारख्या हिंद-स्वराज्य संस्थापकास जन्म देणारी वीरमाता जिजाबाई, दादोजी कोंडदेव, तानाजी मालुसरे, मोरोपंत, बाजी देशपांडे आणि यांखेरीज तुकाराम रामदासासारखे वंद्य सत्पुरुष यांपैकीं कोणाचेंही नांव भूषण कवींच्या उपलब्ध काव्यांत नाहीं. छत्रपतींच्या राज्यारोहणाचा एवढा भव्य समारंभ भूषणजी सारख्या महाकवींच्या दृष्टींतून सुटणें शक्य नव्हतें. परंतु त्याचेंही वर्णन नाहीं. यावरून असें अनुमान निघतें कीं त्यांचे इतर काव्य-ग्रंथ असावें व त्यांत वरील व्यक्ति व प्रसंग यांची माहिती असावी.

शिवप्रभूंच्या स्वर्गवासानंतर भूषणकवि स्वदेशीं आले असावे. नंतर संभाजी महाराजांची कारकीर्द, [1]कलुशाचें प्रस्थ, व संभाजी महाराजांच्या वधानंतर महाराष्ट्रावर ओढवलेलें राजकीय संकट या

१ कलुशा हा संभाजीचा मुख्य प्रधान होता. त्याला ' कवि कुलेश ' ही पदवी होती. यांतील कुलेश शब्दाचा अपभ्रंश ' कलुशा ' होऊन त्याची कुप्रसिद्धी झाली. तसेंच त्याला ' कवजी ' या नांवानेंही इतिहासांत उल्लेखिलें आहे. ' कवि ' शद्वास जी हा आदरार्थी प्रत्यय लावून बनलेल्या 'कविजी' या शब्दांचा हिंदी उच्चार जो ' काबिजी ' ( व च्या ठिकाणीं हिंदींत ब येतो ) त्याचें ' कबजी ' हें अपभ्रष्ट रूप आहे. (पुढें चालू- )

धामधूमीच्या काळांत भूषणकवींचें दक्षिणेंत येणें घडलें नाहीं. जेव्हां शाहुमहाराजांची सुटका होऊन ते दक्षिणेंत आले व त्यांनीं आपली गादी मिळवून तिला स्थिरता आणिली तेव्हां ते आपले आश्रयदाते जे शिवाजी महाराज त्यांच्या वंशजास न विसरतां शाहू महाराजांच्या दरबारीं आले होते. ( इ. स. १७१५ ) त्या वेळीं त्यांनीं शाहू महाराजांवर केलेली एक स्फुट कविता उपलब्ध आहे.

॥ बलख बुखारे मुलतान लौं हहर पारै कपि लौं पुकारै कोऊ धरत न सार है
॥ रूम रूंदि डारै खुराशान खूंदि मारै, खाक खादर लौं झारै ऐसी साहुकी बहार है
॥ कक्कर लौं बक्खर लौं मक्कर लौं चले जात टक्कर लेवैया कोऊ वार है न पार है
॥ भूषन सिरोंज लौं परावने परत फेरि दिलीपर परति परिंदनकी छार है.

वरील कवितेंत शाहूमहाराजांच्या पराक्रमानें आणि दहशतीनें बल्क बुखारा या शहरापर्यंत हातीं शस्त्र न धरण्याइतका त्याचा धाक पसरला होता.

---

कलुशा हा भूषणकवींच्याच जातीचा कान्यकुब्ज ब्राह्मण होता. जितके कान्यकुब्ज तितके शाक्त म्हणजे देवीउपासक असतात. म्हणून भूषणजीप्रमाणें कलूशा देखील देवी उपासक होता. भोसले राजे तर भवानीचे भक्तच होते. कलुशाच्या दोन्हीं नांवांची जी उपपत्ति वर दिली आहे त्या वरून ज्या काव्य गुणानें कविराज भूषण शिवप्रभूच्या दरबारांत गाजले त्याच काव्यगुणानें त्याचा संभाजीच्या दरबारीं प्रवेश झाला असावा हें अनुमान सयुक्तिक दिसतें. किंबहुना भूषणजींनीं मिळवून ठेविलेली कीर्तीच त्याला उपयोगीं पडली असावी. मात्र ज्या एका कान्यकुब्ज कवीनें मराठी दरबार आपल्या वीररसाच्या कवितेनें प्रस्फुरित केला त्याच्याच जातीच्या दुसऱ्या कवीनें आपल्या दुर्गुणांनीं त्या दरबारास अधोगती आणिली हें पाहून खेद होतो. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर कलुशा सारख्या दुर्वर्तनी कवीचें प्रस्थ संभाजीच्या दरबारीं वाढल्यामुळें भूषणजी उत्तरेंतून दक्षिणेंत आले नसावे असें तर्कशुद्ध अनुमान निघतें.

आणि खादर नदीपलीकडील खुरासान व त्याही पलीकडील रूमशाम पर्यंतचे योद्धे त्यांनीं झाडून टाकले होते वगैरे वर्णन ह्मणजे शाहू महराजांचें सिंहासन स्थिर होऊन बाळाजी विश्वनाथास पेशवाई प्राप्त झाल्यानंतरचें आहे. या वेळीं भूषणजींचें वय सुमारें १०२ वर्षांचें होतें. इतक्या वयांत देखिल या महाकवींची कविताशक्ति किती प्रखर होती हें वरील कवितेवरून दिसून येण्यासारखें आहे. शाहूच्या दरबारीं येण्याच्या आधीं इ. स. १७१० चे सुमारास भूषण कवि हे आपले धाकटे बंधु मतिरामजी यांच्या सांगण्यावरून बुंदीचे राजे राव बुद्धसिंह यांच्या दरबारीं गेले होते. तेथें त्यांनीं त्याजवर म्हटलेली कविताही स्फुटसंग्रहांत समाविष्ट झालेली आहे. मतिरामजी हे बुंदी नरेशाचे दरबारीं कवि होते. भूषणजींची संभावना तेथें मतिरामजीपेक्षां अधिकच झाली असावी. परंतु ती त्यांना विशेष समाधानकारक वाटली नाहीं. उघडच आहे, छत्रपती शिवाजी महाराजासारख्यांच्या दानापुढें इतर भूपतींच्या दानाचें महत्व भूषणजीस काय वाटणार[१] ?

---

१ सूर्यमल्ल नांवाचे एक कवि बुंदी दरबारांत होते. त्यांनीं इ. स. १८४० मध्यें वंशभास्कर नांवाचा जो ग्रंथ लिहिला त्यांत लिहिलें आहे कीं, मतिराम कवींना बुंदी दरबारांतून समस्त वस्त्राभूषणें, चार हजार रुपये, ३२ हत्ती आणि रिंडी व चिंडी हीं दोन गांवें इनाम मिळालीं. इतकें मिळूनहीं मतिरामजींचें संपत्तिशाली कवींत कांहींही वर्णन नाहीं आणि भूषणजींनीं मात्र विपुल संपत्ति मिळविली असें जिथें तिथें वर्णन आढळतें यावरून शिवभूपतीकडून त्यांस किती अपार संपत्ति मिळाली असेल याची कल्पना होते. या शिवराजभूषण ग्रंथांतही कवीनें छत्रपतींच्या दातृत्वाचें ठिकठिकाणीं अत्यंत उत्कटतेनें व रसभरित असें वर्णन केलें आहे. त्या दातृत्वगुण निदर्शक अशा १६ कविताचे अनुक्रमांक खालीं दिले आहेत. त्यांतील बहारीचीं वर्णनें वाचकांनीं पहावीं.

११९, १४०, १४३, १६२, २१५, २२१, २२३, २३१, २६६, २८१, २८३, २९१, ३२६, ३२९, ३३६, ३४०.

पन्नाचे ( बुंदेलखंड ) राजे छत्रसाल यांजकडे मात्र भूषणजींचें जाणें येणें नित्य असे. शिवाजी महाराजांच्या खालोखाल त्यांचे याच भूपालावर विशेष प्रेम होतें. छत्रसाल राजे स्वतंत्र, पराक्रमी व हिंदुत्वाचे अभिमानी असल्यामुळें भूषणजींचें चित्त छत्रपतींच्या पश्चात् त्याजवर प्रसन्न असावें हें समुचितच होते. तथापि छत्रपतींचे पौत्र शाहू महाराज गादीवर आल्यानंतर या थोर कवीला भोसले वंशाचा विसर पडला नाहीं. बुंदी नरेशाकडून परत येतांना मार्गांत छत्रसाल राजांची भेट झाली तेव्हां त्यांजवर लिहिलेल्या एका कवितेच्या शेवटच्या ओळींत शाहूकडे जाण्याची कवीच्या मनाला जी ओढ लागली होती ती व्यक्त केली आहे.

|| और राव राजा एक मन मै न ल्याऊं, अब साहू को सराहौं कै सराहौं छत्रसाल को ! [ छ. द. १० ]

**अर्थः–** इतर कोणीही राजा किंवा राव मी मनांत देखील आणित नाहीं. परंतु आतां छत्रसालाचें वर्णन करूं कीं शाहूचें वर्णन करूं ?

या नंतर भूषणकवि शाहूमहाराजाकडे सन १७१५ च्या सुमारास आल्याचा उल्लेख वर एका कवितेनें केलाच आहे यापुढें मात्र त्यांच्या इहलोकच्या वास्तव्याचा कांहीं आधार सांपडत नाहीं. याच सुमारास ते दिवंगत झाले असावे. त्यांचा जन्मकाळ सन सुमारें १६१५ त असल्याचा उल्लेख मागें केलाच आहे. तेव्हां शतोत्तर ( १०२ वर्षे ) आयुष्याचें भाग्य या महाकवीस लाभलें हें स्पष्ट होतें. भूषण कवींचे वंशज फत्तेपूर जिल्ह्यांत ( यू. पी. ) त्याचप्रमाणें मध्य प्रदेशांत अजूनही आहेत असें ह्मणतात.

जळगांव
२६।२।३१

दु० आ० तिवारी.

# प्रस्तावना.

श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदरीं असलेले हिंदी महाकवी 'भूषण' यांजवर आम्ही १९२२ सालीं महाराष्ट्रसाहित्य मासिकांत ( मे ) एक लेख लिहिला होता. भूषणजींनीं या महाराष्ट्र-भूपालावर 'शिवाबावनी' व 'शिवराज भूषण' असे जे दोन ग्रंथ लिहिले त्यांचें मराठी रूपांतर महाराष्ट्रीय रसिकांस सादर करण्याचा हेतु या लेखाच्या शेवटीं व्यक्त केला होता. त्याप्रमाणें १९२८ सालीं शिवाबावनींतील कांहीं कवितांचें केलेलें भाषांतर कविमित्र श्रीयुत शि. स. शिर्के बी. ए. ( अॅ. ऑ.; डि. स्कूलबोर्ड पू. खा. ) यांस आवडल्याचें दिसलें. पुढें १५ दिवसांत सर्व शिवाबावनी रूपांतरित केली. व ती त्याच वर्षी 'शिवप्रताप' या पुस्तकरूपानें शिवजयंतीस प्रसिद्ध केली.[1] त्यानंतर कांहीं दिवसांनीं शिवराजभूषणाच्या रूपांतराला आरंभ करून तें दोन महिन्यांत संपविलें. १९३० च्या एप्रीलमध्यें या ग्रंथाची मुद्रणीय प्रत तयार असूनही अडचणीमुळें त्याच्या प्रकाशनाला एक वर्षाचा विलंब लागला. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी औंध यांस हस्तलिखिताच्या रूपानें या ग्रंथाचा नमुना दाखवून विनंती केली असतां त्यांनीं संतोषपूर्वक या ग्रंथाच्या प्रकाशनाला आर्थिक मदत केली यामुळें श्रीशिवरायांची ही अल्पशी सेवा हातून घडल्याचें जें मानसिक समाधान वाटलें तें श्रीमंतांच्या या पुरस्कारानें दुणावलें. म्हणून आम्ही आरंभींच त्यांचें प्रसन्न मनानें आभार मानीत आहोंत.

शिवराजभूषण हा ग्रंथ अलंकारिक आहे. हा ग्रंथ लिहिण्यांत भूषण कवींचा हेतु शिवचरित्राचें अलंकारयुक्त वर्णन करण्याचा आहे. हा उद्देश त्यांनीं पद्यांक २९ मध्यें व्यक्तही केला आहे.

---

१ आमचे 'शिवप्रताप' पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वी किंवा त्यानंतरही शिवाबावनीचें सरळ मराठी भाषांतर प्रसिद्ध झालेलें आमच्या पाहण्यांत नव्हतें.

" शिव चरित्त लखि यों भयो कवि भूषन के चित्त ।
भाँति भाँति भूषननि सों भूषित करौं कबित्त ॥२९॥ "

**अर्थः**- शिवरायाचें उज्वल चरित्र पाहतांच भूषण कवीला वाटलें कीं नानाप्रकारच्या अलंकारांनीं तें सजवावें.

अलंकार शास्त्रांत उपमादिकांच्या क्रमानें अलंकारांची गणना होते ह्मणून शिवचरित्रांतील गोष्टी मागें पुढें होणें साहजिक आहे.

शिवचरित्र अलंकारांनीं सजविण्याचा हेतु धारण करणारी भूषणजींची विद्वत्ता व कवित्वशक्ति अत्यंत प्रगाढ असली पाहिजे. नाम-पारायण, धातुपारायण, कोश, छंदशास्त्र आणि अलंकारशास्त्र ह्या काव्याला उपयुक्त असणाऱ्या गोष्टीं त्यांनीं अध्ययनानें प्राप्त करून घेतल्या होत्या. त्याचप्रमाणें सत्कवींची संगती, देशवार्ताज्ञान विदग्धवाद, लोकव्यवहार, विद्वद्गोष्टी आणि प्राचीन काव्यावलोकन या काव्यानुकूल विषयांशींही ते परिचित होते. हें शिवराज भूषणाचें सूक्ष्म अवलोकन केल्यानें कळण्यासारखें आहे. त्यांचें पुराणांचें अध्ययन चांगलें होतें. या ग्रंथांत त्याच्या खुणा जागोजाग उमटल्या आहेत[1]. मच्छ कच्छादि अवतार ( क नं. १४२, १६६ व ३४८ ) रामचंद्र, युधिष्टिर, वाल्मिकी व व्यास यांच्या कथा [क. नं. २९०] इंद्रकथा [१४७] अंधक-कथा [१६४] भृगु-कथा [७५] विराट नगरीची कथा ( २६५ ) अशा जुन्य कथांपासून विक्रम भोजापर्यंत [ २६६ ] कथासंदर्भ या ग्रंथांत आले आहेत. यावरून वरील विधान सत्य आहे हें कळून येईल. संस्कृत काव्यांचें त्यांचें परिशीलन चांगलेंच असावें. कारण, किंजल्क, कोक कोकनद असे कितीक संस्कृत शब्द त्याचप्रमाणें छत्रपतीस दिलेली दिलीप राजाची उपमा [ ३६४ ] आणि काहीसें मेघदूतांतील अल-

---

१ साहि तनै सिवके उरसों तुरकौ गहि वारिधि की गति पैली ।
बेद पूरानन की रचना अरचा दुज देवन की फिरि फैली ॥२९३॥

कावतीप्रमाणें आरंभीं गयगडाचें केलेलें वर्णन यांनीं वरील अनुमानाला बळकटी येते.

पुराणें व संस्कृत काव्यें यांनीं प्रगल्भ झालेल्या काव्यवाणीस अलंकार शास्त्राची जोड मिळाल्यावर ती मनोहारिणी व्हावी हें स्वाभाविक आहे. अलंकार शब्दाचा अर्थ ' भूषण ' हा स्पष्ट आहे. कोणतेंही सुंदर काव्य घ्या त्यांत अलंकार असतोच. अलंकार-विरहित सुंदर काव्य असणेंच शक्य नाहीं. अलंकारांना कृत्रिम ह्मणून नांवें ठेवणारे जे कोणी असतील त्यांची कृती त्यांना न कळत अलंकारांनींच नटलेली असेल. चंद्रालोककार कविवर जयदेव ह्मणतात–

" अंगीकरोति यः काव्य शब्दार्थावनलंकृती ।
असौ न मन्यते कस्मादनुष्णमनलंकृती ॥ "

**अर्थः**– जो विद्वान् अलंकार रहित शब्द आणि अर्थ यांना काव्य मानितो तो अग्नीला उष्णताहीन कां बरें मानित नाहीं ?

**आग्निपुराणांत भगवान् वेद व्यासांचीही आज्ञा आहे कीं–**

" अलंकारणमर्थानामर्थालंकार इष्यते ।
तं विना शब्दसौंदर्यमपिनास्ति मनोहरम् ॥
अर्थालंकार रहिता विधवेव सरस्वती । "

**अर्थः**– अर्थात जो रमणीयताकारक धर्म आहे, तोच अर्थालंकार होय त्याच्यावांचून शद्वसौंदर्यदेखील मनोहर भासत नाहीं. आणि त्यावांचून हीन सरस्वती म्हणजे वाणी ही विधवातुल्य आहे. याचप्रमाणें महाकवि दंडी यानेंही म्हटलें आहे:—

" काव्यशोभाकरान्धर्मानलंकान्प्रचक्षते । "

**अर्थः**– काव्यांतील शोभाकारक धर्मच अलंकार म्हटले जातात.

भावना आणि कल्पना यांचा जेव्हां प्रथम उद्गम होतो तेव्हां त्यांचें

स्वरूप खाणींतील हिऱ्याप्रमाणें किंवा सोन्याच्या अशोधित मृत्तिकेप्रमाणें असतें. त्यांना व्यवस्थित रूप देणें हें अलंकारांचें कार्य होय. एखादी युवती जन्मतःच सुंदर असली तरी ती अलंकारांनीं जशी अधिकच लावण्यवती दिसावयास लागते, तशी सत्कवीची वाणी अलंकारमय असली म्हणजे त्याची कविता अधिकच हृदयसंवेद्य भासते. यावरून कवि आणि अलंकारशास्त्र यामधील आवश्यक संबंध लक्षांत येणार आहे.

हिंदी भाषा ही मराठीप्रमाणें संस्कृतापासून निघालेली भाषा असल्यामुळें तिच्यांत अलंकार शास्त्रावर जे विपुल ग्रंथ निर्माण झाले ते सर्व संस्कृतांतील अलंकार ग्रंथांवरूनच निर्माण झाले आहेत. परंतु या एकंदर ग्रंथांतील अधिकोत्तर ग्रंथ तर जयदेव कविकृत चंद्रालोक आणि अप्पय दिक्षितांनीं केलेल्या 'कुवलयानंद' या ग्रंथाच्या अनुकरणानेंच निर्माण झाले आहेत. वास्तविक कुवलयानंद हा अप्पय दिक्षितांचा ग्रंथ ह्मणजे चंद्रालोक ग्रंथावरील टीका स्वरूपाचा होय. चंद्रालोकांतील पद्य संकीर्णतेमुळेंच यथार्थ स्वरूपाचें विवेचन करणारा कुवलयानंद हा ग्रंथ निर्माण झाला अर्थात् याला अनुसरणारे जे हिंदी अलंकारज्ञ त्यांची अलंकारलक्षणें व अलंकार संख्या ही जयदेव कवीच्या चंद्रालोकासारखीं असावीं हें साहजिक आहे. भारती-भूषण या अलंकारिक ग्रंथाचे कर्ते केडिया महाशय ह्मणतातः--

"हिन्दी के प्राचीन अलंकार ग्रंथोंमेसे अधिकांशने 'चंद्रालोक' एवं कुवलयानंदकाही विशेष रूपसे सहारा लिया है। इसका परिणाम यह हुवा है की प्रायः ग्रंथो के उदाहरण एकसे हो गये है।

भारती--भूषण पान २५

यावरून कविराज भूषण यांनीं 'शिवराज भूषण' हा ग्रंथ लिहितांना जयदेव कवीचा 'चंद्रालोक' हा अलंकारशास्त्रावरील

ग्रंथच इतर हिंदी ग्रंथकाराप्रमाणें आधारास घेतला असावा हें अनुमान खरें आहे. चंद्रालोकांत एकूण शंभर अर्थालंकार आहेत आणि भूषणजींनींही थोड्या फरकानें या पुस्तकांत १०० अर्थालंकार व ५ शब्दालंकार दिले आहेत. हे जे १०० अलंकार त्यांची लक्षणेंही तत्स्वरूपी आहेत. अलकार शास्त्रांतील भूषणजींच्या प्राविण्याकडे पाहिलें ह्मणजे त्यांनीं अलंकार शास्त्रावरील इतरही अनेक संस्कृत व हिंदीग्रंथांचे परिशीलन केलें असावें. हिंदी साहित्यांत ज्यांना अलंकारांचे आचार्य ह्मणून मान दिला जातो. अशा महाराज जसवंतसिंह, मतिराम, दलपतिराय, बन्सीधर, बेनी, पद्माकर, ग्वाल रामसहाय, कलानिधी यांच्यांत त्यांची गणना होते. भारतीभूषण कर्त्यांनीं शेवटच्या वाक्यांत इतर हिंदीअलंकारज्ञावर एकस्वरूपी उदाहरणांचा जो आक्षेप घेतला आहे तो भूषणजीवर लागू होत नाहीं कारण त्यांनीं या ग्रंथांत अलंकारांचीं लक्षणें पूर्वकथित अशींच सामान्यतः दिलीं आहेत, परंतु त्यावरील उदाहरणें मात्र शिवचरित्रांतील प्रसंग घेऊन त्यावरून स्वतंत्र तयार केलीं आहेत. अलंकारांचीं स्वतंत्र उदाहरणें लिहिणें ही महाकवीची प्रतिभा होय. जगन्नाथराय पंडितासारख्या वाग्भूषणानें ज्याप्रमाणें दुसऱ्याचीं उदाहरणें न घेतां अलंकारांच्या लक्षणास उदाहरणभूत असें नवीनच काव्य निर्माण करून आपला ' रस गंगाधर ' ग्रंथ सजविला[1] त्याचप्रमाणें या हिंदी

---

१ काव्यं मयात्र निहितं न परस्य किंचित् । निर्माय नूतनमुदाहरणानुरुपं ॥
किं सेव्यते सुमनसां मनसापि गन्धः । कस्तूरिकाजननशक्तिभृता मृगेण ॥

**रसगंगाधर.**

**अर्थः–** अलंकारांच्या लक्षणांस उदाहरणभूत असें नवीनच काव्य निर्माण करून मी येथें रसिकांपुढें ठेवीत आहें. परक्यांचें उसनवार असें मी कांहींही घेतलें नाहीं. कस्तूरी निर्माण करण्याची शक्ती ज्याच्या ठायीं वसत आहे असा कस्तूरी मृग इतर फुलांचा वास घेण्याचें कधीं तरी मनांत आणील काय ?

महाकवीनेंही केलें. हिंदी अलंकारग्रंथांत मुरारी दानजीकृत जसवंत-जसोभूषण, गोकुलदास कायस्थकृत दिग्विजय-भूषण, केडिया महाशयकृत भारती-भूषण तसाच भाषाभूषण हे जसे भूषणशब्दालंकृत ग्रंथ आहेत, तसाच शिवराजांच्या भूषण कवींचा हा शिवराज-भूषण ग्रंथ होय. यांत चरित्रनायक शिवाजी महाराज आणि भूषण या दोहोंचीं नांवें आलीं आहेत. शिवराज भूषण ह्मणजे शिवाजी महाराजांना भूषणभूत ग्रंथ होय. हाही नामार्थ युक्तच होय.

अलंकारिक कविता कृत्रिम असते असा आक्षेप घेणारांनीं काव्याच्या सजावटीचें सूक्ष्म आवरण बाजूस सारून या ग्रंथाचें अवलोकन केल्यास त्यांना भूषण कवींची रसवंती इतिहासाच्या सत्य मार्गानेंच विहार करीत असलेली दिसून येईल. हें या ग्रंथांतील वैशिष्य होय. शिवराज भूषणांत अलंकाराकरिता इतिहासाशीं असंबद्ध अशी केलेली रचना आढळणार नाहीं. इतकेंच नव्हें तर कांहीं अज्ञात गोष्टीवर प्रकाश पडलेला दिसेल.

श्रीछत्रपती शिवाजी महाराजांचें शौर्य, धैर्य अभिमान, दातृत्व[1], कीर्ति इत्यादि अनेक गुणांच्या वर्णनांनीं हा ग्रंथ खरोखर भूषणभूत झाला आहे. या दख्खनच्या सिंहाची मोंगल व त्यांच्या स्त्रिया यांच्या मनावर त्या काळीं केवढी भीती पसरली होती हें पहावयाचें असल्यास पुढे दिलेल्या कविता वाचून पहाव्या ८०, १२३ १६१, १७८, २२८, २५०, २६१, ३१२, ३१५, ३२७, ३३७,

१ भूषण कवींना शिवाजी राजांपासून विपुल द्रव्य-दान मिळालें होतें. ह्मणून महाराजांची दानशूरता त्यांनीं उसळल्या लहरींनीं गायिली आहे. ( कविता नं. ११९, १४०, १४३, १६२, २१५, २२१ २२३, २३१, २६६, २८१, २८३, २९१, ३२६, ३२९, ३३६, ३४० पहा )

३५०, ३५१, त्याचप्रमाणें सर्जा शिवाचें ग्रीष्मऋतूंतील प्रचंड मार्तंडा सारखें शौर्य अवलोकावयाचें असल्यास ३५, ११२, १३३ २९२, ३०७, ३२८ या कविता पहाव्या. भूषण कवि हे शिवाजी महाराजांजवळच असल्यामुळें शिवराज भूषणांत महाराजांच्या स्वभावाचें देखील दिग्दर्शन झालें आहे व तें आनंदजनक आहे. शिवाजी राजे दानशूर, शिवकथाप्रिय आणि शत्रुहननाला उद्यत असे होते. हा त्यांचा स्वभाव ३१६ नं. च्या कवितेंत उमटला आहे. तसेंच छत्रपती हे कविताप्रिय मार्मिक रसिक होते व ते दिसण्यांत सुंदर होते हीं वर्णनें अनुक्रमें ३२६ व ३४५ नंबरच्या कवितांत आहेत. स्वदेश स्वधर्म या करितां त्यांनीं केलेलीं धाडसाचीं व साहसाचीं कृत्यें पाहून त्या वेळीं मानवी मनावर कोणता परिणाम घडला होता याचें सुंदर चित्र पुढील चरणांत उमटलें आहे.

। जान्यो न परत ऐसे काम है करत कोऊ गंधरब देव है की सिद्ध है
की सेवा है ॥ ७९ ॥

अर्थः– ज्यांची कल्पना करवत नाहीं अशीं शौर्य–कृत्यें हा भोसलेभूप करितो. हा गंधर्व आहे, देव आहे कीं कोणी सिद्ध आहे न कळे !

स्वराज्यसंस्थापक शिवाजी महाराज हे भवानीचे भक्त होते आणि भूषण कविही कान्यकुब्ज ब्राह्मण असल्यानें तेही देवी भक्तच होते त्यांनीं या पुस्तकांत आरंभीं विघ्नहारक गजाननाची स्तुतिकेल्यावर लगेच दुसऱ्या पद्यांत चंडभंडासुरखंडिनी कालिका देवीची स्तुति केली आहे आणि नंतर चितोडच्या सिसोदिया कुलांत छत्रपतींचा जन्म झाला म्हणून त्या कुलाची देवता ‘ सूर्य, ’ त्याचें वर्णन केलें आहे. परंतु नवलाची गोष्ट अशी कीं, छत्रपती हे भवानीभक्त होते असा उल्लेख शिवराज भूषणांत कोठेंही नाहीं ! भूषण ग्रंथावलीचे कर्ते मिश्रबंधु यांनींही याविषयीं आश्चर्य प्रगट केलें आहे. आमच्या मतें भूषणजीस

आपल्या या चरित्रनायकास अवतारी ठरवून श्रेष्ठत्व द्यावयाचें होतें म्हणून त्यांनीं त्याहून कनिष्ठ अशा भक्ताच्या पायरीवर त्यांचा उल्लेख केला नाहीं. (१।१२।२२८।२९५।३४८ या कविता पहा. त्यांत शिवाजी महाराजांना हरीचा अवतार मानिला आहे आणि हरि हा शिवकथाप्रिय आहे. म्हणून भोसलेभूपालही शिवकथाप्रिय होते असें ३२६ व्या कवितेंत म्हटलें आहे !

शिवराजभूषण ग्रंथांत शिवाजीराजांच्या चरित्रांतील जे अनेक प्रसंग आहेत त्यांतून अफजुलखानाचा वध, षाहिस्तेखानावर घातलेला छापा, औरंगजेबाशीं भेट व साल्हेर मुल्हेरचें युद्ध या चार प्रसंगांवर या कवीश्वरानें इतर प्रसंगापेक्षां अधिक कविता लिहिल्या आहेत.त्यामुळें या प्रसंगाची ती ती माहिती संकलित केली असतां आपण जणु काय त्या काळांत गेलों आहों असें वाचकांस वाटेल. अफजुलखानाच्या वधाचा प्रसंग ४२।६३।६६।९९।१६१।२३९।२५२।३१२।३३७ या कवितांतून आला आहे. त्यावरून तो राक्षसासारख्या भव्य शरिराचा आणि मदोन्मत्त होता हें स्पष्ट होतें. तसेंच त्याच्या मनांत दगा करण्याचा बेत होता, त्यानेंच आधीं महाराजांची आगळीक केली तेव्हां महाराजांनीं त्यास वाघनखांनीं उधडून ठार केलें. हे भूषणजींनीं कवितेंत सांगितलें आहे. अफजुलखानाबरोबर याकूतखानही आला होता. अफजुलखान हा याकुतखानाच्या सल्ल्यानें वागत होता. यास अनुलक्षून खानास हत्तीची उपमा आणि याकुतास महाताची उपमा देऊन हा खानरूपी हत्ती सर्जाशिवाजीनें ठार करितांच याकुतखान अंकुश घेऊन पळाला व त्यानें जीव वांचविला. हें ऐतिहासिक सत्य भूषणकवींच्या काव्यांत जसेंच्यातसेंच उमटलें आहे.

वास्तविक अफजुलखानाच्या वधाचा प्रसंग इ. स. १६५९ त घडला आणि भूषणकवि शिवाजीराजांकडे इ. स. १६६७ च्या सुमारास आले आणि तेव्हांपासून इ स. १६७३ पर्यंत त्यांनीं हा ग्रंथ लिहून

समाप्त केला. ह्मणजे त्यांनीं हा प्रसंग कांहीं प्रत्यक्ष पाहिलेला नव्हता. तरीही त्याचें वर्णन सूक्ष्म व यथातथ्य होण्याचें कारण स्वराज्याचा वृक्ष वाढीस लागला तोंच त्याजवर आलेलें हें संकट चिंताजनक होतें. अशा विपत्कालीं भोसले कुलोत्तमानें जें असामान्य साहस व शौर्य दाखविलें त्यामुळें तो प्रसंग ह्मणजे त्यांच्या शौर्य–कीर्तीचा एक विषय होऊन राहणें साहजिक होतें. भूषणजींची ४२ वी कविता पहा. ह्मणजे या ह्मणण्याची सत्यता पटेल. तींत म्हटलें आहे कीं, 'ज्याप्रमाणें शिवाजीनें अफजुलखानास मारून भूतलावर आपली उज्वल कीर्ति पसरली त्याप्रमाणें चंद्रानें अंधारास ग्रासून शुभ्र चांदणें पृथ्वीवर पसरिलें! अर्थात् अफजुलखानाच्या वधानें शिवाजी महाराजांची कीर्ति लोकांत प्रसृत झाली असली पाहिजे आणि म्हणूनच हा प्रसंग कविपुढें लोकचर्चेनें पुन्हःपुन्हां उभा रहात असला पाहिजे.

शाहिस्तेखानावरील छाप्याचा प्रसंग असाच विलक्षण साहसाचा व धाडसाचा होता. एक लक्ष फौज घेऊन आलेला हा दिल्लीपतीचा जंगबहादुर सरदार होता. ज्याप्रमाणें विजापूरच्या दरबारचा अफजुलखान शिवाजीस जिवंत धरून आणण्याच्या प्रतिज्ञेनें सैन्यसंभार घेऊन आला होता तसाच शाहिस्तेखान हाही या दक्षिण दिक्पालास नेस्तनाबूद करण्याकरितां आला होता आणि अफजुलखानासारखा प्रसंग आपणावर येऊं नये म्हणून त्यानें कडेकोट बंदोबस्तही केला होता. तरीही महाराजांनीं अफजुलखानाच्या वधानें ज्याप्रमाणें विजापूरच्या मंदिराचा स्तंभ भूतलावर कोसळून पाडिला आणि आदिलशाहीच्या मनांत दहशत उत्पन्न केली· त्याप्रमाणें शाहिस्तेखानाच्या गोटांत घुसून त्याचीं बोटें छाटणें ह्मणजे मोंगलशाहीच्या तरवारीची मूठच ढिली पाडण्यासारखें त्यांचें तें शौर्यकृत्य होतें. वीररसप्रिय अशा भूषण कवींच्या प्रतिभेनें या रोमांचकारी छाप्याकडे वारंवार वळावें आणि उल्हसित वृत्तीनें त्याचें वर्णन करावें हें साहजिक आहे. कविता ३५, ७७, ९६, ९१, १८९, ३२०, ३२३, ३३७ पहा.

औरंगजेबाच्या भेटीचा प्रसंग तर या सत्कवीनें प्रत्यक्ष पाहिला असावा हें कविचरित्रांत सिद्ध केलें आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्रांतील हाही प्रसंग मोठ्या आणीबाणीचा होता. भेटीच्यावेळीं महाराजांबरोबर रामसिंग होता; ते दरबारांत गेले तेव्हां त्याची मुद्रा कशी होती, ते किती सावध होते, महाराजांस पाहतांच अमीर उमउमरावांची कोण तेधा उडाली आणि दिल्लीपतीच्या मनांत कोणत्या प्रकारची दहशत उत्पन्न झाली वगैरे भूषण कवींनीं केलेलीं वर्णनें सूक्ष्म असून बहारीचीं आहेत. दरबारांत महाराजांचा अपमान झाला. तेव्हां त्यांना जो क्रोध चढला त्याचें स्वरूप आणि त्यांची समजूत घाळण्याकरितां रामसिंग वगैरेंनीं केलेला प्रयत्न यांचे या शिवराज भूषणांत जें चित्र उमटलें आहे तें जणुं काय प्रत्यक्षावलोकनानेंच रेखिलें आहे असें इतिहास भक्तांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. ( कविता नं. ३४, ३८, ७९, १८६, १९८, २०९, ३०९, ३१० पहा.)

गनीमी काव्यानें लढण्यास मराठ्यांनीं शत्रू समोर मांडी थोपटून जर कोठें निर्वाणीची झुंज दिली असेल तर ती साल्हेरला. साल्हेर मुल्हेरची लढाई भारीच अहमहमिकेची झाली. ( इ० स० १६७२ ). येथील झटापटींत प्रतापराव गुजर व मोरोपंत पिंगळे यांनीं मोंगलांवर इतक्या निकराचे हल्ले चढविले कीं पांच हजार मोंगल रणांत पडले व त्यांचे तीस अंमलदार प्राणास मुकले. भूषणजी म्हणतात " साल्हेरच्या रणभूमीवर रोहिल्यांच्या रक्ताच्या नद्या वाहिल्या, त्यांच्या तडफडणाऱ्या कबंधांनीं पर्वतभूमी कंपायमान होऊन उठली. तेथें मराठ्यांनीं रणावेशांत 'हाणा मारा' म्हणून जी गर्जना केली तिचा प्रतिध्वनि अजून ऐकू येत आहे." शौर्यरसाच्या कवितेचे केवळ आचार्य अशा भूषण कवीच्या प्रतिभेनें रणकल्लोलाचें जें वर्णन केलें आहे तें कोठवर लिहावें ? सद्रसिकांनीं तें ९७, १०३, १०७, १६१, २२६, २९२, ३३१, ४९२ या कवितांत अवश्य वाचून पहावें.

या युद्धांत इकलासखान मोहकमसिंग या मोंगल सेनापतीबरोबर अमरसिंग चंदावत आणि इतरही कच्छवंशी रजपूत मोंगलांच्या बाजूनें लढले. परंतु मराठ्यांनीं मोंगल सेनेचा असा धुव्वा उडविला कीं त्यांचे १२५ हत्ती ७०० उंट ६००० घोडे, पुष्कळ जड जवाहीर, शेंकडों बैल व इतर युद्धोपयोगी सामान त्यांस मिळालें. शिवाय मोंगलांचे कित्येक सेनापती लढतां लढतां जिवंत धरले गेले !

वर उल्लेखिलेल्या चार महा प्रसंगांखेरीज इतरही प्रसंग भूषणजींनीं फार कुशलतेनें रेखिले आहेत आणि ते इतिहासाशीं तंतोतंत जुळणारे आहेत. खानदौरा, जोरावरखां, कर्तलबखां बहिलोलखान खवासखा यांच्या बरोबरच्या लढायांची माहिती शिवराज भूषणांत स्थलकालानुरूपच आढळते. सूरतची लूट व पन्हाळगड, लोहगड, सिंहगड वगैरे किल्ल्यांवरील विजय अगदीं बरोबर सांगितले गेले आहेत. ऐतिहासिक कवितेंत सत्य निवेदनाचें व्रत पाळावयाचें असतें तें जर बरोबर पाळिलें गेलें नाहीं. तर त्या कवितेला कांहींच महत्व उरत नाहीं. परंतु भूषणजींनीं हें व्रत कडकडीत रीतीनें पाळिलें आहे. त्यांचा स्वभावच सत्यप्रिय आणि यथार्थ भाषी होता. औरंगजेबाच्या वतीनें दक्षिण काबीज करण्यास आलेल्या मिर्झाराजा जयसिंग याला महाराजांनीं जे किल्ले दिले व तह केला तो एक प्रकारें महाराजांचा पराजयच होता. परंतु या पराजयाचेंहीं निवेदन या सत्यभाषी कवींनीं केलें आहे. (क. नं. २१२।२१३) भूषणजींना हिंदुत्वाचा मोठा अभिमान होता. या अभिमानाचा दर्शक असा एक त्यांचा प्रसन्न उद्गार २९३ नं. च्या कवितेंत निघाला आहे. त्यांत ते ह्मणतात "शहाजी पुत्र शिवाजी राजे यांच्या दर्पामुळें तुर्क हे समुद्रापलीकडे पळाले आणि त्यामुळें पुन्हां वेद पुराणांची व देवब्राह्मणांची अर्चा (पूजा) पुन्हां सुरू झाली !"

उत्तर हिंदुस्थानातील आपली जन्मभूमी सोडून दक्षिणेंत शिवाजी राजांकडे येण्यांत तरी त्यांचा हाच उद्देश होता कीं, हिंदूंचा अभिमान धरून परधर्मीयांचा उच्छेद करणाऱ्या छत्रपतीस अधिक प्रस्फुरित करावें. नाहींपेक्षां त्यांचे बंधु मतिराम हे बुंदी नरेश रावबुद्ध यांच्या दरबारीं होते आणि बुंदेलखंडाच्या छत्रसाल राजांनीं तर त्यांच्या आंदोलिकेचा दंड आपल्या स्कंधावर धारण करून त्यांचा सन्मान केला होता. तेव्हां यावरून त्यांना उत्तरप्रांतांत हवा तसा राजाश्रय मिळणें शक्य असतांही ते शिवाजी महाराजांचेच आश्रित होऊन राहिले. याचें कारण त्या कालीं तुर्कांची रग जिरविणारा महाराजांसारखा अतुल बलशाली असा दुसरा कोणीही वीर अखिल भारतांत नव्हता म्हणूनच भूषणजी हे आप्त स्वकीय, जन्मस्थान वगैरे सर्व सोडून हिंदीभाषा प्रचलित नसलेल्या अशा महाराष्ट्रांत येऊन तेथें त्यांनी महाराष्ट्र भूपालास हिंदी कवितेनें प्रस्फुरित केलें.

शिवाजी महाराजांचे मित्र जे बुंदेलखंडाचे छत्रसाल राजे तेही मोंगलाशीं वांकून वागत होते त्यांनीं समक्ष भेटींत महाराजांच्या उपदेशाप्रमाणें उत्तरेकडे तुर्कांबरोबर कित्येक स्वातंत्र्य-युद्धें केलीं होतीं. म्हणून हिंदुत्वाचा अभिमान धारण करणाऱ्या भूषणजींच्या कवितेनें छत्रसालाचें यशोगायन केलें. 'छत्रसालदशक' या नांवानें हा संग्रह प्रसिद्ध आहे. यांतील प्रत्येक कविता उत्कृष्ट म्हणून गणली गेली आहे. मिर्झाराजा जयसिंग आणि त्यांचे पुत्र रामसिंग ( बादशहाच्या भेटीच्यावेळीं हे महाराजाबरोबर होते. ) यांच्याही प्रशंसेवर या कवीश्वरानें लिहिलेली कविता उपलब्ध आहे.

उपनिषदांचें फारशीमध्यें भाषांतर करणारा औरंगजेबाचा वडील भाऊ जो 'दाराशिकोह' त्याजवर देखील केलेली भूषणजींची कविता मिळाली आहे.

बडो भाई दारा वाको पकड के कैद कियो, मेहेर उर नाहि माको जायो सगो भाई है ॥

**अर्थ:**– हे औरंगजेबा ! त्वां आपला वडील भाऊ दारा त्याला कैद केलें. तुझ्या हृदयांत एवढी दया उत्पन्न झाली नाहीं कीं हा माझा सख्खा भाऊ आहे !

या भूषणजींच्या उद्गारांत दाराशिकोह विषयीं सहानुभूतीच दिसून येत आहे. यावरून हिंदुत्वाचा अभिमान बाळगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे ते चहाते होते.

वास्तविक पहाता भूषणकवि अशा काळांत निर्माण झाले होते कीं, ज्या समयीं पती अथवा उपपती यांचा प्रियतमेशी विहार, मान, दूतित्व, पश्चात्ताप, विरहोच्छ्वास यांवर हिंदी साहित्यांत कविता निर्माण होत होती. ललनांचे नेत्र, कटाक्ष, नितंब, उरोज यांचीं वर्णनें आणि गणिकांचे अधिक द्रव्योत्पादनाचे प्रयत्न याकडेच कवितेचें लक्ष होतें. अशा कालांत जन्मलेल्या या हिंदशारदाभक्तानें केवळ शृंगारालाच नव्हे तर सर्वच अनुपयोगी विषयांना दूर सारून भारत मुखोज्वलकारी महाराज शिवाजी भोसले त्याचप्रमाणें छत्रसाल बुंदेले अशा महापुरुषांच्या गुणगानांत आपली अलौकिक काव्यशक्ति लावून दिली. त्यांनीं आपल्या सर्व आयुष्यांत एकच शृंगारिक कविता लिहिली ! ही आश्चर्याची व लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

शिवराज भूषणांतील भाषा ही मुख्यतः व्रजभाषा आहे. ती खड्या भाषेपेक्षां अंमळ कठीण आहे. तिच्यांत अनेक संस्कृत व देशी शब्दांचीं अपभ्रष्ट रूपें आढळतात. शिवाय यावनी शब्दांचा व प्रांतिक शब्दांचाही समावेश शिवराज भूषणांत झाला आहे. यामुळें कांहीं स्थळीं संभ्रम उत्पन्न होणें साहाजिक आहे. जेथें त्रिपाठीजी सारखे हिंदी साहित्यभक्त म्हणतात कीं:—

"भूषण की कविता यद्यपि बडी ही प्रासादिक है, पर कहीं कहीं शब्द और भाव दोनो मेरी समझ मे नहीं आये"

तेथें शिवराज भूषणांतील भावांचें मराठी कवितेंत रुपांतर करितांना आमच्या हातून दोष घडलेही असतील पण ते कोणी जर यथार्थ दाखविले तर आम्ही त्यांचे आभारी होऊं. हा अलंकारिक ग्रंथ असल्यानें कवितेंतील रूपांतरांत मूळकवितेंतील भावसौंदर्य आणि अलंकार सौंदर्य हे दोन्हीही विकृत न होऊं देण्याची काळजी घेतली आहे. कांहीं स्थळीं तर हिंदी शब्दांचे श्लेषार्थ मराठींत रूढ नसल्यामुळें तो तो अलंकार कायम राखण्याकरितां मराठींतील निराळेच शब्द घालावे लागले. परंतु असें स्थान एकादेंच असेल. सावधानता ठेवूनही अलंकारांत कोठें चुका घडल्या असतील. अलंकारज्ञ अशा थोर रसिकांनीं त्या सुचविल्या तर पुढील आवृत्तींत आभार पूर्वक अवश्य सुधारणा करूं. मात्र भूषणासारख्या भाषा पंडितानें या अलंकारिक ग्रंथांत भावसौंदर्याबरोबर जागजागीं जें प्रासानुप्रासांचें शब्दसौंदर्य साधिलें आहे तें आम्हास साधतां येणें दुष्कर होतें.

शिवप्रताप पुस्तकाची जशी छपाई केली त्याचप्रमाणें ह्याही पुस्तकांत डाव्या बाजूस हिंदी मूळ कविता व उजवीकडे तिचें मराठी रूपांतर अशीच छपाई केली आहे. यामुळें वाचकांस मूळ व रूपांतर हीं दोन्ही वाचावयास मिळतील. अलंकारांचीं लक्षणें भूषणजींनीं दोहा वृत्तांत गुंफिलीं आहेत. आम्ही त्यांच्या समोर त्यांचा मराठी अर्थ मात्र दिला आहे आणि हेंच करणें उचित होतें. अलंकारांच्या उदाहरणांत जेथें जेथें दोहे आले तेथें तेथें आम्ही रूपांतराला आर्या--वृत्त घेतलें आहे आणि जेथें जेथें कबित्त--मनहरण किंवा सवैय्या सारखीं मोठीं वृत्तें आलीं आहेत, तेथें तेथें शिवप्रतापाप्रमाणें मंदारमाला वृत्ताची योजना केली आहे. शिवराजभूषणांत दोह्यापेक्षां हीं मोठीं वृत्तें विपुल आहेत. मराठींतील भव्य आणि कंठ–गेय अशा या वृत्तांत देखील हिंदींतील कबित्त–मनहरणासारख्या विशाल मात्रावृत्तांतील कवीचे सर्व भाव आणतां येणें कठीण आहे. पुन्हां अलंकार

कायम ठेवून हें साधणें त्याहून कठीण. तेव्हां आमचें हें रूपांतर किती यथार्थ आहे याची परीक्षा काव्यमर्मज्ञ विद्वानच करूं शकतील. आम्हाला त्या विषयीं कांहींही बोलतां येत नाहीं.

हिंदीभाषा ही स्वभावत:च वीर, रौद्र आणि भयानक अशा रसांना पोषक असतांही आजवर त्या भाषेंत भूषणजींच्या कवीतेसारखी वीररसाची कविता कोणीही लिहिली नाहीं. हिंदीभाषाप्रदेशांत भूषण-जींच्या काव्याचा फार गौरव होत आहे. हिंदीभाषापरीक्षेच्या अभ्या-सक्रमांत भूषणाचे ग्रंथ नेमले जातात. असें असून ज्या महाराष्ट्रांतील स्वराज्यसंस्थापकाचें यशोवर्णन त्यांनीं केलें त्यांच्याच महाराष्ट्रांत भूषण व त्यांची कविता या विषयीं फारसा आदर नाहीं. याचें कारण त्या कवितेची भाषा हिंदी होय. परंतु तिच्या या रूपांतरानें महाराष्ट्र-वाचकांस थोडा जरी आनंद वाटला तरी आमचें श्रमसाफल्य होईल.

शिवराज भूषणाचें आमचें रूपांतर संपूर्ण झालें तोंच श्री. रामचंद्र गोविंद काटे यांचा 'संपूर्ण भूषण' हा ग्रंथ भारतइतिहास-संशोधक मंडळामार्फत प्रसिद्ध झाला. अर्थदृष्टीनें ज्या ज्या स्थळीं आम्हास श्री. काटे यांचा अर्थ ग्राह्य वाटला त्या त्या स्थळीं आम्हीं फरक केला. आणि वाचकांच्या उपयोगी अशी व्यक्तिस्थल-सूचीही श्री. काटे यांच्याच संपूर्णभूषणावरून सुधारुन घेतली. रूपांतराची मराठी मूळप्रत आम्ही मिश्र बंधूंच्या 'भूषण ग्रंथावली या हिंदीपुस्तका-वरून तयार केली. लक्ष्मीव्यंकटेश्वर प्रेसानें प्रसिद्ध केलेलें 'शिवराज भूषण' काव्यही शंकित स्थळीं आम्हास मार्ग-दर्शक झालें आहे. म्हणून श्री. काटे, मिश्रबंधु आणि श्रीलक्ष्मी व्यंकटेश्वर प्रेसचे मालक या त्रिवर्गाचे आम्ही आभारी आहोंत.

हें पुस्तक श्रीमंत बाळासाहेब पंत प्रतिनिधी–औंध यांच्या आश्रयानेंच परंतु काव्याकिरण माला–जळगांव या संस्थेमार्फत दहावा किरण म्हणून प्रसिद्ध होत आहे. काव्यकिरण–मालेचे संपादक व प्रकाशक श्रीयुत मि० का० भोरटक्के यांनीं आजवर कांहींही गाजावाजा

न करितां या मालेंतून जीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं त्यांतील पुष्कळ पुस्तकें मुंबई सरकारनें बक्षिसें व लायब्ऱ्यांकरितां मंजूर केलीं. कांहींना डेक्कन व्ह० ट्रा० सोसायटी–पुणें, महाराष्ट्र ग्रथोत्तेजक मंडळ--इंदूर या संस्थांनीं बक्षिसें दिलीं व कांहीं पुस्तकें इतकीं लोकप्रिय झालीं कीं त्यांच्या द्वितीयावृत्ति प्रकाशित झाल्या. या मालेला फारसे वर्गणीदार नाहींत अशा स्थितींत मौनव्रत धारण करून श्री० भोरटके यांनीं या मालेच्या रूपानें मराठी काव्यसाहित्याची जी सेवा चालविली आहे. ती त्यांस निःसंशय भूषणावह आहे. महाराष्ट्रांत अनेक कविमंडळें, साहित्यमंडळें, काव्यमाला व त्यांच्या शाखा, उपशाखा विद्यमान आहेत. त्यांत श्री. भोरटके यांची काव्यकिरणमाला एखाद्या कुलशील वधूप्रमाणें निःशब्द रीतीनें आपला उज्वल संसार थाटीत आहे. ध्येयावर दृष्टी ठेवून कर्तव्याच्या मार्गानें सरळपणें जाणारी ‘ काव्यकिरणमाला ’ ही खान्देशांतील पहिलीच संस्था होय. यापूर्वीं खानदेशांत अशा संस्थेचा जन्म झाला नाहीं. या मालेतर्फें प्रकाशित झालेल्या किरणांचा वर उल्लेखिल्याप्रमाणें अखिल महाराष्ट्रानें जो गौरव केला आहे तो श्री. भोरटके यांच्या कीर्तीला सुस्थिर करणारा आहे.

जळगांव येथील श्रीकृष्ण प्रेसाचे मालक नामदेवराव माधव नेमाडे हे सज्जन स्नेही लाभल्यामुळें छपाईचीं कामें मनासारखीं व थोड्या खर्चांत होत आहेत. मराठी साहित्याला ते अशाप्रकारें मदतच करीत आहेत असें म्हणावें लागतें. ‘ शिवराज भूषण ’ ग्रंथाची छपाई त्यांनीं आरंभिल्यापासून अवघ्या दोन महिन्यांत संपविली. त्यांच्या प्रेसांतील रामदासपंत नेमाडे आणि शंकरराव चौधरी या कर्तव्यदक्ष चालकांच्या सहानुभूतीची आठवण विसरतां येत नाहीं. म्हणून श्री. नामदेवराव व त्यांचे हे दोघे चालक यांचे या प्रस्तावनेच्या शेवटीं आभार मानणें उचित होय.

जळगांव
११।३।३१

दु. आ. तिवारी.

# भूषण-वर्णित व्यक्ति-स्थलांची सूची.


अकब्बर २७९
अफजलखान ४२, ६३, ९६, ९९, १६१, २३९, २५२, ३१२, ३३७
अब्बासशाह ६१
अमरसिंह ९७, १५५, २२५, २७५
आकूतखान ( याकूतखान ) ६३
इकलासखान २४
उदेभान १००, १५५, २५९, २८५
एदिलशाह ( आदिलशाह ) ६१, ६३ ७२, १७८, २०६, २१३, २४९' २५४
करनसिंग ३५, ७७, ३४६
कारतलबखा १०३
किशोरसिंह ३५५
कुतुबशाह ६२, ७२, १५५, २१३, २४९, २५४
खवासखान २०६, २५४, ३१२, ३२८
खानजहाँ ३३७
खानदौरा १०३
जयसिंग २१२, २१३, ३६४
जसवंतसिंग ३५, ७७
जोरावर १०३
दारा २१७
दिलेर ३५५
नवसेरीखान १०७
निझाम ७२
फत्तेखान २३९
बब्बर २७९
बहलोलखान ९६, १६१, २३९, ३५६, ३५८, ३५९
बहादुरखान, ३२०
बाबु उमराव ९७
भाऊसिंह ३५, ७७, ३४६
माल मकरन्द ६, १०, ११०, ३६६
मुराद २१७
मोहकमासिंग २३९, ३५६
रामसिंह १९८
रुद्र २८
रुस्तुमजमान २३९
शास्ताखान ३५, ७७, ९६, १०३, १८९, ३२३, ३३७
शुजा २१७
सफदरजंग १०३
साहिज ९, १०
सीसोदिया ५
सुजान १५५
हरि अवतार ११, १२, २२८, ३४८
हृदयराम २८

# स्थल-सूची.


अहमदनगर ३०७

कल्याण २१३

किल्ले देणें २१२, २१३

किल्ले बांधणें ६६, १०४, २९५

गढनेर ११७

गुसलखाना ७९, ८६, १९८, २०४, २०९, २६५, ३०९

गोवळकोंडा १३, ६९, २४२

चांदा ११७

जावली ६२, ९९

जवारी ( जव्हार ) १७३

देवगिरी ७

परनाला ( पन्हाळा ) १०७, १७८, २०७, २५४, ३५७

परेंडा २१३

पुणें १०३, १८९, ३३८, ३६४

बेदर २१३

भरोच ३५४

भागनेर ११७, २१३

रामनेर १७३, २०६

रायगड १४ ते २४

रेवा ७९, १४८

लोहगड २५८

विजापूर १३, ६९, १५५, २४२

सालेरी ९७, १०३, १०७, १६१, [illegible]२६, २०२, ३३१, ३५१

सिंहगड १००, २५९

सुरत २००, ३३४, ३५४

मराठी

# शिवराज-भूषण काव्यांतील

## अलंकार-अनुक्रमाणिका


| | विषय | पृष्ठ | | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| | मंगलाचरण ... | ३ | १८ | कैतवापन्हुति ... | ४७ |
| | राजवंश वर्णन ... | ५-९ | १९ | उत्प्रेक्षा ... | ४९ |
| | रायगड वर्णन ... | ९-१३ | | गमगुत्पोत्प्रेक्षा (हेतूत्प्रेक्षा) | ५१-५३ |
| | कविवंश वर्णन ... | १३-१५ | २० | रूपकातिशयोक्ति ... | ५५ |
| १ | उपमा ... ... | १७-१९ | २१ | भेदकातिशयोक्ति ... | ५५ |
| २ | अनन्वय ... ... | १९ | २२ | अक्रमातिशयोक्ति ... | ५७ |
| ३ | प्रथम प्रतीप ... | २१ | २३ | चंचलातिशयोक्ति ... | ५७ |
| | द्वितीय प्रतीप .. | २१ | २४ | अत्यंतातिशयोक्ति ... | ५९ |
| | तृतीय प्रतीप ... | २३ | २५ | सामान्यविशेष ... | ५९ |
| | चतुर्थ प्रतीप ... | २३ | २६ | तुल्ययोगिता ... | ६१ |
| | पंचम प्रतीप ... | २५ | २७ | दीपक ... ... | ६३ |
| ४ | उपमेयोपमा ... | २७ | २८ | दीपकावृत्ति ... ... | ६३ |
| ५ | मालोपमा ... ... | २७ | २९ | प्रतिवस्तूपमा ... | ६५ |
| ६ | ललितोपमा ... ... | २९ | ३० | दृष्टांत ... ... | ६७ |
| ७ | रूपक .... ... | २९ | ३१ | निदर्शना ... ... | ६७ |
| | रूपकाचे दोन भेद .. | ३३ | ३२ | व्यतिरेक ... ... | ७१ |
| ८ | परिणाम ... ... | ३३ | ३३ | सहोक्ति ... ... | ७३ |
| ९ | उल्लेख ... ... | ३५ | ३४ | विनोक्ति ... ... | ७३ |
| १० | स्मृति ... ... | ३७ | ३५ | समासोक्ति ... ... | ७५ |
| ११ | भ्रम ... ... | ३९ | ३६ | परिकर ... ... | ७७ |
| १२ | सन्देह ... ... | ३९ | ३७ | परिकरांकुर ... ... | ७९ |
| १३ | शुद्धापन्हुति ... | ४१ | ३८ | श्लेष ... ... | ८१ |
| १४ | हेत्वापन्हुति ... ... | ४१ | ३९ | अप्रस्तुतप्रशंसा ... | ८१ |
| १५ | पर्यस्तापन्हुति ... | ४३ | ४० | पर्यायोक्ति ... ... | ८३ |
| १६ | भ्रांतापन्हुति ... | ४५ | ४१ | व्याजस्तुति ... ... | ८५ |
| १७ | छेकापन्हुति ... ... | ४५ | ४२ | आक्षेप ... ... | ८७ |

४३ विरोध ... ... ८९
४४ विरोधाभास ... ८९
४५ विभावना ... ... ९१
विभावनेचे प्रकार ...९१–९३
४६ विशेषोक्ति ... ... ९५
४७ असंभव ... ... ९५
४८ असंगति ... ... ९७
द्वितीय असंगति ... ९९
तृतीय असंगति .. ९९
४९ विषम ... ... १०१
५० सम ... ... १०३
५१ विचित्र ... ... १०३
५२ प्रहर्षण ... ... १०५
५३ विषादन .. ... १०७
५४ अधिक ... ... १०९
५५ अन्योन्य ... ... १०९
५६ विशेष ... ... १११
५७ व्याघात ... ... ११३
५८ गुम्फ ... ... ११३
५९ एकावली ... ... ११५
६० मालादीपक ( सार ) ११७
६१ यथासांख्य ... ... ११७
६२ पर्याय ... ... ११९
६३ परिवृत्ति ... ... १२१
६४ परिसंख्या ... ... १२१
६५ विकल्प ... ... १२३
६६ समाधि ... ... १२५
६७ समुच्चय ... ... १२५
द्वितीय समुच्चय ... १२७
६८ प्रत्यनीक ... ... १२७
६९ अर्थापत्ति ... ... १२९
७० काव्यलिंग ... ... १२९
७१ अर्थांतरन्यास ... १३१
७२ प्रौढोक्ति ... ... १३३
७३ संभावना ... ... १३३
७४ मिथ्याध्यवसित ... १३५
७५ उल्लास ... ... १३५
७६ अवज्ञा ... ... १३९
७७ अनुज्ञा ... ... १३९
७८ लेश ... ... १४१
७९ तद्‌गुण ... ... १४१
८० पूर्वरूप ... ... १४३
८१ अतद्‌गुण ... ... १४५
८२ अनुगुण ... ... १४७
८३ मीलित ... ... १४९
८४ उन्मीलित ... ... १४९
८५ सामान्य ... ... १५१
८६ विशेषक ... ... १५१
८७ पिहित ... ... १५३
८८ प्रश्नोत्तर ... ... १५३
८९ व्याजोक्ति ... ... १५५
९० लोकोक्ति ... ... १५७
९१ छेकोक्ति ... ... १५७
९२ वक्रोक्ति ... ... १५९
९३ स्वभावोक्ति ... ... १६१
९४ भाविक ... ... १६३
९५ भाविक छवि ... १६५
९६ उदात्त ... ... १६५
९७ अत्युक्ति ... ... १६७
९८ निरुक्ति ... ... १६९
९९ हेतु ... ... ... १७१
१०० अनुमान ... ... १७३


[ शब्दालंकार ]


१०१ छेक-लाटानुप्रास ... १७५
१०२ यमक-लाटानुप्रास ... १८३
१०३ पुनरुक्तिवदाभास ... १८३
१०४ चित्र ... ... १८५
१०५ संकर ... ... १८५
ग्रथालंकार नामावलि १८६–१८९



श्रीमंत भवानराव पंडितराव पंत प्रतिनिधि संस्थान औंध.

## ❀ आभार-पत्रिका. ❀

**श्रीमंत भवानराव श्रीनिवासराव उर्फ**
**बाळासाहेब पंतप्रतिनिधी बी. ए.**
**सरकार–औंध.**

यांनीं या ग्रंथाच्या प्रकाशनास उदार देणगी दिली आहे.
तिजविषयीं मी त्यांचा फार आभारी आहे.

विनीत

दु. आ. तिवारी.

# शिवराज-भूषण.



[ कविराज भूषणकृत अलंकारिक काव्य-ग्रंथाचें मराठी रूपांतर ]

# शिवराज--भूषण.

## ( हिंदी-मूळ )

### मंगलाचरण.

**कवित्त, शुद्ध घनाक्षरी[1] अथवा मनहरण**

बिकट अपार भव पंथ के चले को स्रम हरन करन बिजनासे ब्रह्म ध्याइए।
यहि लोक परलोक सुफल करनं कोंकनद से चरन हिए आनि कै जुडाइए॥
अलि कुल कलित कपोल; ध्यान ललित, अनंद रूप सरित मैं भूषन अन्हाइए।
पाप तरु भंजन बिघन गढ गंजन जगत मनरंजन द्विरदमुख गाइए॥ १॥

**छप्पय[2] अथवा षट्पद**

जै जयंति जै आदि सकति जै कालि कपर्दिनि।
जै मधु कैटभ छलनि देवि जै महिष विमर्दिनी॥
जै चमुंड जै चंड मुंड भंडासुर[3] खंडिनी।
जै सुरक्त जै रक्तबीज बिड्डाल[4] बिहंडिनि॥
जै निसुंभ सुंभद्दलनि भनि भूषण जै जै भननि।
सरजा समत्थ सिवराज कहँ देहि बिजै जै जग-जननि॥ २॥

---

१ या मात्रावृत्तांत ३१ वर्ण असतात. लघु गुरूंचा कांहीं नियम नसतो. अंत्य वर्ण मात्र गुरु असून १६ व्या वर्णावर यति असतो.

२ या छंदांत ६ चरण असतात. पहिले ४ चरण 'काव्यछंद' नांवाचे असतात व शेवटचे दोन 'उल्लाला' नांवाचे असतात. काव्यछंदाचा प्रत्येक चरण २४ मात्रांचा असतो व त्यांत ११ व्या मात्रेवर यति असतो. उल्लाला नांवाचे चरण २८ मात्रांचे असतात व त्यांत १५ व्या मात्रेवर यति असतो.

३।४ भंड असुराची कथा उपपुराणांत आहे व बिडालाची कथा दुर्गा पुराणांत आहे.

# शिवराज-भूषण.

( मराठी रूपांतर )

मराठी ग्रंथ संग्रहालय
४४१०
दा. क्र.

* मंगलाचरण *

मंदारमाला-वृत्त.

संसारमार्गे-श्रमातें हराया, रमावें गणाधीश रूपांतरीं !
स्वर्लोक हा लोक दोन्ही घडाया पदाब्जास त्याच्या स्मरावें तरी
गंडस्थलीं गुंजते भृंगमाला, असें ध्यान ज्याचें जगत्सुंदर
जो पापहारी, भयांना निवारी, भजावा गणाधीश तो सादर ॥ १ ॥

## मंदारमाला.

देवी! उमे! कालिके! आदिशक्ती! शिवानंदिनी! भक्तकल्याणिनी!
चंडासुरच्छेदिनी! भद्रकाली! निशुंभासुर-प्राणसंहारिणी!
दाक्षायणी! शैलराजेंद्रकन्ये! जगत्स्वामिनी! राजराजेश्वरी!
गे! वंशदेवी! तुला प्रार्थितो हा शिवाजी, रणीं दे जय स्वामिनी ॥ २ ॥

### दोहा.[1]

तरनि जगत जलनिधि तरनि जै जै आनंद ओक ।
कोक कोकनद सोकहर, लोक लोक आलोक ॥ ३ ॥

## राजवंश वर्णन.

राजत है दिनराज को बंस अवनि अवतंस ।
जामें पुनि पुनि अवतरे कंस मथन प्रभु अंस ॥ ४ ॥
महावीर ता बंस मैं भयो एक अवनीस ।
लियो बिरद "सीसौदिया" दियो ईस को सीस ॥ ५ ॥
ता कुल मैं नृपबृंद सब उपजे बखत बुलंद ।
भूमिपाल तिन मैं भयो बडो "माल मकरंद ॥ ६ ॥
सदा दान किरबान मै जाके आनन अंभु ।
साहि निजाम सखा भयो दुग्गा देवगिरि खंभु ॥ ७ ॥
तातें सरजा बिरद भी सोभत सिंह प्रमान ।
रन-भू-सिला सु भौंसिला आयुषमान खुमान ॥ ८ ॥

---

१ 'दोहा' या मात्रावृत्तांत चार चरण असतात व ते अनुक्रमें १३।११-१३।११ अशा मात्रांचे बनतात. हिंदी छंदःशास्त्रांत यांचें लक्षण असें दिलें आहे:-

॥ प्रथम कला तेरह धरौ । पुनि गेरह गनि लेहु ॥
॥ पुनि तेरह गेरह गनौ । दोहा लच्छन एहु. ॥

## आर्या

लोक–प्रकाशका बा! तरणे[१]! तूं तरणिरूप[२] जगतांत ॥
[३]अरविंद-चक्र[४] यांच्या शोकघ्ना! तव जयोऽस्तु विश्वांत ॥ ३ ॥

## राजवंश वर्णन

राजतसे तेजानें अवनीवरि सूर्यवंश अवतंस।
अवतरतो ज्यामाजी पुनः पुन्हां कंसमथन देवांश ॥ ४ ॥
त्या वंशांत जह्वाला एक महाशूर वीर अवनीश।
उपनांम धारिलें हें "सिसोदियां", अर्पि विभुपदीं शीर्ष ॥५॥
विख्यात त्या सिसोदी-कुलांत नृपराज जाह्ले बहुत।
त्या नृपवृंदांत अहा! मालोजी भूमिपाल यशवंत ॥ ६ ॥
दानीं तेविं कृपाणीं यद्वदनीं विलसलें सदा अंभ[६]।
तो होय देवगिरिच्या निजामशाहीस[७] रक्षक स्तंभ ॥ ७ ॥
'सरजा[८]' पदवी त्यातें शोभतसे केसरी समान पहा।
रण-भू-शिलाच[९] केवळ, जन वदती 'भोसला' तयास अहा॥८॥

---

१ हे सूर्या! २ नौकारूप ३ कमळ ४ चक्रवाक ५ सिसोदे कुलाचे रजपूत सर्वश्रेष्ठ होतात. हल्लीं उदेपूर व नेपाळ येथें याच वंशाचे राजे आहेत. या कुळाचे पूर्वज 'सिसौद' निवासी होते. ६ पाणी ७ मालोजी भोसल्यांचा अहमद नगरच्या निझामशाहीस मोठा आधार होता. ८ मालोजीला 'सरजाह' हा किताब होता. या पासूनच 'सर्जा' शद्ब निघाला. भूषण कवि 'सिंह' या अर्थी हा शब्द वापरतात. ९ 'भोसला' शब्दाची कवीनें ही अलंकारिक व्युत्पत्ती सांगितली आहे.

भूषन भनि ताके भयो भुव-भूषन सुत साहि ।
रातौ दिन संकित रहैं साहि सबै जग माहि ॥ ९ ॥

## कबित्त मनहरण.

एते हाथी दीन्हे मालकरंद जू के नंद जेते गनि सकति बिरंच हू की न तिया ।
भूषन भनत जाकी साहिबी सभा के देखे लागैं सब और छितिपाल छिति मैं छिया॥
साहस अपार हिंदुवान को अधार, धीर सकल सिसौदिया सपूत कुल को दिया।
जाहिर जहान भयो साहिजू खुमान बीर साहिन को सरन सिपाहिन को तकिया॥१०॥

## दोहा

दशरथ जू के राम भे वसुदेव के गोपाल।
सोई प्रगटे साहि के श्री सिवराज भुवाल ॥ ११ ॥
उदित होत सिवराज को मुदित भये द्विजदेव ।
कलियुग हट्यो मिटयो सकल म्लेच्छन को अहमेव ॥ १२ ॥

## कबित्त-मनहरण

जा दिन जनम लीन्हो भू पर भुसिल भूप ताहि दिन जीत्यो अरि उर के उछाह को।
छठी छत्रपातिन को जीत्यो भाग अनायास जीत्यो नामकरन मैं करन प्रवाह को ॥
भूषन भनत बाललीला गढ कोट जीत्यो साहिके सिवाजी करि चहूं चक्क चाह को।
बीजापूर गोलकुंडा जीत्यो लरिकाइ ही मैं ज्वानी आए जीत्यो दिलीपती पातसाहको
॥ १३ ॥

मालोजीस शहाजी भू-भूषण सत्कुमार हा झाला ।
पातशहाही चित्तीं धाकत होते यदीय शौर्याला ॥ ९ ॥

## मंदारमाला.

दंती[१] दिले एवढे शाहजीनें गणूंही शकेना विरंची-सुता[२] ।
ज्याच्या सभा-मंडपीं म्लान झाले धराधीश यच्छ्रेष्ठता पाहतां ॥
जो हिंदुवानास[३] आधार झाला, सिसौदी-कुलीं धीर ज्यानें दिला ।
दीनांस पाता, शहांचा विधाता असा गाजला शाहजी भोसला॥ १० ॥

## आर्या.

श्रीराम दशरथाचा, वसुदेवाचा कुमार गोपाल ।
तोच शहाजी उदरीं प्रगटे शिवराज शौर्य-तेजाळ ॥ ११ ॥
शिवराज उदित होतां देव-द्विज मुदित जाहले सकल ।
कलियुग सरलें, झाली यवन--अहंता निजांतरीं विकल ॥ १२ ॥

## मंदारमाला.

घेई शिवाजी अहा! जन्म लोकीं रिपूत्साहची जिंकिला त्या दिनीं
भाग्यें नृपांचीं सटीच्या दिनीं,[४] कर्ण-कीर्ती तशी नामधानीं दिनीं[५]
कीलेसवें जिंकिलें तोरण्याला, स्वमाहात्म्य चारी दिशीं वाधिलें
बाल्यांतची जिंकिलें दक्षिणेला, पुढें यौवनीं दिल्लिला जिंकिलें॥ १३ ॥

---

१ हत्ती २ सरस्वती ३ हिंदु लोकांस ४ जन्मानंतर सहाव्या दिवशीं सटीची पूजा करितात त्या दिवशीं ५ बारशाच्या दिवशीं नांव ठेवतात तेव्हां.

### दोहा

दच्छिन के सब दुग्ग जिति दुग्ग सहार बिलास ।
सिवसेवक सिव गढपती कियो रायगढ बास ॥ १४ ॥

## रायगढ-वर्णन.

### मालती सवैया[१]

जा पर साहि तनै सिवराज सुरेस कि ऐसि सभा सुभ साजै
यों कवि भूषन जंपत है लखि संपति को, अलकापति लाजै ॥
जा मधि तीनिहु लोक कि दीपति ऐसो बडो गढराय बिराजै ।
वारि पताल सी माची मही अमरावति की छबि ऊपर छाजै ॥ १५ ॥

### हरिगीतिका-छंद[२]

मनिमय महल सिवराजके इमि रायगढ मैं राजहीं ।
लखि जच्छ किन्नर असुर सुर गंधर्व हौंसनि साजहीं ॥
उत्तंग मरकत मंदिरन मधि बहु मृदंग जु बाजहीं ।
घन-समै मानहु घुमरि करि घन घनपटल गलगाजहीं ॥ १६
मुकतान की झालरिन मिलि मनि-माल छज्जा छाजही ।
संध्या समै मानहुं नखत गन लाल अंबर राजहीं ॥

---

१ या वृत्तांत ७ भगण असतात व शेवटीं २ गुरु असतात. हिंदी भाषेंत गुरु अक्षरास देखील मृदु उच्चारानें लघुत्व आणितां येतें म्हणून त्या भाषेंत या वृत्तनियमानें फारच थोड्या सवैया शुद्ध निघतील.

२ या छंदांतील प्रत्येक चरण २८ मात्रांचा होतो व शेवटचें अक्षर गुरु असतें. १६ व्या मात्रेवर यति असतो.

### आर्या.

जे दुर्ग दक्षिणेचे जिंकियले त्यांत जो करि विलास ।
शिव-सेवक शिव गढपति रायगडीं त्या करी स्वयें वास ॥ १४ ॥

## रायगढ-वर्णन.

### मंदारमाला

त्या रायदुर्गांवरी श्रीशिवाजी--सभा देवतुल्या शुभा शोभते ।
जेथील संपत्ति पाहून चित्तीं कुबेरासही लाज कीं वाटते ॥
त्रैलोक्य--कांती विराजे जयाच्या मधें, दुर्ग ऐसा दिसे भूवरी ।
माची[१] मही, वारि[२] पाताळ खालीं, वरी शोभते निर्जरांची पुरी॥ १५।

### आर्या.

मणिमय मंदिर--माला शिवरायाच्या गडावरी राजे ।
किन्नर--गण सुर--गणही तैशीं भवनें करावया साजे ॥
मरकतमय मंदिरिं त्या उठति मनोहर मृदंग पडसाद ।
अंबुदमाला करिते अभ्रपटावरि गभीर कीं नाद ॥ १६ ॥
रत्नखचित मुक्तावलि महिरापी भवंति वितरिती कांती ।
संध्यासमयीं जणुं कीं नक्षत्रें लाल अंबरें वरिती ॥

---

१।२ खंदकाचा जलयुक्त भाग पाताळाप्रमाणें व त्यावरील माचीचा भाग पृथ्वी प्रमाणें असा अर्थ.

३ तशी मंदिर-माला.

जहँ तहाँ ऊरध उठे हीरा किरन घन समुदाय है।
मानो गगन तंबू तन्यो ताके सपेत तनाय हैं॥ १७॥

भूषन भनत जहँ परसि कै मनि पुहुपरागन की प्रभा।
प्रभु पीत पट की प्रगट पावत सिंधु मेघन की सभा॥
मुख नागरिन के राजही कहुँ फटिक महलन संग मैं।
बिकसंत कोमल कमल मानहु अमल गंग तरंग मैं॥ १८॥

आनंद सों सुंदरिन के कहुं बदन इंदु उदोत हैं।
नभ सरित के प्रफुलित कुमुद मुकुलित कमल कुल होत हैं॥
कहुँ बावरी सर कूप राजत बद्धमनि सोपान हैं।
जहँ हंस सारस चक्रवाक बिहार करत सनान हैं॥ १९॥

कितहूँ बिसाल प्रबाल जालन जटित अंगनि भूमि हैं।
जहँ ललित बागनि द्रुमलतानि मिलि रहे झिलमिलि झूमि हैं॥
चंपा चमेली चारु चंदन चारि हू दिसि देखिए।
लवली लवंग यलानि केरे लाखोहों लगि लेखिए॥ २०॥

कहुँ केतकी कदली करौंदा कुंद अरु करबीर हैं।
कहुँ दाख दाडिम सेब कटहल तूत अरु जंभीर हैं॥
कितहूँ कदंब कदंब कहुँ हिंताल ताल तमाल हैं।
पीयूष ते मीठे फले कितहूँ रसाल रसाल हैं॥ २१॥

पुन्नाग कहुँ कहुँ नागकेसरि कतहुँ बकुल असोक हैं।
कहुँ ललित अगर गुलाब पाटल पटल बेला थाक हैं॥

जेथें तेथें उठती ऊर्ध्वमुखी किरण हीर--रत्नाचें ।
वाटे शुभ्र तणावे गगनाच्या शोभतात तंबूचे ॥ १७ ॥
जेथें पुष्कर[1]--रत्नप्रभा मनोहर सपीत विकसोनी ।
प्रभुपीतपटासमची कांति लसे, जेवि सिंधु--मेघ--गणीं ॥
सुंदर ललना--वदनें विलसति जैं स्फटिक--रम्य भवनांत ।
वाटे विकासित झालीं कमलें भागीरथी--तरंगांत ॥ १८ ॥
सानंद उदित होतीं इंदु--सदृश सुंदरी--मुखें कोठें ।
मंदाकिनींत[2] कुमुदें कमलें कीं विकच जाहलीं वाटे ॥ १९ ॥
यत्सोपान मण्यांचे राजति, कोठें तडागही वापी ।
सारस-चक्र-मराल-द्वंद्वें रमतात जेथ आलापीं ॥ १९ ॥
भवनांगणीं प्रवालें रचिलेल्या शोभतात किति वेली ।
उद्यानांतिल वेली डोलत असतां प्रकाश करि केली ॥
चंदन, चारु चमेली, चाफा चारी दिशांत हे वृक्ष ।
लवली[3], लवंग, एला[4]--लतिका लसती सहस्र कीं लक्ष ॥२०॥
कोठें कदली, केतकि, कुटज कुठें, कुंद, कुरर[5], करवंद ।
द्राक्ष--लता दाडिम--तरु जंबीरांचे कुठें कुठें वृंद ॥
हिंताल[6], ताल कोठें, कदंब कोठें, तमाल तरु कोठें ।
अमृतापरि रुचि ज्यांची रसाल ऐसे रसाल--तरु कोठें ॥ २१ ॥

पुन्नाग[8] नागकेसर[9] बकुल अशोकहि विशाल लसतात ।
कोठें गुलाब पाटल माधविंचे ताटवेहि खुलतात ॥

---

१ पुष्कराज-रत्न २ स्वर्गंगा ३ नेवारी ४ वेलदोडा ५ कण्हेर ६ ताडवृक्ष ७ आम्रवृक्ष. ८ जायफळाचें झाड, ९ नागचाफा.

कितहूँ नेवारी माधवी सिंगारहार कहूँ लसैं ।
जहँ भाँति भाँतिन रंग रंग बिहग आनँद सों रसैं ॥ २२ ॥

## षट्पद

लसत बिहंगम बहु लवनित बहु भाँति बाग महँ ।
कोकिल कीर कपोत केलि कलकल करंत तहँ ॥
मंजुल महरि मयूर चटुल चातक चकोर गन ।
पियत मधुर मकरंद करत झंकार भृंग घन ॥
भूषन सुवास फल फूल युत छहुँ ऋतु बसत बसंत जहँ ।
इमि रायदुग्ग राजत रुचिर सुखदायक सिवराज कहँ ॥ २३ ॥

## दोहा

तहँ नृप रजधानी करी जीति सकल तुरकान ।
सिव सरजा रुचि दान में कीन्हों सुजस जहान ॥

## कविवंश वर्णन

देसन देसन ते गुणी आवत जाचन ताहि ।
तिनमें आयो एक कवि भूषण कहियतु जाहि ॥ २५ ॥

दुज कनौज, कुल कश्यपी, रतनाकर सुत धीर ।
बसत तिविक्रम पुर सदा तरनि तनूजा तीर ॥ २६ ॥

बीर बीरबर से जहाँ उपजे कबि अरु भूप ।
देव बिहारीश्वर जहाँ विश्वेश्वर तद्रूप ॥ २७ ॥

मधु माधवी निवारी कोठें शृंगारहार या वेली ।
विविध विहंगम ज्यावरि आनंदें कारिति गानमय केली ॥ २२ ॥

आर्या

लसती सुमनोद्यानें विविध विहग-वृंद जेथ वसतात ।
कोकिल कीर कपोत क्रीडा कलकल रवांत करितात ॥
चंचल चकोर चातक, मंजु मयूरी मयूर रमतात ।
मधुर मरंद प्राशुनि गुंजारव भृंगराज करितात ॥
परिमलयुत फल पुष्पें षड्ऋतु अर्पिति जयास नव साज ।
शिवरायाच्या वसतिप्रति शोभे रायदुर्ग नगराज ॥ २३ ॥

आर्या

तेथेंच राजधानी केली जिंकून सकल तुर्काला ।
दक्षिण-भूप शिवाजी दान--गुणें विस्तरी स्व-कीर्तीला ॥ २४ ॥

## कविवंश वर्णन.

शोधित येतात तया देशादेशाहुनी गुणाढ्य-गण ॥
आला एक तयांताचि 'कवि भूषण' ज्यास बोलतात जन ॥ २५॥
रत्नाकर-सुत, कश्यप गोत्री, द्विज कान्यकुब्ज[१] मतिधीर ॥
राहे त्रिविक्रम-पुरीं, जें भूषवि सूर्यजा--नदी--तीर ॥ २६ ॥
जेथें बीरबलासम कवि-भूपांचा घडे अहा ! जन्म ॥
देव विहारीश्वरही निज-वासें स्थान तें करीं धन्य ॥ २७ ॥

---

१ या वरून स्पष्ट कळून येतें कीं भूषणजी हे कान्यकुब्ज ब्राह्मण असून कश्यप गोत्री ( तिवारी ) होते. त्यांच्या वडिलांचें नांव रत्नाकर असून ते यमुनातीरावरील त्रिविक्रम पुराचे राहिवासी होते. याच त्रिविक्रमपुरांत बीरबलाचा जन्म झाला होता व बिहारीश्वर हें त्या पुरांतलि ग्रामदैवत होतें.


कुल सुलंक चितकूटपति साहस सील समुद्र ।
कवि भूषण पदवी दई हृदयराम सुत रुद्र ॥ २८ ॥

सिव चरित्र लखि यों भयो कवि भूषन के चित्त ।
भाँति भाँति भूषनिनि सों भूषित करौं कवित्त ॥ २९ ॥

सुकबिन हू की कछु कृपा समुझि कविन को पंथ ।
भूषन भूषनमय करत " शिव-भूषन " सुभ ग्रंथ ॥ ३० ॥

भूषन सब भूषननि मैं उपमहि उत्तम चाहि ।
याते उपमहि आदि दै बरनत सकल निबाहि ॥ ३१ ॥

——×——



सोलंकी--कुलभूषण साहस--शीळांत सिंधु--सा ह्मणवी ॥
त्या चित्रकूटभूपें[१] 'कवि भूषण' ही दिली तया पदवी ॥ २८ ॥

शिवराज-चरित पाहुनि भूषण-कविमन विलोभलें तेथें ॥
काव्य करावें वाटे, विविधालंकार शोभती जेथें ॥ २९ ॥

सत्कविकृपा-प्रसादें उचित तयांच्या पथास अनुसरतों ॥
भूषण मी, 'शिव--भूषण' भूषणमय रुचिर काव्य हें रचितों ॥ ३० ॥

विविधालंकारांतरिं उपमा रुचिरा गमे सुबुद्धींतें ॥
आधीं तिचेंच वर्णन करितों, नेईल काव्य सिद्धींतें ॥ ३१ ॥

---

२५ आणि २६ या कवितांचें मंदारमाला वृत्तांतील रूपांतरः—

॥ देशांतराहून येतात नाना गुणी लोक विद्याकलाभूषण ॥
॥ त्यांच्यांत आला कवी एक ज्याला जनीं सर्वही बोलती 'भूषण' ॥
॥ धीराग्रणी पुत्र रत्नाकराचा, गुणी कश्यपी कान्यकुब्ज द्विज ॥
॥ त्रैविक्रमाख्या पुरी सूर्यजेच्या तटीं जी, तिथें नांदले पूर्वज ॥

१ चित्रकूटापासून १३ मैलांवर गहोरा आहे. 'हृदयराम' हे गहोराचे राजे होते व त्यांचेच पुत्र 'रुद्र' यांनीं कवीस 'भूषण' ही पदवी दिल्याचा हा उल्लेख आहे. हृदयरामाच्या वेळीं गहोराच्या राज्यांत १०४३½ गांव होते. आणि राज्याचें उत्पन्न वीस लाख रुपये होते. बुंदेलखंडच्या छत्रसाल राजानें इ० स० १६७१ च्या सुमारास गहोराचें राज्य जिंकिलें.

# ग्रंथ प्रारंभ

## उपमा

### लक्षण-दोहा

जहाँ दुहुनकी देखिए सोभा बनति समान ।
उपमा भूषन ताहि को भूषण कहत सुजान ॥ ३२ ॥
जाको बरनन कीजिए सो उपमेय प्रमान ।
जाकी सरबरि कीजिए ताहि कहत उपमान ॥ ३३ ॥

### उदाहरण-मनहरण दंडक

मिलतहि कुरुख चकत्ताको निरखि कीन्हो सरजा सुरेस ज्यों दुचित ब्रजराजको ।
भूषन कुमिस गैरमिसल खरे किये म्लेच्छ मुरछित करि कै गराज को ॥
अरे ते गुसुलखाने बीच ऐसे उमराय लै चले मनाय महाराज सिवराजको ।
दाबदार निरखि रिसानो दीह दलराय जैसे गडदार अडदार गजराजको ॥ ३४॥

### अन्यच्च-मालती सवैया

सासता खाँ दुरजोधन सो औ दुसासन सो जसवंत निहार्‍यो ।
द्रोन सो भाऊ करन्न करन्न सो और सबै दल सो दल भार्‍यो ॥
ताहि बिगोय सिवा सरजा भने भूषन औनि छता यों पछार्‍यो ।
पारथ कै पुरुषारथ भारथ जैसे जगाय जयद्रथ मार्‍यो ॥ ३५ ॥

# ग्रंथ प्रारंभ

## उपमा

### लक्षण

जेथें दोन वस्तूंची समान शोभा दिसून येते तेथें 'उपमा' अलंकार ह्मणतात ३२

ज्याचें वर्णन करावयाचें त्यास 'उपमेय' ह्मणतात व ज्याची उपमा द्यावयाची त्यास 'उपमान' ह्मणतात ३३

### उदाहरण—मंदारमाला

संतप्त झाला शिवाजी शहाला बघोनी, जसा कृष्ण इंद्रावरी ॥
मानोचित स्थान लाधे न तेव्हां करी गर्जनेनें सभा घाबरी ॥
क्रुद्ध द्विपेंद्रास नेती महात प्रयासें जसें शांतवोनी पुढें ॥
नेती शहाच्याकडे स्नान-गेहीं, मनस्वी परी मानभंगें अडे ॥३४॥

### उदाहरण—दुसरें, मंदारमाला

दुःशासनी मूर्ति दुर्योधनी त्या यशोवंत[१]-षाहिस्तखांच्या गणीं।
द्रोणापरी भाउसिंह[२] प्रतापी, गणा कर्ण[३] कर्णापरी अग्रणी ॥
गोटामध्यें साहसानें घुसोनी धरापृष्टिं षाहिस्तखां छेदिला ॥
पार्थ जसा पौरुषें जागवोनी रणीं सिंधु-भूपाल[४] संहारिला ॥३५॥

---

१ इ. स. १६६२ त षाहिस्तखां दक्षिणेंत आला तेव्हां त्याच्या बरोबर मारवाडचा राजा जशवंतसिंग होता २ बूंदी नरेशाचा पुत्र भाऊसिंहही होता ३ विकानेरचा युवराज कर्णसिंहही होता यानें इ. स. १६३२ ते १६७४ पर्यंत राज्य केलें. याला दिल्ली दरबारांतून २ हजार स्वारांची मनसबी होती ४ जयद्रथ.

## लुप्तोपमा

### लक्षण-दोहा

उपमा वाचक पद, धरम, उपमेयो, उपमान।
जामैं सो पूर्णोपमा लुप्त घटत लौं मान ॥ ३६ ।

### उदाहरण ( धर्मलुप्ता ) मालती सवैया

पावक तुल्य अमीतन को भयो मीतन को भयो धाम सुधा को ।
आनंद भो गहिरो समुदै कुमुदावलि तारन को बहुधा को ॥
भूतल माहिं बली सिवराज भो भूषन भाखत शत्रु मुधा को ।
बंदन तेज त्यों चंदन कीरति सोंधे सिंगार बधू बसुधा को ॥ ३७ ॥

### अन्यच्च मनहरण

आए दरबार बिललाने छरीदार देखि जापता करनहारे नेक हू न मनके ।
भूषन भनत भैसिला के आय आगे ठाढे वाजे भए उमराय तुजुक करन के ॥
साहि रह्यो जकि सिव साहि रह्यो तकि और चाहि रह्यो चकि बने ब्योंत अनबन के ।
ग्रीषम के भानुसो खुमान को प्रताप देखि तारे सम तारे गए मूँदि तुरकन के ॥ ३८ ॥

## अनन्वय

### लक्षण-दोहा

जहाँ करत उपमेय को उपमेयै उपमान ।
तह अनन्वै कहत है भूषन सकल सुजान ॥ ३९ ॥

# लुप्तोपमा

## लक्षण.

उपमावाचक पद, धर्म, उपमेय आणि उपमान हे ज्या वर्णनांत पूर्णपणें लुप्त झालेले असतात त्यास 'लुप्तोपमा' अलंकार ह्मणतात. ३६

## उदाहरण ( धर्मलुप्त )

### मंदारमाला.

वैरीजनां पावका सारखा हा, सुहृत्सज्जनांना सुधा-धाम हा[1] ॥
नक्षत्र-माला कुमुद्वृंद रूपी जनांचा प्रकाशे जणो हर्ष हा ॥
राजा शिवाजी बली भूतलीं हा असे मिथ्यतेचा प्रहंता पहा ॥
तेजांत हा अग्नि, कीर्तींत पाटीर[2], पृथ्वींत सौगंध-शृंगार हा ॥३७॥

## उदाहरण दुसरें, ( मंदारमाला )

गेला सभा-मंडपीं हा शिवाजी तदा स्तब्ध ते द्वारचारी जन ॥
आला पुढें मान द्यायास कोणी , करी नम्रतेनें कुणी वंदन ॥
शाहा जिवाला जपे, इच्छि हा[3] कीं घडावी धुमाळी अतां या स्थळीं
प्रश्मिार्क--तेजापरी तेज त्याचें बघोनी बुडे तुर्क--तारावली ॥३८॥

# अनन्वय

## लक्षण.

जेथें उपमेयाला उपमेयाचेंच उपमान केलें जातें तेथें 'अनन्वय' अलंकार ह्मणतात ३९

१ ही चंद्रावर उक्ति आहे. २ चंदन. ३ शिवाजी.

### उदाहरण-मालती सवैया

साहि तनै सरजा तव द्वार प्रतिच्छन दान कि दुंदुभि बाजै ।
भूषण भिच्छुक भीरन को अति भोजहुते बढि मौजनि साजै ॥
राजन को गन, राजन ! को गनै ? साहिन मैं न इती छबि छाजै ।
आजु गरीब नेवाज मही पर तो सो तुहीं सिवराज बिराजै ॥ ४० ॥

## प्रथम प्रतीप

### लक्षण-दोहा

जहँ प्रसिद्ध उपमान को करि बरनत उपमेय ।
तहँ प्रतीप उपमा कहत भूषन कविता प्रेय ॥ ४१ ॥

### उदाहरण-मालती सवैया

छाय रही जितही तितही अतिही छबि छीरधि रंग करारी ।
भूषन सुद्ध सुधान के सौधनि सोधति सी धरि ओप उज्यारी ॥
यों तम तोमहि चाबिकै चंद चहूँ दिसि चांदनि चारु पसारी ।
ज्यों अफजल्लहि मारि महीपर कीरति श्री सिवराज बगारी ॥ ४२ ॥

## द्वितीय प्रतीप

### लक्षण-दोहा

करत अनादर बर्न्य को, पाय और उपमेय ।
ताहू कहत प्रतीप जे भूषन कविता प्रेय ॥ ४३ ॥

### उदाहरण--मंदारमाला

त्वन्मंदिरीं दान--विख्यात गाजे प्रभो ! प्रत्यहीं दुंदुभीचा ध्वनी ।
आकंठ जे भोजनीं तृप्त झाले दिसे मौज त्या भिक्षुकांच्या गणीं ॥
भूपाल ! भूपाल कोणी गणावें, न शाहांत दातृत्व ऐसें दिसे ॥
क्षोणीतळीं क्षोणि-पाळा! दयाळा! तुझ्यासारखा तूंच दाता असे।४०।

# प्रथम प्रतीप

### लक्षण.

जेथें प्रसिद्ध उपमानाला उपमेय स्वरूपांत वर्णिलें असतें तेथें ' प्रतीप ' अलंकार ह्मणतात. ४१

### उदाहरण-मंदारमाला.

चोहींकडे क्षीरधीच्या विशुभ्रा प्रभेसारखी शोभेत शुभ्रता ॥
शोधी सुधा-तुल्य सौधास कीं ही मनोहारिणी भूवरीं चारुता ॥
तारापती संहरोनी तमाला अशी कौमुदी विस्तरी भूतळीं ॥
कीं जेविं मारून अफ्जुल्लखाला शिवानें जगीं कीर्ति विस्तारिली॥४२॥

# द्वितीय प्रतीप

### लक्षण

जेथें वर्ण्य ( उपमेय ) वस्तूचा अनादर करून अन्य उपमेय योजिलें जातें तेथेंही ' प्रतीप ' अलंकार होतो. ४३

### उदाहरण-दोहा

शिव ! प्रताप तव तरनिसम, अरि पानिप हर मूल ।
गरब करत केहि हेत है वडवानल तो तूल ॥ ४४ ॥

## तृतीय प्रतीप

### लक्षण-दोहा

आदर घटत अबर्न्यं को, जहँ बर्न्य के जोर ।
तृतीय प्रतीप बखानहीं तहँ कविकुल सिरमोर ॥ ४५ ॥

### उदाहरण-दोहा

गरब करत कत चांदनी हीरक छीर समान ।
फैली इती समाज गत कीरति सिवा खुमान ॥ ४६ ॥

## चतुर्थ प्रतीप

### लक्षण-दोहा

पाय बरन उपमान को, जहाँ न आदर और ।
कहत चतुर्थ प्रतीप है भूषन कबि सिरमौर ॥ ४७ ॥

### उदाहरण-कबित्त मनहरण

चंदन मैं नाग, मद भर्यो इंद्रनाग, विष भरो सेस नाग कहैं उपमा अबस को ।
भोर ठहरात न कपूर बहरात, मेघ सरद उडात वात लागे दिसि दस को ॥
शंभु नीलग्रीव, भौंर पुंडरीकही बसत, सरजा सिवाजी सन भूषन सरस को ।
छीरधी मैं पंक, कलानिधि मैं कलंक, याते रूप एक टंक ए लहैं न तव जस को॥४८॥

### उदाहरण--आर्या

शिव ! तव विक्रम रविसम, अरितेजाचा समुद्र हरणारा ॥
गर्व करितसे कां तरि ? वडवानल तदुदरांत वसणारा ॥ ४४ ॥

# तृतीय प्रतीप

### लक्षण

उपमानाविषयीं अनादर वाटून उपमेयाविषयीं आदर वाटूं लागला ह्मणजे तृतीय ' प्रतीप, अलंकार होतो. ४५

### उदाहरण--आर्या.

हीरक–दुग्ध समान प्रभामयी चमकते कुठें तारा ॥
इकडे भूतल व्यापी शिव–सरजाची शुभा यशो--धारा ॥ ४६ ॥

# चतुर्थ प्रतीप

### लक्षण

उपमान उपमेयाच्या योग्यतेपेक्षां कमी प्रतीचें आहे असें जेथें वर्णन असतें तेथेंही चतुर्थ ' प्रतीप ' अलंकार होतो ४७

### उदाहरण–मंदारमाला

मैलागिरी चंदनीं नाग राहे, मदें इंद्र नागासही व्यापिलें ॥
कर्पूर वायूसवें लुप्त होई , उषा चंचला प्रत्यहीं आढळे ॥
क्षीरोदधीच्या तळीं पंक राहे, कलंकी कलास्वामि देहीं असे ॥
हिंद-स्वराज्य-प्रजानाथ! कोठें न तुल्योपमा त्वद्यशाला दिसे ॥४८॥

## पंचम प्रतीप

### लक्षण-दोहा

हीन होय उपमेय सों नष्ट होत उपमान ।
पंचम कहत प्रतीपं तेहि भूषन सुकवि सुजान ॥ ४९ ॥

### उदाहरण-कवित्त मनहरण

तो सम हो सेस सो तो बसत पताल लोक ऐरावत गज सो तो इंद्रलोक सुनियै ।
दुरे हंस मानसर ताहि मै कैलासधर सुधा सुरबर सोऊ छोडि गयो दुनियै ॥
सूर दानी सिरताज महाराज सिवराज रावरे सुजस सम आजु काहि गुनियै ।
भूषन जहाँ लौं गनौं तहाँ लौं भटाकि हार्‍यों लखिये कछू न केती बातैं चित चुनियै॥५०

### अपरंच-मालती सवैया

कुंद कहा पय वृंद कहा अरु चंद कहा सरजा जस आगे ?
भूषन भानु कृसानु कहाब खुमान प्रताप महीतल पागे ?
राम कहा द्विजराम कहा बलराम कहा रन मैं अनुरागे ?
बाज कहा मृगराज कहा अति साहस मैं सिवराज के आगे ? ॥ ५१ ॥

यों सिवराज को राज अडोल कियो सिव जोब कहा धुव धू है ?
कामना दानि खुमान लखे न कछू सुर-रूख न देव-गऊ है ?
भूषन भूषन मैं कुल भूषन भौंसिला भूप धरे सब भू है ।
मेरु कछूं न कछू दिगदंति न कुंडलि कोल कछू न कछू है ॥ ५२ ॥

## पंचम प्रतीप

### लक्षण

उपमेयामुळेंच उपमान हीन ठरून नष्ट होत असलें म्हणजे तेथें पंचम ' प्रतीप ' अलंकार होतो.

### उदाहरण—मंदारमाला

श्री शेष आहे तुझ्या सारखा तो, परी वास पाताळ लोकीं करी ॥
ऐरावत—स्थानही इंद्र--लोकीं, तसा मानसीं हंस राहे दुरी ॥
सोडून गेली सुधा भूतळाला, तुझी कीर्ति तोलूं कुणाशीं तरी ॥
शोधून शोधून मी हारलों बा, कुठें वस्तु तुल्या दिसे ना परी ॥ ५० ॥

### उदाहरण २ रें—मंदारमाला

कोठें पयोवृंद, तो कुंद कोठें, कुठें चंद्र, सर्जा—यशाच्यापुढें ?
वानूं कसा भानु किंवा कृशानूं[1] प्रतापासवें, हेंच कोडें पडे !
श्रीराम कोठें, बळीराम कोठें महाबाहु—युद्धानुरागांतरीं ?
काकोल[2] कोठें, कुठें केसरीही, कसे तुल्य तत्साहसाला तरी? ॥५१॥

### उदाहरण ३ रें—मंदारमाला

शंभू करी राज्य त्याचें असें कीं, ध्रूवाचें कुठें ध्रौव्य[3] सांगा अतां॥
या कामना—पूरकातें बघोनी गमे कामधेनू-तरूही[4] वृथा ॥
भू पाळिली भोसले—भूषणानें स्वबाहु—प्रतापें, खरा भूप हा ॥
श्रीशेष, दिग्दंति, मेरू, वराह श्रुती ऐकते मात्र नामें पहा ॥ ५२ ॥

---

१ अग्नि   २ बहिरी ससाणा   ३ अचलता   ४ कल्पवृक्ष

## उपमेयोपमा

### लक्षण-दोहा

जहाँ परस्पर होत हैं उपमेयो उपमान
भूषन उपमेयोपमा ताहि बखानत जान ॥ ५३ ॥

### उदाहरण-कबित्त मनहरण

तेरो तेज, सरजा समत्थ! दिनकर सो है, दिनकर सोहै तेरे तेज के निकर सो।
भौसिला भुवाल ! तेरो जस हिमकर सोहै, हिमकर सोहै तेरे जस के अकर सो॥
भूषन भनत तेरो हियो रतनाकर सो, रतनाकरौ है तेरे हिय सुखकर सो ॥
साहिके सपूत सिव साहि दानि ! तेरो कर सुरतरु सोहै, सुरतरु तेरे कर सो॥५४॥

## मालोपमा

### लक्षण-दोहा

जहाँ एक उपमेय के होत बहुत उपमान।
ताहि कहत मालोपमा भूषन सुकवि सुजान ॥ ५५ ॥

### उदाहरण--कबित्त मनहरण

इंद्र जिमि जंभपर, वाडव सुअंभ पर, रावन सदंभ पर रघुकुल-राज है।
पौन बारिबाह पर, संभु रतिनाह पर, ज्यों सहसबाह पर राम द्विजराज है।
दावा द्रुमदंड पर, चीता मृग झुंड पर भूषन बितुंड पर जैसे मृगराज है।
तेज तम अंस पर, कान्ह जिमि केस पर, त्यों मलिच्छ बंस पर सेर सिवराज है ॥५५॥




**श्री शिवाजी व भूषण.**

हा भोसले भूप गाझी शिवाजी तसा भूतळीं म्लेंच्छ वंशावरी ||पा.२७

श्रीकृष्ण छा. जळगांव

# उपमेयोपमा

## लक्षण

जेथें उपमेय व उपमान दोघेही परस्पर तुल्य असतात तेथें 'उपमेयोपमा' अलंकार ह्मणतात ( ह्मणजे प्रथम एका वस्तूला दुसऱ्याची उपमा दिल्यानंतर तिलाच पहिलीची उपमा देणें. ५३

## उदाहरण—मंदारमाला.

त्वत्तेज राया! रवीसारखें, तो रवीहि तुझ्या दिव्य तेजापरी ॥
कीर्ति त्वदीया शशीसारखी, तो शशीहि तुझ्या कीर्ति-पुंजापरी ॥
त्वच्चित्त रत्नाकरासारखें वा! तसा रत्न[१]—धी रम्य चित्तापरी ॥
हस्त प्रभो! कल्पवल्लीपरी ते, अहा! कल्पवल्लीही हस्तापरी॥५४॥

# मालोपमा

## लक्षण.

जेथें एका उपमेयाचें अनेक उपमानांनीं वर्णन केलेलें अस तेथें 'मालोपमा' अलंकार ह्मणतात. ५५

## उदाहरण--मंदारमाला

जंभावरी इंद्र, लंकापतीच्यावरी कीं जसा जानकीचा पती ॥
मेघावरी वायु, कामावरी कीं महादेव--ज्याची तपाची रती ॥
दुःशासनाच्या वरी भीम, किंवा कन्हय्या जसा दुष्ट कंसावरी ॥
हा भोसले--भूप गाझी शिवाजी तसा भूतलीं म्लेंच्छ वंशावरी॥५६॥

---

१ समुद्र

## ललितोपमा

### लक्षण–दोहा.

जहँ समता को दुहुन की लीलादिक पद होत ।
ताहि कहत ललितोपमा सकल कबिन के गोत ॥ ५७ ॥
बिहसत, निदरत, हँसत जहँ छवि अनुसरत बखानि ।
सत्रु मित्र इमि औरऊ लीलादिक पद जानि ॥ ५८ ॥

### उदाहरण- कबित्त मनहरण.

साहि तनै सरजा सिवाकी सभा, जामधी है मेरुवारी सुरकी सभा को निदरति है।
भूषन भनत जाके एक एक सिखरते केते धौं नदी नदकी रेल उतरती है ।
जोन्ह को हँसति जोति हिरा मनि मंदिरन कंदरन मैं छबि कुहू की उछरति है ॥
ऐसो ऊँचो दुरग महाबली को जामैं नखतावली सों बहस दिपावली धरति है॥५९॥

## रूपक

### लक्षण–दोहा

जहाँ दुहुन को भेद नहिं बरनत सुकवि सुजान ॥
रूपक भूषन ताहि को भूषन करत बखान ॥ ६० ॥

# ललितोपमा

### लक्षण

जेथें लीलादि पदें दोहोंच्या ( उपमेयोपमानांच्या ) समतेला कारण होतात तेथें 'ललितोपमा' अलंकार म्हणतात. ५७

"ज्या वर्णनांत शत्रु, मित्र व इतर देखील उपहासमय, निरीक्षणमय आणि हास्यमय कांतीला अनुसरतात अशा वर्णनांतील पदांना 'लीलादि-पदें' म्ह० ५९

### उदाहरण—मंदारमाला

मेरूवरी निर्जरांची सभा, श्री शिवाजी—सभा तेविं दुर्गावरी ॥
एकैक शृंगीं जयाच्या वहाती नदीनिर्झर—स्रोत भूमीवरी ॥
यन्मंदिराची हंसे रत्नकांती अमेची[१] दडे कृष्णता कंदरीं ॥
उत्तुंग ऐसा बली-दुर्ग, ज्याची लसे दीप-भा व्योम[२]-तारांतरीं ॥५९॥

# रूपक

### लक्षण

जेथें उपमान व उपमेय यांचें अभेद वर्णन असतें तेथें 'रूपक' अलंकार होतो ६०

---

१ अमावास्येची  २ आकाशतारांगणांत

## उदाहरण-छप्पय

कलिजुग जलधि अपार उध्ध सधरम्म उम्मिमय।
लच्छनि लच्छ मलिच्छ कच्छ अरु मच्छ मगर चय॥
नृपति नदीनद वृंद होत जाको मिलि नीरस।
भनि भूषन सब भुम्मि घेरि किन्निय सुअप्प बस॥
हिंदुवान पुन्य गाहक बनिक तासु निवाहक साहि सुब।
बर बादवान किरवान धरि जस जहाज सिवराज तुव॥ ६१॥

## अन्यच्च-उदाहरण

साहिन मन समरत्थ जासु नवरंग साहि सिरू।
हृदय जासु अब्बास साहि बहुबल बिलास थिरु॥
एदिलसाहि कुतुब्ब जासु जुग भुज भूषन भनि।
पाय म्लेच्छ उमराय काय तुरकानि आन गनि॥
यह रूप अवनि अवतार धरि जेहि जालिम जग दंडियव।
सरजा सिव साहस खग्ग गहि कलिजुग सोइ खल खंडियव॥ ६२॥

## अपरंच-कवित्त मनहरण

सिंह थरि जाने बिन जावली जँगल भठी हठी गज एदिल पठाय करि भटक्यो।
भूषन भनत देखि भभरि भगाने सब हिंमत हिये मैं धारि काहुवै न हटक्यो॥
साहि के सिवाजी गाजी सरजा समत्थ महा मदगल अफजलै पंजाबल पटक्यो।
ता बिगर ह्वै करि निकाम निज धाम कह आकुत महाउत सु आंकुस लै सटक्यो
६३॥

## उदाहरण--मंदारमाला.

गंभीर अब्धी असे हा कलीचा नव्या धर्मवीचीमुळें तामस ॥
संक्रीडती म्लेंच्छ हे मच्छ, राजे नदीरूप होती किती नीरस ॥
पुण्येच्छु हिंदू वणिग्रूप तेथें, शहाजी-सुता त्यांजला तारिशी ॥
तूं खड्ग-शीडास हस्तीं धरोनी यशोरूप नौकेस संवाहशी ॥६१॥

## उदाहरण २ रें मंदारमाला.

औरंगशाहा असें शीर्ष ज्याचें, शहंशाह 'अब्बास[१]' हें अंतर॥
आदीलशाहा[२] कुतुब्शाह[३] दोघे प्रतापीच भारी जयाचे कर ॥
यत्पाद यद्देह कीं म्लेंच्छ-तुर्क, क्षितीला छळी रूप हें दारुण ॥
येई भवानी-[४]कृपाणेश, टाकी विराटास या भूतलीं छेदुन ॥६२॥

## उदाहरण ३ रें मंदारमाला.

नेणें हरि-स्थान तो जावळीचें, शहा 'अफ्जुल' श्रेष्ट धाडी करी[५] ॥
जों देखिली झेंप पंचाननाची, पळाले, न तत्साह्य कोणी करी ॥
सर्जा शिवाजी रणामाजि गाजी ! गजश्रेष्ठ त्वां ध्वंसिला छेदिला ॥
त्यावीण 'याकूत' झाला निकामी पळे घेउनी अंकुशाला भला ॥६३॥

---

१ हा त्या वेळीं इराणचा बादशहा होता. शहाजहान आणि औरंगजेब यांच्याशीं त्याचा पत्रव्यवहार होता. २ विजापूरची पातशाही ३ गोवळ कोंड्याची पातशाही. ४ श्री शिवाजी. ५ हत्ती ६ याकुतखान, हा अफ्जूल खानाच्या बरोबर आला होता याला येथें महाताची व अफजूलखानाला हत्तीची उपमा दिली आहे. हा खानाच्या वधानंतर विजापूरास पळून गेला.

## रूपक के दो अन्य भेद ( न्यूनाधिक )

### लक्षण--दोहा.

घटि बढि जहँ बरनन करै करिकै दुहुन अभेद।
भूषन कवि औरौ कहत द्वै रूपक के भेद ॥ ६४ ॥

### उदाहरण--कवित्त मनहरण

साहि तनै सिवराज भूषण सुजस तव बिगिरकलंक चंद उर आनियतु है।
पंचानन एकही बदन गनि तोहि गजानन गज बदन बिना बखानियतु है ॥
एक सीसही सहससीस कला करिबे को दुहुँ दृग सों सहसदृग मानियतु है।
दुहूँ कर सों सहसकर मानियतु तोहि दुहूँ बाहु सों सहसबाहु जानियतु है॥६५॥

जेते हैं पहार भुव माहिँ पारावार तिन सुनिके अपार कृपा गहे सुख फैल है।
भूषन भनत साहि तनै सरजा के पास आइबे को चढी उर हौंसनि की ऐल है ॥
किरवान बज्र सों बिपच्छ करिबे के डर आनिकै कितेक आये सरन की गैल है।
मघवा मही में तेजवान सिवराज बीर कोट करि सकल सपच्छ किए सैल है ॥६६॥

## परिणाम

### लक्षण-दोहा.

जहँ अभेद करि दुहुन सों करत और स्वे काम।
भनि भूषन सब कहत हैं तासु नाम परिनाम ॥ ६७ ॥

# रूपकाचे आणखी दोन प्रकार. (न्यूनाधिक)

## लक्षण.

जेथें उपमान उपमेयाचें अभेद वर्णन न्यूनाधिक भावानें केलें जातें तेथेंही ' रूपक ' अलंकार होतो ६४

## उदाहरण—मंदारमाला.

वीरोत्तमा ! निष्कलंकी शशीच्यापरी त्वद्यशाला कवी लेखिती ॥
एका मुखाचा जरी तूं, तुला भव्य पंचाननाच्या यशें वर्णिती ॥
होशी द्विनेत्रें सहस्राक्ष, तैसा सहस्री भुजांचा द्विबाहूमुळें ॥
नामेंच होशी शिवासारखा तूं, तुला पाहतां विघ्न दूरी पळें ॥६५॥

## मंदारमाला.

भूमीवरी जेवढे हे गिरी, ते कृपा ऐकुनीया सुखी जाहले ॥
त्यांच्या मनीं वाढली हौस भारी शिवाच्या करीं यावया हर्षले ॥
तत्खड्ग—वज्रें विपक्षी न व्हावें ह्मणोनी किती नम्र पायीं गिरी ॥
ह्मी भूतलीं इंद्र आहे दयाळू तद्यानें तयां पक्षधारी करी ॥ ६६ ॥

# परिणाम

## लक्षण

जेथें उपमेय उपमानाच्या अभेद वर्णनांत स्वकार्यसाधन घडतें तेथें ' परिणामालंकार ' ह्मणतात* ६७

---

१ श्री छत्रपती शिवाजी महाराज * उपमेयद्वारा केली जाणारी क्रिया जेथें उपमानकृत समजली जाते तेथेंहि परिणाम अलंकार मानितात.

### उदाहरण-मालती सवैया

भौसिला भूप बली भुव को भरु भारी भुजंगम सों भुज लीनो।
भूषन तीखन तेज तरन्नि सो बैरिन को कियो पानिप हीनो॥
दारिद दौ करि बारिद सों दलि त्यों धरनीतल सीतल कीन्हो।
साहि तनै कुलचंद सिवा जस-चंद सों चांद कियो छबि छीनो॥ ६८॥

### अन्यच्च-कवित्त मनहरण

बीर बिजैपुर के उजीर निसिचर गोलकुंडावारे घूघू ते उडाए हैं जहान सो॥
मंद करि मुखरुचि चंद चकता की, कियो भूषन भूषित द्विज चक्र खानपान सों।
तुरकान मलिन कुमुदिनी करी हैं हिंदुवान निलिनी खिलायो विविध बिधान सों
चारु सिव नामको प्रतापी सिव साहि सुव तापी सव भूमि यों कृपान भासमान सों॥
॥ ६९॥

## उल्लेख

### लक्षण-दोहा.

कै बहुतें कै एक जहँ एक वस्तुको देखि॥
बहु विधि करि उल्लेख है, सो उल्लेख उलेखि॥ ७०॥

### उदाहरण-मालती सवैया

एक कहैं कलपद्रुम है इमि पूरत है सबकी चित चाहै।
एक कहैं अवतार मनोज को यों तन मै अति सुंदरता है॥
भूषन एक कहैं महि इंदु यों राज बिराजत बाढयो महा है।
एक कहैं नरसिंह है संगर एक कहैं नरसिंह सिवा है॥ ७१॥

### ८ उदाहरण–मंदारमाला

शेषापरी वाहतो भूमि–भार प्रतापी शिवाजी स्वबाहूवरी ॥
तेजोविहीन स्वशत्रूस लोकीं करी हा स्वतेजें रवीच्यापरी ॥
दारिद्य–दावाग्नि लागीं हरोनी पयोदापरी शांतवी भूतल ॥
वंशांतला चंद्र हा, कीर्ति-चंद्रें करी क्षीण चंद्रप्रभा–मंडल ॥

### उदाहरण २ रें–मंदारमाला

रात्रिंचरा सारख्या एदिलांना[१] कुतुब्शाही घूकांस संहारिलें ॥
दिल्लीश–चंद्रप्रभा मंद केली, द्विजांच्या गणालागिं संतोषिलें ॥
तुर्की-कुमुदत्पंक्ति विम्लान केल्या प्रफुल्ला करी हिंदवी पद्मिनी ॥
नामप्रतापी शिवासारखा हा, कृपाणार्क–तेजें लसे मेदिनी ॥६९॥

## उल्लेख

### लक्षण

एक अथवा अनेक जन जेथें एका वस्तूला पाहून तिचा अनेक तर्कांनीं उल्लेख करितात तेथें ‘ उल्लेख ’ अलंकार जाणवा. ७०

### उदाहरण–मंदारमाला

कोणी म्हणे हा असे कल्पवृक्ष, प्रकर्षें करी पूर्ण सत्कामना ॥
कोणी म्हणे हा मनोजावतार, स्वरूपें हरी कामिनींच्या मना ॥
युद्धांतला सिंह वाटे कुणाला, नृसिंहावतारी कुणा वाटला ॥
भासे कवींला शिवाजी शशी हा, दिसंदीस कांतिप्रती पावला ॥७१॥

---

१ आदिलशाही मीरांना

### पुनरपि यथा-मनहरण दंडक

कवि कहै करन, करनजीत कमनैत, अरिन के उर माहिं कीन्ह्यो इमि छेव है ।
कहत धरेस सब धराधर सेस ऐसो और धराधरन को मेट्यो अहमेव है ॥
भूषन भनत महाराज सिवराज तेरो राजकाज देखि कोऊ पावत न भेव है ।
कहरी यदिल, मौज लहरी कुतुब कहै, बहरी निजाम के जितैया कहैं देव है ॥ ७२ ॥

पैज प्रतिपाल भूमिभार को हमाल चहुँ चक को अमाल भयो दंडक जहान को ।
साहिन को साल भयो ज्वाल को जवाल भयो हर को कृपाल भयो हार के विधान को॥
बीर रस ख्याल सिवराज भुवपाल तुव हाथ को विसाल भयो भूषन बखान को।
तेरो करवाल भयो दच्छिन को ढाल भयो हिंदु को दिवाल भयो काल तुरकान को ॥७३

## स्मृति

### लक्षण-दोहा

सम सोभा लखि आन की सुधि आवति जेहि ठौर ।
स्मृति भूषन तेहि कहत हैं भूषन कवि सिरमौर ॥ ७४ ॥

### उदाहरण-मनहरण दंडक

तुम सिवराज ब्रजराज अवतार आज तुमही जगत काज पोषत भरत हौ ।
तुम्हैं छोडि याते काहि विनती सुनाऊँ मैं तुम्हारे गुन गाऊँ तुम ढीले क्यों परत हौ॥
भूषन भनत वहि कुल मैं नयो गुनाह नाहक समुझि यह चित मैं धरत हौ ।
और बांभनन देखि करत सुदामा सुधि मोहिं देखि काहे सुधि भृगु की करत हौ॥७५॥

## उदाहरण २ रें मंदारमाला

तूंतें कवी बोलती 'कर्ण,' तैसे धनुर्धारि ' कर्णारि ' संबोधती ॥
सारे धराधीश शेषोपमेनें ' धराधार ' नामांत उल्लेखिती ॥
त्वद्राज–नीती गभीरा अशी कीं, न लागे तिचा अंत, ती निस्तुला॥
आदील बोले 'मनस्वी' तुला तो 'यशस्वी' कुतुब्शाह बोले तुला॥७२॥

## उदाहरण ३ रें मंदारमाला.

भू–भारहारी प्रतिज्ञाविहारी जगद्रक्षणीं दंडधारी परी ॥
सन्मार्गचारी जनां साह्यकारी कठोरास होशी कुठारापरी ॥
धारांगणीं तीव्र–खड्गप्रहारी, तुझ्या शोभतें दान–वारी करीं ॥
म्लेंच्छास काळापरी खड्ग तूझें महाराष्ट्र–भूमीस ढालेपरी ॥ ७३ ॥

# स्मृति

## लक्षण

सम शोभा पाहून जेथें अनुभवलेल्या वस्तूची स्मृति होते तेथें ' स्मृति , अलंकार होतो ७४

## उदाहरण–मंदारमाला.

कृष्णावतारी शिवाजी नृपाळा ! जगाला तुह्मी पोषितां पाळितां ॥
सांगूं विनंती तुह्मावीण कोणा ? उदासीन कां कीर्ति–कार्यीं स्वतां?
झाला द्विजाच्या कुळीं जन्म माझा, मला दोषितां कां वृथा अंतरीं ?
होई सुदाम-स्मृती अन्य विषें, मला पाहतां कां भृगूची [२] तरी॥७५॥

---

१ विजापूरचा पातशाहा २ भृगूनें विष्णूस लाथ मारिली होती.

## भ्रम

### लक्षण—दोहा.

आन बात को आन मै होत जहाँ भ्रम आय।
तासों भ्रम सब कहत है, भूषन सुकवि बनाय ॥ ७६ ॥

### उदाहरण—मालती सवैया.

पीय पहारन पास न जाहु यों तीय बहादुर सों कहे सोषैं ॥
कौन बचै है नबाब तुम्हैं भनि भूषण भौंसिला भूपके रोषैं ॥
बंदि सइस्तखँहू को कियो जसवंत से भाऊ करन्न से दोषैं ॥
साहि सिवा के सुवीरन सों गो अमीर न बाचि गुनीजन घोषैं ॥ ७७ ॥

## संदेह

### लक्षण—दोहा.

कै यह कै वह यों जहा होत आनि संदेह।
भूषन सो संदेह है यां मैं नहिं संदेह ॥ ७८ ॥

### उदाहरण—कवित मनहरण

आवत गुसुलखाने ऐसे कछु त्योर ठाने जाने अवरंगजू के प्रानन को लेवा है।
रस खोट भए ते अगोट आगरे मैं सातौ चौकि डाँकि आनि घर किन्हीं हद रेवा है।
भूषन भनत वह चहूं चक्क चाहि कियो पातसाहि चकताकी छातिमाहि छेवा है।
जान्यो न परत ऐसे काम है करत कोऊ गंधरव देवा है कि सिद्ध है कि सेवा है
॥ ७९ ॥

# भ्रम

## लक्षण

एका वस्तूच्या वर्णनांत कांहीं निराळ्याच अन्य वस्तूचा भ्रम उत्पन्न होत असला ह्मणजे तेथें 'भ्रम' अलंकार ह्मणतात ७६

## उदाहरण–मंदारमाला

जावें न नाथा! गिरीसंनिधानीं अमीरास कांता सचिंता वदे ॥
सांगा तुह्मा वांचवी कोण कैसा शिवाच्या असह्य प्रकोपामधें? ॥
घायाळ षाहिस्तखानास केला, यश:सिंह तो कर्ण तो जिंकिला ॥
ज्ञानी गुणी घोषती—"मावळेश-प्रवीरापुढें मीर ना वांचला" ॥

# संदेह

## लक्षण

हें किंवा तें अशा प्रकारचा जेथें संशय उत्पन्न होतो तेथें 'संदेह' अलंकार ह्मणतात ७८

## उदाहरण–मंदारमाला

तेथें[4] असा ठाकला कीं शहाचा अतां प्राण घेईल हा धाउनी ॥
मैत्री उडाली, पह्याच्यास टाळी, करी हद्द रेवा घरीं येउनी ॥
इच्छी चतुर्दिक्प्रभुत्वास जेव्हां, निघे शद्ब शाहा-मुखांतून 'हा'! ॥
ठावें न कोणा करी कार्य ऐसें, असे यक्ष कीं देव गंधर्व हा! ॥७९॥

---

१ जसवंतसिंग २ बिकानेरचे महाराज कर्णसिंह, इ. स. १६५७ त अहमदनगर येथें कारतलबखां व नौशेरीखां यांच्या बरोबर महाराजांचें जें युद्ध झालें त्यांत कर्णसिंह होते. ३ शिवाजीपुढें ४ औरंगजेबाच्या स्नानगृहांत ५ नर्मदा ६ दु:खजनक 'हा!' शद्ब.

## शुद्ध अपन्हुति

### लक्षण-दोहा

आन बात आरोपिए साँची बात दुराय ।
शुद्धापन्हुति कहत है भूषन सुकवि बनाय ॥ ८० ॥

### उदाहरण-मनहरण उदंड

चमकतीं चपला न, फेरत फिरंगैं भट; इंद्र को न चाप, रूप बैरष समाज को ।
धाए धुरवा न, छाए धूरि के पटल, मेघ गाजिबो न बाजिबो है दुंदुभि दराज को ॥
भौंसिला के डरन डरानी रिपु रानी कहैं, पिया भजौं, देखि उदौ पावसके साजको ।
घन की घटा न गज घटनि सनाह साज भूषन भनत आयो सेन सिवराज को ॥८१॥

## हेत्वपन्हुति

### लक्षण-दोहा

जहाँ जुगति सों आन को कहिए आन छपाय ।
हेतु अपन्हुति कहत हैं ताकहँ कबि-समुदाय ॥ ८२ ॥

### उदाहरण-दोहा

सिव सरजा के कर लसै सो न होय किरवान ।
भुज भुजगेस भुजंगिनी भखति पौन अरि प्रान ॥ ८३ ॥

# शुद्धापन्हुति

## लक्षण

सत्य गोष्ट बाजूस सारून तिजवर अन्य गोष्टीचा आरोप करणें याला 'शुद्धापन्हुति' म्हणतात. (म्हणजे उपमेयाचा निषेध करून हें उपमानच आहे असें वर्णन) ८०

## उदाहरण–मंदारमाला

विद्युल्लता ही न, ही खड्ग–माला; नभश्चाप नोहे पताका उभी ॥
नोहे धुकें हें, रजाची महोर्मी; पयोद–ध्वनी हा न, ही दुंदुभी ॥
वैरांगना भोसले–कंपिता ती म्हणे–' नाथ ! धावा इथोनी त्वरें,॥
मेघावली ही न, हे युद्ध–दंती; पहा ही शिवाची चमू संचरे ॥८१॥

# हेत्वपन्हुति

## लक्षण

जेथें युक्तीनें एक गोष्ट लपवून दुसरी सांगितली जाते तेथें 'हेत्वपन्हुति' अलंकार होतो. ८२

## उदाहरण–आर्या

शिव–भूपाच्या हस्तीं शोभतसें खड्ग; तें नव्हें शस्त्र !
भुज-भुजगेश–भुजंगिनि पवन–अरिप्राण भक्षिती सत्य ॥ ८३ ॥

### पुनरपि–कवित्त मनहरण

भाखत सकल सिव जी को करवाल पर भूषन कहत यह करि कै विचार को।
लीन्हो अवतार करतार के कहे तें कलि म्लेच्छन हरन उद्धरन भुव भार को॥
चंडी ह्वै घुमंडि अरि चंड मुंड चावि करि पीवत रुधिर कछु लावत न बार को।
निज भरतार भूत भावन की भूख मेटि भूषित करत भूतनाथ भरतार को॥८४॥

## पर्यस्तापन्हुति

### लक्षण–दोहा.

वस्तु गोय ताको धरम आन वस्तु मैं रोपि।
पर्यस्तापन्हुति कहत कबि भूषन मति वोपि॥ ८५॥

### उदाहरण–दोहा.

काल करत कलिकाल मैं नहिँ तुरकन को काल।
काल करत तुरकान को सिव सरजा करवाल॥ ८६॥

### पुनरपि–कवित्त मनहरण.

तेरे ही भुजान पर भूतल को भार, कहिबे को सेसनाग दिगनाग हिमाचल हैं।
तेरो अवतार जग पोसन भरनहार कछु करतार को न तामधि अमल है॥
साहिन मैं सरजा समत्थ सिवराज कबि भूषन कहत जीवो तेरोई सफल है।
तेरो करवाल करै म्लेच्छन को काल विनु काज होत काल वदनाम धरातल है॥८७॥

### उदाहरण २ रें मंदारमाला

खड्ग–प्रशंसा शिवाच्या कराची जगीं ऐकिली, उक्ति ही सूचली ॥
ह्यां[1] म्लेंच्छ-भूभारची उद्धाराया विधि-प्रोक्त देवावतारी बली ॥
चंडी-भवानी[2], प्रचंडारि मुंडाप्रती चावते रक्त संप्राशिते ॥
भूतेशं[3]-तृप्ती घडे जाणुनी ही तया कंठिं मुंडावली अर्पिते ॥८४॥

# पर्यस्तापन्हुति

### लक्षण

वस्तु लपवून तिचे धर्म अन्य वस्तूंवर आरोपित करणें याला ' पर्यस्तापन्हुति ' ह्मणतात ८५

### उदाहरण--आर्या.

या कलि–कालीं न करी तुर्कांचा काल तो महाकाळ
तें काल-कार्य करितो शिव–सरजाचा कराळ करवाळें[4] ॥ ८६ ॥

### उदाहरण २ रें मंदारमाला

भू–भार तूझ्याच बाहूवरी बा! कथायास दिग्नागें[5] कीं शेष हा ॥
त्वज्जन्म आहे जगत्पोषणाला विरंचीस[6] त्याची न चिंता अहा ॥
सर्वां नरेशांत तूं श्रेष्ठ होशी, तुझें जन्म--साफल्य लोकांतरीं ॥
ती त्वद्भवानी[7] करी काल-कार्यें रिकामा फिरे काळ भूमीवरी॥८७॥

---

१ श्री छत्रपति. २ चंडीरूप भवानी खड्ग. ३ शंकर. ४ तरवार. ५ शेष मस्तकावर पृथ्वी आहे व दिग्नाग तिला सांभाळित आहे. ह्या केवळ बोलायच्या गोष्टी. असा अर्थ. ६ ब्रह्मदेवास. ७ भवानीखड्ग.

## भ्रांतापन्हुति

### लक्षण—दोहा

संक आन को होत ही जहँ भ्रम कीजै दूरि।
भ्रांतापन्हुति कहत हैं तहँ भूषन कवि भूरि ॥ ८८ ॥

### उदाहरण—कवित मनहरण

साहि तनै सरजा के भय सों भगाने भूप मेरु मैं लुकाने ते लहत जात वोत है
भूषन तहाऊँ मरहटपति के प्रताप पावत न कल अति कौतुक उदोत है ॥
"सिव आयो सिव आयो" संकर के आगमन सुनि कै परान ज्यों लगत अरि गोत हैं;
"सिव सरजा न यह सिव है महेस" करि योंहीं उपदेश जच्छ रच्छक से होत है।
॥ ८९ ॥

### पुनः मालती सवैय्या

एक समै सजि कै सब सैन सिकार को आलमगीर सिधाए।
" आवत है सरजा सम्हरौ " एक ओरते लोगन वोल जनाए ॥
भूषन भो भ्रम औरंग के सिव भौंसिला भूपकि धाक धुकाए।
धायकै " सिंह " कह्यो समुझाय करौलनि आय अचेत उठाए ॥९०॥

## छेकापन्हुति

### लक्ष्मण—दोहा

जहाँ और को संक करि सांच छिपावत बात।
छेकापन्हुति कहत है भूषन कवि अवदात ॥ ९१ ॥

# भ्रांतापन्हुति

### लक्षण

अन्य गोष्टीची शंका येतांच जेथें ती दूर केली जाते तेथें 'भ्रांतापन्हुति' अलंकार म्हणतात ८८

### उदाहरण—मंदारमाला

सह्याद्रि—दुर्गेश्वराच्या भयानें पळाले अरी मेरुपृष्ठाकडे ॥
याचे प्रतापार्क—रश्मी तिथेंही ! पहा थोर आश्चर्य हें केवढें ॥
'स्वारी शिवाची अहो ! येतसे' ही श्रुती ऐकतां शत्रु जों धांवती ॥
'सर्जा शिवाजी न, हा शंभु जाणा' वचानें तया यक्ष आश्वासिती॥८९

### उदाहरण—२ रें मंदारमाला

दिल्लीश औरंग एका प्रसंगीं शिकारीस गेला स्व—सैन्यासवें ॥
"आला पहा भव्य सर्जा जपा हो." शिपाई कुणी बोलला उद्रवें ॥
झाला तदा भ्रांत औरंगशाहा अहा ! भोसले—भूप—भीतीमुळें ॥
सर्जा-नव्हे, सिंह संवेदिलें त्या विमूर्छ प्रभूला गृहीं आणिलें ॥ ९० ॥

# छेकापन्हुति

### लक्षण

जेथें अन्य वस्तूची शंका घेऊन सत्य वस्तु मुद्दाम लपविली जाते तेथें 'कैतवापन्हुति' अलंकार जाणावा. ९१

## उदाहरण–दोहा

तिमिर बंस हर अरुन कर आयो, सजनी भोर ?
सिव सरजा चुप रहि सखी, सूरज-कुल-सिरमोर ॥ ९२ ॥

दुरगहि बल पंजन प्रबल सरजा जिति रन मोहिं ।
औरंग कहैं देवान सों सपन सुनावत तोहिं ॥ ९३ ॥

सुनि सु उजीरन यों कह्यो, "सरजा सिव महाराज ? "
भूषन कहि चकता सकुचि " नहिं, सिकार मृगराज " ॥ ९४ ॥

# कैतवापन्हुति

## लक्षण–दोहा

जहँ कैतव, छल व्याजि मिसि इन सों होत दुराव
कैतव पन्हुति ताहि सों भूषन कहि सति भाव ॥ ९५ ॥

## उदाहरण–कवित्त दंडक ( मनहरण )

साहिन के सिच्छक सिपाहिन के पातसाह संगर मैं सिंह कैसे जिन के सुभाव है।
भूषन भनत सिव सरजा की धाक ते वै काँपत रहत चित गहत न चाव है ॥
अफजल की अगति सासता की अपगति बहलोल बिपति सों डरे उमराव है।
पक्का मतो करि कै मलिच्छ मनसब छोडी मकाही के मिस उतरत दरियाव है ॥९६॥

### उदाहरण—आर्या

तिमिर कुलाचा हंता आला आरक्त, 'मैत्रिणी ! अरुण ?'
राही स्तब्ध सखे गे ! शिव सरजा येइ सूर्य-कुलरमण ॥ ९२ ॥
औरंग ह्मणे वजिराप्रति तुह्मा स्वप्न सांगतों एक ॥
दुर्ग-बलें नखरबलें सर्जा जिंकीं रणांत निःशंक ॥९३॥
पुसतो वजीर तेव्हां 'सरजा शिव काय?' विरमला शाहा ॥
लाजून ह्मणे पुनरपि 'शिकार मृगराज' अर्थ माझा हा ॥९४॥

## कैतवापन्हुति

### लक्षण

एखादी वस्तु कपट, छल, मिष, प्रतारणा यांच्या योगें जेथें दूरावली जातें किंवा लपविली जाते, तेथें 'कैतवापन्हुति' अलंकार होतो ९५

### उदाहरण—मंदारमाला

शाहांस शास्ता, असे बादशाहा शिपाई जनांना, रणीं सिंह-सा ॥
सर्जा शिवाच्या भयें कांपती ते, शिवे ना सुखाची तयां लालसा ॥
अफ्जूल, षाहिस्त, बह्लोलखांच्या[1] मृती दुर्गती कीं विपत्तीमुळें ॥
भ्याले, पदें[2] त्यागुनी म्लेंच्छ मक्का-मिषें अब्धि-नौका चढूं लागले ९६

---

१ हा विजापुरी सरदार होता इ. १६७३त प्रतापराव गुजरानें यास शरण यावयास भाग पाडिलें व सोडून दिलें. लगेच हा पुन्हां उलटून आला तेव्हां छत्रपती प्रतापरावावर रागावले आणि ह्मणूनच तो मानी वीर बेभान होऊन लढला व स्वर्गद्वारीं गेला. पुढें तें युद्ध हंसाजी मोहित्यांनीं जिंकिलें.

२ मनसब किंवा अधिकार.

साहि तनै सरजा खुमान सलहेरि पास कीन्हो कुरुखेत खीझि मीर अचलन सों।
भूषन भनत बलि करी है अरीन धर धरनी पै डारि नभ प्रान दै बलन सों ॥
अमर के नाम के बहाने गो अमरपुर चंदावत लरि सिवराज के दलन सों।
कालिका प्रसाद के बहाने ते खवायो महि बाबु उमराव राव पसु के छलन सों ॥९७॥

## उत्प्रेक्षा

### लक्षण--दोहा.

आन बात को आन मैं जहँ संभावन. होय।
वस्तु, हेतु, फल युत कहत उत्प्रेक्षा है सोय ॥ ९८ ॥

### उदाहरण। वस्तूत्प्रेक्षा-मालती सवैया

दानव आयो दगा करि जावली दीह भयारो महामद भार्‍यो।
भूषन बाहुबली सरजा तेहि भेटिबे को निरसंक पधार्‍यो ॥
बीछूके घाय गिरे अफजलहि ऊपरही सिवराज निहार्‍यो।
दाबि यों बैठो नरिंद अरिंदहि मानो मयंद गयंद पछार्‍यो ॥ ९९ ॥



अफजुलखानाचा वध.

मर्मस्थळीं मारितांची चपेटे तनू ती पडे अफ्जुलाची झणी

[पान ४९]

श्रीकृष्ण छा. जळगांव.

त्वां शाहजीच्या चिरंजीव पुत्रा ! कुरुक्षेत्र सालेरें[1] केलें खरें ॥
वैरी धरोनी बळी त्यास केके जणों भूतळीं कापिलीं मेंढरें ॥
चंदावतें[2] क्षत्रवंशीं कुलाच्या मिषें चंद्रलोकीं लढोनी शिरें ॥
चंडी-प्रसाद-स्वरूपें महीला अमीरादि तूं अर्पियेलें करें ॥ ९७ ॥

# उत्प्रेक्षा

## लक्षण

"एका गोष्टीची दुसऱ्या गोष्टींत संभावना होत असली म्हणजे तेथें 'उत्प्रेक्षा' अलंकार होतो मग ही संभावना वस्तुमय असो, हेतुमय असो किंवा फलमय (परिणामयुक्त) असो, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे उपमेय हें जणु काय उपमानच आहे असें वर्णन. ९८

## उदाहरण—मंदारमाला

कापट्य योजून ये जावळीला मदोन्मत्त कीं दैत्य भव्याकृती ॥
निःशंक भेटावया जाय सर्जा, महाबाहु तो, थोर त्याची धृती ॥
मर्मस्थळीं मारितांची चपेटे तनू ती पडे अफ्जुलाची क्षणीं ॥
मारी अरींद्रास भूपेंद्र, जैसा गजेंद्रास मारी मृगेंद्र क्षणीं ॥ ९९ ॥

---

१ इ० स० १६७२ त सालेर मुल्हेर येथें अति घनघोर युद्ध झालें मराठ्यांचे सेनापती मोरोपंत पेशवे व प्रतापराव गुजर हे होते आणि मोगलांच्या अफाट सेनेचा अधिपती एकलासखान होता. या युद्धांत मोगलांचे २२ सेनापती मारले गेले व कितीक कैद झाले आणि सर्व मोंगली फौजेचा फडशा उडाला. या युद्धापासूनच मराठ्यांना मोंगलांशीं उघड्या मैदानावर सामना देण्याची हिंमत चढली ह्मणूनच भूषण कवीनें या युद्धाचें जागोजाग भयानक वर्णन केलें आहें. ( कविता नं. २२६, २१२, ३३१, ३५५ पहा )

२ अमरसिंह चंदावत या युद्धांत मारला गेला. हा मोगलांच्या बाजूच भारी सरदार होता भूषणकवीनें याच्याविषयीं सन्मानपूर्वक उल्लेख केला आहे. शिव छत्रपतीची प्रशंसा करितांना असे उद्गार काढिले आहेत कीं "हिंदु बचाय बचाय यही अमरेस चदावत लौं कोइ टूटै" ( कविता नं १ ., २२५, २३९, २७५ पहा. )

साहि तनै सिवसाहि निसा मै निसाँक लीयो गढसिंह सोहानौ ।
राठिवरोको संहार भयो लरिकै सरदार गिऱ्यो उदैभानौ ॥
भूषन यों घमसान भो भूतल घेरत लोथिन मानो मसानौ ।
ऊँचे सुछज्ज छटा उचटी प्रगटी परभा परभात की मानौ ॥ १०० ॥

## पुनरपि-कबित मनहरण

दुरजनदार भजि भजि बेसम्हार चढि उत्तर पहार डरि सिवजी नरिंद ते ।
भूषन भनत बिन भूषन बसन, साधे भूखन पियासन है नाहन को निंदतेते ॥
बालक अयाने वाट बीचही बिलाने कुम्हिलाने मुख कोमल अमल अरबिंद ते ।
दृगजल कज्जल कलित बढ्यो कढ्यो मानो दूजा सोत तरनितनूजा को कालिंदते॥१०१

## अपरंच-दोहा

महाराज सिवराव तुव सुघर धवल धुव कित्ति ।
छबि छटान सों छुवति सी छिति अंगन दिग भित्ति ॥ १०२ ॥

## हेतूत्प्रेक्षा-कबित मनहरण

लूट्यो खानदौरा जोरावर सफजँग अरु लूट्यो कारतलबखां मनहुँ अमाल है ।
भूषन भनत लूट्यो पूना मैं सइस्तखान गढन मैं लूट्यो त्यों गढोइन को जाल है॥
हेरि हेरि कूटि सलहेरि बीच सरदार घेरि घेरि लूट्यो सब कटक कराल है ।
मानो हय हाथी उमराव करि साथी अवरंग डरि सिवाजी पै भेजत रिसाल है॥१०३॥

[५१]



## उदाहरण २ रें–मंदारमाला

निःशक घे कोंडणा दुर्ग रात्रीं महाराष्ट्र–सेनाग्रणी साहसें ॥
राठोड-संहार झाला, लढोनी उदेभान गेला, जयश्री हसे ॥
ऐसा तिथें घोर संग्राम झाला, रणस्थान जाणा स्मशानापरी ॥
सौधावरोनी दिसे कांति ऐशी, खुले बाल-सूर्य-प्रभा ज्यापरी ॥१००॥

## उदाहरण २ रें–मंदारमाला

शत्रुस्त्रिया धावती हैमशैलीं भिवोनी शिवाजी नरेंद्राप्रती ॥
भूषाविना देहवस्त्रेंच साधी, क्षुधाक्रांत नाथाप्रती निंदिती ॥
तद्बाल–पद्माननें म्लान होतीं, पथीं बैसती स्फुंदती क्रंदती ॥
दृक्कज्जलाश्रु-प्रवाहें नदी जी, कलिंदात्मजेची सपत्नीच ती॥१०१॥

## उदाहरण ३ रें

बा ! भोसले–नरेंद्रा ! रुचिर धवल कीर्ति जी तुझी अचला ।
स्पर्शी धरांगणाला दिग्भित्तीला प्रभा–करें विमला ॥ १०२ ॥

## हेतूत्प्रेक्षा–उदाहरण–मंदारमाला

जोरावराला[1] सफाई लुटी तो, लुटी खानदौरा[2] लुटी कातल[3] ॥
षाहिस्तखाला पुण्याला लुटोनी, लुटी दुर्गप–श्रेणि दुर्गांतिल॥
हेरून हेरून मीरांस मारी लुटी फौज सालेरिची घेरुनी ॥
दिल्लीश वाजीगजांच्यासवें ती जणों भेट धाडी शिवालागुनी ॥१०॥

---

१ जोरावरखां. २ इ. स. १६५० त अहमदनगर येथें शिवाजी महाराजाबरोबर खानदौराचें युद्ध झालें 'खानदौरा' ही याची पदवी होती. याचें खरें नांव नौशेरिखां होतें. (कविता नं. ३०७ पहा) ३ कातिलखांशींही अहमदनगर येथें इ. स. १६५४ त शिवाजी महाराजाचें युद्ध झालें.

### फलोत्प्रेक्षा-मनहरण दंडक

जाहि पास जात सो तौ राखि ना सकत याते तेरे पास अचल सुप्रीति नाधियतु है।
भूषन भनत सिवराज तव किन्ति सम औरकी न किन्ति कहिवे को कांधियतु है॥
इंद्रको अनुज तैं, उपेंद्र अवतार याते तेरो बाहुबल लै सलाह साधियतु है।
पाय तर आय नित निडर बसायबे को कोट बांधियतु मानो पाग बांधियतु है॥१०४

### दोहा

दुवन सदन सब के बदन सिव सिव आठौ याम।
निज बचिबे को जपत जनु तुरकौ हर को नाम ॥ १०५॥

## गमगुप्तोत्प्रेक्षा.

### लक्षण-दोहा.

माना इत्यादिक बचन आवत नहिं जेहि ठौर।
उत्प्रेक्षा गम गुप्त सो भूषण कहत अमौर ॥१०६॥

### उदाहरण- मनहरण.

देखत ऊंचाई उदरत पाग, सूधी राह धोस हू मैं चढैं ते जे साहस निकेत हैं।
सिवाजी हुकूम तेरो पाय पैदलन सलहेरि परनालो ते वै जीते जनु खेत हैं॥
सावन भादोंकी भारी कुहू की अँध्यारी चढि दुग्ग पर जात मावलीदल सचेत हैं।
भूषण भनत ताकी बात मैं बिचारी तेरे परताप रवि की उज्यारी गढ लते है॥१०७॥

### पुनःदोहा.

और गढोई नदी नद सिव गढपाल दऱ्याव।
दौरि दौरि चहुँ ओर ते मिलत आनि यहि भाव ॥ १०८॥

जाती जयापाशिं हे दुर्ग, रक्षी न तो; हे तुझ्या नांदती प्रीतिनें ॥
संग्राम विख्यात वंशोद्भवा! बा! यशाला कुणाशीं तुझ्या तोळणें ॥
इंद्रानुजा! तूं उपेंद्रावतारी, तुझी शक्ति लावी कराया तह ॥
जे[1] जाहले नम्र तद्रक्षणाला जणो बांधिले कोट तूं निर्भय ॥ १०४ ॥

## आर्या

अरि-सदनीं प्रतिवदनीं 'शिव शिव' हें नाम अष्टही याम ॥
निज-रक्षणार्थ जणु कीं जपताती सकल तुर्क हर-नाम ॥१०५॥

# गम्योत्प्रेक्षा

## लक्षण

'जणु', 'कांहीं' इत्यादि पदें जेथें येत नाहींत तेथें 'गम्योत्प्रेक्षा' अलंकार ह्मणतात १०६

## उदाहरण-मंदारमाला

उंची पहातां जयांची, गळावें शिरापासुनी हो! शिरोभूषण ॥
जे साहसी तेच जाती चढोनी सलेरी पन्हाळों[2] असे[3] भीषण ॥
वर्षाऋतूच्या निशीं मावळ्यांनीं गडांना तयां [4]क्षेत्र-सें व्यापिलें ॥
वाटे मला त्वत्प्रतापार्क-तेजें स्वयें भव्य दुर्गाप्रती जिंकिलें ॥१०७॥

## पन्हा-आर्या

शिव गढपति सागर हा, इतर गढपती नद्या-नद प्रचुर ॥
धाउन धाउन येती चहुंकडुनी मिळति, भाव हा चतुर ॥१०८॥

---

१ दुर्ग २ इ० स० १६५९ च्या सुमाराम पन्हाळा शिवाजी महाराजांच्या ताब्यांत आला इ० स० १६६० त विजापुरी सेनेचा पन्हाळ्यास वेढा पडला पण तो व्यर्थ गेला. १६६१ त हा किल्ला आदिलशाहीच्या ताब्यांत गेला. परंतु महाराजांनीं १६७३ च्या एप्रिल मध्यें पन्हाळ्यावर पुन्हां मराठी निशाण लाविलें. १६७६ त पन्हाळा पुन्हां हातचा गेला व पुन्हां ताब्यांत आला. ३ अशा प्रकारचे ४ शेतासारखे.

## रूपकातिशयोक्ति

### लक्षण-दोहा.

ज्ञान करत उपमेय को जहँ केवल उपमान।
रूपकातिशय-उक्ति सो भूषन कहत सुजान॥ १०९॥

### उदाहरण-मनहरण दंडक.

वासव से बिसरत विक्रम की कहाँ चली, विक्रम लखत वीर वखत-बुलंद के।
जागे तेज बृंद सिवाजी नरिंद मसनंद माल मकरंद कुलचंद साहिनंद के॥
भूषण भनत देस देस बैरि नारिन में होत अचरज घर घर दुख दंद के।
कनकलतानि इंदु, इंदू माहिं अरविंद, झरै, अरबिंदन ते बुंद मकरंद के॥११०॥

## भेदकातिशयोक्ति

### लक्षण-दोहा

जेहि थर आनहि भाँति की बरनत बात कछूक।
भेदकातिसय--उक्ति सों भूषण कहत अचूक॥ १११॥

### उदाहरण-कवित्त मनहरण

श्रीनगर नयपाल जुमिलाके छितिपाल भेजत रिसाल चौर गढ कुही बाज की।
मेवार ढुंढार मारवाड बुंदेलखंड झारखंड बाँधो धनी चाकरी इलाज की॥
भूषन जे पूरब पछाँह नरनार ते वै ताकत पनाह दिलीपती सिरताज की।
जगत को जैतवार जीत्यो अवरंगजेब न्यारी रीति भूतल निहारी सिवराजकी॥११२॥

# रूपकातिशयोक्ति

## लक्षण

जेथें केवळ उपमानच उपमेयाचें ज्ञान करून देतें तेथें 'रूपकातिशयोक्ति' अलंकार होतो. १०९

## उदाहरण-मंदारमाला.

इंद्रापरी हारले विक्रमाची कथा काय ? हे विक्रमा पाहती ॥
हा भोसले--नंदन श्रेष्ठ चंद्र, प्रभा नित्य याची दिसे जागती ॥
आश्चर्य हें देशदेशांतरीं शत्रु जायांतरी सर्व गेहांतरी ॥
सौवर्णवल्लींत[1] इंदू लसे, पद्म इंद्वंतरीं, बिंदु पद्मांतरीं ॥११०॥

# भेदकातिशयोक्ति.

## लक्षण.

अन्य प्रकारच्या गोष्टीच्या वर्णनाचा भर असतां तेथें निराळीच भेदक गोष्ट वर्णन करणें यास 'भेदकातिशयोक्ति' ह्मणतात. १११

## उदाहरण-मंदारमाला.

काश्मीर--जुम्ला[2] क्षितीचे पती तेहि नौरंगशाहास देती कर ॥
मेवाड जैपूर बुंदेल ओढा धनी येथले जाहले चाकर ॥
दिल्लीपतीची कृपा याचिताती कृपाकांक्षि पूर्वापराचे[3] पती ॥
ऐशा शहालागि जिंकी शिवाजी निराळीच सर्वांत तद्रीति ती॥११२।

---

१ सुवर्णासारख्या देहांत चंद्रमा, (मुख), चंद्रांत ( मुखांत ) कमल (नेत्र) आणि कमलांत ( नेत्रांत) बिंदू ( अश्रु ) तुर्कललनांच्या दुःखाचें हें सुंदर-वर्णन आहे- २ जुम्ला या नांवाचा देश आढळत नाहीं. औरंगाबादेजवळील जालनाचे हें अपभ्रष्ट रूप असेल कीं काय न कळे. ३ पूर्व आणि पश्चिम देशाचें राज.

## अक्रमातिशयोक्ति

### लक्षण-दोहा

जहाँ हेतु अरु काज मिली होत एक ही साथ।
अक्रमातिसय-उक्ति सो कहि भूषण कविनाथ ॥ ११३ ॥

उद्धत अपार तव दुंदुभि धुकार संग लंघै पारावार बाल-वृंद रिपुगन के ॥
तेरे चतुरंग के तुरंगन के रंगेरज साथही उडात रजपुंज है परन के ॥
दच्छिन के नाथ सिवराज तेरे हाथ चढै धनुष के साथ गढ कोट दुरजन के ॥
भूषण असीसैं, तोहि करत कसीसैं पुनि बानन के साथ छुटै प्रान तुरकन के ॥ ११४

## चंचलातिशयोक्ति

### लक्षण-दोहा

जहाँ हेतु चरचाहि मैं काज होत ततकाल।
चंचलातिसय-उक्ति सो भूषन कहत रसाल ॥ ११५ ॥

### उदाहरण-दोहा

आयो आयो सुनतही सिव सरजा तुव नावँ।
वैरि नारि दृग जलन सों बूडि जात अरि गाँव ॥ ११६ ॥

गढनेर गढ चाँदा भागनेर बीजापूर नृपन की नारी रोय हाथन मलति है।
करनाट हबस फिरंग हू बिलायत बलख रूम अरितिय छतियाँ दलति है ॥
भूषन भनत साहि तनै सिवराज एते मान तव धाक आगे दिसा उबलति है।
तेरी चमू चलिवे की चरचा चलेते चक्रवर्तिन की चतुरंग चमु बिचलति है ॥ ११७ ॥

# अक्रमातिशयोक्ति

## लक्षण

जेथें कार्य आणि कारण मिळून एकाच वेळीं घडतात तेथें चंचलातिशयोक्ति अलंकार ह्मणतात ११३

## उदाहरण-मंदारमाला.

त्वद्दुंदुभीचा अपार ध्वनी, त्यासवें लंघिती भीरु वैरी दिशा !
अश्वप्रवेगीं रजोराशिसंगें उडे राज-राशी घडे दुर्दशा !
भूपा ! तुझ्या तीव्र चापासवेंची करीं दीर्घही दुर्ग-माला चढे !
बाणासवें प्राण तुर्की जनांचे उडाले नभोमंडलाच्या पुढें ॥११४॥

# चंचलातिशयोक्ति

## लक्षण

जेथें हेतु व चर्चा यांतच तत्काल कार्य घडून येतें तेथें 'चंचलातिशयोक्ति' अलंकार ह्मणतात. ११५

## उदाहरण-आर्या

'शिव आला, शिव आला' सरजा तव ऐकतांच बा ! नाम ॥
अरि-ललना-दृग्सलिलीं जाय बुडोनी अहा ! रिपु-ग्राम ॥ ११६ ॥

## उदाहरण-मंदारमाला

चांदा-विजापूर-भागापुरीच्या[1] स्त्रिया क्रंदती हाथ त्या चोळिती !
कर्नाटकी, बल्के[2]-रूमी[3], फिरंगी रिपूंच्या स्त्रिया वक्षही ताडिती !
दिग्दक्षिणाधीश ! साऱ्या दिशा या कढूं लागल्या त्वद्भयाग्नीमुळें !
चाले चमू, लोक-चर्चाहि चाले, चमू चक्रवर्ती[4] तियेनें चळे ॥ ११७॥

---

१ हैदराबादच्या २ अफगाणिस्तानांतील एक प्रसिद्ध शहर ३ इस्तंबूल किंवा कान्स्टांटिनोपल ( तुर्कस्थानची राजधानी ) यास 'रूमशाम' असेंही नांव आहे. ४ चक्रवर्ती चमू = औरंगजेबाची फौज.

## अत्यंतातिशयोक्ति

### लक्षण-दोहा

जहाँ हेतु ते प्रथमही प्रगट होत है काज ।
अत्यंतातिसयोक्ति सो कहि भूषन कबिराज ॥ ११८ ॥

### उदाहरण-कबित्त मनहरण

मंगन मनोरथ के प्रथमहि दाता तोहिं काम धेनु काम तरु सो गाइयतु है
याते तेरे गुन सब गाय को सकत कवि, बुद्धि अनुसार कछु तऊ गाइयतु है
भूषन भनत साहि तनै सिवराज निज बखत बढाय करि तोहि ध्याइयतु है
दीनता को डारि औ अधीनता बिडारि दीह दारिद को मारि तेरे द्वार आइयतु है ११९

### पुनःदोहा

कबि तरुवर सिव सुजसरस सींचे अचरज मूल
सुफल होत है प्रथम ही पीछे प्रगटत फूल ॥ १२० ॥

## सामान्य विशेष.

### लक्षण दोहा.

कहिबे जहँ सामान्य है कहै जु तहाँ विशेष ।
सो सामान्य विशेष है बरन सुकबि अशेष ॥ १२१ ॥

### उदाहरण दोहा.

और नृपति भूषन कहै करैं न सुगमौ काज ।
साहि तनै सिव सुजस तो करै कठिनऊ आज ॥ १२२ ॥

# अत्यंतातिशयोक्ति

## लक्षण

जेथें कारणापूर्वींच कार्य प्रगट होतें तेथें ' अत्यंतातिशयोक्ति ' अलंकार ह्मणतात ११८

## उदाहरण-मंदारमाला.

तूं आद्य दाता मनोवांछितेचा, तुला मानिती कल्पवृक्षापरी !
गाऊं शके कोण साऱ्या गुणांना यथाबुद्धि काव्य-ज्ञ गाती परी !
उत्साहदायी चरित्रास ध्याई कुणी वेळ राखून विद्याग्रणी !
सांडी पराधीनतेला कुणी, दैन्य सांडी कुणी बा ! तुला सेवुनी ॥ ११९॥

## पुन्हा-आर्या

कवि हा तरुवर जाणा शिव-कीर्ती-सलिल लाभतां त्याला—
होई सुफल प्रथमचि, मागुन पावे प्रफुल्ल धर्माला ॥ १२० ॥

# सामान्य विशेष

## लक्षण

सांगावयाच्या सामान्य गोष्टींत कांहीं विशेष सांगितलें ह्मणजे ' सामान्य विशेष अलंकार होतो. १२१

## उदाहरण-आर्या

कवि-भूषण वदती कीं, अन्य नृपति करिति ना सुगम काज ॥
परि भोसले नृपाची कीर्ति कठिन कार्यही करी आज ॥ १२२ ॥

### पुनः मालती सवैया.

जीति लई बसुधा सिगरी घमसान घमंड कै बीरन हू की ।
भूषन भौसिला छीन लई जगती उमराव अमीरन हू की ॥
साहि तनै सिवराज कि धाकनि छूटि गई धृति धीरन हू की ।
मीरन के उर पीर बढी यों जु भूलि गई सुधि पीरन हू की ॥१२३॥

## तुल्ययोगिता

### लक्षण दोहा

तुल्य जोगिता तहँ धरम, जहँ बरन्यन को एक ।
कहूँ अबरन्यन को कहत भूषन बरनि बिबेक ॥ १२४ ॥

### उदाहरण-मनहरण दंडक

चढत तुरंग चतुरंग साजि सिवराज चढत प्रताप दिन दिन अति जंग मैं ।
भूषन चढत मरहट्टन के चित्त-चाव खग्ग खुलि चढत है अरिन के अंग मै ॥
भौंसिला के हाथ गढ कोट है चढत अरि जोट व्है चढत एक मेरु गिरि सृंग मै ।
तुरकान गन व्योमयान है चढत बिनुमान है चढत बदरंग अवरंग मैं ॥ १२५ ॥

### अंन्यच्च-दोहा

सिव सरजा भारी भुजन, भुव भरु धर्‌यो सभाग ।
भूषन अब निहचिंत है सेसनाग दिगनाग ॥ १२६ ॥

### द्वितीय-लक्षण दोहा

हित अनहित को एक सो, जहँ बरनत व्यवहार ।
तुल्यजोगिता और सो, भूषन ग्रंथ बिचार ॥ १२७ ॥

### उदाहरण २ रें-मंदारमाला.

घेई क्षिती जिंकुनी हा अरींची महत्संगरीं झुंजुनी झुंजुनी !
घेई अमीरी हिराऊन बाहु-द्वयें सर्वथा मंथुनी मंथुनी !
या दक्षिणादिक्प्रभूच्या भयानें सुटे धैर्य धीरांतराचें पहा !
चिंता अमीरांस बाधे अशी कीं तयां पीरही नाठवीती अहा! ॥१२३॥

# तुल्ययोगिता

### लक्षण

अनेक उपमेयें किंवा उपमान ह्यांचा एखादा गुण किंवा धर्म ह्यांचें ऐक्य जेथें वर्णन केलेलें असतें तेथें 'तुल्ययोगिता' अलंकार होतो १२४

### उदाहरण-मंदारमाला.

वाजीवरी हा चढे जों शिवाजी दिसंदीस तत्तेज युद्धीं चढे !
चित्तीं चढे हौस ह्यो मावळ्यांच्या, अरींच्या शिरीं खड्ग-धारा चढे !
हातीं शिवाच्या चढे दुर्ग-माला, अरींचा चढे गोट मेरूकडे !
तुर्कावली व्योमयानीं चढे तों शहाच्या मुखीं कृष्णता ती चढे॥१२५॥

### उदाहरण २ रें-आर्या

सुभगा ! स्वभुजावरि त्वां धरिला भू-भार भोसले-नाथा !
दिग्नाग शेष-नागहि लोकीं निश्चित जाह्ले आतां ॥ १२६ ॥

### द्वितीय-लक्षण

ज्या व्यवहारांत हित अहिताचें वर्णन बरोबरच (एकदम) केलेलें असतें तेथेंही तुल्ययोगिता अलंकार म्हणतात. १२७

### उदाहरण-कवित्त मनहरण

गुनन सों इनहूँ को बांधि लाइयतु पुनि गुनन सो उनहूँ को बाँधि लाइयतु है।
पाय गहि इनहूँ को रोज ध्याइयतु अरु पाय गहि उनहूँ को रोज ध्याइयतु है॥
भूषन भनत महाराज सिवराज रस रोस तो हिये मैं एक भाँति पाइयतु है।
दोहाई कहे ते कविलोग जाइयतु अरु दोहाई कहे ते अरिलोग जाइयतु है॥ १२८॥

## दीपक

### लक्षण-दोहा

बन्र्य अबन्र्यन को धरम जहँ बरनत हैं एक।
दीपक ताको कहत हैं भूषन सुकवि बिबेक॥ १२९॥

### उदाहरण-मालती सवैया

कामिनि कंतसों जामिनि चंद सों दामिनि पावस मेघ घटा सों।
कीरति दान सों सूरति ज्ञान सों प्रीति बडी सनमान महा सों॥
भूषन भूषन सों तरुनी नालिनी नव पूषन देव प्रभा सों।
जाहिर चारिहु ओर जहान लसै हिंदुवान खुमान सिवा सों॥ १३०॥

## दीपकावृत्ति

### लक्षण-दोहा

दीपक पद के अरथ जहँ फिरि फिरि करत बखान।
आवृत्ति दीपक तहँ कहत भूषन सुकबि सुजान॥ १३१॥

### उदाहरण-दोहा

सिव सरजा तव दान को करि को सकत बखान?
बढत नदीगन दानजल उमडत नद गजदान॥ १३२॥

### उदाहरण– मंदारमाला.

यांना[1] गुणें बांधुनि आणशी तूं, तयांना[2] गुणें बांधिशी दर्पिंशी ।
यांच्या पदांना मनीं चिंतशी बा ! तयांना परी रोज तूं शोधिशी ॥
हे मावळेशा ! रस–क्रोध तुल्य स्वभावांत जोडी तुझ्या आढळे ।
दोहाईनें[3] रक्षिशी तूं विपक्षी, कवी रक्षिशी तेविं दोह्यांमुळें[4] ॥ १२८ ॥

## दीपक

### लक्षण

उपमेय उपमानांचा एकच धर्म जेथें वर्णन केला जातो तेथें ' दीपक ' अलंकार होतो. १२९

### उदाहरण–मंदारमाला

कांतामुळें कामिनी शोभते कीं शशांकामुळें शोभते यामिनी ।
ज्ञानामुळें रूप, दानामुळेंची सुकीर्ती, पयोदामुळें दामिनी ॥
हेमामुळें सुंदरी शोभते, कीं रवीनें जशी पद्मिनी शोभते ।
या भोसले-वंश-भूपामुळें हिंदभूमि प्रकर्षें तशी राजते ॥ १३० ॥

## दीपकावृत्ति

### लक्षण

एकाच अर्थाच्या शद्बांची जेथें वारंवार आवृत्ति होते तेथें ' दीपकावृत्ति ' अलंकार म्हणतात १३१

### उदाहरण–आर्या

कवि कोण शके वर्णूं ? तव दानाला स्वधर्म पथचारी ! ।
वाहति दानजल–नद्या, गज--दानें उमडतात नद भारी ॥१३२॥

---

१ गुणी जनांस २ शत्रूंस ३ ' शरण आहों ' असें शपथपूर्वक म्हणण्यानें ४ दोहा हें एक हिंदी काव्यांतलि मात्रावृत्त आहे हें मधुर असून याचा प्रचार हिंदी साहित्यांत फार आहे.

### पुनः मालती सवैया

चक्रवती चकता चतुरंगिनि चारिउ चापि लई दिसि चंका ।
भूप दरीन दुरे भनि भूषन एक अनेकन बारिधि नंका ॥
औरंग साहि सों साहि को नंद लरो सिव साहि बजाय कै डंका ।
सिंह की सिंह चपेट सहै गजराज सहै गजराज को धंका ॥ १३३ ॥

### अन्यश्च-मनहरण दंडक

अटल रहे हैं दिग अंतन के भूप धरि रयति को रूप निज देस पेस करि कै ।
राना रह्यो अटल वहाना करि चाकरी को बाना तजि भूषन भनत गुन भरि कै ॥
हाडा रायठौर कछवाहे गौर और रहे अटल चकत्ता को चमाऊ धरि डरि कै ।
अटल सिवाजी रह्यो दिल्ली को निदरि धीर धरि ऐंड धरि तेग धरि गढ धरि कै १३४

## प्रतिवस्तूपमा

### लक्षण-दोहा

वाक्य न को जुग होत जहँ एकै अरथ समान ।
जुदो जुदो करि भाषिए प्रति वस्तूपम जान ॥ १३५ ॥

### उदाहरण-लीलावती[1] छंद

मद जल धरन द्विरद बल राजत, बहु जल धरन जलद छबि साजै ।
पुहुमि धरन फनिनाथ लसत अति, तेज धरन ग्रीषम रवि छाजै ॥
खरग धरन सोभा तहँ राजत, रुचि भूषन गुन धरन समाजै ।
दिल्ली दलन दाखिन दिसि थंभन, ऐंड धरन सिवराज बिराजै ॥ १३६ ॥

---

१ या छंदाचें हिंदी लक्षण असें आहे:-॥ लघुगुरुको जहँ नेम नहीं। बत्तिस कल सब जान ॥ तरल तुरंगम चालसो । लीलावतीवखान म्हणजे प्रत्येक चरणांत ३२ मात्रा असतात व लघु गुरूंचा कांहीं नियम नसतो.

### उदाहरण २ रें मंदारमाला

सम्राट-औरंग-चौरंग सेना चतुर्दिग्धरा जिंकुनी चाकली !
रत्नाकराच्या तटाला पळाली, दडाली दरीमाजि भूपावली !
ऐशा शहाच्या सवें झुंज घेई, शिवाजीच मंथी तया संगरीं !
साहे चपेटा हरीचा हरी हो, शिरोघात साहे करीचा करी ॥ १३३ ॥

### उदाहरण ३ रें-मंदारमाला

अर्पून राज्यें शहाला, रहाती प्रजारूप होऊन राज्येश्वर !
मेवाड-राणा त्यजी सर्व बाणा पहा राहिला होउनी चाकर !
'राठोड' 'हाडा' तसे 'कच्छवाही' शहाच्यावरी चामरें ढाळिती !
राहे परी निश्चल श्रीशिवाजी धरोनी धृती-दुर्ग-खड्गाप्रती ॥ १३४ ॥

## प्रतिवस्तूपमा

### लक्षण

जेथें उपमान व उपमेय वाक्यांचा निरनिराळ्या शब्दांनीं एकच भाव जाणविला जातो तेथें 'प्रतिवस्तूपमा' अलंकार म्हणतात
१३५

### उदाहरण-मंदारमाला

सामर्थ्य तें दानधारी गजाचें लसे, नीरधारी पयोद-प्रभा ॥
भूगोलधारी भुजंगेंद्र शोभे, रवी कांतिधारी निदाघांत बा ! ॥
शोभा लसे खड्गधारी जनांची जिथें संगरेच्छू मिळाली सभा ॥
दिल्लीशहारी महाराष्ट्रधारी करारी शिवाजी लसे भूप हा ॥ १३६ ॥

## दृष्टांत.

### लक्षण-दोहा.

जुग वाक्यनको अरथ जहँ प्रतिबिंबित सो होत।
तहाँ कहत दृष्टांत हैं भूषन सुमति उदोत ॥ १३७ ॥

### उदाहरण-दोहा.

सिव औरंगहि जिति सकै और न राजा राव।
हत्थि मत्थ पर सिंह बिनु आन न घालै घाव ॥ १३८ ॥
चाहत निरगुन सगुन को ज्ञानवंत गुणधीर।
यही भाँति निरगुन गुनिहि सिवा नेवाजत वीर ॥१३९॥

### पुनः मालती सवैया.

देत तुरी गन गीत सुने बिनु देत करी गन गीत सुनाए।
भूषन भावत भूप न आन जहान खुमान की कीरति गाए ॥
मंगन को भुवपाल घने पै निहाल करै सिवराज रिझाए।
आन ऋतैं बरसैं सरसैं उमडैं नदियाँ ऋतु पावस आए ॥ १४० ॥

## निदर्शना.

### लक्षण-दोहा.

सदृश वाक्य जुग अरथ को करिए एक अरोप।
भूषन ताहि निदर्शना कहत बुद्धि दै ओप ॥१४१॥

# दृष्टांत

### लक्षण

दोन वाक्यांचें युग्म जेथें एकच अर्थबिंब प्रतिबिंबित भावानें दाखवितें तेथें 'दृष्टांत' अलंकार होतो ( प्रस्तुत गोष्टीचें एखाद्या उदाहरणानें स्पष्टीकरण करणें याला दृष्टांत अलंकार म्हणतात ) १३७

### उदाहरण-आर्या

शिव एकचि जिंकुं शके औरंगाला, दुजा न नृप राव ।
मत्त गजाच्या शीर्षी हरिविण कोणी न घालतो घाव ॥ १३८ ॥
सगुणास निर्गुणासहि आदरिती ज्ञानवंत गुणधीर ।
सुगुणी निगुणी यांना प्रतिपाळी तेविं रायगड--वीर ॥ १३९ ॥

### उदाहरण २ रें-मंदारमाला

काव्यश्रुतीवीण दे अश्वमाला, श्रवे काव्य तों हस्तिमालेस दे ॥
याचें यशोगान केल्यावरी ना कवी अन्य भूपास गाई मुदें ॥
दाते किती या जगीं, याचकांना शिव-प्रीति संमृद्धि देई परी ॥
वृष्टी अकालीं ऋतूंची घडेही सरित्पात्र समृद्ध वर्षा करी ॥१४॥

# निदर्शना

### लक्षण

सदृश वाक्ययुग्मांत अर्थाचा एकच आरोप केलेला असला ह्मणजे 'निदर्शना' अलंकार होतों. उपमेंतच पर्यवसान व्हावें, एरवी अर्थ सांगावा लागू नये असा दोन वस्तूंचा किंवा दोन वाक्यांचा संबंध निदर्शनेत असतो १४१

१ वर्षाऋतु. २ या कवितेवरून स्पष्ट होतें कीं भूषण कवीला शिवाजीपासून पुष्कळशी द्रव्यप्राप्ति झाली होती.

### उहाहरण-मालती सवैया

मच्छहु कच्छ मैं कोल नृसिंह मैं बामन मैं भनि भूषन जो है ।
जो द्विजराज मैं जो रघुराम मैं जोब कह्यो बलरामहु के है ॥
बौद्ध मैं जो अरु जो कलही महँ विक्रम हूवे को आगे सुनो है ।
साहस भूमि अधार सोई अब श्री सरजा सिवराज मैं सो है ॥ १४२ ॥

### अपरंच-कवित्त मनहरण

कीरति सहित जो प्रताप सरजा मैं बर मारतंड माँझ तेज चाँदनी सो जानी मैं ।
सोहत उदारता औ सीलता खुमान मैं सो कंचन मैं मृदुता सुगंधता बखानी मैं ॥
भूषन कहत सब हिंदुनके भाग फिरै चढेते कुमति चकता हू की निसानी मैं ।
सोहत सुबेस दान कीरति सिवा मैं सोई निरखी अनूप रुचि मोतिनके पानी मैं ॥१४३

### अन्यच्च-दोहा

औरन को जो जनम है सो याको यक रोज ।
औरन को जो राज सो, सिर सरजा की मौज ॥ १४४ ॥
साहिन सो रन माँडिबो कीबो सुकबि निहाल ।
सिव सरजा को ख्याल है औरन को जंजाल ॥ १४५ ॥

## उदाहरण-मंदारमाला

[1]मच्छांत कच्छांत कोकांत किंवा नृसिंहांत वा वामनीं जो वसे ॥
रामामधें रेवतीशामधें रेणुकेच्या कुमारामधें जो लसे ॥
बौद्धामधें राजला, भावि कल्कीमधेंही विराजेल हें मिथ्य न ॥
त्या विक्रमाचा शिवाजी प्रभूच्यामधें राजतो आज तेजोगुण
॥ १४२ ॥

## उदाहरण २ रें-मंदारमाला.

कीर्तीसवें जो शिवाजींत शोभे प्रतापास मार्तंडि त्या देखिलें
जें शील औदार्य सर्जामध्यें त्या सुगंधास पद्मांतरीं वर्णिलें
दुर्भाग्य हिंदूजनांचें सरे जों [2]चढे दिल्लिपाच्या कुबुद्धी मध्यें
जी दान-कीर्ती शिवाची विशुभ्रा प्रभा तीच मुक्तावलीच्यामध्यें १४३

## उदाहरण ३ रें आर्या

इतर मनुष्यें जन्मति, याचा परि एकदांच हा जन्म
करिती राज्य इतर जे, हा मानी त्यास मौज नृप धन्य ॥ १४४॥
पातशहासह संगर करुनी हा होय विषय सुकवींचा ।
शिव सरजाची स्मृति जी घोर विषय तोच होय तदरींचा ॥ १४५॥

---

१ दशावतारांचीं नांवें २ दुर्भाग्य हाच कर्ता.

## उदाहरण-मालती सवैया

मच्छहु कच्छ मैं कोल नृसिंह मैं बामन मैं भनि भूषन जो है ।
जो द्विजराज मैं जो रघुराम मैं जोब कह्यो बलरामहु के है ॥
बौद्ध मैं जो अरु जो कलही महँ विक्रम हूवे को आगे सुनो है ।
साहस भूमि अधार सोई अब श्री सरजा सिवराज मैं सो है ॥ १४२ ॥

## अपरंच-कबित्त मनहरण

कीरति सहित जो प्रताप सरजा मैं बर मारतंड मॉझ तेज चाँदनी सो जानी मैं ।
सोहत उदारता औ सीलता खुमान मैं सो कंचन मैं मृदुता सुगंधता बखानी मैं ॥
भूषन कहत सब हिंदुनके भाग फिरै चढेते कुमति चकता हू की निसानी मैं ।
सोहत सुबेस दान कीरति सिवा मैं सोई निरखी अनूप रुचि मोतिनके पानी मैं ॥१४३

## अन्यच्च-दोहा

औरन को जो जनम है सो याको यक रोज ।
औरन को जो राज सो, सिर सरजा की मौज ॥ १४४ ॥
साहिन सो रन मँडिबो कीबो सुकबि निहाल ।
सिव सरजा को ख्याल है औरन को जंजाल ॥ १४५ ॥

## उदाहरण–मंदारमाला

[1]मच्छांत कच्छांत कोकांत किंवा नृसिंहांत वा वामनीं जो वसे ॥
रामामधें रेवतीशामधें रेणुकेच्या कुमारामधें जो लसे ॥
बौद्धामधें राजला, भावि कल्कीमधेंही विराजेल हें मिथ्य न ॥
त्या विक्रमाचा शिवाजी प्रभूच्यामधें राजतो आज तेजोगुण
॥ १४२ ॥

## उदाहरण २ रें–मंदारमाला.

कीर्तीसवें जो शिवाजींत शोभे प्रतापास मार्तंडिं त्या देखिलें
जें शील औदार्य सर्जामध्यें त्या सुगंधास पद्मांतरीं वर्णिलें
दुर्भाग्य हिंदूजनांचें सरे जों [2]चढे दिल्लिपाच्या कुबुद्धी मध्यें
जी दान-कीर्ती शिवाची विशुभ्रा प्रभा तीच मुक्तावलीच्यामध्यें १४३

## उदाहरण ३ रें आर्या

इतर मनुष्यें जन्मति, याचा परि एकदांच हा जन्म
करिती राज्य इतर जे, हा मानी त्यास मौज नृप धन्य ॥ १४४ ॥
पातशहासह संगर करुनी हा होय विषय सुकवींचा ।
शिव सरजाची स्मृति जी घोर विषय तोच होय तदरींचा ॥ १४५ ॥

---

१ दशावतारांचीं नांवें २ दुर्भाग्य हाच कर्ता.

## व्यतिरेक.

### लक्षण-दोहा.

सम छबिवान दुहून मैं, जहँ बरतन बढि एक ।
भूषण कबि कोबिद सबै, ताहि कहत व्यतिरेक ॥१४६॥

### उदाहरण-छप्पय.

त्रिभुवन मैं परसिद्ध एक अरि बल वह खंडिय ।
यहि अनेक अरिबल बिहंडि रन मंडल मंडिय ॥
भूषन वह ऋतु एक पुहुमि पानिपहि बढावत ।
यह छहु ऋतु निसि दिन अपार पानिप सरसावत ॥
सिवराज साहि सुव सत्थ नित हय गज लक्खन संचरई ।
यकइ गयंद यकइ तुरंग किमि सुरपति सरबरि करई ॥१४७॥

### पुनरपि कबित्त-मनहरण.

दारुन दुगुन दुरजोधन ते अवरंग भूषन भनत जग राख्यौ छल मढि कै ।
धरम धरम, बल भीम, पैज अरजुन, नकुल अकिल, सहदेव तेज चढि कै ॥
साहि के सिवाजी गाजी, कर्यो आगरे मैं चंड पांडवनहू ते पुरुषारथ सुवढि कै ।
सुने लाख भौन ते कढे वै पांच राति, तैंजु द्योस लाख चौकी ते अकेलो आयो काढि कै
॥ १४८ ॥

# व्यतिरेक.

## लक्षण

कांतिमान अशा दोन वस्तूंतून एकीला मोठेपणा देणें याला 'व्यतिरेक' अलंकार ह्मणतात १४६ ( अन्य कवि व्यतिरेकांत उपमान उपमेयांचाही संबंध जोडतात.

## उदारण–मंदारमाला.

त्रैलोक्य–विख्यात एकाच वैरी-बलाला विखंडी सुराधीश तो ।
संख्या न ज्यांची अशा म्लेंच्छवैरी–बलाला विखंडून हा गाजतो ॥
तो[2] एक वर्षर्तुमाजीच वर्षे रणीं षड्ऋतू माजि हा वर्षतो ।
एका गजाश्वें हरी[3], लक्षवाजी-गजेशाशीं[4] या साम्य का पावतो?॥ १४७

## उदाहरण २ रें मंदारमाला

दुर्योधनाहून हा दुष्ट भारी अलम्गीर, साऱ्या जगाला छळी !
धर्मापरी धर्म, भीमापरी कर्म, पार्थापरी पैज त्या दाविली !
आग्रयाहुनी जों निघाला शिवाजी, करी पांडवांहूनही चंडता !
लाक्षागृहीं रात्रि ते[5] तप्त झाले, पहाऱ्यांतुनी हा दिनीं ये स्वता १४८

---

१ शिवाजी. २।३ इंद्र ४ शिवाजीशीं. ५ दुर्योधनानें कपटानें पांडवांस लाक्षागृहांत दग्ध करण्याचा व्यूह रचिला होता. त्यावेळीं धर्माचा धर्म, भीमसेनाचें बल, अर्जुनाची प्रतिज्ञा, नकुलाचें बुद्धिचातुर्य आणि सहदेवाचें तेज या गुणांनीं ते त्या संकटांतून वाचले. यावर लक्ष ठेवून शिवाजी महाराज दिल्लीहून सुटून आले, त्या प्रसंगाच्या वर्णनांत त्यांची येथें पांडवांबरोबर तुलना केली गेली आहे.

## सहोक्ति

### लक्षण—दोहा

वस्तुन को भासत जहाँ, जन रंजन सह भाव ।
ताहि सहोक्ति बखानहीं, जे भूषन कविराव ॥ १४९ ॥

### उदाहरण—मनहरण दंडक

छूट्यो है हुलास आमखास एक संग छुट्यो हरम सरम एक संग बिनु ढंग ही ।
नैनन ते नीर धीर छूट्यो एक संग छूटी सुख रुचि मुख रुचि त्योंहि बिनु रंग ही ॥
भूषन बखाने सिवराज मरदाने तेरी धाक बिललाने न गहत बल अंग ही ।
दक्खिन को सूबा पाय दिली के अमीर तजैं उत्तर की आस जीव आस एक संग ही ॥ १५० ॥

## विनोक्ति

### लक्षण—दोहा

विना कछू जहँ बरनिए कै हीनो कै नीक ।
ताको कहत बिनोक्ति है कबि भूषन मति ठीक ॥ १५१ ॥

### उदाहरण—दोहा

सोभमान जग पर किए सरजा सिवा खुमान ।
साहिन सों बिनु डर अगड बिनु गुमान को दान ॥ १५२ ॥

# सहोक्ति

### लक्षण.

जेथें वस्तूंचे 'सह' भाव जन मनोरंजनासह प्रकट होतात तेथें 'सहोक्ति ! अलंकार म्हणतात १४९

### उदाहरण–मंदारमाला

आनंद शाही सभेचा गळे, त्यासवें बेगमांचीहि लज्जा गळे ॥
डोळ्यांतुनी वाहिल्या अश्रु–धारा, तयांच्यासवें धैर्यही वाहिलें ॥
राया ! तुझा धाक जाळी मनाला, जळे त्यासवें देहशक्ती अहा !
आशा गृहांच्यासवें जीविताची सुभेदार सोडून येती पहा ! ॥१५०॥

# विनोक्ति

### लक्षण

अमक्यावांचून अमुक चांगलें दिसतें किंवा विशोभित दिसतें असें वर्णन असलें म्हणजे 'विनोक्ति' अलंकार होतो १५१

### उदाहरण–आर्या

पातशहाशीं बाणा भीतिविना, दान तेंहि गर्वविना ॥
भूषविलें शिव–भूपें भूपृष्ठीं रुचिर दोन सुगुणांना ॥ १५२ ॥

### पुनः-मालती सवैया

को कबिराज बिभूषन होत बिना कवि साहि तनै को कहाए ?
को कबिराज सभाजित होत सभा सरजा के बिना गुन गाए ?
को कबिराज भुवालन भावत भौंसिला के मन मैं बिनु भाए ?
को कबिराज चढ़ैं गज बाजि सिवाजि कि मौज मही बिनु पाये ॥ १५३ ॥

### अन्यच्च-कबित्त मनहरण

बिना लोभ को बिबेक, बिना भय युद्ध टेक, साहिन सो सदा साहि तनै सिरताज के ।
बिनाही कपट प्रीति बिनाही कलेश जिति बिनाही अनीति रीति लाज के जहाज के॥
सुकबि समाज बिन अपजस काज भनि भूषन भुसिल भूप गरीब नेवाज के ।
बिना ही बुराई ओज बिना काज घनी फौज बिना अभिमान मौज राज सिवराज के ॥ १५४ ॥

कीरति को ताजी करी बाजी चढ़ि लुटि कीन्हीं भई सब सेन बिनुबाजी बिजैपुरकी ।
भूषन भनत भौंसिला भुवाल धाक ही सों धीर धरबी न फौज कुतुबके धुरकी॥
सिंह उदैभान बिन अमर सुजान बिन मान बिन कीन्ही साहिबी त्यौं दिलीसुर की ।
साहिसुव महाबाहु सिवाजी सलाह बिन कौन पातसाहकी न पातसाही मुरकी ॥१५५॥

## समासोक्ति

### लक्षण-दोहा

बरनन कीजै आन को ज्ञान आन को होय ।
समासोक्ति भूषन कहत कबि कोबिद सब कोय ॥ १५६ ॥

### उदाहरण २ रें–मंदारमाला

ज्यातें कवी मानिलें ना शिवानें, ' कवी ' हें जगीं नाम लाधे कुणा ?
होई सभाजित् कवि श्रेष्ठ कैसा सभेमाजि तत्कीर्तिगाना विना ?
कोणा नृपाला कविश्रेष्ठ भावे शिवाच्या न जो आवडे सन्मना ?
बाजी गजांच्यावरी कोण राजे कविश्रेष्ठ, या भूपदानाविना ॥ १५३ ॥

### उदाहरण ३ रें–मंदारमाला

शाहासवें या नृपांचा विवेक प्रलोभाविना, युद्ध भीतीविना ॥
प्रीती वसे कैतवाच्या विना, ती जयश्री वश क्लेश दुःखाविना ॥
गाती कवी दीन-संरक्षकाची महत्कीर्ती मोर्दे विकीर्तीविना ॥
ओजस्विता विग्रहाच्या विना, फौज कार्याविना, मौज मानाविना
॥ १५४ ॥

### उदाहरण–चौथें–मंदारमाला.

बाजी चढे या शहाजी–सुताची, करी आदिली फौज बाजीविना
बीनीवरी भोसले–भूषणाच्या भयें गोळकोंडा धरी धीर ना ॥
दिल्लीश्वराची करी हीन शेखी उदेभानें–चंदावताच्या विना
याच्या तहावीण कोणा शहाची दिसे पातसाही प्रसन्नानना !
॥ १५५ ॥

## समासोक्ति

### लक्षण

एका वस्तूचें वर्णन करावें आणि तिजवरून अन्य वस्तूचा बोध व्हावा असें असलें ह्मणेज त्याला 'समासोक्ति' अंलकार ह्मणतात १५६

१ आवडे २ शिवाजीचा ३ उदेभान हा सिंहगडाचा किल्लेदार होता ४ अमरसिंह चंदावत साल्हेरीच्या युद्धांत मोंगलातर्फे लढतां लढतां मारला गेला.

### उदाहरण-दोहा

वडो डील लखि पील को सबन तज्यो बन थान ।
धनि सरजा तू जगत मैं ताको हर्‍यो गुमान ॥ १५७ ॥
तुहि साँच द्विजराज है तेरी कला प्रमान ।
तो पर सिव किरपा करी जानत सकल जहान ॥ १५८ ॥

### अपरंच-कवित्त मनहरण

उत्तर पहार विधनोल खँडहर झारखँडहु प्रचार चारु केली है बिरद की ।
गोर गुजरात अरु पूरब पछाँह ठौर जंतु जंगलीनकी बसाति मारि रद की ॥
भूषन जो करत न जाने बिनु घोर सोर भूलि गयो आपनी उँचाई लखे कद की ।
खोइयो प्रबल मदगल गजराज एक सरजा सौं बैर कै बढाई निज मद की ॥१५९॥

## परिकर-परिकरांकुर

### लक्षण-दोहा

साभिप्राय विसेषननि भूषन परिकर मान ।
साभिप्राय विसेष्य ते परिकर अंकुर जान ॥ १६० ॥

## उदाहरण-आर्या

मदमत्त द्विरद-गती पाहुनिया स्थान सोडिती सर्व ॥
सिव सरजा धनि जगतीं तूं, त्याचा हारिलास बा! गर्व ॥१५७
द्विजराज सत्य तूंची वर्धिष्णु त्वकला प्रमाण असे ॥
त्वच्छीर्षी शभूंची कृपा वसे जग समस्त जाणतसे ॥ १५८ ॥

## उदाहरण २ रें-मंदारमाला

बिन्दूर[1]-बुंदेले[2]-झखंड[3]-भागीं उदीचीन[4] शैलांत केली[5] करी ॥
पूर्वापरीं[6], गुर्जरीं[7], गोर[8]-देशीं वनक्रूर जंतूंस जो संहरी ॥
औरंग त्या सिंह-शौर्यास नेणें भ्रमे[9] आपुल्या भव्यतेनें करी ॥
हारी स्वतांच्या मदश्रेष्ठतेला अमित्रत्व सर्जासवें आचरी ॥१५९॥

# परिकर-परिकरांकुर

## लक्षण

साभिप्राय ( सहेतुक ) विशेषणें असलीं ह्मणजे 'परिकर' अलंकार मानावा आणि विशेष्यही साभिप्राय असलें कीं 'परिकरांकुर' अलंकार जाणावा १६०

---

१ म्हैसूर प्रांतांत शहर आहे. येथें एक राणी राज्य करीत होती व तिला तिच्या सरदाराविरुद्ध छत्रपतींनीं सहाय्य केलें होतें. २ बुंदेलखंड ३ झांशी, बांदा, हमीरपूर आणि जालौन या चार जिल्हे मिळून होणारा प्रांत ४ उत्तरेकडील ५ क्रीडा ६ पूर्व आणि पश्चिम देशीं ७ गुजरायेंत ८ गोर = शहाबुद्दीन गोरीचा प्रांत-अफगाणिस्थानांत. ९ क्रियापद.

### उदाहरण । परिकर । कवित्त-मनहरण

बचैगा न समुहाने बहलोलखाँ अयाने भूषन बखाने दिल आनि मेरा बरजा ।
तुझ ते सवाई तेरा भाई सलहेरि पास कैद किया साथका न कोई बीर गरजा ॥
साहिन के साहि उसी औरंग के लीन्हे गढ जिसका तू चाकर औ जिसकी है परजा ।
साहिका ललन दिली दलका दलन अफजलका मलन सिवराज आया सरजा ॥ १६१ ॥

जाहिर जहान जाके धनद समान पेखियतु पासवान यों खुमान चित चाय है ।
भूषन भनत देखे भूख न रहत सब आपही सों जरत दुख दारिद बिलाय है ॥
खीझे ते खलक माहिँ खलभल डारत है रीझेते पलक माहिँ कीन्हे रंक राय है ।
जंग जुरि अरिन के अंगको अनंग कीबो दीबो सिव साहिब के सहज सुभाय है ॥ १६२ ॥

### अन्यच्च-दोहा

सूर सिरोमनि सूर कुल सिव सरजा मकरंद ।
भूषन क्यों औरंग जितै कुल मलिच्छ कुल चंद ॥ १६३ ॥

### परिकरांकुर-दोहा

भूषन भनि सबही सबही जीत्यो हो जुरि जंग ।
क्यों जीतै सिवराज सों अब अंधक अवरंग ॥ १६४ ॥



## उदाहरण ( परिकर ) मंदारमाला

बल्लोलखा[1]! संमुखाला न येई, जिवानेंच जाशील, मागें फिर ?
भाई[2] तुझ्याहूनही जो सवाई, सलेरीस तो बंधिला दुर्धर !
तूं दास ज्याचा, शहांचा शहा जो, तयाच्याच दुर्गावलीतें हरी !
दिल्ली-दलाचा खली, अफजुलाचा बली पातला हा शिवाजी हरी !
॥ १६१ ॥

## उदाहरण २ रें–मंदारमाला

ज्याच्या दिसे आश्रितांची स्थिती ती कुबेराप्रमाणें सुखाची महीं ॥
यद्दर्शनें क्षुत्तृई नष्ट होती, दुरी राहतें दुःख–दारिद्र्यही ॥
भूकंपदायी असे क्रोध याचा, परी तुष्टतां राव रंका करी ॥
जे जे शिवाच्या रणीं पातले ते अनंग स्वभावेंच झाले अरी॥ १६२॥

## पुन्हां–आर्या

शूरशिरोमणि रविकुल, शिव सरजा त्या मधील मकरंद ॥
औरंग केविं जिंकी म्लेंच्छकुलांतील त्याजला चंद्र ॥ १६३ ॥

## परिकरांकुर–आर्या

तेंव्हांच जिंकिले ते सकलहि घनघोर संगरांत अहा ! ॥
आतां शिवरायाला अंधक[3] औरंग केविं जिंकिल हा ॥ १६४ ॥

---

१ हा वास्तविक विजापुरी सरदार होता. परंतु यानें दोनदा मोगलांचें साह्य घेऊन शिवाजीशीं युद्ध केलें व पराभूत झाला म्हणून " जिसका तू चाकर और जिसकी है परजा " असें याचें कवीनें औरंगजेबाशीं नातें लाविलें आहे २ सलेरीच्या युद्धांत बल्लोलखाचा हा कोणता भाऊ धरला गेला त्याचें नांव कळत नाहीं ३ अंधक दैत्याला शिवानें (शंकराला) ठार मारिलें होतें.

## श्लेष

### लक्षण-दोहा

एक बचन मैं होत जहँ बहु अर्थन को ज्ञान ।
स्लेस कहत हैं ताहि को भूषन सुकबि सुजान ॥ १६५ ॥

### उदाहरण कबित्त-मनहरण

सीता संग सोभित सुलच्छन सहाय जाके भूपर भरत नाम भाई नीति चारु है ।
भूषन भनत कुल सूर कुल भूषन है दासरथी सब जाके भुज भुव भारु है ॥
अरि लंक तोर जोर जाके संग बान रहै सिंधुर हैं बाँधे जाके दलको न पारु है ।
तेगहि कै भेंटै जौन राकस मरद जाने सरजा सिवाजी रामहीं को अवतारु है ॥ १६६ ॥

### पुन्हां

देखत सरूप को सिहात न मिलन काज जग जीतिबेकी जामें रीति छल बलकी ।
जाके पास आवै ताहि निधन करति बेगि भूषन भनत जाकी संगति न फलकी ॥
कीरति कामिनि राची सरजा सिवाकी एक बस कै सकै न बस करनी सकलकी ।
चंचल सरस एक काहू पै न रहै दारी गनिका समान सुबेदारी दिली दलकी ॥ १६७ ॥

## अप्रस्तुतप्रशंसा

### लक्षण-दोहा

प्रस्तुत लीन्हे होत जहँ, अप्रस्तुत परसंस ।
अप्रस्तुत परसंस सो कहत सुकबि अवतंस ॥ १६८ ॥

# श्लेष

## लक्षण

एका वचनांत (शब्दांत) अनेक अर्थांचें ज्ञान होत असलें ह्मणजे ‘ श्लेषालंकार ’ ह्मणतात १६५

### उदाहरण—मंदारमाला

सीता[1] यशःश्री, जया लक्ष्मणांचें[2] मिळे साह्य, शत्रुघ्न-बंधू[3] जगीं ॥
जो सूर्य वंशांतला भव्य-योद्धा, धराभार वाही स्वबाहूरगीं ॥
जो धाकवी शत्रु[4]-लंकेस, कीर्ती जगीं सिंधु[5]-निर्बंधकाची लसे ॥
दैत्यारि मर्दावया शक्तिशाली जिजा-पुत्र रामावतरी असे ॥१६६॥

### उदाहरण २ रें—मंदारमाला

आलिंगनेच्छू करी जी[6] मनाला छलादी बळानें जगाला हरी ॥
येई जया संनिधानीं तयाला दरिद्री करी स्नेह ना आचरी ॥
केव्हां कुणाच्या नसे आधिना ही, रची भोसलेकीर्ति—कांतेप्रती ॥
वारांगनेच्यापरी चंचला ही सुभेदारि दिल्लीदलाची अती ॥१६७॥

# अप्रस्तुतप्रशंसा

## लक्षण

प्रस्तुता ( उपमेया ) करितां अप्रस्तुताची ( उपमानाची ) प्रशंसा होत असली म्हणजे ‘ अप्रस्तुत प्रशंसा अलंकार होतो १६८

---

१ सीता = जानकी [ पक्षीं ] स्वर्गंगा २ सौमित्र [ पक्षीं ] सुचिन्हयुक्त ३ शत्रुघ्न आहे बंधु ज्याचा [ पक्षीं ] शत्रुघ्नांचा बंधु ४ लंका ( पक्षीं ) दिल्ली ५ समुद्र [ पक्षीं ] गज ६ दिल्लीदलाची सुभेदारी ही वारांगनेसारखी आहे असें या कवितेंत वर्णन आहे. तें दोन्हीकडे सारखें लावून श्लेषालंकार साधला आहे.

### उदाहरण-दोहा

हिंदुनि सों तुरकिनि कहैं तुम्हैं सदा संतोष ।
नाहिन तुम्हरे पतिनपर सिव सरजा कर रोष ॥ १६९ ॥
अरातिय भिल्लिनि सों कहैं घन वन जाय इकंत ।
सिव सरजा सों बैर नहिँ सुखी तिहारे कंत ॥ १७० ॥

### पुन्हां-मालती सवैया

काहु पै जात न भूषन जे गढपाल कि मौज निहाल रहे हैं ।
आवत हैं जु गुनीजन दच्छिन भौसिला के गुन गीत लहे हैं ॥
राजन राव सबै उमराव खुमान कि धाक धुके यों कहे हैं ।
संक नहीं, सरजा सिवराज सों आजु दुनी में गुनी निरभै हैं ॥ १७१ ॥

## पर्यायोक्ति

### लक्षण-दोहा

बचनन की रचना जहाँ बर्णनीय पर जानि ।
परजायोकति कहत हैं भूषण ताहि बखानि ॥ १७२ ॥

## उदाहरण—आर्या

वदते आर्य— सखीला तुर्की—ललना—“ तुम्हां सदा तोष;
तुमच्या पतिवरि नाहीं शिव सरजाचा विनाशकर रोष ॥ १६९ ॥
यवनी शबरीस वदे—“ बरा वनांतील बाइ एकांत !
वैर न शिव सरजाशीं तुमचे असती जगीं सुखी कांत” ॥ १७० ॥

## उदाहरण२ रें—मंदारमाला

जाती न कोणाकडे, जे पहाती शिवाची प्रभूत प्रदानक्रिया ॥
जो ये गुणी भोसलेभूपतीच्या गुणाला सजे तो प्रशंसावया ॥
यच्चित्त धाके जिजापुत्र--धाकें मुखें बोलती राव राजे असें ॥
“ शंका नसे, या शिवाजीमुळें हा गुणी—वृंद निर्भांत लोकीं असें ”
॥ १७१ ॥

# पर्यायोक्ति

## लक्षण

वर्णनीय रचनेवरून परिस्थिति कळून येत असली म्हणजे पर्यायोक्ति अलंकार म्हणतात. १७२

( स्पष्ट शब्दांत न सांगतां पर्यायानें सांगणें असेंही या अलंकाराचें थोडक्यांत लक्षण आहे )

### उदाहरण-मनहरण दंडक

महाराज सिवराज तेरे बैर देखियतु घन बन व्है रहे हरम हबसीन के।
भूषन भनत तेरे बैर रामनगर जवारि पर बह बहे रुधिर नदीन के॥
सरजा समत्थ वीर तेरे बैर बीजापुर बैरी बैयरनि कर चीन्ह न चुरीन के।
तेरे रोस देखियत आगरे दिली में विन सिंदूर के बुंद मुख इंदु जमीनीनके
॥ १७३ ॥

## व्याजस्तुति

### लक्षण-दोहा

सुस्तुति में निंदा कढे निंदा में स्तुति होय।
व्याजस्तुति ताको कहत कबि भूषन सब कोय॥ १७४॥

### उदाहरण-कवित्त मनहरण

पीरी पीरी हुन्नै तुम देत हौ मँगाय हमैं सुबरन हम सों परखि करि लेत हो।
एक पलही में लाख रूखन सों लेत लोग तुम राजा व्है कै लाख दीबेको सचेत हो॥
भुषन भनत महाराज सिवराज बडे दानी दुनी ऊपर कहाए केहि हेत हो?।
रीझि हँसि हाथी हमैं सब कोऊ देत कहाँ रीझि हँसि हाथी एक तुमहियै देत
हौ॥ १७५॥

### उदाहरण—मंदारमाला

वैरें तुझ्या भोसले--भूमिपाळा! रहाती वनीं रुक्मिणी कामिनी ॥
रोषें तुझ्या [1]रामनेरीं जव्हारीं नद्या वाहिल्या शोणिताच्या रणीं ॥
चिन्हें चुड्यांचीं तुझ्या दीर्घ-वैरें बुझालीं विजापूर--कांता—करीं ॥
सिंदूर[2]-बिंदूविना बेगमांची मुखेंदु-प्रभा हीन दिल्ली-पुरीं ॥ १७३ ॥

## व्याजस्तुति

### लक्षण

स्तुतिमध्यें निंदा किंवा निंदेमध्यें स्तुति प्रगट होत असली म्हणजे 'व्याजस्तुति' अलंकार होतो. १७४

### उदाहरण—मंदारमाला

देशी अम्हां पीत होनास राया! सु--[3]वर्णास घेशी अम्हापासुनी!
घेती तरू पासुनी [4]लाँख सारे मुर्दे [5]लाँख देशी प्रभु होउनी!
भूमंडळीं गाजशी श्रेष्ठ दाता कशाला शिवाजी नरेशा! तरी?
कोणी दिला घेतला नाग[6] लोकीं दिले [7]नाग तूं याचकांच्या करीं! १७५

---

१ इ. स. १६७१ त छत्रपतींनीं एक रामनगर जिंकलें आणि दुसरे वर्षी दुसरें एक रामनगर व जव्हारचें राज्य जिंकलें.

२ या कवितेंत यवनी स्त्रियांच्या भाल प्रदेशांत सिंदूर बिंदूंचा अभाव दर्शवून त्यांची वैधव्य दशा व्यंजित केली गेली आहे. अजून कांही मुसलमानांत लग्नाच्या दिवशीं वधूला सेंदुराचें सौभाग्य चढविलें जातें. त्यावांचून त्यांचें लग्न लागत नाहीं. त्या काळीं मुसलमानांच्या सौभाग्यवती स्त्रिया कपाळावर सिंदूर-बिंदु लावीत असव्या. ३ चांगले वर्ण अर्थात् कविता. ४ पलाश पिप्पलादिकां-पासून जी निघते ती. ५ लक्ष रुपये. ६ सर्प. ७ हत्ती. अलंकार कायम राखण्या-करितां येथें मुळांतील 'हस्ति' शब्द सोडून 'नाग' हा व्यर्थी शब्द वापरला आहे.

तू तौ रातो दिन जग जागत रहत वेऊ जागत रहत रातौ दिन वनरत हैं।
भूषन भनत तू विराजै रज भरो वेऊ रज भरे देहिन दरी मैं विचरत हैं ॥
तू तौ सूर गन को बिदारि बिहरत सूर-मंडलै बिदारि वेऊ सुरलोक रत है।
काहे ते सिवाजी गाजी तेरोई सुजस होत तो सों अरिबर सरिबरि सी करत है ॥ १७६ ॥

## आक्षेप

### लक्षण-दोहा

पहिले कहिए बात कछु पुनि ताको प्रतिषेध।
ताहि कहत आच्छेप हैं भूषन सुकबि सुमेध ॥ १७७ ॥

### उदाहरण-मालती सवैया

जाय भिरौ न भिरे बचि है। भनि भूषन भौसिला भूप सिवा सों।
जाय दरीन दुरौ दरिऔ तजि कै दरियाव लँघौ लघुता सों ॥
सिच्छन काज वजीरन को कढैं बोल यों एदिल साहि सभा सों।
छूटि गयो तौ गयो परनालो सलाह कि राह गहौ सरजा सों ॥ १७८ ॥

### द्वितीय लक्षण-दोहा

जेहि निषेध अभ्यासही भनि भूषन सो और।
कहत सकल आच्छेप हैं जे कविकुल सिरमौर ॥ १७९ ॥

### उदाहरण-कबित्त मनहरण

पूरब के उत्तर के प्रबल पछाँह हूके सब बादसाहन के गढकोट हरते।
भूषन कहैं यों अवरंग सों वजीर जीति लीबे को पुरतगाल सागर उतरते ॥
सरजा सिवापर पठावत मुहीम काज हजरत हम मरिबेको नहि डरते।
चाकर हैं उजुर कियो न जाय नेक पै कछू दिन उबरते तौ घने काज करते ॥ १८० ॥

## पुन्हां उदाहरण—मंदारमाला.

जागे तुझें तेज रात्रंदिनीं, तो[1] निशीं जागुनी राहि रानीं दिनीं ॥
तूं राजशी राजलक्ष्मीसर्वे, तो रजोयुक्त हिंडे दरी—काननीं ॥
शूरांस तूं भेदिशी, सूर्यबिंब प्रभेदून तो राहि लोकांतरीं ॥
श्रेष्ठा! तुझीच प्र—कीर्ती कशाला? समत्वास वैरी तुझ्या आचरी॥१७६

# आक्षेप

### लक्षण

प्रथम एखादी गोष्ट सांगून पुन्हां तिचा प्रतिषेध केला गेला म्हणजे 'आक्षेप' अलंकार होतो १७७

### उदाहरण—मंदारमाला.

झुंजा तयाशीं, परी झुंजुनीही न वांचाल सर्जा शिवापासुनी ॥
किंवा गृहें सोडुनी कंदरीं जा, दुरी जा समुद्रास उल्लंघुनी ॥
आदीलशाहा वजीरादिकांच्या सभेला निदानीं करी घोषणा ॥
'गेला पन्हाळा सुटोनी सुटो तो, तहाचीच त्याला करा याचना १७८

### द्वितीय—लक्षण

इतर गोष्टी सजवून सांगितल्या तरी मुख्य गोष्टीचा परिणाम निषेधांतच होत असला ह्मणजेही आक्षेप अलंकार होतो १७९

### उदाहरण—मंदारमाला

पूर्वोत्तरा—पश्चिमा—दिक्पतींच्या गडांना अह्मी जिंकितों जाउनी ॥
शाहाप्रती सांगती मंत्रि—"जातों फिरंग्यावरी सिंधु उल्लंघुनी ॥
राया! अह्मी भीत नाहीं मराया जरि प्रेषिशी दक्षिणेशावरी ॥
लोकीं परी वांचतों काळ कांहीं महत्कार्य होतें करानें तरी॥१८०

---

१ तुझा (शिवाजीचा) शत्रु २ युद्धांत मरणारे योध्दे सूर्यबिंब भेदून स्वर्गांत जातात, असें म्हणतात.

## विरोध ( द्वितीय विषम )

### लक्षण-दोहा

द्रव्य क्रिया गुन में जहँ उपजत काज विरोध ।
ताको कहत बिरोध है भूषन सुकवि सुबोध ॥ १८१ ॥

### उदाहरण-मालती सवैया

श्री सरजा सिव तो जस सेत सों होत हैं बैरिन के मुहँ कारे ।
भूषन तेरे अरुन्न प्रताप सफेत लखे कुनबा नृप सारे ॥
साहितनै तव कोप कृसानु तै बैरि गरे सब पानिप वारे ।
एक अचंभव होत बडो तिन ओंठ गहे अरि जात न जारे ॥ १८२ ॥

## विरोधाभास

### लक्षण-दोहा.

जहँ विरोध सों जानिये साँच बिरोध न होय ।
तहाँ बिरोधाभास कहि बरनत है सब कोय ॥ १८३ ॥

### उदाहरण-मालती सवैया

दच्छिन नायक एक तुही, भुव भामिनी को अनुकूल व्है भावै ।
दीनदयाल न तो सो दुनी पर म्लेच्छ के दीनहिँ मारि मिटावै ॥
श्रीसिवराज भनै कवि भूषन तेरे सरूप को कोउ न पावै ।
सूर सुबंस में सूरसिरोमनि व्है करि तू कुलचंद कहावै ॥ १८४ ॥

# विरोध ( द्वितीयविषम )

## लक्षण-दोहा.

द्रव्य, क्रिया किंवा गुण यांच्यांत कार्य-विरोध उत्पन्न होत असला ह्मणजे 'विरोधालंकार' जाणावा १८१

## उदाहरण-मंदारमाला.

वैरी जनांचीं मुखें कृष्ण झालीं यशाचा तुझा सेतु संप्रेक्षुनी ॥
रक्त-प्रतापें मुखीं पांडुरी ये नृपांच्या नृपालोत्तमा! तत्क्षणीं ॥
पाणी वसे ज्यांत, विद्रोहचारी बुझाले तुझ्या कोपवन्हीमुळें ॥
आले तृणाला धरोनी स्वदंतीं विदग्ध स्वदेहीं परी राहिले! ॥१८२॥

# विरोधाभास

## लक्षण

जेथें विरोधावरून कळून येतें कीं, हा खरा विरोध नव्हे तेथें 'विरोधाभास' अलंकार ह्मणतात. १८३

## उदाहरण-मंदारमाला

तूं दक्षिणस्वामि भूभामिनीच्या मनीं भावशी प्रेमनाथापरी।
ना दीन-पाता तुझ्यावीण लोकीं, विभो! 'दीनं'-हाराहि म्लेच्छांतरीं
गोब्राह्मणाधार! पावे न कोणी तुझी रूपता धर्मवीराग्रणी।
तूं सूर्य-वंशांत चूडामणीही 'कुलेंदु' प्रसिद्धी तुझी या जनीं॥१८४॥

---

१ 'दीन दीन' शब्द हरण करणारा ( किंवा दीन म्हणजे धर्म )

# विभावना

## लक्षण-दोहा.

भयो काज बिन हेतुही, बरनन हैं जेहि ठौर ।
तहँ बिभावना होति है कवि भूषन सिरमौर ॥ १८५ ॥

## उदाहरण-मालती सवैया

बीर बडे बडे मीर पठाण खरो रजपूत को गन भारो ।
भूषन जाय तहाँ सिवराज लियो हरि औरंगजेब को गारो ॥
दीन्हो कुज्वाब दिलीपति को अरु कीन्हो वजीरनको मुहँ कारो ।
नायो न मायहि दक्खिन नाथ न साथ मैं फौज न हाथ हथ्यारो ॥ १८६ ॥

## पुन्हां-दोहा.

साहि तनै सिवराजकी सहज टेव यह ऐन ।
अनरीझे दारिद हरै, अनखीझे अरि सैन ॥ १८७ ॥

# और दो विभावना

## लक्षण-दोहा.

जहाँ हेतु पूरन नहीं, उपजत है परकाज ।
कै अहेतु ते और यों द्वै विभावना साज ॥ १८८ ॥

# विभावना

## लक्षण

हेतुवांचून कार्य घडलें असें वर्णन जेथें केलेलें असतें तेथें 'विभावना' अलंकार ह्मणतात. १८५

## उदाहरण—मंदारमाला

संग्रामशाली उभे मीर भारी, उभा राजपूत प्रभावी गण ॥
औरंग-गर्वास तेथें स्व—तेजें हरी विक्रमी भोसले-भूषण ॥
प्रश्नोतरीं दिल्लिनाथास दापी वजीरी मुखीं कृष्णता वाढवी ॥
ना सैन्य, ना शस्त्र, हा दक्षिणादिग्विजेता परी मान ना वांकवी
॥ १८६ ॥

## उदाहरण २ रें आर्या

सत्पुत्र शहाजीचा त्याचा सहज स्वभाव, हा बाणा
रिझल्याविण हरि दैना, खिजल्याविण हरि समस्त अरि-सेना॥ १८७

# आणखी दोन विभावना

## लक्षण

जेथें हेतु पूर्ण नाहीं परंतु कार्याची मात्र उत्पत्ति होते तेथेंही 'विभावना' अलंकार ह्मणतात. १८८

## उदाहरण

### कारण अपूरे काज की उत्पत्ति–कवित्त मनहरण

दच्छिन को दावि करि बैठो है सइस्तखान पूनामाहिं दूना करि जोर करवार को।
हिंदुवान खंभ गढपति दलथंभ भनि भूपण भरैया कियो सुजस अपार को॥
मनसबदार चौकिदारन गँजाय महलन में मचाय महाभारत के भार को।
तो सो को सिवाजी जेहि दो सो आदमी सों जीत्यो जंग सरदार सौ हजार असवार को
॥ १८८ ॥

### अहेतु ते कारज की उत्पत्ति–कवित्त मनहरण

ता दिन अखिल खलभलैं खल खलक में जा दिन सिवाजी गाजी नेक करखत हैं
सुनत नगारन अगार तजि अरिन की दारगन भाजत न बार परखत है॥
छूटे बार बार छूटे बारन ते लाल देखि भूषन सुकवि बरनत हरखत हैं॥
क्यों न उतपात होहिं बैरिन के झुंडन में कारे घन उमडि अँगारे बरखत हैं॥१९०

## और विभावना

### लक्षण–दोहा

जहँ प्रगट भूषन भनत हेतु काज ते होय।
सो विभावना औरऊ कहत सयाने लोय॥ १९१॥

### उदाहरण–दोहा.

अचरज भूषन मन बढ्यो, श्री सिवराज खुमान।
तव कृपान धुव धूम ते, भयो प्रताप कृसान॥ १९२॥



शाहिस्तेखानावरील छापा.

चौक्या पहाऱ्यांतुनि आंत जाई, करी भारती कंदनाला अती. पा. १३

श्रीकृष्ण छा. जळगांव.

### अपूर्ण कारणांत कार्याची उत्पत्ति-मंदारमाला

षाहिस्तखां दक्षिणाभूस दापी, पुणें-मंदिरीं दावि खड्ग-प्रभा ॥
सह्याद्रि-दुर्गेश दुःसह्य दावी महत्साहासें विक्रमाची विभा ॥
चौवथ्या पहाऱ्यांतुनी आंत जाई करी भारती कंदनाला अती ॥
योद्धे सर्व दोनशें मात्र होते, परी जिंकिला लक्ष सेनापती॥१८९॥

### हेतु नसतां कार्याची उत्पत्ति मंदारमाला.

गाझी शिवाजी सजे ज्या दिनीं, त्या दिनीं होय कल्लोल दुष्टांतरीं॥
ऐके नगारा त्यजोनी अगारा पळे शत्रु दारा भयें बावरी ॥
बारासवें बाल-वेणी सुटे तों सुटे तींतुनी रत्न तेजोमणी ॥
उत्पात होती न कां वैरि-वृंदिं जणो वर्षते अग्नि कादंबिनी॥१९०॥

## आणखी विभावना

### लक्षण

जेथें कार्यावरून हेतु ( कारण ) प्रगट होतो तेथेंही ‘ विभावना ’ अलंकार ह्मणतात. १९१

### उदाहरण-आर्या

मालोजीच्या पौत्रा ! नवल सदा अंतरांत वाढतसे ॥
त्वत्कर-कृपाण-धूम्रें प्रताप-वन्हि प्रचंड विलसतसे ॥ १९२ ॥

### पुनः–कबित्त–मनहरण

साहि तनै सिव ! तेरो सुनत पुनीत नाम धाम धाम सबही को पातक कटत है।
तेरो जस काज आज सरजा निहारि कविमन भोज बिक्रम कथा ते उचटत है॥
भूषन भनत तेरो दान संकलप जल अचरज सकल मही मैं लपटत है।
और नदी नदन ते कोकनद होत तेरो कर कोकनद नदीनद प्रगटत है ॥१९३॥

## विशेषोक्ति.

### लक्षण–दोहा

जहँा हेतु समरथ भयहु प्रगट होत नहिँ काज।
तहँा बिसेसोकति कहत भूषन कबि सिरताज ॥ १९४ ॥

### उदाहरण–मालती सवैया.

दै दस पाँच रुपैयन को जग कोऊ नरेस उदार कहायो।
कोटिन दान सिवा सरजा के सिपाहिन साहिन को बिचलायो॥
भूषन कोऊ गरीबन सों भिरि भीमहुँ ते बलवंत गनायो।
दौलति इंद्र समान बढी पै खुमान के नेक गुमान न आयो॥ १९५ ॥

## असंभव

### लक्षण–दोहा.

अनहूवे की बात कछु प्रगट भई सी जानि।
तहाँ असंभव बरनिए सोई नाम बखानि ॥ १९६ ॥

### उदाहरण २ रें–मंदारमाला

नामें तुझ्या नष्ट होतात पापें शिवा! सर्वही धाम धामांतुनी ॥
त्वकीर्ति–कार्यें विलोकून होती कवीलोक भोजादि-वार्तेतुनी ॥
वाहे तुझें दान-संकल्प-वारी तयें व्यापिली दानवंता! क्षिती ॥
अन्या नदींमाजि होतात पद्में, तुझ्या हस्त-पद्मीं नद्या जन्मती
॥ १९३ ॥

## विशेषोक्ति

### लक्षण

जेथें हेतु ( कारण ) समर्थ असून कार्य प्रगट होत नाहीं तेथें 'विशेषोक्ति' अलंकार ह्मणतात. १९४

### उदाहरण–मंदारमाला

मुद्रा दहा पांच देऊन कोणीहि भूपाल हो! गाजवी दानता.
कोटिप्रदान–क्रिया या शहाजी–सुताची शहालागिं दे मूढता!
जिंकून दीनांस वा दुर्बलांना कुणी होय का थोर भीमांहुनी?
इंद्रापरी भव्य ऐश्वर्य वाढे अहंता शिवे ना शिवाच्या मनीं! ॥१९५॥

## असंभव

### लक्षण

न होणारी गोष्ट जेथें घडून आल्यासारखी वाटते तेथे 'असंभव' अलंकार ह्मणतात. १९६

### उदाहरण-दोहा

औरंग यों पछतात मैं करतो जतन अनेक ।
सिवा लेइगो दुरग सब को जानै निसि एक ॥ १९७ ॥

### अन्यच्च-कबित्त मनहरण

जसन के रोज यों जुलूस गहि बैठो जोब इंद्र आवै सोऊ लागै औरंग की परजा।
भूषन भनत तहाँ सिवाजी गाजी तिनको तुजुक देखि नेकहू नँ लरजा ॥
ठ्यानो न सलाम भान्यो साहि को इलाम धूम धाम कै न मान्यो रामसिंहहू को बरजा।
जासों बैर करि भूप बचै न दिगंत ताके दंत तोरि तखत तरे आयो सरजा॥१९८॥

## असंगति (प्रथम)

### लक्षण-दोहा.

हेतु अनत ही होय जहँ काज अनत ही होय ।
ताहि असंगति कहत हैं भूषन सुमति समोय ॥ १९९ ॥

### उदाहरण-कबित्त मनहरण.

महाराज सिवराज चढत तुरंग पर ग्रीवा जाति नैकरी गनीम अतिबल की ।
भूषन चलत सरजा की सैन भूमि पर छाती दरकति खरी अखिल खलन की ।
कियो दौरि घाव उमरावन अमीरन पै गई कटि नाक सिगरेई दिली-दलकी ।
सूरत जराई कियो दाहु पातसाहु उर स्याही जाय सब पातसाही मुख झलकी
॥ २०० ॥

## उदाहरण-आर्या

औरंगशहा पश्चात्ताप करी, " रक्षितों जया भारी-
ठावें कुणा न एका रात्रीं सरजा समस्त गड हारी " ॥ १९७ ॥

## उदाहरण २-रें मंदारमाला.

होई जयोत्साह दिल्लीमध्यें त्या दिनीं इंद्रही ये प्रजा तो बने !
राजा तिथें जाय सर्जा शिवाजी, बघे डौल, लाजे न तेजोगुणें !
केली जरी सूचना रामसिंहें, करी ना सलामी, धरी उग्रता !
यच्छत्रु वाचे न कोणी कुठें, तत्सभेंतून[1] दावून ये भव्यता ॥१९८॥

# असंगति (प्रथम)

## लक्षण

कारण निराळें व कार्य निराळें असा भाव जेथें वर्णिला असतो तेथें 'असंगति' अलंकार ह्मणतात. ॥ १९९ ॥

## उदाहरण-मंदारमाला

अश्वीं चढे भोसला मर्द जों, तों अरींची ढळे मान भीतीमुळें ॥
त्वेषें निघाली यदा दौड तेव्हां किती कांपली शत्रु-वक्षस्थळें ॥
केला अहा ! घाव दिल्ली-दलाची जाणो नाकची कापली संगरीं ॥
जाळून तो सूरतेला शहाच्या उरीं दाह लावी, प्रभेला हरी ॥२००॥

---

१ त्या औरंगजेबाच्या सभेंतून.

## असंगति ( द्वितीय )

### लक्षण-दोहा

आन ठौर करनीय सो करै औरही ठौर ।
ताहि असंगाति और कवि भूषन कहत सगौर ॥ २०१ ॥

### उदाहरण-मनहरण दंडक

भूपति सिवाजी तेरी धाक सों सिपाहिन के राजा पातसाहिन के मन ते अहं गली
भौसिला अभंग तु तौ जुरतो जहांई जंग तेरी एक फते होति मानो सदा संग ली॥
साहिके सपूत पुहुमीके पुरहूत कवि भूषन भनत तेरी खरगउ दंगळी ।
सत्रुन की सुकुमारी थहरानी सुंदरी औ सत्रु के अगारन मैं राखे जंतु जंगली
॥ २०२ ॥

## असंगति ( तृतिय )

### लक्षण-दोहा

करन लगै औरै कछू करै औरई काज ।
तहाँ असंगाति होति है कहि भूषन कविराज ॥ २०३ ॥

### उदाहरण-मालती सवैया

साहि तनै सरजा सिव के गुन नेकहु भाषि सक्यो न प्रवीनो ।
उद्यत होत कछू करि बे को करै कछु वीर महा रस भीनो ॥
ह्याँ ते गयो चकतै सुख देन को गोसलखाने गयो दुख दीनो ।
जाय दिली दरगाह सुसाह को भूषण बैरि बनाय ही लीनो ॥ २०४ ॥

# असंगति [ द्वितीय ]

## लक्षण

इतर स्थळीं करावयाची गोष्ट कर्त्यानें भलत्याच स्थळीं केली असें वर्णन असलें ह्मणजेही 'असंगति' अलंकार होतो. ॥ २०१ ॥

## उदाहरण—मंदारमाला.

राजे, शहा, पातशहा तयांची अहंता गळे त्वद्भयें दुर्गणी ॥
युद्ध—स्थळीं तूं अभंग प्रतापी जय-श्री जणो होय सांगातिनी ॥
क्षोणीश्वरेंद्रा! कुलश्रेष्ठ चंद्रा! तुझें खड्ग युद्धांत रंगे किती? ॥
म्लेंच्छांगना कांपती, तद्गृहांतीं वनाचे पशू राखिले त्वां अती २०२

# असंगति ( तृतीय )

## लक्षण

कांहीं एक गोष्ट करावयास लागला तों भलतीच गोष्ट केली. अशा वर्णनालाही 'असंगति' अलंकार ह्मणतात. २०३

## उदाहरण—मंदारमाला

हा भूप-कीं खाण नाना गुणांची-करूं ना शके तत्प्रशंसा कुणी ॥
कांहीं करूं जों सजे हा शिवाजी करी अन्य कांहींच शूराग्रणी ॥
येथून गेला शिवा सौख्य द्याया दिलें दुःख औरंगशाहा प्रती ॥
शांतावया जाय दर्गे—मशीदी परी वैर आला करोनी अती॥२०४॥

## विषम

### लक्षण-दोहा.

कहाँ बात यह कहँ वहै, यों जहँ करत बखान ।
तहाँ विषम भूषन कहत भूषन सुकबि सुजान ॥ २०५ ॥

### उदाहरण-मालती सवैया

जावलि बार सिंगारपुरी औ जवारि को राम के नैरि को गाजी ।
भूषन भौसिला भूपति ते सब दूरि किये करि कीरति ताजी ॥
बैर कियो सिवजी सों खवास खाँ डौंडियै सैन बिजैपुर बाजी ।
बापुरो एदिल साहि कहाँ कहाँ दिल्लीको दामनगीर सिवाजी ॥ २०६ ॥

लै परनालो सिवा सरज़ा करनाटक लौं सब देस बिँधूचे ।
बैरिन के भगे बालक बृंद कहै कबि-भूषन दूरि पहूँचे ॥
नाँघत नाँघत घोर घने बन हारि परे यों कटे मनो कूँचे ।
राजकुमार कहाँ सुकुमार कहाँ बिकरार पहार वे ऊँचे ? ॥ २०७ ॥

ग्रंथ संग्रहालय ठाणे

## विषम

लक्षण

कुठें ही गोष्ट व कुठें ती गोष्ट! अशा वर्णनाला [1] विषमालंकार ह्मणतात. २०५

### उदाहरण—मंदारमाला

शृंगापुरीं रामनेरीं जव्हारीं इथें गाजला शूर वीराग्रणी ॥
केलें दुरी लोकपालास, झाला यशोमंदिराच्या शिराचा मणी ॥
केली वृथा शत्रुता भोसल्याशीं पळाला, खवास्खां[1] विजापूरचा ॥
आदीलशाहा कुठें बापडा, हा विजेता कुठें हस्तिनापूरचा! २०६

### उदाहरण २ रें—मंदारमाला

वेई पन्हाळा धरोनी उमाळा नखें फाडिले देश कर्नाटकी ॥
सर्जा शिवाच्या भयें शत्रु—बालें पळालीं अशीं, ना सुचे वाट कीं ॥
तीं नांघुनी नांघुनी चालतातीं, पदीं कंटकें बोचतातीं परी ॥
हे पुत्र ऐश्वर्यशाली नृपांचे कुठें, भव्य विक्राळ ते हो गिरी २०७

---

१ बिजापूरचा मुख्य वजीर खानमहंमद याचा हा मुलगा होता. आदिलशाहा मृत्युशय्येवर असतां यानें त्याच्या एका अयोग्य पुत्रास गादीवर बसविलें (१६७२) छत्रपतीशीं याच्या पुष्कळ झटापटी झाल्या. याला १६७५ त बहलोलखानानें मारविलें.

## सम

### लक्षण-दोहा

जहाँ दुहूँ अनुरूप को करिये उचित बखान।
सम भूषन तासों कहत भूषन सकल सुजान ॥ २०८ ॥

### उदाहरण-मालती सवैया

पंच हजारिन बीच खडा किया मैं उसका कछु भेद न पाया।
भूषन यों कहि औरंगजेब उजीरन सों बेहिसाब रिसाया ॥
कम्मर की न कटारी दई इसलामने गोसलखान बचाया।
जोर सिवा करता अनरत्थ भली भई हत्थ हथ्यार न आया ॥ २०९ ॥

### पुन्हां-दोहा.

कछु न भयो केतो गयो, हार्‌यो सकल सिपाह।
भली करै सिवराज सों, औरंग करै सलाह ॥ २१० ॥

## विचित्र

### लक्षण-दोहा.

जहाँ करत हैं जतन फल, चित्त चाहि बिपरीत।
भूषन ताहि विचित्र कहि, बरनत सुकबि बिनीत ॥ २११ ॥

# सम

## लक्षण

जेथें दोन सम वस्तूंचें यथायोग्य वर्णन केलेलें असतें तेथें 'सम' अलंकार ह्मणतात. २०८

## उदाहरण—मंदारमाला

"केलें उभें पंचसेना[१]हजारीं अमीरांत, तेथेंच तो शोभला !"
औरंगशाहा वजीरास ऐसें वदोनी वृथा मत्सरें हांसला ॥
कोणी दिलें शस्त्र हातीं न त्याच्या, भला वांचलों मी, सभा वांचली
जातें जरी शस्त्र त्याच्या करीं, तो महाकाळ होता शिवाजी बली
॥ २०९ ॥

## उदाहरण २ रें—आर्या

किति[२] गेले, परि कांहीं झालें नच, सैन्य भार नासियला ॥
औरंग भला त्यानें शिवरायाशीं हळूच तह केला ॥ २१० ॥

# विचित्र

## लक्षण

जेथें प्रयत्न एक प्रकारचा व फळाची अपेक्षा निराळ्याच प्रकारची केली जाते अशा वर्णनाला 'विचित्र' अलंकार ह्मणतात २११

---

१ पांच हजार स्वारांची ज्यांना मनसब असते त्यांना 'पंचहजारी' ह्मणतात. २ कितीक अमीर उमराव.

### उदाहरण–दोहा

तैं जयसिंहहिँ गढ दिये सिव सरजा जस हेत ।
लीन्हें कैयो बरस मैं, बार न लागी देत ॥ २१२ ॥

### अन्यच्च–कवित्त मनहरण

बेदर कल्यान दै परेंड़ा आदि कोट साहि एदिल गँवाय है नवाय निज सीसको
भूषन भनत भागानगरी कुतुब साईं दै करि गँवायो रामगिरिसे गिरीसको ॥
भौंसिला भुवाल साहि तनै गढपाल दिन दोउ ना लगाए गढ लेत पँचतसि को।
सरजा सिवाजी जयसाह मिरजा को लीने सौ गुनी बडाई गढ दीन्हे हैं दिलीसको
॥ २१३ ॥

## प्रहर्षण

### लक्षण–दोहा.

जहँ मन वांछित अरथ ते प्रापति कछु अधिकाय ।
तहाँ प्रहरषन कहत हैं भूषन जे कविराय ॥ २१४ ॥

## उदाहरण-आर्या

जयसिंहाला दिधले शिवरायें गढ यशःप्रसारार्थ ।
जिंकाया किति वर्षे; अर्पाया पळ न लागला सत्य ॥ २१२ ॥

## उदाहरण २ रें-मंदारमाला

कल्याण देई, परेंडाहि देई विजापूरची मान खालीं लवे ॥
भागापुरी रामदुर्गापरी दे गिरी, मैत्रि यांची शिवाच्या सवें ॥
पंचोत्तरत्रिंशत श्रेष्ठ किल्ले हरायास ना लागले दो दिन ॥
जैसिंह सेनापतीला दिले ते, किती विस्तरीला यशाचा गुण ॥२१३॥

# प्रहर्षण

## लक्षण

जेथें मनोवांछितापेक्षां कांहीं अधिक प्राप्ति घडते तेथें 'प्रहर्षण' अलंकार म्हणतात. २१४

---

१ हा औरंगजेबाचा सहा हजारी मनसबदार होता व यास 'मिर्झा' ही पदवी होती. २ गोवळकोंड्याच्या महंमद कुतुबुल्कानें आपली प्रियपत्नि भागामती हिच्या नांवावर राजधानीपासून ४ मैलावर हें शहर वसविलें यालाच हैद्राबाद म्हणतात. ३ क्रियापद ४ पस्तीस ५ शिवाजीनें जयसिंहास किल्ले दिले ते भिऊन दिले नाहींत तर हिंदूंचा रक्तपात घडूं नये म्हणून दिले असें सांगून कवीनें मोठ्या खुबीनें विचित्र अलंकार साधला आहे.

### उदाहरण-मनहरण दंडक

साहि तनै सरजा की कीरति सों चारो ओर चाँदनी वितान छिति छोर छाइयतु है ।
भूषन भनत ऐसो भूप भौंसिला है जाको द्वार भिच्छुकन सों सदाई भाइयतु है ॥
लड़ादानि सिवाजी खुमान या जहान पर दान के प्रमान जाके यौं गनाइयतु है ।
रजत की हौस किए हेम पाइयतु जासों हयन की हौस किए हाथी पाइयतु है ॥
॥२१५॥

## विषादन

### लक्षण-दोहा

जहँ चित्त चाहे काज ते उपजत काज विरुद्ध ।
ताहि विषादन कहत हैं भूषन बुद्धि विसुद्ध ॥२१६॥

### उदाहरण-मालती सवैया.

दारहि दारि मुरादहि मारि कै संगर साह सुजै बिचलायो
कै कर मैं सब दिल्लि की दौलति और हु देस घने अपनायो ॥
बैर कियो सरजा सिव सों यह नौरंग के न भयो मन भायो ।
फौज पठाई हुती गढ लेन को गाँठिहुँ के गढ कोट गँवायो ॥ २१७ ॥

### अपरंच-दोहा

महाराज सिवराज तव, बैरि तजि रस रुद्र ।
बचिबे को सागर तरे, बूडे सोक समुद्र ॥ २१८ ॥

### उदाहरण-मंदारमाला

या भोसले भूपतीच्या यशानें मही शोभते, कौमुदीनें जशी ॥
याचें रुचे द्वार सद्भिक्षुकांना, सदा भूप गोब्राह्मणांना वशी ॥
दाता धरामंडलीं गाजतो हा, कळे दान तें या प्रमाणावरी ॥
इच्छी कुणी रौप्य, त्या हेम देई; शिवाजी ह्येच्छूस देई करी ॥२१५॥

## विषादन

### लक्षण

जेथें इच्छित कार्याच्या विरुद्ध कार्योत्पत्ति होते तेथें 'विषादन' अलंकार होतो। २१६

### उदाहरण-मंदारमाला

मारी मुरादास, दारास दारी[1], सुजाला पळायास लावी रणीं ॥
घेई करीं दिल्लिच्या दौलतीला विदेशास जिंकून होई धनी ॥
केलें परी वैर सर्जा शिवाशीं शहाच्या न झालें मनासारखें ॥
घ्यायास तद्दुर्ग धाडी चमूला, स्वतांच्याच दुर्गास शाहा मुके ॥
॥ २१७ ॥

### उदाहरण २ रें-आर्या.

शिवराज ! तुझे वैरी त्यजुनि रसातें महान रौद्रातें ॥
दुस्तर सागर तरले, शोक-समुद्रीं परी बुडाले ते ॥ २१८ ॥

---

१ विदारी किंवा फाडी ( ठार मारी )

## अधिक

### लक्षण-दोहा

जहाँ बडे आधार ते बरनत बढि आधेय ।
ताहि अधिक भूषन कहत जानि सुग्रंथ प्रमेय ॥ २१९ ॥

### उदाहरण-दोहा.

सिव सरजा ! तव हाथ को नहिँ बखान करि जात ।
जाको बासी सुजस सब त्रिभुवन मैं न समात ॥ २२० ॥

### पुनः-कबित्त-मनहरण

सहज सलील सील जलद्से नील डील पब्बय से पील देत नाहिँ अकुलात है ।
भूषन भनत महाराज सिवराज देत कंचन को ढेरु जो सुमेरु सो लखात है ॥
सरजा सवाई कासों करि कविताई तव हाथ की बढाई को बखान करि जात है ?
जाको जस टंक सातो दीप नव खंड महिमंडल की कहा ब्रहमंड ना समात है
॥ २२१ ॥

## अन्योन्य

### लक्षण-दोहा.

अन्योन्य उपकार जहँ यह बरनन ठहराय ।
ताहि अन्योन्या कहत है अलंकार कविराय ॥ २२२ ॥



**श्रीछत्रपतींचा दरबार व भूषण कवि.**

ब्रह्मांडही त्वद्यशाला पुरेना, कुठें पृथ्वि खंडद्रिपावेष्टिता ॥ पा. १०९

श्रीकृष्ण प्रि. प्रेस जळगांव.

# अधिक

## लक्षण

जेथें आधारापेक्षां आधेयाचें विशालत्व वर्णिलें असतें तेथें 'अधिक' अलंकार जाणावा २१९

## उदाहरण—आर्या

रायगडाच्या राया ! वर्णन करवे तुझ्याऽन हस्ताचें ।
तच्चलवासि यशातें स्थान पुरेना विशाल जगताचें ॥ २२० ॥

## उदाहरण २ रें—मंदारमाला

शैलापरी नील मेघापरी हा करी अर्पितां लोभ ठेवी दुरी ।
देई शिवाजी असा स्वर्ण—राशी जयाशी दिसे तुल्य मेरू गिरी ॥
काव्यें रचावीं तुझ्यावीण कोणावरी, भव्य गाव्या कुणाच्या कथा ? ।
ब्रह्मांडही त्वद्यशाला पुरे ना, कुठें पृथ्वि खंडद्विपावेष्टिता ॥
॥ २२१ ॥

# अन्योन्य

## लक्षण

दोन वस्तु परस्परास उपकारक होतात असें जेथें वर्णनानें सिद्ध केलेलें असतें तेथें ' अन्योन्य ' अलंकार होतो २२२

### उदाहरण-मालती सवैया

तो कर सों छिति छाजत दान है दान हू सों अति तो कर छाजै ।
तैंहि गुनी की बढाई सजै अरु तेरी बढाई गुनी सब साजै ॥
भूषन तोहि सों राज बिराजत राज सों तू शिवराज बिराजै ।
तों बल सों गढ कोट गजैं अरु तू गढ कोटन के बल गाजै ॥ २२३ ॥

## विशेष

### लक्षण-दोहा.

बरनत है आधेय को जहँ बिन ही आधार ।
ताहि बिसेष बखान हीं भूषन कवि सरदार ॥ २२४ ॥

### उदाहरण-दोहा

सिव सरजा सों जंग जुरि चंदावत रजवंत ।
राव अमर गो अमरपुर समर रही रज तंत ॥ २२५ ॥

### पुनः कबित्त मनहरण

सिवाजी खुमान सलहेरि में दिलीस दल कीन्हों कतलाम करवाल गहि कर में ।
सुभट सरोह चंदावत कछवाहे ढाहे मुगलौ पठान फरकत परे फर मै ॥
भूषन भनत भौसिलाके भट उदभट जीति घर आये धाक फैली घरघर में ।
मारु के करैया अरि अमर पुरै गे तऊ अजौं मारु मारु सोर होत है समर में
॥ २२६ ॥

## उदाहरण–मंदारमाला

भूपा ! तुझ्या शोभतें दान हस्तें, प्रदानें तुझा हस्त शोभे किती ?
शोभे गुणज्ञ–प्रशंसा तुलाची, प्रशंसा गुणज्ञास शोभे अती !
राजे तुझ्याचीमुळें राज्य, राज्यें शिवाजी महाराज तूं राजशी !
गाजे बलानें तुझ्या दुर्ग-माळा, तियेनें बली तूंहि वा गाजसी ॥२२३॥

# विशेष

## लक्षण

जेथें आधारावांचूनच आधेय वर्णिलें असतें तेथें ' विशेषालंकार ' ह्मणतात. २२४

## उदाहरण–आर्या

सरजासह लढण्याची चंदावर्त[1] राजपूत हाव धरी ॥
अमरावतीस गेला राव ' अमर[2] ' लक्ष्मि सोडुनी समरीं ॥२२५॥

## उदाहरण २ रें–मंदारमाला

साळेर–युद्धांत दिल्लीदलाची किती घोर केली तुवां[3] कत्तल ॥
चंदावती कच्छवाही पठाणी कबंधीं नटे भव्य युद्ध–स्थल ॥
जेते तुझे वीर आले गृहाला शिरे भीरुता शत्रु–गेहांतरीं ॥
मारावया ठाकले तेच मेले, घुमे 'मार ! मार !' ध्वनी संगरीं ॥२२६॥

---

१ अमरसिंह चंदावत २ राव अमरसिंह तर अमरावतीस ( स्वर्गनगरीस ) निघून गेला त्याची राज्यश्री मात्र धारांगणीं निराधार राहिली. ३ साळेरच्या युद्धांत शिवाजी महाराज स्वत: नव्हते. मोरोपंत पेशवे होते. शिपाई लढतात व जयापजय राजाच्या नांवावर उल्लेखिले जातात.

## व्याघात

### लक्षण-दोहा

और काज करता जहाँ करै औरई काज ।
ताहि कहत व्याघात है, भूषन कवि सिरताज ॥ २२७ ॥

### उदाहरण-मालती सवैया

ब्रह्म रचै पुरुषोत्तम पोसत, संकर सृष्टि संहारन हारे ।
तूं हरिको अवतार सिवा नृप काज सँवारे सबै हरि वारे ॥
भूषन यों अवनी यवनी कहैं "कोऊ कहै सरजासों हहारे ।
तूं सबको प्रतिपालनहार बिचारे भ्रतार न मारु हमारे ॥ २२८ ॥

### अन्यच्च-कबित्त मनहरण

कसत मैं वारबार वैसोई बुलंद होत वैसोई सरस रूप समर भरत है ।
भूषन भनत महाराज सिवराज मनि सघन सदाई जस फूलन धरत है ॥
बरछी कृपान गोली तीर केते मान, जोरावर गोला बान तिनहूको निदरत है ।
तेरो करवाल भयो जगतको ढाल अब सोई हाल म्लेच्छनके कालको करत है ॥
॥ २२९ ॥

## ( कारणमाला ) गुम्फ

### लक्षण-दोहा

पूरब पूरब हेतु कै उत्तर उत्तर हेतु ।
या विधि धारा बरनिए गुम्फ कहावत नेतु ॥ २३० ॥

# व्याघात

## लक्षण

एक कार्य करीत असतां दुसरेंच केलें जातें असें वर्णन असलें म्हणजे तेथें 'व्याघात' अलंकार जाणावा २२७

## उदाहरण-मंदारमाला.

ब्रह्मा रचीं, विष्णु पाळी, भवानी-पती संहरी सृष्टिलागीं पहा ॥
आहेस तूं विष्णुरूपी महींद्रा! प्रजेलागि संरक्षितोसी अहा! ॥
कोणी ह्मणे यावनी "जाउनी हो! कुणी दक्षिणेच्या नृपाला कथा ॥
माझ्या पतीला न मारी दयाळा! जगत्पालक स्वामि तूंच स्वतां ॥
॥ २२८ ॥

## उदाहरण २ रें-मंदारमाला

त्वत्खड्ग धारांगणीं वीरनाथा! वरी रक्तिमा बंधुकाच्यापरी ॥
जों जों उठें युद्धकल्लोल तों तों यशाचीं फुलें धारि देहावरी ॥
खांडे कट्यारी धनुर्बाण भाले, परी पावती ना तयाची सरी ॥
ढालेपरी खड्ग तूझें जगाला परी आज तुर्कांस काळापरी ॥ २२९ ॥

# कारणमाला [ गुम्फ ]

## लक्षण

"एकाद्या कारणापासून जेथें कार्य उत्पन्न होतें आणि तेंच कार्य दुसऱ्या कार्याचें कारण बनतें, अशा कार्यकारणांची परंपरा जेथें वर्णिलेली असते तेथें 'कारणमाला' किंवा गुम्फ अलंकार मानितात" ॥ २३० ॥

---

१ सेंदरीचें किंवा दुपारीचें झाड. याला बाराही महिने तांबडीं फुलें येतात.

## उदाहरण-मालती सवैया

शंकर की किरपा सरजा पर जोर बढी कवि भूषन गाई ।
ता किरपा सों सुबुद्धि बढी भुव भौसिला साहि तनै की सवाई ॥
राजसुबुद्धि सों दान बढ्यो अरु दान सों पुन्य समूह सदाई ।
पुन्य सों बाढ्यो सिवाजी खुमान खुमान सों बाढी जहान भलाई ॥२३१॥

## पुन्हां-दोहा.

सुजस दान अरु दान धन धन उपजै किरवान ।
सो जग मैं जाहिर करी सरजा सिवा खुमान ॥२३२॥

# एकावली

## लक्षण-दोहा.

प्रथम बरनि जहँ छोडिए जहाँ अरथ की पाँति
बरनत एकावलि अहै कवि भूषन यहि भाँति ॥२३३॥

## उदाहरण-हरिगीतिका छंद

तिहुँ भुवन मैं भूषन भनै नरलोक पुन्य सुसाज मैं ।
नरलोक मैं तीरथ लसैं, महि तीरथों कि समाज मैं ॥
महि मैं बडी महिमा भली महि मैं महाराज लाज मैं ।
रज लाज राजत आजु है महाराज श्रीसिवराज मैं ॥२३४॥

### उदाहरण—मंदारमाला

या छत्रधारी नृपाळावरी श्रीशिवाची कृपा नित्य वृद्धिंगता ॥
वाढे कृपेनें सुबुद्धि, सुबुद्धीमुळें वाढली भोसले—दानता ॥
दानामुळें प्रत्यहीं पुण्य वाढे, न वाढे तसें जें तपाच्या बळें ॥
पुण्यामुळें आयु वाढे शिवाचें जगत्कीर्ति वाढेहि आयूमुळें ॥२३१॥

### उदाहरण २ रें—आर्या

यश लाभे दानानें, दान धनानें, धन स्व—खजानें ॥
विख्यात हें जगाला केलें सह्याद्रि दुर्ग—नाथानें ॥२३२॥

## एकावली*

### लक्षण

प्रथम वर्णन करून तें सोडणें व पुढील वर्णनांत त्याचा अर्थ—संबंध मात्र ठेवणें या वर्णनपद्धतीला 'एकावली' ह्मणतात. २३३
( पहिल्या वस्तूशीं दुसरीचा विशेषणरूप संबंध तसाच दुसरीशीं तिसरीचा अशीही साखळी असते. )

### उदाहरण—मंदारमाला

पुण्योपयोगी असे हा नृलोक त्रिलोकांत, शास्त्रावली बोलते ॥
शोभे नृलोकांत तीर्थ—प्रसिद्धी, मही तीर्थ—वृंदामुळें राजते ॥
राजे महिम्ना महीमंडलीं, त्या महिम्नांत लज्जा रजाची खरी ॥
लज्जा रजाची विराजे अजी श्रीशिवाजी—भवानी कृपाणावरी॥२३४॥

---

* कारणमाले (गुम्फ) मध्यें कार्यकारण संबंध असतो परंतु तो एका—वलींत नसतो त्याचप्रमाणें मालादीपकांत पदावृत्ति दीपकाचा संबंध असतो तोही एकावलींत नसतो

## मालादीपक एवंसार

### लक्षण-दोहा

दीपक एकावलि मिले मालादीपक होय।
उत्तर उत्तर उतकरष सार कहत हैं सोय ॥ २३५ ॥

## उदाहरण

### मालादीपक-कवित्त मनहरण

मन कवि भूषनको सिवकी भगति जीत्यो, सिवकी भगति जीत्यो साधुजन सेवाने
साधुजन जीते या कठिन कलिकाल कलिकाल महावीर महाराज महिमेवाने ॥
जगतमे जीते महावीर महाराजन ते, महाराज बावन हू पातसाह लेवाने
पातसाह बावनौ दिलीके पातसाह, दिलीपति पातसाहै जीत्यो हिंदुपति सेवाने॥२३६॥

### सार यथा-मालती सवैया

आदि बडी रचना है विरंचिकि, जामैं रह्यौ रचि जीव जडो है ।
ता रचना महँ जीव बडो आति, काहे ते ता उर ज्ञान गडो है ॥
जीवन मैं नर लोग बडे, कवि भूषन भाषत पैज अडो है ।
है नर लोग मैं राज बडो, सब राजनमें सिवराज बडो है ॥ २३७ ॥

## यथासांख्य

### लक्षण दोहा

क्रमसों कहि तिनके अरथ क्रमसों बहुरि मिलाय ।
यथासांख्य ताको कहैं भूषन जे कविराय ॥ २३८ ॥

# मालादीपक व सार

## लक्षण

दीपक आणि एकावली मिळून 'मालादीपक' अलंकार होतो आणि उत्तरोत्तर उत्कर्षात्मक वर्णनाला 'सार' अलंकार ह्मणतात. २३५

## मालादीपक उदाहरण-मंदारमाला

जिंकी शिवाची सुभक्ती कवीला, सुभक्तीस जिंकी जगीं साधुता ॥
हा साधुलोकांस जिंकी कळी, या कळीला महावीर-कीर्ती तथा ॥
वीरांस हो ! जिंकिलें राज-भाग्यें शहांनीं महाराजही जिंकिले ॥
शाहांस दिल्ली-शहा जिंकि जो, तो अहा जिंकिला हिंद-भूपें बळें ॥
॥ २३६ ॥

## सार-उदाहरण मंदारमाला

सृष्टी विरंची-कृती श्रेष्ठ भारी, जिथें निर्मिले जीव तैसे जड ॥
श्रेष्ठत्व सृष्टींत जीवास येई, जया जीवनीं ज्ञान ही सांगड ॥
जीवांमधें मानुषी श्रेष्ठ जीव, प्रतिज्ञा-बळें साध्य त्या सर्वही ॥
सर्वां मनुष्यीं असे श्रेष्ठ राजा, शिवाजी असे श्रेष्ठ, राजांतही ॥
॥ २३७ ॥

# यथासांख्य

## लक्षण

अनेक गोष्टी क्रमशः जुळवून त्यांचा अनेक गोष्टींशीं क्रमशः अर्थसंबंध दाखविणें याला 'यथासांख्य' अलंकार ह्मणतात. २३८

### उदाहरण-कबित्त मनहरण

जेई चहौ तेई गहौ सरजा सिवाजी देस संके दल दुवन के जे वै बडे उरके ।
भूषन भनत भौंसिला सों अब सनमुख कोऊ ना लरैया है धरैया धीर धुरके ॥
अफजलखान रुसामै जमान फतेखान खूटे कूटे लूटे ए उजीर विजैपुरके ।
अमर सुजान मोहकम इकलास खान खाँडे छाँडे डाँडे उमराय दिलीसुरके ॥
॥ २३९ ॥

## पर्याय

### लक्षण-दोहा.

एक अनेकन में रहै एकहि में कि अनेक ।
ताहि कहत परयाय है भूषन सुकवि विवेक ॥ २४० ॥

### उदाहरण-दोहा

जीति रही अवरंग मैं सबै छत्रपति छाँडि ।
तजि ताहू कौ अब रही सिव सरजा कर माँडि ॥ २४१ ॥

### पुनः-कबित्त मनहरण

कोट गढ दै कै माल मुलुक मैं बीजापुरी गोलकुंडा वारो पीछे ही को सरकतु है ।
भूषन भनत भौंसिला भुवाल भुजबल रेवा ही के पार अवरंग हरकतु है ॥
पेसकसैं भेजत इरान फिरगान पति उनहूँ के उर याकी धाक धरकतु है ।
साहि तनै सिवाजी खुमान या जहान पर कौन पातसाह के न हिये खरकतु है
॥ २४२ ॥

### उदाहरण-मंदारमाला

जेथें मनें घेतली धाव तेथें उफाळून हा जाय हो केसरी ॥
कोणी पुढें यावयाला शकेना लढाऊ हियेबाज युद्धांतरीं ॥
मागेंच अफजूल, रुस्तूम[1] योद्धे विजापूरचे छेदिले हारिले ॥
इक्लासखानास मोहोकमाला[2] दिला धाक दिल्लीकडे लाविले ॥२३९॥

## पर्याय

### लक्षण

एकांत अनेक किंवा अनेकांत एक वास्तव्य करीत आहे अशा वर्णनाला ' पर्याय ' अलंकार म्हणतात. २४०

### उदाहरण-आर्या

नवरंगीं[3] रंगे ही छत्रपतींना त्यजून जय-लक्ष्मी ॥
आतां सोडुनि त्याला वसे शिवाजी-प्रतापकर-शर्मीं ॥ २४१ ॥

### उदाहरण २ रें-मंदारमाला

किल्ले तशी खंडणी देति, जाती विजापूर-कोंडापती[4] मागुती ॥
औरंग रेवा-तटापार राही, तया भोसले-भूप भीती अती ॥
हृत्कंप ज्यांचा न राहे, इराणी फिरंगी[5] बहु प्रेषिती वस्तुही ॥
या दक्षिणेंद्र-प्रतापें न कांपे असा कोण भूपाल आहे मही ॥२४२॥

---

१ रुस्तुम जमान. २ हा अमरसिंह चंदावताचा मुलगा, साल्हेरच्या युद्धांत मराठ्यांनीं याला कैद केलें. याचा बाप मात्र मारला गेला. मोहकमासिंगाला सोडून दिल्यावर तो व एकलासखान जीव घेऊन दिल्लीकडे पळाले. ३ नौरंग-औरंगजेब. ४ गोवळकोंड्याचा शहा ५ सन १६६२ च्या प्रारंभापासून पोर्तुगीज लोक छत्रपतीकडे वार्षिक खंडणी पाठवीत होते. कारण याच वर्षी महाराजांच्या हातून ९००० फिरंगी फौज कापली गेली.

## उदाहरण

अगरे के धूप धूम उठत जहाँई तहाँ उठत बगूरे अब अतिही अमाप हैं ।
जहाँई कलावँत अलापैं मधुर स्वर तहाँई भूत प्रेत अब करत विलाप है ॥
भूषन सिवाजी सरजाके बैर बैरिन के डेरन मैं परे मनो काहू के सराप हैं ।
बाजत हे जिन महलन में मृदंग तहाँ गाजत मतंग सिंह बाघ दीह दाप है ॥ २४३ ॥

# परिवृत्ति

### लक्षण-दोहा

एक बातको दै जहाँ आन बातको लेत ।
ताहि कहत परिवृत्ति हैं भूषन सुकवि सचेत ॥ २४४ ॥

### उदाहरण-कवित्त मनहरण

दच्छिन धरन धीर धरन खुमान, गढ लेत गढ धरन सों धरम दुवारु दै ।
साहि नर नाहको सपूत महा बाहु लेत मुलुक महान छीनि साहिन को मारु दै ॥
संगर मैं सरजा सिवाजी अरि सैननको सारु हरि लेत हिंदुवान सिर सारु दै ।
भूषन भुसिल जय जस को पहारु लेत हरजु को हारु हरगन को अहारु है॥२४५॥

# परिसंख्या

### लक्षण-दोहा.

अनत बरजि कछु वस्तु जहँ बरनत एकहि ठौर ।
तेहि परिसंख्या कहत हैं भूषन कवि दिलदौर ॥ २४६ ॥

### उदाहरण ३ रें– मंदारमाला.

धूपावलीचा उठे गंध जेथें, रजांचा तिथें लोट आतां उठे !
आलापितीं गानवेत्ते अहाहा ! तिथें भूतयोनी विलापें रटे !
वैरीजनें वैर केलें शिवाशीं जणों शाप तन्मंदिरीं भोंवले;
जेथें मृदंग–ध्वनी रम्य झाले तिथें सिंह शार्दूल गर्जिन्नले ! ॥२४३॥

# परिवृत्ति

### लक्षण

एक वस्तु देऊन ( मोबदल्यांत ) अन्य वस्तु घेणें अशा वर्णनाला ‘ परिवृत्ति ’ अलंकार ह्मणतात. २४४

### उदाहरण–मंदारमाला

दुर्गाधिपापासुनी दुर्ग घे हा, तया धर्मशालांतरीं धाडुनी ॥
प्रांतावरी प्रांत घेऊन देई बलें युद्ध–शिक्षा शहांलागुनी ॥
सर्वस्व घेई ह्मणोनी रिपूंचें रणीं हिंदुस्थानास ऐश्वर्य दे ॥
घेई यशाचा गिरी शंभुकंठीं शिरोहार, आहार दूतांस दे ॥२४५॥

# परिसंख्या

### लक्षण

अनत व वर्ज्य अशा कांहीं वस्तु अथवा गुणधर्म यांचा इतरत्र अभाव दाखवून जेव्हां त्यांचें एकाच ठायीं वर्णन केलें जातें तेव्हां परिसंख्या अलंकार होतो. २४६

---

१ सन १६४७ मध्यें शिवाजीमहाराजांनीं तिघा भावांतील भांडण मिटवून पुरंदर किल्ला घेतला. त्यांस अनुलक्षून हें कविवचन आहे.

### उदाहरण–मनहरण दंडक

अति मतवारे जहाँ दुरदै निहारियत तुरगन ही में चंचलाई परकीति है ।
भूषन भनत जहाँ पर लगै बानन मैं कोक पच्छिनहि माँहि बिछुरन हिति है ॥
गुनि गन चोर जहाँ एक चित्त ही के, लोक बंधैं जहाँ एक सरजा की गुन-प्रीति है॥
कंप कदली मैं बारि बुंद बदली मैं सिवराज अदली के राज मैं यों राजनीति है ॥
॥ २४७ ॥

## विकल्प

### लक्षण–दोहा

कै वह कै यह कीजिए जहँ कहनावति होय ।
ताहि विकल्प बखानहीं भूषन कवि सब कोय ॥ २४८ ॥

### उदाहरण–मालती सवैया

मोरँग जाहु कि जाहु कुमाऊँ सिरीनगरै कि कबित्त बनाए ।
बाँधव जाहु कि जाहु अमेरि कि जोधपुरै कि चितौरहि धाए ॥
जाहु कुतुब्ब कि एदिल पै कि दिलीस हु पै किन जाहु बोलाए ।
भूषन गाय फिरौ महि मैं बनि है चित चाह सिवाहि रिझाए ॥ २४९ ॥

### पुन्हां–मालती सवैया

देसन देसन नारि नरेसन भूषन यों सिख देहिँ दयासों ।
मंगन व्है करि दंत गहो तिन, कंत तुम्हैं हैं अनंत महा सों ॥
कोट गहौ कि गहौ बन ओट कि फौजकी जोट सजौ प्रभुता सों ।
और करौ किन कोटिक राह सलाह बिना बचिहौ न सिवा सों ॥२५०॥

### उदाहरण—मंदमाराला.

चांचल्य अश्वांतरीं मात्र भासे, मदोन्मत्त मातंगची हो ! जिथें !
बाणासची लागती पक्ष जेथें, तसे कोक[1]-पक्ष्यांत विक्षेप ते !
ज्ञानी गुणी चोर हे मात्र जेथें शिवाच्या गुणीं पावले बद्धता !
मेघांत धारांबु, रंभेंत[2] कंप प्रभूच्या[3] स्वराज्यांत ही न्यायता ! ॥ २४७ ॥

# विकल्प

### लक्षण.

हें करावें की तें करावें असें वर्णन जेथें करण्यांत येतें तेथें—'विकल्प' अलंकार होतो. २४८

### उदाहरण+—मंदारमाला

जाऊं कुमाऊंत, मोरंग[4] देशीं, रचूं काव्य कीं जाउनी काश्मिरीं ?
अंबेर[5]—रीवा प्रदेशास जाउं, रचूं काव्य कीं जोधपूरांतरीं ?
दिल्लीकडे आदिलाच्या पुढें कीं वळूं गोळकोंड्याकडे आग्रहें ?
पृथ्वीवरी गात हिंडेन कीर्ती शिवाची, मला तो रिझावूं सहे !॥२४९॥

### उदाहरण २ रें—मंदारमाला

राजस्त्रिया देशदेशीं पतीला बहु प्रार्थिती रूपभाग्योत्तमा ॥
दांतीं तृणाला धरोनी शिवाची करा प्रार्थना, आण आहे तुह्मां ॥
दुर्गीं चढा, आत्मगेहीं दडा की लढाया दलाची करा योजना ॥
कोटी उपायास योजा तरीहो शिवाशीं तहावीण वांचाल ना ॥२५०॥

---

१ चक्रवाक २ कदलींत ३ शिवाजीच्या ४ कुचबिहारच्या पश्चिमेस हें राज्य होतें. ५ जयपूर.

+ हीं दोन्ही उदाहरणें अशुद्ध आहेत कारण विकल्पांत शेवटपर्यंत संदेह राहिला पाहिजे परंतु या दोन्ही उदाहरणांच्या शेवटीं संदेह नाहींसा करून अंतीं निश्चय व्यक्त झाला आहे. कदाचित् शिवछत्रपतींच्या पूर्ण प्रशंसेकरितांही कवीनें हा दोष स्वीकृत केला असेल.

## समाधि

### लक्षण-दोहा

और हेतु मिलि कै जहाँ होत सुगम अति काज ।
ताहि समाधि बखानहीं भूषन जे कबिराय ॥ २५१ ॥

### उदाहरण-मालती सवैया

बैर कियो सिव चाहतहो तब लौं अरि बाह्यो कटार कठैठो ।
योहीं मलिच्छहि छाँडै नहीं सरजा मन तापर रोसमै पैठो ॥
भूषन क्यों अफजल्ल बचै अठपाउके सिंहको पाँव उमैठो ।
बिछूके घाय धुक्योई धरक्क ह्वै तौ लगि धाय धराधर बैठो ॥ २५२ ॥

## समुच्चय

### लक्षण-दोहा

एक बारही जहँ भयो बहु काजन को धंध ।
ताहि समुच्चय कहत हैं भूषन जे प्रतिबंध ॥ २५३ ॥

### उदाहरण-मालती सवैया

माँगि पठायो सिवा कछु देस वजीर अजानन बोल गहे ना ।
दौरि लियो सरजा परनालो यों भूषन जो दिन दोन लगेना ॥
धाक सों खाक बिजैपुर भो मुख आय गो खान खवास के फेना ।
भै भरकी करकी धरकी दरकी दिल एदिल साहिं कि सेना ॥ २५४ ॥

# समाधि

## लक्षण

आरंभिलेलें कार्य इतर कांहीं कारणामुळें सुगम झालें असें वर्णन असलें ह्मणजे 'समाधि' अलंकार जाणावा. २५१

### उदाहरण-मंदारमाला

लेखी न ह्या शत्रु ज्याला शिवाजी कट्यारी सवें तोंवरी तो सजो ॥
ऐसा न कोणी जिवानें सुटे कीं प्रकोपास याच्या असे पात्र जो ॥
अफजुल्लखां मूर्ख कैसा जगावा मृगेंद्रास या क्रोधवोनी, कथा ? ॥
जों घाबरा होय घावामुळें तों धराधीश त्याला करी पालथा ॥२५२॥

# समुच्चय

## लक्षण

एकाच काळीं अनेक कार्यांची उत्पत्ती, अशा वर्णनाला 'समुच्चय' अलंकार ह्मणतात. २५३

### उदाहरण-मंदारमाला

सर्जा वजीरास भू-भाग मागे, अजाणून 'नाहीं' ह्मणे मंद-धी ॥
घाली पन्हाळ्यावरी झेप तो, दो दिनाचाहि लागे न कालावधी ॥
आलें खवास्खां-मुखीं फेन, धाकें विजापूरचें खाक झालें मुख ॥
भीतीमुळें धाकली कांपकी त्या स्थलीं एदिली फौज निर्नायक ॥२५४

## द्वितीय समुच्चय

### लक्षण-दोहा

वस्तु अनेकन को जहाँ बरनत एकहि ठौर ।
दुतिय समुच्चय ताहि को कहि भूषन कबिमौर ॥ २५५ ॥

### उदाहरण-मालती सवैया.

सुंदरता गुरुता प्रभुता भनि भूषन होत है आदर जामैं ॥
सज्जनता औ दयालुता दीनता कोमलता झलकै परजा मैं ॥
दान कृपान हु को करिबो करिबो अभै दीनन को बर जामैं ॥
साहन सों रन टेक बिबेक इते गुन एक सिवा सरजा मैं ॥ २५६ ॥

## प्रत्यनीक

### लक्षण-दोहा

जहँ जोरावर सत्रु के पच्छी पै करजोर ।
प्रत्यनीक तासों कहैं भूषन बुद्धि अमोर ॥ २५७ ॥

### उदाहरण-अलसा सवैया[1]

लाज धरौ सिवजू सों लरौ सब सैयद सेख पठान पठाय कै ॥
भूषन ह्यां गढ कोटन हारे उहाँ तुम क्यों मठ तोरे रिसाय कै ? ॥
हिंदुन के पति सों न बिसात सतावत हिंदु गरीबन पाय कै ॥
लीजै कलंक न दिल्लि के बालम आलम आलमगीर कहाय कै ॥ २५८ ॥

1 या छंदांत सात भगण व शेवटीं एक रगण असतो.

# द्वितीय समुच्चय

## लक्षण

अनेक वस्तूंचें एकाच ठायीं वर्णन केलेलें असलें म्हणजे त्यालाही 'समुच्चय' अलंकार म्हणतात. २५५

## उदाहरण–मंदारमाला

सौंदर्य, गांभीर्य, ऐश्वर्य यांचा समाहार त्याच्या शरीरामधें !
सूज्ञत्व, लीनत्व, आतिथ्य यांचा समाहार त्याच्या प्रजेच्या मधें !
दान, क्षमा, दीन–रक्षादिकांचा समाहार चित्तीं तयाच्या वसे !
शूरांसवें शूरतादी गुणांचा निधी एक राजा शिवाजी असे ! ॥२५६॥

# प्रत्यनीक

## लक्षण

शत्रु प्रबल असल्यामुळें प्रत्यक्ष त्यास त्रास न देतां त्याच्या पक्षाला त्रास देणें अशा वर्णनास 'प्रत्यनीक' अलंकार म्हणतात २५७

## उदाहरण–मंदारमाला

लज्जा जरा थोरवीची धरी तूं, चमू पाठवी युद्ध याशीं करी ॥
येथें तुझे हारिले कोट किल्ले, तिथें भंगशी मंदिरें[१] कां तरी ? ॥
या हिंदवी–भूपसंगें लढाया न येशी, वृथा हिंदु संत्राससी ॥
जें नांव 'आलम्गिर' श्रेष्ठ घेशी, शहा ! डाग तूं कां तया लाविशी ?
॥ २५८ ॥

---

१ औरंगजेबानें हिंदूंस त्रास देतांना त्यांचीं अनेक देवमंदिरें खणून काढिलीं बनारसमध्यें काशीविश्वनाथाचें मंदिर तुडवून त्यानें त्याच्या एका बाजूला मशीद उभी केली, जी अजून तेथें आहे !

### पुनः-कवित्त-मनहरण

गौर गरवीले अरबीले राठवर गह्यो लोहगढ सिंहगढ हिम्मति हरष ते ।
कोटके कंगूरन मै गोलंदाज तीरंदाज राखे हैं लगाय, गोली तीरन बरष ते ॥
कै कै सावधान किरवान कसि कम्मरन सुभट अमान चहूँ ओरन करष ते ।
भूषन भनत तहाँ सरजा सिवा तै चढो रातिके सहारे ते अराति अमरष ते ॥
॥ २५९ ॥

## अर्थापत्ति ( काव्यार्थापत्ति )

### लक्षण--दोहा

" वह कीन्हो तौ यह कहा " यों कहनावति होय ।
अर्थापत्ति बखानहीं तहाँ सयाने लोय ॥ २६० ॥

### उदाहरण-कवित्त मनहरण

सयन मैं साहनको सुंदरी सिखावैं ऐसे सरजा सों बैर जनि करौ महाबली है ।
पेसकसैं भेजत विलायति पुरुतगाल सुनिकै सहमि जात करनाट थली है ॥
भूषन भनत गढ गोट माल मुलुक दै सिवा सों सलाह राखिए तौ बात भली है ।
जाहि देत दंड सब डरि कै अखंड सोई दिली दलमली तौ तिहारी कहाँ चली है ? "
॥ २६१ ॥

## काव्यलिंग

### लक्षण-दोहा.

है दिढाइबे जोग जो ताको करत दिढाव ।
काव्यलिंग तासों कहैं भूषन जे कबिराव ॥ २६२ ॥

### उदाहरण २ रें—मंदारमाला

राठोड—योद्धा सजे सैन्य—शस्त्रें उदेभान तो सिंहदुर्गावरी ॥
ठेवी तिरंदाज बंदूकवाले गडाच्या कपारींत कोनांतरीं ॥
कोटावरी बांधुनीया कटी त्या निशीं पोंचले खड्ग—धारी किती ॥
काळ्या निशेच्या पहाऱ्यांत गाजी चढे भोसला धन्य त्याची धृती ॥
॥ २५९ ॥

## अर्थापत्ति ( काव्यार्थापत्ति )

### लक्षण

ती गोष्ट केली मग हिची काय कथा आहे ? " अशा लोकोक्तिमय वर्णनाला ' अर्थापत्ति ' ह्मणतात. २६०

### उदाहरण—मंदारमाला

शाहास एकांति कांता वदे कीं, जपोनी करा वैर याशीं बरें !
धाडी फिरंगी किती वस्तु याला, पहा भूप कर्नाटकी घाबरे !
सम्राट दिल्लीश त्यातेंहि जिंकी, कथा काय त्याच्यापुढें आपुली!
द्या कोट, किल्ले; प्रदेशासही द्या परी मैत्रि जोडा शिवाशीं भली ॥
॥ २६१ ॥

## काव्यलिंग

### लक्षण

दृढ करण्यायोग्य वस्तूचें समर्थन ज्या वर्णनानें होतें त्यास काव्यलिंग अलंकार ह्मणतात. २६२
( अमुक गोष्ट असल्यामुळें घडली किंवा घडेल अशा वर्णनालाही काव्यलिंग अलंकार ह्मणतात. )

### उदाहरण-मनहरण दंडक

साइति लै लीजिए बिलाइतिको सर कीजै बलख बिलायतिको बंदि अरि डावरे ।
भूषन भनत कीजै उत्तरी भुवाल बस पूरब के लीजिए रसाल गज छावरे ॥
दच्छिन के नाथ से सिपाहिन सों बैर करि अवरंग साहिजू कहाइये न बावरे ।
कैसे सिवराज मानु देत अवरंगै गढ गाढे गढपति गढ लीन्हे और रावरे ॥
॥ २६३ ॥

## अर्थांतरन्यास

### लक्षण-दोहा.

कह्यो अरथ जहँही लिये और अरथ उल्लेख ।
सो अर्थांतरन्यास है कहि सामान्य बिसेख ॥ २६४ ॥

### उदाहरण । सामान्य भेद । कवित्त मनहरण

बिना चतुरंग संग बानरन लै कै बाँधि बारिध को लंक रघुनंदन जराई है ।
पारथ अकेले द्रोन भीषम से लाख भट जीति लीन्ही नगरी बिराट मे वडाई है ।
भूषन भनत व्है गुसुल खाने मैं खुमान अवरंग साहिबी हथ्याय हरि लाई है ।
तौं कहा अचंभो महाराज सिवराज सदा बीरन के हिम्मतै हथ्यार होति आई है ।
॥ २६५ ॥

### विशेषभेद । मालती सवैया

साहि तनै सरजा समरत्थ करी करनी धरनी पर नीकी ।
भूलिगो भोज से बिक्रम से औ भई बलि बेनु कि कीरति फीकी ॥
भूषन भिच्छुक भूप भए भलि भीख लै केवल भौंसिला ही की ।
नैसुक रीझि धनेस करै, लखि ऐसियै रीति सदा सिवजी की ॥ २६६ ॥

### उदाहरण–मंदारमाला

शाहीपदा मेळवीं, बलिख बंदी करीं, पोर्तुगीजांस जिंकीं शहा !
शासी उदीचीन निःशक्त राजे, हरी पूर्व भूप–द्विपालागिं हा ॥
या दक्षिणेंद्रावरी पाठवोनी अमीरास, व्हावें न त्वां बावरें ॥
देई तुला कोठले दुर्ग ? घेई तुझे एक एकाहुनी हाच रे[1] ॥२६३॥

## अर्थांतरन्यास

### लक्षण

जेथें सांगितलेल्या अर्थाला धरून आणखी अर्थोल्लेख केलेला असतो तेथें ‘ अर्थांतरन्यास ’ अलंकार ह्मणतात. २६४

### उदाहरण । सामान्यभेद । मंदारमाला

श्रीराम सैन्याविना वारिधीला करी बद्ध, लंकापुरी दाहवी ॥
एकाकि गांडीव–धन्वा विराट–प्रदेशीं हरी द्रोण भीष्मासही ॥
दिल्लीपतीची जणो बादशाही सभेंतून आणी हिरावून हा ॥
“ आश्चर्य तें काय ? शूराग्रणींचें सदा धैर्यची शस्त्र होतें पहा ? ”
॥ २६५ ॥

### विशेषभेद । मंदारमाला

सामर्थ्यवंता ! शहाजी सुता ! त्वां अशी सत्कृती आचरीली महीं ॥
भोजादिकांची स्मृती ना घडे, ती फिको जाहली बा ! बली-कीर्तिही ॥
भिक्षेमुळें भूप झाले अहाहा ! तुझ्या गेहिं येवोनिया भिक्षुक ॥
रंकाप्रती राव लोकीं करावें, शिवप्रीति सर्वांस ही ठाउक ॥२६६॥

---

१ ही औरंगजेबाप्रत उक्ति आहे.

### उदाहरण–मनहरण दंडक

साइति लै लीजिए बिलाइतिको सर कीजै बलख बिलायतिको बंदि अरि डावरे ।
भूषन भनत कीजै उत्तरी भुवाल बस पूरब के लीजिए रसाल गज छावरे ॥
दच्छिन के नाथ से सिपाहिन सों बैर करि अवरंग साहिजू कहाइये न बावरे ।
कैसे सिवराज मानु देत अवरंगै गढ गाढे गढपति गढ लीन्हे और रावरे ॥
॥ २६३ ॥

## अर्थांतरन्यास

### लक्षण–दोहा.

कह्यो अरथ जहँही लिये और अरथ उल्लेख ।
सो अर्थांतरन्यास है कहि सामान्य बिसेख ॥ २६४ ॥

### उदाहरण । सामान्य भेद । कबित्त मनहरण

बिना चतुरंग संग वानरन लै कै बाँधि बारिध को लंक रघुनंदन जराई है ।
पारथ अकेले द्रोन भीषम से लाख भट जीति लीन्ही नगरी बिराट मे बडाई है ॥
भूषन भनत है गुसुल खाने मैं खुमान अवरंग साहिबी हथ्याय हरि लाई है ।
तौं कहा अचंभो महाराज सिवराज सदा बीरन के हिम्मतै हथ्यार होति आई है ॥
॥ २६५ ॥

### विशेषभेद । मालती सवैया

साहि तनै सरजा समरत्थ करी करनी धरनी पर नीकी ।
भूलिगो भोज से बिक्रम से औ भई बलि बेनु कि कीरति फीकी ॥
भूषन भिच्छुक भूप भए भलि भीख लै केवल भौंसिला ही की ।
नैसुक रीझि धनेस करै, लखि ऐसियै रीति सदा सिवजी की ॥ २६६ ॥

### उदाहरण—मंदारमाला

शाहीपदा मेळवीं, बल्लिख बंदी करीं, पोर्तुगीजांस जिंकीं शहा !
शासी उदीचीन निःशक्त राजे, हरी पूर्व भूप—द्विपालागिं हा ॥
या दक्षिणेंद्रावरी पाठवोनी अमीरास, व्हावें न त्वां बावरें ॥
देई तुला कोठले दुर्ग ? घेई तुझे एक एकाहुनी हाच रे[1] ॥२६३॥

## अर्थांतरन्यास

### लक्षण

जेथें सांगितलेल्या अर्थाला धरून आणखी अर्थोल्लेख केलेला असतो तेथें 'अर्थांतरन्यास' अलंकार ह्मणतात. २६४

### उदाहरण । सामान्यभेद । मंदारमाला

श्रीराम सैन्याविना वारिधीला करी बद्ध, लंकापुरी दाहवी ॥
एकाकि गांडीव—धन्वा विराट—प्रदेशीं हरी द्रोण भीष्मासही ॥
दिल्लीपतीची जणो बादशाही सभेंतून आणी हिरावून हा ॥
"आश्चर्य तें काय ? शूराग्रणींचें सदा धैर्यची शस्त्र होतें पहा ?"
॥ २६५ ॥

### विशेषभेद । मंदारमाला

सामर्थ्यवंता ! शहाजी सुता ! त्वां अशी सत्कृती आचरीली महीं ।'
भोजादिकांची स्मृती ना घडे, ती फिकी जाहली वा ! बली-कीर्तिही ।'
भिक्षेमुळें भूप झाले अहाहा ! तुझ्या गेहिं येवोनिया भिक्षुक ॥
रंकाप्रती राव लोकीं करावें, शिवप्रीति सर्वांस ही ठाउक ॥२६६॥

---

1 ही औरंगजेबाप्रत उक्ति आहे.

## प्रौढोक्ति

### लक्षण-दोहा

जहँ उतकरष अहेत को वरनत है करि हेत ।
प्रौढोकति तासों कहत भूषन कवि बिरदेत ॥ २६७ ॥

### उदाहरण-कबित्त मनहरण

मानसर बासी हंस बंसन समान होत, चंदन सों घस्यो घनसारऊ घरकि है ।
नारद की सारद की हाँसी मैं कहाँ सी आभ सरद की सुर सरी कौन पुंडरीक है ॥
भूषन भनत छक्यो छीरधि मैं थाह लेत फेन लपटानो ऐरावत को करी कहै ।
कयलास ईस ईस सीस रजनीस वहौ अवनीस सिवा के न जस को सरीक है ॥२६८॥

## संभावना

### लक्षण-दोहा

"जुँ यों होय तौ होय इमि" जहँ सभावन होय ।
ताहि कहत संभावना कवि भूषन सब कोय ॥ २६९ ॥

### उदाहरण-कबित्त मनहरण

लोभसकी ऐसी आयु होय कौनहू उपाय तापर कवच जो करनवारो धारिए ।
ताहू पर हूजिए सहसबाहु ता पर सहस गुनो साहस जो भीमहू ते करिए ॥
भूषन कहैं यों अवरंग जू सों उमराव नाहक कहौ तौ जाय दच्छिन मे मरिए ।
चलैं न कछू इलाज भेजियत बेहिकाज ऐसो होय साज तौ सिवासों जाय लरिए॥२७०॥

# प्रौढोक्ति×

### लक्षण

जेथें अहेतुक उत्कर्षाचें वर्णन केलेलें असतें तेथें 'प्रौढोक्ति' अलंकार ह्मणतात. २६७

### उदाहरण-मंदारमाला

हास्यप्रभा नारदाची फिकी, ती फिकी शारदेची, शिवाच्या यशीं ॥
जे मानसाच्या तटीं राहताती तदीया नसे शुभ्रताही तशी ॥
ऐरावत क्षीर--धी पोहुनी ये दिसे शुभ्र भारी हरीचा करी ॥
कैलासचा नाथ, तन्मस्तकेंदू, कुणी साम्य सर्जा--यशीं ना धरी ॥
॥ २६८ ॥

# संभावना

### लक्षण

जर असें झालें तर तसें होईल अशा प्रकारचें संभवात्मक वर्णन जेथें केलेलें असतें तेथें 'संभावना' अलंकार ह्मणतात. २६९

### उदाहरण-मंदारमाला.

लाभेल हो ! लोमशायू[1] कसें तें ? तनूला जरी त्राणे[2] निर्मी विधी ॥
बाहू असावे सहस्रावधी ते, धृती त्याहुनीही सहस्रावधी ॥
उम्राव ते बोलती-- 'साज ऐसा मिळावा, तरी दक्षिणेशावरी-
जातों अह्मी, आजपर्यंत गेले दशा काय झाली तयांची तरी ! ॥२७०॥

---

× या अलंकाराचें लक्षण अन्य कवींनीं असेंही सांगितलें आहे कीं, जेथें एखादें मोठें कार्य घडलेलें असून त्याचें कारण वर्णित नसेल तेथें प्रौढोक्ति अलंकार ह्मणतात.

१ लोमश ऋषीचें आयुष्य २ चिलखत.

## मिथ्याध्यवसित

### लक्षण-दोहा

झूठ अरथ की सिद्धि को झूठो बरनत आन।
मिथ्याध्यवसित कहत है भूषन सुकवि सुजान ॥ २७१ ॥

### उदाहरण-दोहा

पग रन मैं यों चल लसैं ज्यों अंगद पग ऐन।
धुव सो भुव सो मेरु सो सिव सरजा को बैन ॥ २७२ ॥

### पुन्हां-कवित्त मनहरण

मेरु सम छोटो पन सागर सो छोटो मन घनद को धन ऐसो छोटो जग जाहि को।
सूरज सो सीरो तेज चाँदनी सी कारी कित्ती अमिय सो कटु लागे दरसन ताहि को॥
कुलिस सो कोमल कृपान अरि भंजिबे को भूषन भनत भारी भूप भौंसलाहि को।
भुव सम चल पद सदा महि मंडल में धुव सो चपल धुव वल सिव साहि को
॥ २७३ ॥

## उल्लास

### लक्षण-दोहा

एक हि के गुन दोष ते औरै को गुन दोस।
बरनत हैं उल्लास सो सकल सुकवि मतिपोस ॥ २७४ ॥

# मिथ्याध्यवसित

## लक्षण

असत्य अर्थाची सिद्धी असत्य वर्णनानें करणें याला ' मिथ्याध्यवसित अलंकार म्हणतात. २७१

## उदाहरण—आर्या

धारांगणिं पद चंचल सरजावें अंगदा[1]समान जणू ॥
ध्रुवसम, भूसम किंवा मेरुगिरीसम तदीय वच मानूं ॥ २७२ ॥

## उदाहरण २ रें—मंदारमाला

मेरूपरी सान त्याची प्रतिज्ञा, समुद्रापरी सान त्याचें मन ॥
चंद्रापरी कृष्ण—कीर्ती, रवीच्या परी शांत तच्छौर्य—तेजोरस ॥
वज्रापरी खड्ग त्याचें मृदू हो ! कटू तन्मुख—श्री सुधानिस्तुल ॥
भूतुल्य त्याचे चलत्पाद जाणा, ध्रुवाच्यापरीलोल कीं तद्बल ॥ २७३

# उल्लास

## लक्षण

एकाच्या गुणदोषानें दुसऱ्याचे गुणदोष दाखविणें या प्रकारच्या वर्णनाला ' उल्लास अलंकार म्हणतात ॥ २७४ ॥

---

१ वास्तविक अंगदानें रावणाच्या सभेंत आपला पाय इतका रोंखून धरिला होता कीं कोणाही राक्षसाकडून तो हालला नाहीं.

## उदाहरण ( गुणेन दोषो ) मालती सवैया

काज मही सिवराज बली हिंदुवान बढाइबे को उर ऊटै।
भूषन भू निरम्लेच्छ करी चहै, म्लेच्छन मारिबो को रन जूटै ॥
हिंदु बचाय बचाय यही अमरेस चँदावत लौं कोइ टूटै।
चंद अलोक ते लोक सुखी यहि कोक अभागे को सोक न छूटै ॥ २७५ ॥

## पुनः ( दोषेण गुणो ) मनहरण दंडक


देस दहपट्ट कीने लूटि कै खजाने लीने बचे न गढोई काहू गढ सिरताज के।
तोरादार सकल तिहारे मनसबदार डाँडे, जिनके सुभाय जंग दै मिजाज के ॥
भूषन भनत बादसाह को यों लोग सब बचन सिखावत सलाहकी इलाज के।
डावरे की बुद्धि व्है कै बावरे न कीजै वैरु रावरे के बैर होत काज सिवराज के॥
॥ २७६ ॥

## अन्यच्च ( गुणेन गुणो ) दोहा

नृप सभान मैं आपनी होन बढाई काज।
साहि तनै सिवराज के करत कवित कबिराज ॥ २७७ ॥

## अपरंच ( दोषेन दोषो ) दोहा

सिव सरजा के बैर को यह फल आलमगीर।
छूटे तेरे गढ सबै कूटे गए वजीर ॥ २७८ ॥



## उदाहरण ( गुणेन दोषः )–मंदारमाला

ऐश्वर्य–वृद्धी घडो भारताची, सदा हाच उल्हास ज्याच्या मनीं ॥
निर्म्लेच्छ पृथ्वी करायास इच्छी, विमर्दावया त्यांस धावे रणीं ॥
हिंदूंस रक्षून रक्षून, छेदी पर–स्नेहि बुंदी[1]–नरेशाप्रती ॥
चंद्रास आलोकुनी कोक होती सुखी, कोक[2] शोकाप्रती पावती॥२७५

## उदाहरण २ रें ( दोषेण गुणः )–मंदारमाला

देशावरी देश जिंकी, खजीने लुटी, दुर्ग–धारी न सोडी कुणी ॥
प्रौढी बहू, मान ज्यांचा बहू, जे मिजाजी बहू जिंकिले ते रणीं ॥
नानापरी सांगती ते शहाला–' तहालाच उद्युक्त होणें बरें ' ॥
होऊन हो डावरे, बावरे या न कीजे, अशानें न हा आवरे ॥ २७६ ॥

## उदाहरण ३ रें ( गुणेन गुणः )–आर्या

निजगुण–गौरव व्हावा राजसभाभ्यंतरीं म्हणून कवी–
शिवरायावरि कविता रचिती रसिकांतरास जी सुखवी ॥ २७७ ॥

## उदाहरण ४ थें ( दोषेण दोषः )–आर्या

वैर शिवाशीं केलें, तत्फल हें दिल्लिपाल–पदरांत–
सुटले गड हातांतिल, कुटले सारे वजीर समरांत ॥ २७८ ॥

---

१ अमरसिंह चंदावत २ वृक ( लांडगा ) = वृकासारखे लोक असा अर्थ वृक म्हणजे चक्रवाक पक्षी हाही अर्थ येथें युक्त आहे.

### पुनरपि । मनहरण दंडक

दौलति दिली की पाय कहा ए अलमगीर बब्बर अकब्बर के बिरद बिसारे तैं ।
भूषन भनत लरि लरि सरजा सों जंग निपट अभंग गढ कोट सब हारे तैं ॥
सुधर्‍यो न एकै साज भेजि भेजि बेहिकाज बडे बडे बेइलाज उमराव मारे तैं ।
मेरे कहें मेर करु, सिवाजी सों बैर करि गैर करि नैर निज नाहक उजारे तैं ॥
॥ २७९ ॥

## अवज्ञा

### लक्षण–दोहा

औरे के गुन दोस ते होत न जहँ गुन.दोस ।
तहाँ अवज्ञा होति है भनि भूषन मति पोस ॥ २८० ॥

### उदाहरण–मालती सवैया

औरन के अनबाढे कहा अरु बाढे कहा नहिं होत चहा है ।
औरन के अनरीझे कहा अस रीझे कहा न मिटावत हा है ॥
भूषन श्रीसिवराज हि माँगिए एक दुनी बिच दानि महा है ।
मंगन औरन के दरबार गए तौ कहा न गए तौ कहा है ॥ २८१ ॥

## अनुज्ञा

### लक्षण–दोहा

जहाँ सरस गुन देखि कै करे दोस की हौस ।
तहाँ अनुज्ञा होति है भूषन कवि यहि रौस ॥ २८२ ॥

### उदाहरण ५ वें-मंदारमाला

सोडी कुलाचार, ऐश्वर्य लोभें, ' अलम्गीर ' हें नांव तैं पावला ॥
सर्जासवें भांडुनी भांडुनी हा स्वतां कोट किल्ल्यांसची हारला ॥
एकाहुनी एक योद्धा लढाऊ जरी धाडिला कार्य ना साधिलें ॥
केला शिव-द्वेष, ही चूक केली पुर-प्रांत निर्मानवी पाहिले ॥२७९॥

## अवज्ञा

### लक्षण

जेथें एकाच्या गुणदोषानें दुसऱ्यावर कांहींहीं गुण दोषाचा परिणाम घडत नाहीं तेथें ' अवज्ञा ' अलंकार म्हणतात २८०

### उदाहरण-मंदारमाला.

वाढो कुणी संपदेनें, न वाढो, अम्हां काय? जेथें नसे चाह ती ॥
कोणी जरी तुष्टला रुष्टलाही, अम्हा काय? जो हारिना दुःस्थिती ॥
मागावयालागिं या भूमिभागीं शिवाजी असे एक दाता धनी ॥
गेलें न गेलें तरी सारखेंची तया सोडुनी अन्य भूपांगणीं ॥ २८१ ॥

## अनुज्ञा

### लक्षण

सरस गुण पाहून जेथें दोषाची हौस उत्पन्न होते तेथें ' अनुज्ञा ' अलंकार होतो. २८२

### उदाहरण-कवित्त मनहरण

जाहिर जहान सुनि दान के बखान आजु महादानि साहितनै गरिब नेवाज के ।
भूषन जवाहिर जलूस जरबाफ जोति देखि देखि सरजा के सुकबि समाज के ॥
तप करि करि कमलापति सों माँगत यों लोग सब करि मनोरथ ऐसे साज के ।
बैपारी जहाज के न राजा भारी राज के भिखारी हमैं कीजे महाराज सिवराज के ॥ २८३ ॥

## लेश

### लक्षण-दोहा

जहँ बरनत गुन दोष कै कहै दोष गुन रूप ।
भूषन ताको लेस कहि गावत सुकबि अनूप ॥ २८४ ॥

### उदाहरण-दोहा

उदैभानु राठौर बर धरि धीरज गढ ऐंड ।
प्रगटै फल ताको लह्यौ परिगो सुरपुर पैंड ॥ २८५ ॥
कोऊ बचत न सामुहें सरजा सों रन साजि ।
भली करी पिय ! समर ते जिय लै आए भाजि ॥ २८६ ॥

## तद्गुण

### लक्षण-दोहा

जहाँ आपनो रंग तजि गहै औरको रंग ।
ताको तद्गुन कहत है भूषन बुद्धि उतंग ॥ २८७ ॥

### उदाहरण-मंदारमाला

दानोत्सवाचा महिम्रा शहाजी-सुताचा सुविख्यात तो ऐकुनी ॥
त्याच्या कवीच्या हिऱ्या माणकांची प्रभारम्य भूषावली पाहुनी ॥
पूजा-बळें याचिती लोक सारे रमेशास सद्भक्ति भावांतरीं ॥
नौकापती भूपती वा न कीजे अम्हांला भिकारी शिवाचे करीं॥२८३॥

## लेश

### लक्षण

जेथें गुणाला दोष स्वरूपांत व दोषाला गुण स्वरूपांत वर्णिलें असतें तेथें 'लेश' अलंकार होतो. २८४

### उदाहरण-आर्या

राठोड उदयभानू धैर्य धरी गढ धरी, धरी बाणा ॥
प्रकट मिळालें तत्फल, स्वर्गाचा अतिथि जाहला जाणा ॥२८५॥
शिव सरजाच्या संमुख युद्धाला सजुन वांचला न कुणी ॥
नाथा ! तुम्ही शहाणे, आलां स्वप्राण रक्षुनी पळुनी ॥ २८६ ॥

## तद्गुण *

### लक्षण

जेथें आपला रंग टाकून इतराचा रंग स्वीकृत केला जातो तेथें 'तद्गुण' अलंकार म्हणतात. २८७

---

* अत्युज्वल वस्तूच्या संसर्गानें वर्ण्य वस्तूच्या गुणाचा लोप होऊन ती तद्रूप होते अशा वर्णनालाही तद्गुण अलंकार म्हणतात.

### उदाहरण-मनहरण दंडक

पंपा मानसर आदि अगन तलाव लागे जेहि के परन मैं अकथ युत गथ के।
भूषन यों साज्यों रायगढ सिवराज रहे देव चक चाहि कै बनाए राजपथ के॥
बिन अवलंब कलिकानि आसमान मैं व्है होत बिसराम जहाँ इंदु औ उदय के।
महत उतंग मनि जोतिन के संग आनि कैयो रंग चकहा गहत रवि रथ के
॥ २८८ ॥

## पूर्वरूप

### लक्षण-दोहा

प्रथम रूप मिटि जात जहँ फिरि वैसोई होय।
भूषन पूरब रूप सों कहत सयाने लोय॥ २८९ ॥

### उदाहरण-मालती सवैया

ब्रह्म के आनन ते निकसे ते अत्यंत पुनीत तिहूँ पुर मानी।
राम युधिष्ठिर के बरने बलमीकिहु व्यास के अंग सोहानी॥
भूषन यों कलिके कविराजन राजन के गुन पाय नसानी।
पुन्य चरित्र सिवा सरजा सर न्हाय पवित्र भई पुनि बानी॥ २९० ॥

यों सिर पै छहरावत छार हैं जाते उठैं असमान बगूरे।
भूषन भूधरऊ धरकैं जिनके धुनि धक्कन यों बल रूरे॥
ते सरजा सिवराज दिए कबिराजन को गजराज गरूरे।
सुंडन सों पहिले जिन सोखि कै फेरि महामद सों नद पूरे॥ २९१ ॥

### उदाहरण–मंदारमाला

पंपा तशा मानसादी सरांची मिती नाहिं ज्या रायदुर्गावरी ॥
तेथलि पंथास देखून होई सुर–श्रेणि साश्चर्य नाकांतरीं[१] ॥
आकाशगामी शशी–सूर्य दोघे विसाव्यासही थांबती ज्या स्थळीं ॥
उत्तुंग ज्योतिर्मण्याच्या प्रभेनें रवीच्या रथाची प्रभा राजली ॥२८८॥

## पूर्वरूप

### लक्षण

पूर्वरूप नाहिंसें झाल्यावर पुन्हां तें तसेंच प्रगट झालें म्हणजे ' पूर्वरूप अलंकार होतो. २८९

### उदाहरण–मंदारमाला

ब्रह्माननीं जन्म झाला म्हणोनी त्रिलोकांत वाणी[२] पवित्रा असे ॥
वाल्मीकिव्यासासवें सत्पुराणीं कथा–वर्णनीं साजणी ती दिसे ॥
आजी कलीमाजि राजावलीच्या पदीं भूषणाच्या परी लागुनी–
पुण्योत्तम श्रीशिवाच्या चरित्रीं पवित्रा पुन्हां वाणी झाली झणी ॥

### उदाहरण २ रें–मंदारमाला

दंती शिरीं धूलिका वंदिती तैं, उठे लोट, जाई नभाभ्यंतरीं[३] ॥
चीत्कार हुंकार ऐकून ज्यांचा शिरे कंपता पर्वतांच्या उरीं ॥
दानप्रवीर्णा[४] ! तुवां सत्कवींना बलश्रेष्ठ ऐसे करी अर्पिले ॥
शुंडाबलें शोषुनीया तयांनीं नदांना मदानें पुन्हां पूरिलें ॥२९१॥

१ स्वर्गांत २ वाक्देवता ३ आकाशांत ४ शिवरायाचें विशेषण

श्री सरजा सल्हेरिके जूझ घने उमरावन के घर घाले।
कुंभ चंदावत सैद पठान कबंधन धावत भूधर हाले॥
भूषन यों सिवराज कि धाक भए पियरे अरुने रँगवाले।
लोहे कटे लपटे बहु लोहु भए मुँह मीरन के पुनि लाले॥ २९२॥

यों कवि भूषन भाषत है यक तौ पहिले कालिकाल कि सैली।
तापर हिंदुन की सब राहनि नौरंगसाहि करी अति मैली॥
साहि तनै सिव के डरसों तुरकौ गहि बारिध की गति पैली।
वेद पुरानन की चरचा अरचा दुज देवन की फिरि फैली॥ २९३॥


## अतद्गुण

### लक्षण-दोहा

जहँ संगति ते औरको गुन कछूक नहिं लेत।
ताहि अतद्गुन कहत हैं भूषण सुकवि सचेत॥ २९४॥

### उदाहरण-मालती सवैया

दीन दयालु, दुनी प्रतीपालक जे करता निरम्लेच्छ मही के।
भूषन भूधर उद्धरिबो सुने और जिते गुन ते सब जी के॥
या कलि मैं अवतार लियो तऊ तेई सुभाय सिवाजि बली के।
आय धर्‍यो हरि ते नर रूप पै काज करै सिगरे हरि ही के॥२९५॥



## उदाहरण ३ रें-मंदारमाला

साल्हेरिच्या घोर युद्धांत सर्जा ! असंख्य प्रवीरांस संहारिलें ॥
चंदावती बेग-शेखी पठाणी कबंधामुळें शैलही कांपले ॥
वैरी तुझे ताम्र[1]वर्णी भयानें किती पीतवर्णी अहा ! जाहले ॥
घायाळ रक्तामधें लुंठले तैं, पुन्हां ताम्रवर्णाप्रती पावले ॥२९२॥

## उदाहरण ४ थें-मंदारमाला

आधींच वक्रा कलीची गती या, दिसे धर्म-शैथिल्य लोकांतरीं ॥
हिंदू जनांच्या स्वधर्म-प्रथेला जगीं म्लान नौरंगशाही करी ॥
पाथोधि-तीरावरी तुर्क गेले शहाजी-सुताच्या भयानें दुरी ॥
तों वेदचर्चा घडे देव-अर्चा द्विजांची पुन्हां गेह-गेहांतरीं ॥ २९३ ॥

# अतद्गुण

## लक्षण

जेथें संगतींत किंवा सहवासांत इतरांचा गुण घेतला जात नाहीं तेथें 'अतद्गुण' अलंकार होतो २९४

## उदाहरण-मंदारमाला.

निर्म्लेंच्छकर्ता, जगत्पाळ तैसा दयाळु प्रभू दीनलोकावनीं ॥
नाना गुण-श्रेणि जी ईश्वरी ती वसे भूधरोद्धारकाच्या मनीं ॥
हा भोसला या कलीमाजि जन्मे, हरीचा स्वभाव प्रभू हा धरी
घेई हरी[2] पासुनी मानवाची तनू, मात्र कार्यें हरीचीं[3] करी ॥२९५

१ पानपतच्या बखरींतही मोगल तुर्क यांना ताम्र, ताम्रवर्णी असें म्हटलें आहे. २ ईश्वरापासून ३ ईश्वराचीं

## पुन्हां:-कबित्त मनहरण

सिवाजी खुमान तेरो खग्ग बढे मान बढे मानस लौं बदलत कुरुष उछाह ते।
भूषन भनत क्यों न जाहिर जहान होय प्यार पाय तो से हि दिपत बरनाह ते॥
परताप फेटो रहो सुजस लपेटे रहो बरनत खरो नर पानिप अथाह ते।
रन रन रिपुन के रुकत सों रंगों रहै रातो दिन रातो पै न रातो होत स्याह ते ॥ २९६ ॥

## अपरंच-दोहा

सिव सरजा की जगत में राजति कीरति नौल।
अरि तिय अंजन दृग हरै तऊ धौल की धौल ॥ २९७ ॥

## अनुगुण

## लक्षण-दोहा

जहाँ और के संग ते बढै आपनो रंग।
ता कहँ अनुगुन कहत है भूषन बुद्धि उतंग ॥ २९८ ॥

## उदाहरण-कबित्त मनहरण

साहि तनै सरजा के सनमुख आय कोऊ बचि जाय न गनीम भुजबल मैं।
भूषन भनत भौंसिला की दिलदौर सुनि धाक हीं मरत म्लेंच्छ औरँग के दल मैं॥
रात दिन रोवत रहत यवनी हैं सोक परोई रहत दिली आगरे सकल मैं।
कज्जल कलित अँसुवान के उमंग संग दूनो होत रोज रंग जमुनाके जल मैं ॥ २९९ ॥

### उदाहरण २ रें-मंदारमाला

त्वत्खड्ग-सन्मान वाढे, किती तें वरी मानसाच्या[1] परी उद्धती ॥
लोकीं प्रसिद्धी तरी कां न व्हावी ? तया पाहुनी भूपती दीपती ॥
राहे तदग्रीं जयश्री सदाही, तसे शौर्यतेजादि हे सद्गुण ॥
रात्रंदिनीं रंगतें शत्रु-रंगीं, परी शाम तद्रक्तिमा होइ न ॥ २९६ ॥

### उदाहरण ३ रें-आर्या

शिव राजाची राजे जगिं विस्मय-जनक कीर्ति-निर्झरिणी ॥
अरिललना-दृक्कज्जल हरुनी शुभ्राच ती लसे भुवनीं ॥ २९७ ॥

## अनुगुण

### लक्षण

जेथें दुसऱ्याच्या संगतीनें आपला गुण वाढतो असें वर्णन केलेलें असतें तेथें ' अनुगुण ' अलंकार म्हणतात. ॥ २९८ ॥

### उदाहरण-मंदारमाला

जे जे बहादूर आले शिवाजीपुढें, ते न युद्धांतुनी वांचले ॥
पाहून उत्साहची यन्मनाचा भयें कांपले म्लेंच्छ दिल्लीतले ॥
आग्र्यांतल्या बेगमा क्रंदताती, धरा हीच शय्या तयांची दिसे ॥
वाहून वाहून तत्कज्जलाश्रू दुणी सूर्यजेची[2] प्रभा होतसे ॥ २९९ ॥

---

१ मानस सरोवर २ यमुनेची

## मीलित

### लक्षण-दोहा

सदृश वस्तु मैं मिलि जहाँ भेद न नेक लखाय ।
ताको मीलित कहत है भूषन जे कबिराय ॥ ३०० ॥

### उदाहरण-कवित्त मनहरण

इंद्र निज हेरत फेरत गज इंद्र, अरु इंद्र को अनुज हेरै, दुगध नदीस को ।
भूषन भनत सुरसरिता को हंस हेरै, विधि हेरै हंस को चकोर रजनीस को ॥
साहि तनै सिवराज करनी करि है तैं जु होत है अचंभो देव कोटियो तैंतीस को ।
पावत न हेरे तेरे जसमे हिराने निज गिरिको गिरीस हेरै गिरिजा गिरीस को ॥
॥ ३०१ ॥

## उन्मीलित

### लक्षण-दोहा

सदृश वस्तु मैं मिलत पुनि जानत कौनेहु हेत ।
उनमीलित तासों कहत भूषन सुकबि सचेत ॥ ३०२ ॥

### उदाहरण-दोहा

सिव सरजा तव सुजस मैं मिले धौल छबि तूल ।
बोल बास ते जानिए हंस चमेली फूल ॥ ३०३ ॥

# मीलित लक्षण

## लक्षण

एक वस्तु दुसऱ्या सदृश वस्तूंत लुप्त झाल्यानें ओळखूं येत नाहीं अशा वर्णनाला ' मीलितालंकार ' म्हणतात. ॥ ३०० ॥

( दोन सदृश वस्तूंपैकीं एकीचें चिन्ह ज्यास्त प्रगट झाल्यानें दुसरी वस्तु छपली गेली असें वरील लक्षणाचें स्पष्टीकरण करतां येईल. )

### उदाहरण-मंदारमाला.

देवेंद्र ऐरावताला‌गिं शोधी, हरी[1] शोधितो स्वीय दुग्धोदधि ॥
आकाशगंगेप्रती हंस शोधी, मरालास तैसाच शोधी विधी[2] ॥
लोकोत्तरा ! विस्तरीशी यशाला तयें थोर आश्चर्य देवां वडे ॥
अंबेस ना सांपडे शुभ्र शंभू हिमाद्री न शंभूसही सांपडे ॥ २०१

# उन्मीलित

## लक्षण

सदृश वस्तूंत दुसरी वस्तु मिळून गेल्यावर दुसऱ्या कोणत्यातरी कारणानें ती ओळखूं येणें या प्रकारच्या वर्णनास ' उन्मीलित ' अलंकार म्हणतात ॥ ३०२ ॥

### उदाहरण-आर्या

शिवराया ! तव सुयशीं वस्तु मिळाल्या विशुभ्रते सदृश ॥
गंधावरुन चमेली, शद्वावरुनी कळून ये हंस ॥ ३०३ ॥

---

१ विष्णु २ ब्रह्मदेव ( हंस हें त्याचें वाहन आहे. )

## सामान्य

### लक्षण-दोहा.

भिन्न रूप जहँ सदस ते भेद न जान्यो जाय।
ताहि कहत सामान्य हैं भूषन कबि समुदाय॥ ३०४॥

### उदाहरण-मालती सवैया

पावस की यक राति भली सु महाबली सिंह सिवा गमके ते।
म्लेच्छ हजारन ही कटिगे दस ही मरहट्टन के झमके ते॥
भूषन हालि उठे गढ भूमि पठान कबंधन के धमके ते।
मीरन के अवसान गये मिलि धोंपनि सों चपला चमके ते॥ ३०५॥

## विशेषक

### लक्षण-दोहा.

मिश्ररूप सादृश्य मैं लहिए कछू बिसेक।
ताहि बिशेषक कहत हैं भूषन सुमति उलेख॥ ३०६॥

### उदाहरण-कवित्त मनहरण.

अहमदनगर के थान किरवान लै कै नवसेरी खान ते खुमान भिर्‍यो बलते।
प्यादन सों प्यादे पखरैतन सों पखरैत बखतरवारे बखतरवारे हल ते॥

# सामान्य

## लक्षण

वस्तु भिन्न असूनही सारखेपणामुळें भेद दिसून येत नाही तेथें 'सामान्य' अलंकार होतो. ३०४

## उदाहरण—मंदारमाला.

प्रावृट्—निशा एक वेळा बरी, ना बरी भोसले सिंह—संघोषणा ॥
शौर्यें दहा मावळे धावले तों सहस्रावधी[1] सांडिती जीवना ॥
दुर्ग-क्षिती कंपिता जाहली तैं अरींच्या कबंध-प्रकंपामुळें ॥
खड्गा—सवें दामिनी जों लकाके अमीरांतलें धैर्य तेणें गळें ॥३०५॥

# विशेषक

## लक्षण

भिन्नरूपांच्या सादृश्यांत कांहीं विशेष गोष्ट निवडून वर्णणें याला 'विशेषक' अलंकार ह्मणतात. ३०६

## उदाहरण—मंदारमाला

नौशेरखांला[2] निझामीपुराला[3] महाराष्ट्र-भूपें बलें वेढिलें ॥
स्वाराप्रती स्वार प्याद्यास प्यादा मिळोनी रण-स्थान गाजिन्नलें ॥

---

१ सहस्रावधि शत्रु २ नौशेरखांला 'खानदौरा' अशी पदवी होती. अहमदनगरच्या युद्धांत करतलबखां व कर्णसिंह हे दोघे खानदौराच्या बरोबर महाराजांशीं लढले होते. या वेळीं महाराजांनीं नगरची लूट केली होती. ३ अहमदनगरांत.

भूषन भनत एते मान घमसान भयो जान्यो न परत कौन आयो कौन दल ते ।
सम वेष ताके, तहाँ सरजा सिवा के बाँके बीर जाने हाँके देत मीर जाने चलते॥ ३०७

## पिहित

### लक्षण-दोहा

परके मनकी जानि गति ताको देत जनाय ।
कछू क्रिया करि, कहित हैं पिहित ताहि कबिराय ॥ ३०८ ॥

### उदाहरण-दोहा

गैर मिसिल ठाढो सिवा अंतरजामी नाम ।
प्रकट करी रिस साहि को सरजा करि न सलाम ॥ ३०९ ॥

आनि मिल्यो अरि यों गह्यो चखन चकत्ता चाव ।
साहि तनै सरजा सिव दियो मुच्छ पर ताव ॥ ३१० ॥

## प्रश्नोत्तर

### लक्षण-दोहा

कोऊ बूझै बात कछु कोऊ उत्तर देत ।
प्रश्नोत्तर ताको कहत भूषन सुकबि सचेत ॥ ३११ ॥

### उदाहरण-मालती सवैया

लोगन सों भनि भूषन यों कहै खान खवास कहा सिख देहौ ।
आवत देसन लेत सिवा सरजै मिलिहौ भिरिहौ कि भगैहौ ॥

ऐशी धुमाळी तिथें माजली कीं कुणाला कुणी नोळखू येइही ॥
जे गर्जती वीर तेथीं शिवाचे, चळों पाहती मीर ते, खूण ही
॥ २०७ ॥

# पिहित

## लक्षण

दुसऱ्याच्या मनांतील हेतु ओळखून त्यास कांहीं अवयवादि क्रियांनीं उत्तर देणें यास ' पिहित ' अलंकार ह्मणतात. २०८

## उदाहरण–आर्या

सरदारांत उभा शिव अंतर्ज्ञानीच नाम तें त्याचें ॥
शाहास सलाम न करि दाखवि तो रुद्र रूप सत्वाचें ॥ २०९
औरंग मनीं हर्षे, आला हातांत भोसला–वैरी ॥
चढवी हात मिशीवर जगदंबा–भक्त वीर शिवनेरी[1] ॥ २१० ॥

# प्रश्नोत्तर

## लक्षण

कोणी कांहीं प्रश्न विचारितो व दुसरा त्याचें उत्तर देतो 'अशा वर्णनपद्धतीला ' प्रश्नोत्तर ' अलंकार ह्मणतात. २११

## उदाहरण–मंदारमाला.

शेखांस मीरांस मंत्री विचारी स्वयें आदिलाच्या सभाभ्यंतरीं ॥
" येई शिवा देश जिंकीत, सांगा, तुह्मी भ्याल ? धावाल कीं त्यावरी ?

1 शिवनेरीचा जगदंबाभक्त अर्थात् शिवाजी. या दोन्ही उदाहरणांतील प्रसंग औरंगजेब व शिवाजी यांच्या भेटीच्या वेळचा आहे.

एदिल की सभा बोलि उठी यों सलाह करौऽब कहाँ भजि जैहौ।
लीन्हो कहा लरिकै अफजल्ल कहा लरिकै तुमहूँ अब लैहो ? ॥ ३१२॥

## पुन्हां-दोहा

को दाता को रन चढो, को जग पालनहार ? ।
कबि भूषन उत्तर दियो सिव नृप हरि अवतार ॥ ३१३ ॥

# व्याजोक्ति

## लक्षण-दोहा

आन हेतु सों आपनो जहाँ छिपावै रूप ।
व्याज-उकुति तासों कहत भूषन सुकबि अनूप ॥ ३१४ ॥

## उदाहरण-मालती सवैया

साहिन के उमराव जितेक सिवा सरजा सब लूटि लए हैं ।
भूषन ते बिन दौलति ह्वै के फकीर ह्वै देस बिदेस गए हैं ॥
लोग कहैं इमि दच्छिन जेय सिसौदिया रावरे हाल ठए हैं ? ।
देत रिसाय कै उत्तर यों हमहीं दुनियां ते उदास भए हैं ॥ ३१५ ॥

## पुन्हां-दोहा

सिवा बैर औरँग बदन लगी रहै नित आहि ।
कबि भूषन बूझे सदा कहै देत दुख साहि ॥ ३१६ ॥

आदीलशाही सभेचा निघाला ध्वनी एकदांची–"करावा तह"॥
'साधी तदा काय अफ्जुल्लखां कीं तुम्हीं आज साधाल ?
सोडा शह' ॥ ३१२ ॥

### उदाहरण २ रें–आर्या

दाता कोण ? धुरंधर वीर कवण ? पाळि कोण जगताला ? ॥
देवावतार शिव--नृप; उत्तर कवि एक देइ हें त्याला ! ॥ ३१३ ॥

## व्याजोक्ति

### लक्षण

जेथें आपला उद्देश एखाद्या कारणानें लपविला जातो तेथें 'व्याजोक्ति' अलंकार होतो. ३१४

### उदाहरण–मंदारमाला.

ज्या ज्या अमीरास सह्याद्रि–नाथें लुटोनी पराभूत केलें रणीं ॥
ते वैभवाला मुकोनी, फकिरी वरोनी विदेशांत गेले झणी ॥
त्यां पाहुनी बोलती लोक कीं-श्रीशिवानें दशा काय केली तरी ! ॥
लाजून देतात मिथ्योत्तरें ते अल्लालाच आली उदासी खरी ॥३१५॥

### उदाहरण २ रें–आर्या

औरंगाच्या वदनीं शिव–वैरें 'हाय' शब्द हा लागे ॥
तत्कारण सांगे तो, 'राज्य–त्रासांत जीव हा भागे' ॥ ३१६ ॥

# लोकोक्ति एवं छेकोक्ति

## लक्षण-दोहा

कहनावति जो लोक की लोक उकुति सो जानि ।
जहाँ कहत उपमान ह्वै छेक उकुति तेहि मानि ॥ ३१७ ॥

## उदाहरण

### लोकोक्ति-यथा-दोहा

सिव सरजाकी सुधि करौ भली न कीन्ही पीव ।
सूबा ह्वै दच्छिन चले धरे जात कित जीव ? ॥ ३१८ ॥

### छेकोक्ति-यथा-दोहा

जे सोहात सिवराज को ते कवित्त रसमूल ।
जे परमेश्वर पै चढ़ैं तेई आछे फूल ॥ ३१९ ॥

### पुनः- किरिटी सवैया[1]

औरंग जो चढि दक्खिन आवै तो ह्याँते सिधावै सोऊ विनु कप्पर ।
दीनो मुहीम को भार बहादुर लागो सहै क्यों गयंद को झप्पर ? ॥
सासता खां सँग वे हठि हारे जे साहब सातएँ ठीक भुवप्पर ।
ये अब सूबहु आवैं सिवा पर " काल्हि के जोगी कलींदे को खप्पर "
॥ ३२० ॥

---

1 या सवैयेंत आठ भगण असतात.

# लोकोक्ति व छेकोक्ति

## लक्षण

एखादी लोकसमाजांतील ह्मण ज्या वर्णनांत व्यक्त केलेली असते त्याला ‘ लोकोक्ति ’ ह्मणतात. व—
लोकोक्ति जेथें उपमान असते तेथें ‘ छेकोक्ति ’ अलंकार ह्मणतात. २१७

## उदाहरण

### लोकोक्ति–आर्या

चित्तीं शिव–स्मृति करा, बरवें केलें न हें प्रिया ! वाटे ॥
जातां होऊन सुभे दक्षिणचे, जीव ठेविला कोठें ? ॥ २१८ ॥

### छेकोक्ति–आर्या

शिवरायाला रुचते जी कविता, तीच रुचिर रसमूल ॥
जें परमेश्वर–शीर्षीं चढतें तें मान्य होतसें फूल ॥ २१९ ॥

### उदाहरण २ रें–मंदारमाला

औरंग येता जरी दक्षिणेला, विवस्त्र स्थिती पावता तो तरी ॥
मोहीम देई बहादूरखांला, अजाला कसा आवरावा करी ? ॥
षाहिस्तखांच्या सर्वे हारले ते ‘ फतेजंग ’ कीर्ती जयांची चढे ॥
आतां सुभे हे असे पातले की, “ बडे बापके आएँ बेटे बडे ” ॥ २२०

# वक्रोक्ति

## लक्षण-दोहा

जहाँ श्लेष सों काकु सों अरथ लगावै और।
वक्र उकुति ताको कहत भूषन कवि सिरमौर ॥ ३२१ ॥

## उदाहरण

### श्लेष से वक्रोक्ति-कबित्त मनहरण

साहि तनै तेरे बैर बैरिन को कौतुक सों बूझत फिरत कहौ काहे रहे तचि हौ ?
सरजा के डर हम आए इतै भाजि, तब सिंह सों डराय याहू ठौर ते उकचि हौ ॥
भूषन भनत वै कहैं कि हम सिव कहैं तुम चतुराई सों कहत बात राचि हौ ॥
सीव जापै रूठैं तौ निपट कठिनाई तुम बैर त्रिपुरी के त्रिलोक मैं न बचिहौ
॥ ३२२ ॥

### काकु से वक्रोक्ति-कबित्त, मनहरण.

सासता खाँ दक्खिनको प्रथम पठायो तेहि बेटाके समेत हाथ जाय कै गँवायो है।
भूषन भनत जौ लौं भेजौं उत औरै तिन वेहिकाज बरजोर कटक कटायो है ॥
जोई सुभेदार जात सिवाजी सों हारि तासों अवरंग साहि इमि कहै मन भायो है।
मुलुक लुटायो तौ लुटायो, कहा भयो ? तन आपनो बचायो महाकाज करि आयो है ॥
॥ ३२३ ॥



# वक्रोक्ति

## लक्षण

जेथें श्लेषानें व काकु[1]-ध्वनीनें निराळाच अर्थ उत्पन्न केला जातो तेथें 'वक्रोक्ति' अलंकार ह्मणतात. ३२१

# उदाहरण

## श्लेषानें वक्रोक्ति–मंदारमाला.

वैरी जनां पूसती लोक, "सांगा, दडोनी इथें बैसलां का तरी?"
'सर्जा[2]-भयें आह्मि आलों पळोनी !' 'इथें काय भ्याडांस सोडी हरी[3] ?'
ते बोलती–'अर्थ तो हा नव्हेची, अह्मी धांवलों त्या शिवांच्या भयें'
"झाला शिव[4]–क्रोध ज्यांच्यावरी हो! जिवाशा तयें बाळगूंची नये"
॥ ३२२ ॥

## काकु-वक्रोक्ति, उदाहरण–मंदारमाला

बाहिस्तखां प्रेषिला दक्षिणेला, कुमारासवें हस्त-हारी बने ॥
येई दुजा तत्सहायास तोंची चमूच्या शवें भूषवी हा रणें ॥
जो जो शिवाजीसवें हारुनी ये शहा त्या ह्मणे– "तुष्ट केले मला–
जावोत ते प्रांत, आलां गृहाला महत्कार्य केलें, तुह्मी वांचलां !॥३२३

१ काकु ह्मणजे स्वर भेदानें विरुद्धार्थ दर्शविणारा प्रयोग. २ शिवाजीच्या भयानें पक्षीं सर्जा म्ह. सिंह ३ सिंह ४ शिव = शिवाजी पक्षीं शंकर.

### पुनः दोहा

करि मुहीम आये कहत हजरत मनसब दैन ।
सिव सरजा सों जंग जुरि ऐहैं बचिकै है न ॥ ३२४ ॥

## स्वभावोक्ति

### लक्षण-दोहा

साँचो तैसो बरनिए जैसो जाति स्वभाव ।
ताहि सुभावोकति कहत भूषन जे कबिराव ॥ ३२५ ॥

### उदाहरण-मनहरण दंडक

दान समै द्विज देखि मेरहू कुबेरहू की संपति लुटायबेको हियो ललकत है ।
साहि के सपूत सिव साहि के वदन पर सिव की कथान मैं सनेह झलकत है ॥
भूषन जहान हिंदुवान के उबारिबे को तुरकान मारिबे को बीर बलकत है ।
साहिन सों लरिबे की चरचा चलति आनि सरजा के दृगन उछाह झलकत है ॥
॥ ३२६ ॥

काहू के कहे सुने ते जाही ओर चाहैं ताही ओर इकटक घरि चारिक चहत है ।
कहे ते कहत बात, कहेते पियत खात भूषन भनत ऊँची सासन जहत है ॥
पौढे है तौ पौढे, बैठे बैठे खरे खरे हमको है कहा करत यों ज्ञान न गहत है ।
साहि के सपूत सिव साहि तव बैर इमि साहि सब रातौ दिन सोचत रहत है
॥३२७॥

### उदाहरण २ रें—आर्या

मोहीम करुन येइल, त्यां द्याया मनसबी शहा सांगे ॥
ठावें निश्चित त्याला, वांचेलें न, कांहि द्यावया लागे ॥ ३२४ ॥

## स्वभावोक्ति

### लक्षण

जसा जाति-स्वभाव असेल तशा सत्यार्थ वर्णनाला 'स्वभावोक्ति' अलंकार ह्मणतात. ३२५

### उदाहरण—मंदारमाला

दानांत तच्चित्त हो ! मेरुतुल्य स्वसंपत्ति विप्रास द्याया सजे ॥
चाले शिवाची कथा तैं शिवाजी मिटोनी स्व-नेत्रास त्याला भजे ॥
स्वातंत्र्य हिंदूंस द्याया, अहिंदु विनाशावया हा उफाळे हरी ॥
चाले यदा मोंगली—युद्धचर्चा भरे संगरोत्साह नेत्रांतरीं ॥३२६॥

### उदाहरण २ रें—मंदारमाला.

सांगे कुणी कांहिं ऐकून तेंची बसे लावुनी एक जागीं टक ॥
जेवी, तृषा शांतवी आग्रहें तो, कुणी बोलतां बोलतो दुर्मुख ॥
जेथें निजे तो, निजेलाच राही, बसे तों बसें, आपणा नोळखी ॥
रात्रंदिनीं भोसलेंद्रा ! अशी ही अरीला तुझी व्याधि चिंता सुखीं ॥३२७॥

१ मोहीम करून येणाराला २ औरंगजेबाला हें ठाऊक कीं शिवाजी-वरच्या मोहिमेंतून सरदार वाचून परत येणार नाहीं व आपणास कांहीं द्यावें लागणार नाहीं ३ शिवाजींचें चित्त

उमडि कुडाल मैं खवासखान आए भनि भूषन त्यों धाए सिवराज पूरे मनके ।
सूनि मरदाने बाजे हय हिहनाने घोर मूछैं तरराने मुख वीर धीर जनके ॥
एकै कहै मार मार सम्हरि समर एकै म्लेच्छ गिरे मार वीच बेसम्हार तनके ।
कुंडन के ऊपर कडाके उठैं ठौर ठौर जीरन के ऊपर खडाके खडगन के ॥३२८॥

आगे आगे तरुन तरायले चलत चले तिनके अमोद मंद मंद मोद सकसै ।
अडदार बडे गडदारनके हाँके सुनि अडे गैर गैर माँहि रोस रस अकसै ।
तुंडनाथ सुनि गरजत गुंजरत भौंर भूषन भनत तेऊ महा मद छकसै ।
किरति के काज महाराज सिवराज सब ऐसे गजराज कवि राजन को वकसै ॥३२९॥

## भाविक

### लक्षण–दोहा.

भयो, होन हारो अरथ वरनत जहँ परतच्छ ।
ताको भाविक कहत है भूषन कवि मति स्वच्छ ॥३३०॥

### उदाहरण–कबित्त मनहरण

अजौं भूतनाथ मुंडमाल लेत हरषत भूतन अहार लेत अजँहू उछाह है ।
भूषन भनत अजौं काटे करवालन के कारे कुंजरन परी कठिन कराह है ॥
सिंह सिवराज सलहेरी के समीप ऐसो किन्हो कतलाम दिली दलको सिपाह है ।
नदी रन मंडल रुहेलन रुधिर अजौं अजौं रवि मंडल रुहेलन की राह है ३३१

### उदाहरण ३ रें-मंदारमाला.

येई 'खवाखवा' उफाळून जेव्हां कुडाळावरी, हाहि आला पुढें ॥
डंके नगारे झडूं लागले तैं हरी हेषले, वीर रोमांचले ! ॥
कोणी ह्मणे 'मार' कोणी ह्मणे 'घे' उडे म्लेंच्छ-संहार जैं संगरीं ॥
टोपांवरीं[1] तैं कडाके उडाले, खडाके उडाले जिरे बख्तरीं[2] ॥३२८॥

### उदाहरण ३ रें-मंदारमाला.

शुंडा डुले, दान-धारा गळे, जे मदें चालती मंद-शा पाउलें ॥
मार्गी अडोनी अडोनी महाती वचें चालती प्रीति-कोपामुळें ॥
शुंडाध्वनी ऐकतां भृंगराजी शिरीं गुंजते दानलोलुप ती ॥
ऐसे गजश्रेष्ठ अर्पी कवींना सिसोदीकुलोत्तंस हा भूपती ॥३२९॥

## भाविक

### लक्षण

भूत आणि भविष्यकालीन विषयांचें वर्तमानकालाप्रमाणें जेथें वर्णन केलेलें असतें तेथें 'भाविक' अलंकार ह्मणतात. ॥३३०॥

### उदाहरण-मंदारमाला.

भूतेश हर्षे, करी मुंड--माला, भुतें आज आहार घेती मुदें ॥
मत्त द्विपेंद्रावरी काळ आला, डुले यूथ ज्यांचा तनूंच्या मदें ॥
दिल्ली--दलाची सलेरीस ऐशी करी भोसलेनाथ कीं कत्तल ॥
वाहे नदी रोहिले शोणिताची, खुला मार्ग त्यांना नभोमंडल ॥

---

१ शिरस्त्राण २ चिलखतावर.

गज घटा उमडी महा घन घटासी घोर भूतल सकल मदजल सौं पटत है।
बेला छाँडि उछलत सातौ सिंधु बारि, मन मुदित महेस मग नाचत कढत है॥
भूपन बढत भौंसिला भुवाल को यों तेज जेतो सब बारहौ तरानि मैं बढत हैं।
सिवाजी खुमान दल दौलत जहान पर आनि तुरकान पर पैल प्रगटत है॥३३२

## भाविक छवि.

### लक्षण-दोहा

जहँ दूरस्थित वस्तु को देखत बरनत कोय।
भूषन भूषन राज भनि भाविक छवि सो होय॥ ३३३॥

### उदाहरण-मालती सवैया

सूबन साजि पठावत है नित फौज लखे मरहट्टन केरी।
औरंग आपनि दुग्ग जमाति बिलोकत तेरियै फौज दरेरी॥
साहि तनै सिवसाहि भई भनि भूपन यों तुव धाक घनेरी।
रातहु दौस दिलीस तकै तुव सैन कि सूरति सूरति घेरी॥३३४॥

## उदात्त

### लक्षण-दोहा

आति संपाति बरनन जहाँ तासों कहत उदात।
कै आनै सु लखाइए बडी आन की बात॥ ३३५॥

### उदाहरण २ रें-मंदारमाला.

कादंबिनीच्या परी हस्तिमाला उफाळे, धरा आर्द्र धारा-मदें ॥
कीं सोडिती सप्त सिंधूच सीमा, महेश प्रकर्षांत नाचे मुदें ॥
वाढे अजी भोसले-तेज ऐसें, जसें द्वादशार्कांमधें वाढतें ॥
पृथ्वीवरी फौज धावे शिवाची, अजी नष्ट तुर्कावली वाढते ॥३३२॥

## भाविक छवि.

### लक्षण.

जेथें दूरस्थित वस्तूचें प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणें वर्णन केलेलें असतें तेथें "भाविक छवि' अलंकार होतो. ३३३

### उदाहरण-मंदारमाला.

पाहून सेना मराठी करारी शहा सज्ज धाडी चमू आपुली ॥
तों आपुली दुर्ग-माला निरीक्षी जिला लागला पाश तो मावळी ॥
चंडी-कुलस्वामिनी-भक्त भूपा! तुझी भीति ऐशी शहाच्या मनीं, ॥
जी सूरतीला हरी, सूरतीला निरीक्षी चमूच्याच रात्रंदिनी ॥३३४॥

## उदात्त

### लक्षण

अति संपत्तीच्या वर्णनाला उदात्त अलंकार ह्मणतात; एखाद्या वस्तूबद्दल ती अतिशय समृद्धीनें युक्त आहे असे जें वर्णन त्यासही 'उदात्त' अलंकार ह्मणतात। ३३५

### उदाहरण-कवित्त मनहरण

द्वारन मतंग दीसैं आँगन तुरंग हीसैं बंदीजन बारन असीसैं जसरत हैं ॥
भूषन बखाने जरबाफ के सम्याने ताने झालरन मोतिनके झुंड झलरत हैं ॥
महाराज सिवा के नेवाजे कविराज ऐसे साजि कै समाज जेहि ठौर बिहरत हैं॥
लाल करैं प्रात तहाँ नील्मनि करैं रात याही भाँति सरजाकी चरचा करत हैं
॥ ३३६ ॥

जाहु जनि आगे खता खाऊ मति यारो गढ नाह के डरन कहैं खान यों बखान कै।
भूषन खुमान यह सो है जेहि पूना माहिँ लाखन मैं सासताखाँ डाऱ्यो बिन मान कै॥
हिंदुवान द्रुपदी की इजति बचैबे काज झपटि बिराटपुर बाहर प्रमान कै।
व्है है सिवाजी जेहि भीम व्है अकेले माऱ्यो अफजल कीचकको कीच घमसान कै
॥ ३३७ ॥

### पुनःदोहा

या पूना मैं मति टिकौ खान बहादुर आय।
ह्याँई साइस खान को दीन्ही सिवा सजाय ॥ ३३८ ॥

## अत्युक्ति

### लक्षण-दोहा

जहाँ सूरतादिकन की अति अधिकाई होय।
ताहि कहत अति उक्ति हैं भूषन जे कवि लोय ॥ ३३९ ॥

## उदाहरण-मंदारमाला.

द्वारावरी यूथ डोले गजांचा, प्रभावी किती अश्व खिंकाळती ॥
शोभे जया झालरी मोतियांची जरीचे नवे तंबुही शोभती ॥
काव्याग्रणी भोसले-मान्य ऐसे[१] तिथें शोभती बोलती सद्गुणी ॥
'माणिक्य येथें करी सुप्रभात क्षपा भासवी नील--तेजोमणी '॥२२६॥

## उदाहरण २ रें-मंदारमाला.

जाऊं पहातां पुढें, प्राण रक्षा, शिवाच्या भयें खानें उद्धारला[२] ।
तो मर्द हा, लक्ष सेनेंत ज्यानें पुण्यामाजि षाहिस्तखां दापिला ॥
लज्जा अहा ! भारत--द्रौपदीची सुरक्षावया भीम हा धावला ।
अफजुल्लखा कीचका सारखाची बलेंध्वंसुनी ध्वंसुनी मारिला ॥२२७

## उदाहरण ३ रें-आर्या.

खान[३] बहादुर वीरा ! राहावें या न पुण्यनगरास ।
येथेंच शिवाजीनें शिक्षा दिधली सइस्तखानास ॥२२८॥

# अत्युक्ति

### लक्षण

जेथें स्वरूप, शौर्य, दान इत्यादींचें अत्यंत वर्णन केलेलें असतें तेथें ' अत्युक्ति ' अलंकार होतो. २२९

१ शिवाजीला मान्य असे विद्वान २।३ खान जहांबहादुर हा १६७२ त दक्षिणचा सुभेदार होऊन आला होता.

### उदाहरण-मनहरण दंडक

साहि तनै सिवराज ऐसे देत गजराज जिन्हैं पाय होत कबिराज बेफिकिरि है ।
झूलत झलमलात झूलैं जरबाफन की जकरे अँजीर जोर करत किरिरि है ॥
भूषन भँवर भननात घननात घंट पग झननात मनो घन रहे घिरि है ।
जिनकी गरज सुने दिग्गज बे-आब होत मदही के आब गडकाव होत गिरि है ॥
॥ ३४० ॥

आजु यहि समै महाराज सिवराज तूही जगदेव जनक जजाति अंबरीक सो ।
भूषन भनत तेरे दान-जल-जलधि मैं गुनिन को दारिद गयो बहि खरीक सो ॥
चंद कर किंजलक चांदनी पराग उड-वृंद मकरंद बुंद पुंज के सरीक सो ।
कुंद सम कयलास नाक-गंग नाल तेरे जस पुंडरीक को अकास चंचरीक सो ॥
॥ ३४१ ॥

### पुनः दोहा

महाराज सिवराज के जे ते सहज सुभाय ।
औरन को अति उक्तिसे भूषन कहत बनाय ॥ ३४२ ॥

## निरुक्ति

### लक्षण-दोहा

नामन को निज बुद्धि सों, कहिए अरथ बनाय ।
ताको कहत निरुक्ति हैं, भूषन जे कबिराय ॥३४३॥

## उदाहरण–मंदारमाला

ऐसे गजश्रेष्ठ देई शिवाजी, कवींची विचिंताच दूरावली ॥
कंठांतल्या सांखळ्या हालताती वरी मखमली झूलताती झुली ॥
गंडस्थळीं गुंजती भृंग, कंठीं घणाणे, झणाणे पदांतीं ध्वनी ॥
यद्गर्जना कंप दे दिग्गजांना, गिरी यन्मदें लाजती भूवनीं ॥३४०॥

## उदाहरण २ रें–मंदारमाला

भूपोत्तमा अंबरीष प्रभू तूं ययाती जगद्देव आजी खरा ॥
त्वद्दान सिंधूंत दारिद्र्य वाहे तृणासारखें बा ! उदारांतरा ! ॥
कैलास तो त्वद्यशः–पुंडरीक प्रभा–स्रग्विणी नालि शोभे भली ॥
चंद्रांशु किंजल्क, ज्योत्स्ना पराग, स्रवे बिंदु-धाराच तारावली॥३४१

## उदाहरण ३ रें–आर्या

सहज स्वभाव–चिन्हें जीं जीं या रायदुर्ग–भूपाचीं ॥
कवि लाविति तीं इतरां करुनी अत्युक्ति मात्र वचनांचीं ॥३४२॥

# निरुक्ति

### लक्षण

नांवावरून कांहीं विशेष गोष्ट बनवून सांगणें ह्याला 'निरुक्ति' अलंकार ह्मणतात. ३४३

### उदाहरण-दोहा

कविगन को दारिद दुरह याही दल्यो अमान ।
याते श्री सिवराज को सरजा कहत जहान ॥३४४॥
ह्न्यो रूप इन मदन को याते भो सिव नाम ।
लियो बिरद सरजा सबल अरि गज दलि संग्राम ॥३४५॥


### पुन्हां-कवित्त मनहरण

आजु सिवराज महाराज एक तुही सरनागत जनन को दिवैया अभैदान को ।
फैली महिमंडल बडाई चहुँ ओर ताते कहिए कहाँ लौं ऐसे बडे परिमान को ॥
निपट गंभिर कोऊ लाँधि न सकत बीर जोधन को रन देत जैसे भाऊखान को ।
दिल दरियाव क्यों न कहैं कबिराव तोहिं तो मैं ठहरात आनि पानिप जहान को
॥३४६॥

## हेतु

### लक्षण-दोहा

" या निमित्त यहई भयो" यों जह बरनन होय ।
भूषन हेतु बखानहीं कबि कोबिद सब कोय ॥३४७॥



## उदाहरण–आर्या

कविदारिद्र्य–गजाचें करि निर्दाळन महींद्र बळवान ।।
ह्मणुनी शिवरायाला 'सरजा' बोलून देई जग मान ।।२४४।।
मदनाचें रूप हरी, ह्मणुनी 'शिव' नाम याजला उचित ।।
ब्रीद वरी सर्जाचें प्रबल अरि-करी करी रणीं दलित ।।२४५।।

## उदाहरण २ रें–मंदारमाला

पादानतांच्या भयांचा प्रहंता, शिव क्लेश हर्ता जगीं एकला ।
वाढे महिम्ना महीमाजि ऐसा जयाची न होई कशानें तुला ।।
लंघू शकेना तुला धीर कोणी, फिरे भाउखांनापरीही[1] रणीं ।
' दर्याव ' तूंतें ह्मणावें न कां ? तें जगत्तेज सांचे तुझ्याची मनीं
।।२४६।।

# हेतु

## लक्षण

यामुळें असें झालें अशा भावात्मक वर्णनाला ' हेत्वलंकार ' ह्मणतात. २४७

---

१ भाऊसिंह हे बूंदी नरेशाचे ज्येष्ठपुत्र होत. जयसिंहाला जसें मिर्जा जयसिंह ह्मणत तसें यांस भाऊखान ह्मणत. हे फार शूर होते.

### उदाहरण-मनहरण दंडक

दारुन दइत हरनाकुस बिदारिबे को भयो नरसिंह रूप तेज बिकरार है।
भूषन भनत त्योंहीं रावन के मारिबे को रामचंद्र भयो रघुकुल सरदार है॥
कंसके कुटिल बल बंसन बिधुंसिबे को भयो यदुराय बसुदेव को कुमार है।
पृथ्वी पुरहूत सहि के सपूत सिवराज म्लेच्छन के मारिबे को तेरो अवतार है।
॥ ३४८॥

## अनुमान

### लक्षण-दोहा

जहाँ काज ते हेतु कै जहाँ हेतु ते काज।
जानि परत अनुमान तहँ कहि भूषन कबिराज॥ ३४९॥

### उदाहरण-मनहरण दंडक

चित्त अनचैन आँसू उमगत नैन देखि बीबी कहैं बैन मियाँ कहियत काहि नै?।
भूषन भनत बूझे आए दरबार ते कँपत बारबार क्यों सम्हार तन नाहि नै?॥
सीनो धकधकत पसीनो आयो देह सब हीनो भयो रूप न चितौत बाएँ दाहि नै।
सिवाजी की संक मानि गए हौ सुखाय तुम्है जानियत दक्खिसनको सूबा करो साहि नै॥ ३५०॥

ऊंझा सी दिन कि भई संझा सी सकल दिसि गगन लगन रही गरद छवाय है।
चील्ह गीध बायस समूह घोर रोर कर ठौर ठौर चारों ओर तम मडराय है॥
भूषन अँदेस देस देसके नरेस गन आपुस मैं कहत यों गरब गँवाय है।
बडो बडवा को जितवार चहुँघा को दल सरजा सिवा को जानियत इत आय है॥
॥ ३५१॥

### उदाहरण-मंदारमाला

क्रोधें विदारावया कश्यपूला नृसिंहावतार क्षितीं जाहला ॥
लंकापतीला विनाशावयाला रघूच्या कुलीं राम तो जन्मला ॥
ध्वंसावया मत्त कंसाप्रती श्री यदुश्रेष्ठ घे जन्म तो गोकुलीं ॥
म्लेंच्छास विच्छेदण्याला तसाची शिवाजी ! तुझा जन्म या भूतलीं ॥
॥ ३४८ ॥

## अनुमान

### लक्षण

जेथें कार्यावरून कारणाचें किंवा कारणावरून कार्याचें अनुमान निघतें तेथें 'अनुमान' अलंकार होतो. ३४९

### उदाहरण-मंदारमाला

चित्तांत चिंता, वसे नीर नेत्रीं, पतीला पुसे यावनी कामिनी ॥
जाया ! शहा मंदिरांतून आलां, भरे कंप कां ? मुग्ध कां भाषणीं ? ॥
स्वेदार्द्र झाली तनू वक्ष कांपे, मुखीं शौर्यशाली प्रभाही उडे ॥
केलें असावें तुह्मां दक्षिणेचे सुभेदार, भीती शिवाची जडे ॥३५०॥

### उदाहरण २ रें-मंदारमाला

अस्तास गेला जणो भानु, संध्या नभोमंडपीं दिक्पटीं शोभली ॥
होई तमोव्याप्ति चोंहीकडोनी, मुदें गृध्रपंक्ती रटूं लागली ॥
शंका भयग्रस्त संत्रस्त राजे मिळाले, वदे अन्य अन्याप्रती ॥
" जो मोठमोठ्या शहांचा विजेता, चमू त्या शिवाचीच " ये संप्रती ॥
॥ ३५१ ॥

## अथ शब्दालंकार.

### लक्षण-दोहा

जे अरथालंकार ते भूषन कहे उदार ।
अब शब्दालंकार ये कहियत माति अनुसार ॥३५२॥

## छेक एवं लाट अनुप्रास.

### उदाहरण-दोहा

स्वरसमेत अच्छर पदनि आवत सदस प्रकास ।
भिन्न आभिन्न पदन सों छेक लाट अनुप्रास ॥३५३॥

### उदाहरण-अमृतध्वनि छंद[1]

दिल्लिय दलन दबाय करि सिव सरजा निरसंक ।
लूटि लियो सूरति सहर बंकक्करि अति डंक ॥
बंकक्करि अति डंकक्करि अस संकक्कुलि खल ।
सोचच्चकित भरोचच्चलिय बिमोचच्चखजल ॥
तठ्ठइमन कठ्ठिक सोइ रठ्ठिल्लिय ।
सद्दद्दिसि दिसि भद्दद्दबिभई रद्दद्दिल्लिय ॥ ३५४ ॥

---

१ या छंदांत ६ चरण असतात. पहिले दोन चरण मिळून दोहा होतो. आणि शेवटच्या चार चरणांत काव्य नामक छंद होतो. या छंदांत अन्य कवींकडून कांहीं निरर्थक अक्षर समूह येतात पण भूषण कवी या दोषापासून अलिप्त आहेत. याचें नांव जितकें सुंदर आहे तितकाच हा छंद म्हणावयास वक्र आहे. याचें नांव "विषध्वनि" असतें तर शोभलें असतें.

## शद्बालंकार प्रारंभ.

भूषण कवि ह्मणतात. आतांपर्यंत अर्थालंकाराचें वर्णन केलें. आतां यथामति शद्बालंकार वर्णन करितों. ३५२


# छेक एवं लाटानुप्रास.

### लक्षण.

भिन्न भिन्न पदांतून एकाच प्रकारचें स्वरयुक्त वर्णन अथवा शद्ब वारंवार जेथें येतात तेथें 'छेक किंवा लाटानुप्रास' ह्मणतात. ३५३

### उदाहरण—मंदारमाला.

दिल्ली—दलातें दली, धैर्यशाली बळी मावळी फौज घे सावळी ॥
डंग्डंग असे वाजले युद्ध—ढंके, करी नाद खंग्खग्हि खङ्गावली ॥
शंकाकुला व्याकुला संकुला ती दिसे चंचला सूरतीची कला ॥
ठाके जिथें, शत्रु धाके तिथें, एक हाकेसवें द्रव्य घे भोसला ॥
३५४॥



गत बल खान दलेल हुव खानबहादुर मुद्ध ।
सिव सरजा सलहेरि ढिग कुद्धद्धरि किय युद्ध ॥
कुद्धद्धरि किय युद्धद्धुव अरि अद्धद्धरि धरि ।
मुंडड्डरि तहँ रुंडड्डकरत डुंडड्डग भरि ॥
खेदिद्दर बर छेदिद्दय करि मेदद्दधि दल ।
जंगग्गति सुनि रंगग्गलि अवरंग्गत बल ॥६५५॥

लिय धरि मोहकम सिंह कहँ अरु किसोर नृपकुंभ ।
श्री सरजा संग्राम किय भुम्मिम्माधि करि धुम्म ॥
भुम्मिम्माधि किय धुम्मिम्माडि रिपु जुम्मम्मलि करि ।
जंगग्गराजि उतंगग्गरब मतंगग्गन हरि ॥
लक्खक्खन रन दक्खक्खलनि अलक्खक्खिति भरि ।
मोलल्लहि जस्र नोलल्लरि बहलोलल्लिय धरि ॥३५६॥



## मंदारमाला

संक्रुद्ध संवृद्ध युद्धस्थळीं ह्या करी विद्धविद्धांग योध्यांप्रती ॥
जेथें पडे मुंड[1], तेथें रडे रुंड[2], ये युद्ध–खंडांत चंडस्थिती ॥
घेरी सलेरीं दिलेरी–दलाला, असें ध्वंसिलें छेदिलें मर्दिलें ॥
कीं तद्गती जों कळे तो शहाचें गळे धैर्य, देहप्रभा मावळे ॥३५५॥

## मंदारमाला

कोटापतीच्या सुताला[3] धरी, तो सलेरीस मोहोकमाला धरी ॥
भूमीवरी धूम्र, धूम्रामधें धूम, माजे धुमाळी धुमाळीवरी ॥
गर्जून गर्जून गर्विष्ठ गाझी धरापृष्ठिं लक्षावधी छेदिले ।
बल्लोलें कल्लोल पाहून झाला मनीं लोल, तों त्यासही घेरिलें ॥३५६॥

---

१ मुंड = डोकें २ रुंड = धड ३ किशोरसिंह ४ गर्दी ५ बहिलोलखान.




लिय जिति दिल्ली मुलुक सब सिव सरजा जुरि जंग
भनि भूषन भूपति भजे भंगग्गरब तिलंग ॥
भंगग्गरब तिलंगग्गयउ कलिंगग्गलि अति ।
दुंदद्दबि दुहु दंदद्दलनि बुलंदद्दहसति ॥
लच्छच्छिन करि म्लेच्छच्छय किय रच्छच्छवि छिति ।
हल्लग्गि नरपल्लरि परनल्लिय जिति ॥ ३५७ ॥

## पुनः छप्पय.

मुंड कटत कहुं रुंड नटत कहुँ सुंड पटत घन ।
गिद्ध लसत कहुं सिद्ध हँसत सुख वृद्धि रसत मन ॥
भूत फिरत करि बूत भिरत सुरदूत घिरत तहँ ।
चंडि नचत गन मंडि रचत धुनि डंडि मचत जहँ ॥
इमि ठानि घोर घमसान अति भूषन तेज कियो अटल ।
सिवराज साहि सुव खग्गबल दलि अडोल बहलोल दल ॥३५८॥

क्रुद्ध फिरत सति युद्ध जुरत नहि रुद्ध मुरत भट ।
खग्ग बजत अरि बग्ग तजत सिर पग्ग सजत चट ॥
ढुक्कि फिरत मद झुक्कि भिरत करि कुक्कि गिरत गनि ।



## मंदारमाला.

दिल्लीपतीच्या प्रदेशास जिंकी प्रतापी प्रजानाथ हा भोसला ॥
तेलंग राजा निगर्वे पळाला, कलिंगेश जागींच भांबावला ॥
उच्छेद दोन्ही दलांचा जहाला अहा ! दर्प दुर्दांत विस्तारला ।
लक्षावधी म्लेंच्छ संहार झाला शिवानें पन्हाळा परी जिंकिला ॥ ३५७

## मंदारमाला.

कोठें कटे मुंड, कोठें नटे रुंड, कोठें भिडे शुंड शुंडेप्रती ।
कोठें हँसे गृध्र, कोठें हँसे सिद्ध, कोठें जयानंद–वृद्धी अती ॥
चंडी करी नृत्य, दंडी महाशूर शूरास खंडी कृपाणें[1] जियें ॥
मोदें भुतें नाचती, यूथ यूथाप्रती झुंजती दूत येती तियें ॥३५८॥

## मंदारमाला.

क्रुद्धावरी क्रुद्ध युद्धांत धावे, न हो रुद्ध योद्धा, फिरेना कुणी ॥
खड्गीं खणाणाट होई, तुरंगीं खडाडाट, जाई नभ व्यापुनी ॥

१ तरवारीनें.



रंग रकत हर संग छकत चतुरंग थकत भनि ॥
इमि करि संगर अतिहीं विषम भूषन सुजस कियो अचल ।
सिवराज साहि सुव खग्ग बल दलि अडोल बहलोल दल ॥ ३५९ ॥

## पुनरपि-कवित्त मनहरण

बानर बरार बाघ बैहर बिलार बिग बगरे बराह जानवरन के जोम है ।
भूषन भनत भारे भालुक भयानक है भीतर भवन भरे लीलगऊ लोम है ॥
ऐंडायल गज गन गैंडा गररात गनि गेहन में गोहन गरूर गहे गोम है ।
सिवाजी की धाक, मिले खल कुल खाक, बसे खलन के खेरन खवीसन के खोम है ॥ ३६० ॥

तुरमती तहखाने तीतर गुसलखाने सूकर सिलहखाने कूकत करीस हैं ।
हिरन हरमखाने स्याही हैं सुतुरखाने पाढे पीलखाने औ करंजखाने कीस हैं ।
भूषन सिवाजी गाजी खग्ग सों खपाए खल, खाने खाने खलन के खेरे भये खीस हैं ।
खडगी खजाने खरगोस खिलबतखाने खीसैं खोले खसखाने खाँसत खबीस हैं ।
॥ ३६१ ॥

## आयच्च-दोहा

औरन के जाँचे कहाँ नहिं जाँच्यो सिवराज ? ।
औरन के जाँचे कहाँ जो जाँच्यो सिवराज ? ॥ ३६२ ॥

कोठें ध्वनी 'धक्क' मत्त द्विपांचा कुठें 'कुक्क कुक्क' प्रलापे करी ॥
युद्धांगणीं रंग देखून नाचे उमारंग मुंड–प्रमोदांतरीं ॥
केला असा युद्ध–कल्लोल, केलें स्वतेजास या भूतलीं निश्चल ॥
खड्ग–प्रभावें प्रभावी प्रभो ! तूं हरी सर्व बल्लोलखांचें बल ॥३५९॥

## मंदारमाला

धाकें शिवाच्या खलांचीं कुलें तीं अहा ! खाक झालीं, न जाती उरे ॥
ग्रामांत त्यांच्या वृक व्याघ्र नाना वनश्वापद श्रेणि ती संचरे ॥
कोल्हीं किती क्रंदताती, उलूक ध्वनी तद्गृहाभोंवती घूमती ॥
उन्मत्त हस्ती तसे गोह गेंडे गृहीं त्यांचिया येउनी राहती ॥ ३६० ॥

## मंदारमाला

दिल्लीशहाचीं तहाचीं गृहें तीं अहा ! सूकरासारखी कूकती ॥
अंत:पुरांतीलही अंतरंगें कुरंगापरी कंपता पावती ॥
जेथें किती खलबतें चालतीं तीं गृहें क्रौंच–कोकापरी कूजती ॥
खड्गे शिवाच्या विपक्षी जनांची विहंगासम भ्रांत झाली स्थिति ॥
॥ ३६१ ॥

## उदाहरण २ रें–आर्या

इतरांचा जाच कुठें ? जरि नाहीं जाचलाच शिवराज ॥
इतरांचा जाच कुठें ? जरि कोणा जाचलाच शिवराज ॥३६२॥

## यमक अनुप्रास

### लक्षण-दोहा

भिन्न अरथ फिरि फिरि जहाँ ओई अच्छर वृंद ।
आवत हैं, सो जमक करि बरनत बुद्धि बुलंद ॥३६३॥

### उदाहरण-कबित्त मनहरण.

पूनावारी सुनि कै अमीरनकी गति लई भागिबे को मीरन समीरनकी गति हैं ।
मार्‍यो जुरि जंग जसवंत जसवंत जाके संग केते रजपूत रजपूत पति हैं ॥
भूषन भनै यों कुलभूषन भुसिल सिवराज ! तोहि दीन्ही सिवराज-बरकति हैं ।
नौहू खंड दीप भूप भूतल के दीप आजु समै के दिलीप दिलीपति को सिदाति हैं ॥
॥३६४॥

## पुनरुक्तिवदाभास

### लक्षण-दोहा

भासति है पुनरुक्ति सी नहिँ निदान पुनरुक्ति ।
वदाभास पुनरुक्ति सो भूषन बरनत युक्ति ॥३६५॥

### उदाहरण-कबित्त मनहरन

अरिनके दल सैन संगर मैं समुहाने टूक टूक सकल के डारे घमसान मैं ।
बार बार रूरो महानद परवाह पूरो बहत है हाथिनके मद जल दान मैं ॥
भूषन भनत महाबाहु भौंसिला भुवाल सुर रवि कैसो तेज तीखन कृपान मैं ।
माल मकरंद जू के नंद कला निधि तेरो सरजा सिवाजी जस जगत जहान मैं॥३६६॥

# यमक अनुप्रास

## लक्षण

जेथें अक्षरांचे वृंद ( समूह ) पुनः पुन्हां येतात आणि अर्थ मात्र निरनिराळा दाखवितात तेथें 'यमक अनुप्रास' ह्मणतात ३६३

## उदाहरण–मंदारमाला.

षाहिस्तखाची गती ऐकुनीया पळाले समीरासवें मीर ते ॥
'जस्वंत' राजा यशोवंत होता, करी संगरीं म्लान तत्कीर्तितें ॥
हे भोसले–भूषणा ! राज्यवृद्धी तुझी तो करी नाथ कैलासचा ॥
तूं दीपची या नवद्वीप–भूचा, दिलीप प्रभू होशि कीं आजचा ॥३६४॥

# पुनरुक्तिवदाभास

## लक्षण

जेथें पुनरुक्तीचा नुसता भास होतो, वस्तुतः पुनरुक्ति होत नाहीं; तेथें 'पुनरुक्तिवदाभास' अलंकार होतो. ३६५

## उदाहरण–मंदारमाला[1].

युद्धांत **पृथ्वी धरा** शद्बघोषें निनादून तुर्कांस त्वां बांधिलें ॥
नागेंद्र रक्त–प्रवाहीं बुडाले, मदाच्या जळीं दान धारा गळे ॥
तूं लोक–**तेजोमणी सूर्य** कैसा विराजे तुझ्या तीक्ष्ण खड्गांतही ॥
चंद्रापरी पुत्र तूं शाहजीचा सुकीर्ती तुझी **भूप राजे** महीं ॥३६६॥

---

१ या उदाहरणांतील अलंकार कायम राहण्याकरितां मूलार्थांत किंचित् बदल केला आहे. अधोरेखित शद्बस्थळीं पुनरुक्तिवदाभास अलंकार घडला आहे हें चाणाक्ष वाचक ओळखतीलच.

## चित्र.

### लक्षण-दोहा.

लिखे सुने अचरज बढै रचना होय बिचित्र ।
कामधेनु आदिक घने भूषन बरनत चित्र ॥३६७॥

### उदाहरण (कामधेनु चित्र) । माधवी[1] सवैया.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| धुव जो | गुरता | तिनको | गुरु भूषन | दानि बडो | गिरजा | षिव है |
| हुव जो | हरता | रिनको | तरु भूषन | दानि बडो | सिरजा | छिव है |
| भुव जो | भरता | दिनको | नरु भूषन | दानि बडो | सरजा | सिव है |
| तुव जो | करता | इनको | अरु भूषन | दानि बडो | बरजा | निव है |

## संकर.

### लक्षण-दोहा.

भूषन एक कबित्त मैं भूषन होत अनेक ।
संकर ताको कहत हैं जिन्हैं कबित की टेक ॥ ३६९ ॥

### उदाहरण-मनहरण दंडक.

ऐसे बाजिराज देत महाराज सिवराज भूषन जे बाज की समाजैं निदरत हैं ।
पौन पाय हीन, दृग घूंघटमैं लीन, मीन जल मैं बिलीन, क्यों बराबरी करत हैं?
सबते चलाक चित तेऊ कुलि आलम के रहैं उर अंतर मैं धीर न धरत हैं ।
जिन चढि आगे को चलाइयतु तीर, तीर एक भरि तऊ तीर पीछे ही परत हैं॥
३७०॥

१ माधवी सवैयेंत आठ सगण असतात.

# चित्र.

## लक्षण

ज्याची रचना अशी विचित्र असते कीं, पाहिलें किंवा ऐकिलें असतां आश्चर्य वाटतें त्यास 'चित्र' अलंकार ह्मणतात. त्याचे कामधेनु वगैरे पुष्कळ प्रकार आहेत. ॥३६७॥

## उदाहरण–माधवी सवैया.

### समवृत्त.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अचला | गुरुता | तिजला | गुरुभूषण | छत्रपती | नृपती | जगतीं |
| विकळा | ऋणता | तिजला | तरु-भूषण | दान-मती | इगि ती | विगती |
| सकलां | करितां | सजला | नर-भूषण | लोककिती | समरतीं | नमिती |
| विमला | कवितां | तिजला | शिवभूषण | योग्यअती | वदती | सुमतीं |

# संकर.

३६८

## लक्षण.

एकाच कवितेंत अनेक अलंकार वर्णिलेले असले ह्मणजे तेथें 'संकर' नामक अलंकार होतो. ३६९

## उदाहरण–मंदारमाला.

गाझी शिवाजी असे देइ वाजी प्रवेगीं हरे बाजेही त्यांजला।
वायू पदीं हीन, दृष्टी पटीं लीन, नीरांतरीं मीन, नाहीं तुला ॥
ठावें जगीं चित्त–चांचल्य सर्वां, तसा त्याजला धीर ना धारवे ।
जों सोडिलें त्यांवरोनी शराला, शराच्यापुढें तेच जाती जवें ३७०

१ बहिरी ससाणा हा अति वेगवान असतो. हा जेव्हां एखाद्या पक्ष्यामागें लागतो तेव्हां जणुकाय धनुष्याचा बाणच सुटला आहे असा दिसतो.


## ग्रंथालंकार नामावली । गीतिका छंद

उपमा अनन्वै कहि बहुरि उपमा प्रतीप प्रतीप ।
उपमेय उपमा है बहुरि मालोपमा कवि दीप ॥
ललितोपमा रूपक बहुरि परिनाम पुनि उल्लेख ।
सुमिरन भ्रमौ संदेह सुधापन्हुत्यौ सुभ बेख ॥ ३७१ ॥

हेतु अपन्हुत्यौ बहुरि परजस्तपन्हुति जान ।
सुभ्रान्त पूर्ण अपन्हुत्यो छेका अपन्हुति मान ॥
बर कैतवापन्हुति गनौ उतप्रेक्ष बहुरि बखानि ।
पुनि रूपकातिसयोक्ति भेदक अतिसयोक्ति सुजानि ॥ ३७२ ॥

अरु अक्रमातिसयोक्ति चंचल अतिसयोक्तिहि लेखि ।
अत्यंत अतिसैउक्ति पुनि सामान्य चारु बिसेखि ॥
तुल्यियोगिता दीपक अवृत्ति प्रतिवस्तुपम दृष्टांत ।
सु निदर्सना व्यतिरेक और सहोक्ति बरनत शांत ॥ ३७३ ॥

सु बिनोक्ति भूषन समासोक्तिहु परिकरौ अरु बंस ।
परिकर सु अंकुर श्लेष त्यों अप्रस्तुतौ परसंस ॥
परयायउक्ति गनाइए व्याजस्तुतिहु आक्षेप ।
बहुरो बिरोध बिरोधभास बिभावना सुख खेप ॥ ३७४ ॥



सु बिशेष उक्ति असंभवौ बहुरे असंगति लेखि ।
पुनि विषम सम सु बिचित्र प्रहषन अरु विषादन पेखि ॥
कहि अधिक अन्योन्यहु विसेष व्यघात भूषन चारु ।
अरु गुंफ एकावली मालादीपकहु पुनि सारु ॥ ३७५ ॥

पुनि यथासंख्य बखानिए परजाय अरु परिवृत्ति ।
परिसंख्य कहत बिकल्प है जिनके सुमति संपत्ति ॥
बहुर्यो समाधि समुच्चयो पुनि प्रत्यनीक बखानि ।
पुनि कहत अर्थापत्ति कबि जन काव्यलिंगहि जानि ॥ ३७६ ॥

अरु अर्थ अंतरन्यास भूषन प्रौढ उक्ति गनाय ।
संभावना मिथ्याध्यवसितऽरु यों उलासहि गाय ॥
अवज्ञा अनुज्ञा लेस तदगुन पूर्वरूप उलेखि ।
अनुगुन अतदगुन मिलित उन्मीलितहि पुनि अवरेखि ॥ ३७७ ॥

सामान्य और विशेष पिहितौ प्रश्न उत्तर जानि ।
पुनि व्याज उक्ति रु लोकउक्ति सु छेकउक्ति बखानि ॥
वक्रोक्ति जानि सुभाव उक्तिहु भाविकौ निरधारि ।
भाविक छविहु सु उदात्त कहि अत्युक्ति बहुरि बिचारि ॥ ३७८ ॥

बरने निरुक्ति हु हेतु पुनि अनुमान कहि अनुप्रास ।
भूषन भनत पुनि जमक गनि पुनरुक्तिवद आभास ॥
युत चित्र सँकर एक सत भूषन कहे अरु पाँच ।
लखि चारु ग्रंथन निज मतो युत सुकवि मानहुँ साँच× ॥ ३७९ ॥

---

× या अलंकार नामावलींत भूषण कवींनीं १०५ अलंकारांची अनुक्रमणिका दिली आहे. परंतु ग्रंथांत याहून अधिक अलंकार निर्दिष्ट आहेत. लुप्तोपमा, न्यूनाधिक रूपक व गुप्तोत्प्रेक्षा हे कवीनें मुख्य मानिले नसावे ह्मणून त्यांचीं नांवें अनुक्रमणिकेंत नाहींत.

### दोहा

सुभ सत्रहसैं तीस पर बुध सुदि तेरासि मान।
भूषन सिवभूषण कियो पढ़ियौ सुनो सुजान ॥ ३८० ॥

## आशीर्वाद-मनहरण दंडक

एक प्रभुता को धाम, सजे तीनो बेद काम, रहैं पंच आनन षडानन सरबदा
सातौ बार आठौ याम जाचक नेवाजै नव अवतार थिर राजै कृपान हरि गदा।
सिवराज भूषन अटल रहै तौलौं जौलौं त्रिदस भुवन सब गंग औ नरमदा।
साहितनै साहसिक भौंसिला सुरज बंस दासरथि राज तौलौं सरजा थिर सदा ॥
॥ ३८१ ॥


### पुनः । दोहा

पुहुमि पानि रबि सासि पवन जब लौं रहै अकास।
सिव सरजा तब लौं जियौ भूषन सुजस प्रकास ॥ ३८२ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८०
संग्र :

अलंकारवर्णनं समाप्तम्.

शुभमस्तु.



## आर्या

सत्राशें तीसोची, त्रयोदशी, शुक्लपक्ष बुधवार ॥
त्या दिवशीं ग्रंथ रची 'शिवभूषण' बुध वरोत हा हार ॥३८०॥

## आशीर्वाद-मंदारमाला

एक प्रभुस्थान, जें ब्रह्मरूपी, जया वर्णिती वेदही सोत्सुक ॥
शोभो सदा तें; स्थिर श्रेष्ठ राहो हरी, शंभु तत्पुत्रही कार्तिक ॥
जों भूवरी नर्मदा-देवगंगा, शिवे[2] श्रेष्ठ हा तोंवरी सुस्थिर ॥
श्री सूर्यवंशांतल्या रामराज्यापरी भोसले-भूप राजो चिर ॥३८१॥

## आर्या

महि, जल-सागर, रवि-शशि, वायु, गगन राहतील जोंवरि हे;
तोंवरि वाच नृपाळा! शिव-सरजा भूवरी स्वकीर्तिसवें ॥३८२॥

इतिश्री कविभूषण विरचिते शिवराजभूषणे अलंकार वर्णनं समाप्तम्.

॥ शुभमस्तु ॥

---

१ संवत १७३० मधील त्रयोदशी, शुक्लपक्ष व बुधवार या दिवशीं शिवराजभूषण ग्रंथ समाप्त झाला असें कवीनेंच लिहून ठेविलें आहे. महिना मात्र दिला नाहीं. तो कित्येकांच्या मतें श्रावण असावा व कित्येकांच्या मतें कार्तिक असावा. ज्या हिंदी ग्रंथावरून हें रूपांतर केलें त्याचे संपादक मिश्र बंधूंच्या मतें श्रावणमास ग्राह्य आहे.

२ शिवाजी.

* मराठी *

# शिवराज-भूषण

काव्य समाप्त.

# काव्यकिरण-माला.

## ( सं० व प्र०—मि. का. मोरटके )

**अगाऊ त्रैवार्षिक वर्गणी ५॥ रु.**

या मालेतून आजवर बाहेर पडलेलें वाङ्मय काव्यरसिकांस आनंद देणारें तर आहेच पण मराठी काव्याचा काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्यांस तें अत्यंत उपयुक्तही आहे. सामाजिक, ऐतिहासिक सुंदर खंडकाव्यें, चित्रकाव्यें, स्फुटकविता, रसाळ अभंग, मार्मिक निबंध हिंदी काव्यांचीं भाषांतरें अशा विविध प्रकारांनीं वरील वाङ्मयास शोभा आली असून त्यायोगानें मराठी भाषेंत महत्त्वाची भर पडली आहे. महाराष्ट्रीयांनीं मालेस आश्रय देऊन असें वाङ्मय संग्रहीं ठेवणें जरूर आहे. साडेपांच रुपये वर्गणींतून बारा आणे प्रवेश फी वजा जातां बाकीच्या पावणेपांच रुपयांची फेड दर तीन महिन्यांनीं एक याप्रमाणें पुस्तकरूपानें केली जाईल. पुस्तकांची किंमत चार ते आठ आणे पर्यंत असते. वर्गणीदारांस पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळतें.

मालेतून आतापर्यंत पुढील पुस्तकें नियमितपणें प्रकाशित झालीं आहेत

| | | |
|---|---|---|
| १ | महाराणा प्रतापसिंह ( खंडकाव्य ) ... ... | ८८ |
| २ | मान्यांची यमुना ( ,, ) ... ... | ८६ |
| ३ | चंडीशतक ( चित्र काव्य संग्रह ) ... ... | ८१२ |
| ४ | कविता-वनिता ( वनिताविषयक सुंदर कवितांचा संग्रह ) | ८८ |
| ५ | कुमुद्वती ( स्फुट कविता ) ... ... | ८८ |
| ६ | शिवप्रताप ( भूषण कवीच्या शिवाबावनीचें भाषांतर ) | ८८ |
| ७ | मराठी कवि-विरुद्ध प्रो० पटवर्धन ( निबंध ) | ८६ |
| ८ | अभंगमाला ( आवृत्ति दुसरी ) ... ... | ८७ |
| ९ | नन्दिनी ( सचित्र खंडकाव्य ) ... ... | ८८ |
| १० | मराठी शिवराज-भूषण ... ... | रु. १॥ |

हीं सर्व पुस्तकें श्री. कवि तिवारी ह्यांचीं आहेत.

**मि० का० मोरटके**
**जळगांव, पूर्व खानदेश.**

# तिवारींचीं पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| * | १ | काव्यकुसुमांजली ( छापत आहे ) ... ... | ८१० |
| | २ | काव्यरत्नमाला ... ... ... ... | २॥ |
| | ३ | मनोहरलीला ( खंडकाव्य ) ... ... | ८६ |
| * | ४ | प्रसन्नराधा ,, ... ... | ८६ |
| * | ५ | महाराणा प्रतापसिंह (खंडकाव्य, सचित्र २ री आवृत्ति) | ८१० |
| | ६ | मान्यांची यमुना ,, ... ... | ८६ |
| | ७ | अभंगमाला ( आवृत्ति दुसरी ) ... ... | ८७ |
| * | ८ | कविता–वनिता ... ... ... | ८८ |
| × | ९ | शिवप्रताप ... ... ... | ८८ |
| × | १० | कुमुद्वती ... ... ... | ८८ |
| | ११ | मराठ्यांची संग्रामगीतें ( सचित्र आवृत्ति ६ वी ) | १। |
| | १२ | झांशीची संग्रामदेवता ( आवृत्ति तिसरी ) ... | ८१० |
| * | १३ | राधामाधव ( सचित्र खंडकाव्य ) ... ... | ८१० |
| | १४ | चंडीशतक ( चित्रबंधासह ) ... ... | ८१२ |
| | १५ | मराठी कवि विरुद्ध प्रो. वा. ब. पटवर्धन बी. ए. | ८६ |
| | १६ | नंदिनी ( सचित्र खंडकाव्य ) ... ... | ८८ |
| | १७ | मराठी शिवराज–भूषण ( सचित्र ) ... | १॥ रु. |

पहिलीं दहा पुस्तकें मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत आणि ह्याच दहा पुस्तकांस महाराष्ट्रग्रंथोत्तेजक मंडळ इंदूर यासंस्थेनें बक्षिसें दिलीं आहेत.

१।२।५।६।७।९।१० व १५ ह्यानंबरचीं बुकें नागपूर विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत.

* ह्या पुस्तकांस दक्षिणाप्राइज कमेटीनें बक्षिसें दिलीं आहेत व × ह्या पुस्तकांस शिफारस पत्रें दिलीं आहेत.

**सर्व पुस्तकें मिळण्याचे पत्ते:—**

१ **दु० आ० तिवारी**, जळगांव पू. खा.

२ **परचुरे आणि मंडळी**, माधवबाग मुंबई नं. ४

३ दत्तात्रय–कंपनी जळगांव, पू० खा०

REFBK-0004490

REFBK-0004490